न. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. ३६५

सं. ठाणें

विषय कादंबरी

संग्रहालय क्रमांक ९३७

लेख गोरा स रिसबुड

पुस्त वसंत कोकिळा

सन १८७६

का १३८ — १८७६

अनु २३१

# प्रताप को किल्ला

लेखक

नारो सदाशिव रिसबूड

साहाय्यक

केशव सदाशिव रिसबूड

जगद्धितेच्छु [illegible]

शिळाछाप

सन १८७६

किंमत ॥ रुपया

१३८
३८५१

आणि

विषयीं

॥ऊ तय. र केलेला नकाशा असल्यामुळें, व मूळही इमारत बांधणारांचे पुढील असलेले मनोगत भाव आगाऊ त्यांजकडून समजून घेण्याचें कारण नसून पुढें असा अकस्मात् दुर्धर दुःखप्रसंग येऊन ठेपेल हें मनीं मानसीं स्वप्नीही न आल्यानें ते त्यांचे हेतू जेथल्या तेथेंच गुप्त राहिल्या मुळें, मागील तयार झालेल्या कामाची सुंदर रचना, रूबक व डौलदार घांट, व इमारतींत जागजागीं पाहिजे तशा आश्चर्य व आनंदकारक केलेल्या नाना प्रकारच्या सोयी, इत्यादिकांच्या साजणुकीस यथा योग्य साजेलसें पुढीलकाम मज कडून तयार होण्याचा वास्तविक संभव नाहीं; तथापि यथा बुद्धीनें होतील तितके लक्ष्यपूर्वक परिश्रम घेऊन मी आपल्याकडून खालच्या कामास बहुशः साजेलशी वरील तीन मालं कामाची बांधणी करून एकंदर होणें असणारा हा नऊमाळी महाल पूर्ण केला आहे. याचें अवलोकन होऊन पसंत करण्याचा सर्व परी अधिकार विद्वज्जनांना मे। उग ... प्रमाणें, ते ... इया त्या प्रथम यत्नाकडे विद्वजन्म साफल्य व्हाया॥

कंदूर या सर्व कामाच्या पसंतीचार्य सिद्धी म जाया ॥३॥

पूर्वक देतील, अशी मी मोठी उमे ...

श्री ईश्वरी धिग्मती वर्णित्याची॥

ह ...र्णेलें यांनजें चित्स्वरूपी ४ ॥

...लें. आपल्या इच्छ ...

...सलें नाहीं. भुवनसुंदरास

॥ वि ...

...त नाहींत. व त्याची बुद्धि तीक्ष्ण

... राज्यकामीं प्रस्तुत हाच योग्य आहे;

म्हणून त्याचे मतानेंच भुवनसुंदरास

... त्याचे इच्छेनुरूप हवाशीर राजबागा आणि

... कोणतेंही त्यास कमी न पडण्या विषयीं

# वसंतकोकिळा

ठाणें

## भाग पहिला.

श्लोक. (इंद्रवज्रावृत्त)

जोशारदेशीं प्रियचित्तगामी विद्याकलासर्वजयालगामी॥
भक्तादिसे माउलि हेतुकामी वंदीन सत्यागणनायकामी॥१॥
आहे चि जो पूज्य जगत्त्रयासी जो वारि कर्मत्रय अप्रयासीं ॥
हा ग्रंथ गद्यात्मक चालवाया मत्प्रार्थना त्या जगदीश पायां॥२॥

(मालिनी वृत्त.)

मनस मन हरीच्या श्रीगुरूच्या हि पायीं॥
करुनि नमन भावें अर्पिनों मी उपायीं; ॥
भव भय शमवाया जन्म साफल्य व्हाया॥
स्मरण जगवराचें कार्य सिद्धीस जाया॥३॥

(भुजंग प्रयात.)

जग हे घ्यलीला न ज्या ग्रंथिं साचो ग रीत्रै रवरी धिग्मती वर्णित्याची॥
म्हणोनी परब्रह्म वेदांत रूपी इषद् र्णिलें यां न जें चित्स्वरूपी ४ ॥
लें. आपल्या इच्छ म.

(शार्दूलविक्री त.

सलें नाहीं. भुवनसुंदरास
चित्तारंजन व्हाव यास बरवी वि त नाहींत. व त्याची बुद्धि तीक्ष्ण
देते तोष जशी प्रिया पतिमन:
रीउ कामीं प्रस्तुत हाच योग्य आहे;
आहे अद्भुत गोष्ट ही न
म्हणून त्याचे मतानेंच भुवनसुंदरास
झाली भूषणरूप शा
त्याचे इच्छेनुरूप हवाशीर राजबाग आणि
पूर्वी फणिपूर (ना
कोणतेंही त्यास कमी न पडण्या विषयीं
कुंदविलास या नामें

आणि ऐश्वर्याचे तुलनेस येण्या सारखा कोणी समर्थ नव्हता. त्याची सर्व राष्ट्रांवर मोठी जरब होती. व तो आपल्या प्रजेस यथान्याय वागवून तिला सुख देत असे. कदाचित् कोणी दुःसंगानें दुष्टाचरण करणारा दिसल्यास त्या विषयीं क्षमा न करतां त्यास धर्मशास्त्रा प्रमाणें व नीतीप्रमाणें तत्काल शासन करीत असे, त्या मुळें तो तापशमनार्थ दीन जनांस केवळ सीतकरसा भासे. सदैव सज्जनांचा दास होऊन याचकांची इच्छा द्रव्यदानानें पूर्ण करीत असे. देवस्थानें, धर्मादाय, देणग्या, इनामें, जहागिरी, वर्षासनें इत्यादिकांचा पूर्वापर चालत आलेला क्रम मोठ्या उत्सहानें सुरू ठेवून तो कोणाच्याही उपमर्द करीत नसे. अशा प्रकारें राज्य चालवून त्यानें जगांत मोठी कीर्ति संपादन केली होती. आणि ईश्वराचे ठिकाणीं त्याची पूर्ण भक्तीही तशीच होती. त्याचे सदाचरणाचे सहवासानें त्याची सर्व प्रजाही आपआपले धर्मप्रमाणें आचरण करून अंतर्यामीं पापपुण्याची भीति वागवून आनंदांत असे. आणि हाच न्यायी राजा आपणावर सर्व काल असो अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करी. याचे द्रव्यभांडारांत अमूल्य जवाहीर आणि रोकड नाणें विपुल असे. तसेच त्या राज्यांत मोठमोठाले श्रीमंत गृहस्थ, सभ्य सावकार पुष्कळ असून त्यापार धंदे उत्तम प्रकारें चालत असल्यानें त्याची राजधानी केवळ लंकेचे उपमेस योग्य होती. यथाकालीं

...ानें देश सुपीक आणि निरोगी असे, व श्रीं-
...टुंबें निर्धन नव्हतीं. असो त्या राजास प-
...च झाले, ते केवळ स्वरूपानें प्रतिमन्मथ-
...ावडतीं अशीं राजानें त्यांचीं नां-
...चें भुवनसुंदर हीं प्रीतीनें ठेवि-
...हुतेक लेखन, शास्त्र, कला-
...वेद्या, निशाण मारणें, छ-

डी पट्टा बोंथाटी खेळणें, घोडा भरधांव काढणें, मंडळावर धरणें, त्यावर बसून व्याघ्रादि भयंकर श्वापदांची शिकार करणें या सर्वांत ते निष्णात झाले होते, व राज्यनीतीचाही प्रकार बराच त्यांस कळूं लागला होता. भुवनसुंदराचा स्वभाव फारच शांत असून वडिलांचे सेवेंत तत्पर असे. कुसुमचापाचा स्वभाव थोडा हूड आणि विलासी होता व इच्छे प्रमाणें वर्तन करण्याचें त्यास फार प्रिय वाटे, तरी त्यानें वडिलांची आज्ञा कधींच अवमानिली नाहीं. इतकेंच कीं, सदैव एके ठिकाणीं न राहणें इष्टमित्रांचा सहवास करणें, विहारास जाणें, बगिच्यांतून मेजवान्यादि उत्तम प्रकारचा ऐष आराम भोगणें इत्यादि विलास त्यास फार आवडत. उभयतां बंधूंची इतकी प्रीति असे कीं, एकमेकां वांचून त्यांस चैन पडत नसे. त्यांनीं कोणतेंही काम करणें तें निर्द्रोहतेनें व एक विचारानें करावें. दोघेही मुलगे आज्ञापर व वयांत आलेले आणि सर्व राजकीय नीतींत व माहितींत प्रवीण आणि ज्यांचा लौकिक सर्व लोक उत्तमरितीनें गात आहेत, हें जाणून आतां आपले राज्याची सर्व व्यवस्था कुसुमचापानें पहावी असें राजाचे मनांत आलें तें त्याणें दरबार भरून सर्वांस बोलून दाखविलें; परंतु त्या वेळेस या कामीं थोडिशी त्याची अप्रीति दिसल्या वरून प्रधानादिकांचे मतें तो यौवराज्याचा अधिकार त्यानें भुवनसुंदराकडे सोपविला. हें पाहून कुसुमचापासही आनंद होऊन ह्मणूं लागला कीं, हें फार चांगलें झालें. आपल्या इच्छे प्रमाणें इतक्यांत आपले अंगीं राज्य ओझें बसलें नाहीं. भुवनसुंदरास हे विलास मज प्रमाणें विशेष आवडत नाहींत. व त्याची बुद्धि तीक्ष्ण आणि प्रकृति सौम्य असल्यानें राज्यकामीं प्रस्तुत हाच योग्य आहे; तरी कु० स वाईट न वाटावें म्हणून त्याचे मतानेंच भुवनसुंदरास देव वर्तन करीत असे. व त्याचे इच्छेनुरूप हवाशीर राजबागा आणि बंगले व द्रव्यादि देऊन कोणतेंही त्यास कमी न पडण्या विषयीं

तो फार जपत असे. राजासही त्याचा स्वभाव द्रूढ आणि विलासी आहे असें कळून आलें. तरी तो निर्द्रोही आणि आपले विषयीं व भावा विषयीं काळजी घेणारा आहे असें समजून त्याचें तें कांहींच मनांत न आणितां तो उभयतांवर सारखें प्रेम ठेवी. व आपणा सारखा धन्य कोणीच नाहीं असें मानून असे. त्यानें त्या उभयतां मुलांचे लहानपणापासून विधियुक्त सर्व संस्कार मोठे उत्सहानें करून त्यांचीं लग्नेंही आपले बरोबरीचे व्याही पाहून त्यांच्या कन्येशीं करून दिलीं. एके दिवशीं तो कुसुमचाप आपले वसुमती नामें प्रिय मानिले त्या मित्रा बरोबर अरण्यांतील बागबगीचादि वनश्रीची शोभा पहात व हवा घेत प्रातःकालचे चार घटिका दिवसाचे सुमारास घोड्यावर बसून आपल्या शहरांत नित्या प्रमाणें येत असतां कोणी एक वृध्द फकीर रस्त्यांतून मधुर व उंचस्वरानें वहिरवीचे रागांत सवाल टाकीत चालला आहे, त्याच्या अंगांत हिरवी पेहेरण, डोकीस उभी टोपी. कंठांत सहेली आणि हिरव्या पिवळ्या व तशाच आरक्त मण्यांच्या माळा लोंबत आहेत; त्याचे हातांत एक तारेचा पिंजरा असून त्याचा सतेज व आनंदी चेहरा आहे, व हातावर त्या पिंजऱ्यांतील अतिगोजिरवाणा एक कीरपक्षि बसला आहे, त्याचें शरीर भव्य असून, केशरी वर्ण पृष्ठभाग व हरित वर्ण मस्तक, नीलवर्ण कंठनाल, व पीतवर्णानें उदर सुशोभित असा होता. व तो आपल्या गुणांच्या आणि शरीर कांतीवरील कृतीच्या तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या आरत्यतेंत गर्क आहे, आणि नाना प्रकारच्या भाषेंतील मंजुळ व मनोवेधक शब्द बोलत व क्रीडा करीत आहे; व त्या फकिरास सवालाची बरोबरीनें साथही करीत आहे. असें त्या कुसुमचापनामें राजपुत्रानें पाहिलें. तेव्हां त्यास आश्चर्य वाटून त्यानें त्या फकिरास एके बाजूस हाक मारिली. मग त्या पाशीं मधुर भाषण बोलून त्यास आपले सुंदर बनांतील विश्रांत मंदिरीं नेलें. आणि

त्या पक्ष्या विषयीं कांहीं हकीकत विचारली. तेव्हां फकिरानें त्या चे अत्युत्तम गुण व चतुरता, धूर्तपणा, उपदेशपर भाषण व प्रामाणिकपणा यांची तारीफ करून असा पक्षी जगतीतलावर दुसरा मिळणें दुर्लभ आहे, ज्यास याचा सहवास घडेल तोच याचें माहात्म्य जाणील असें सूचविलें. राजपुत्राचें अंतःकरण त्या जवर अतिशय लुब्ध होऊन गेल्या मुळें याची संगती आपल्यास फारच सुखावह होईल. असें वाटून मोठ्या नम्र भावानें व विनयपूर्वक त्या फकिरा पाशीं तो पक्षी त्यानें मागितला. तेव्हां फकिरास पूर्ण माहित जाहलें कीं, हा राजपुत्र आहे याचें वचन मोडिल्यास आपलें चांगलें व्हावयाचें नाहीं. आणि केवळ हा यास नजरच घेत नसून या बद्दल संतोषानें एक लक्ष रुपयेही देईन असें ह्मणत आहे असें जरी होतें, तरी त्याच्या प्रेमाच्या कळवळ्या अंतरीं सदृढ असल्यानें त्याची त्या पुढें खातर न वाटून माझे मनांत पक्ष्यास द्यावें असें येत नाहीं असें त्यानें स्वच्छ सांगितलें. या वांचून दुसरे द्रव्यादिक सौख्यावर माझी प्रीतीही बसत नाहीं. आपण या आग्रहीं पडूं नये. हें माझें प्रार्थना पूर्वक मागणें मान्य करण्यास आपलें परोपकारी हृदय आपणास बुद्धि देवो. कारण या माझ्या प्राणप्रिय मध्वनाथ पक्षिवराचा वियोग मला खचित खचित् दुःखजन्य होईल, आणि याचीही मजवांचून निःसंशय भ्रमित मति होईल. हें ऐकून राजपुत्र ह्मणाला, फकिरबुवा, हें सर्व तुमचें बोलणें या वेळेस मीही मान्य करावें खरें; परंतु काय करूं! तुह्मीं जे जे या सुरंग पक्ष्याचे सद्गुण मजपुढें प्रदर्शित केले, त्या प्रत्येकाचें निरनिराळे विचार तरंगांचें हृदी करण एकत्र होऊन याजवर किंबहुना तुमचे पेक्षांही मदंतःकरण विशेष जडलें आहे. जर आपण ही कृपा मजवर कराल तर आपले उपकार यावज्जीव मी मानून याच्या योगानें सदैव आनंदांत दिवस

घालवीन. असा त्याचा प्रेमनिग्रह पाहून तो मध्यनाथ कीरपक्षी स
जलनेत्र होत्साता ह्मणाला, हो, मम प्राण त्राते, महंमद अल्ली बाबा,
जरी एकमेकांचा या समयीं वियोग होणार, तथापि मी तुमचे पा
शीं असाच पुष्कळ दिवस असलों तरी माझे हातून आपले उपकार
कशानें फिरावयाचे आहेत? अनायासें परमेश्वरानें आज कांहींत-
साच योग आणिला आहे हें जाणून दुःख न करितां मला त्या परोप
कारी आणि कनवाळू सद्गृहस्थाचे हवालीं करावें; ह्मणजे आप
णास जन्मभर सर्व कुटुंबा सहवर्तमान काळजी रहित निःसंशय
परमेश्वर चिंतनीं उरलेला कालावधी घालविण्यास हें द्रव्य साध
नभूत होऊन माझें स्मरण नित्य राहील. तशांत या कनवाळू
गृहस्थापाशीं मी राहिलों तर आपल्या भेटीचा वारंवार लाभ हो-
ण्याची मला यांजकडून मनाई होईल असें वाटत नाहीं. पाहि-
जे असल्यास ही अगोदर कबुली करून घेणें, असा द्रव्ययोग पुनः
कशानें येणार आहे? या योगानें माझेंही कर्तृत्व मी सफल मा
नून याहूनही अधिक आपलें अभीष्ट होण्या विषयीं ईश्वरा पा-
शीं प्रार्थना करीन. दुसऱ्याचें दुःख होईल तितकें निवारण करावें
हा माझा पहिला नियम आहे, व आपणा प्रमाणेंच या राजपुत्रा
वरही माझे चित्तीं प्रेम उत्पन्न होत आहे. जर आतां माझा समा
गम यास न होईल तर याची विचित्र स्थिति होईल, हें उघड या
चे मुखचर्ये वरून दिसत आहे. यावरून दुःख दिल्याचा आरोप
मजवर येत असल्यानें या नियम भंगामुळें मी दोषी ठरेंन. आणि
माझा जो कांहीं हेतु सत्पात्रीं समर्पण करण्याचा आहे त्यास या
सारखा अन्य कोणी ग्राहक दिसत नाहीं. आपण कदाचित् ह्म-
णाल कीं, हेतु अर्पण करण्यास मी नव्हतों कीं काय; परंतु सांगि
तल्यास आपल्यास योग्य नसून त्याची फलप्राप्ति आपल्या सा
रख्या वयातीत व उदासीन पुरुषास कधींही व्हावयाची नाहीं. जसें

बकुलीचे वृक्षास पित्तशामक बिहीचे फळाची, आणि बिहीचे वृक्षास त्या पूज्यमान वृक्षपुष्पाची प्राप्ती नाहीं तद्वत् ये विषयीं प्रकार आहे. या वरून सर्व आपण जाणलेंच असेल. मला जरी हे पाय दुराव-ल्यानें दुःख होणार आहे तरी आपली तांदणूक सौख्यांत निश्चयानें होईल हें जाणून त्याचा वेळोवेळीं विसर पाडीन. त्या पक्ष्याचे विचारी भाषणानें व हा राजपुत्र माझें जन्माचें दारिद्र्य दूर करून याचेंही-संगोपन मजप्रमाणेंच उत्तम करील असें मनांत आणून मोठ्या दुः खानें देतों असें त्यास कबूल केलें; आणि त्या पक्ष्यास हातावर घेऊ-न त्याचें चुंबन करून पुनः हा आतां कशाचा दृष्टीस पडतो, याचे संगतीचे सौख्याचा आज शेवटचा दिवस आहे ह्मणून सद्गद अंतः करणानें त्याचे मुखाकडे न्याहाळून पहात असतां हुंदका दाटून फ-किराच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्याचे दुःखानें पक्ष्याचेही नेत्र भरून येऊन कंठ सद्गदित झाला. असा त्यांचा परस्पर प्रेमा पाहून राजपुत्रास फारच गहिंवर आला. तेव्हां कांहीं वेळानें तो मोह आव रून फकिर ह्मणाला, हे पक्षिराया, तुझा या हतभाग्यास वियोग हो-णार हें स्वप्नींही नव्हतें. आतां पुनश्च ह्मणून सौख्याचा वारा मला प्रा प्त होण्याची आशा उरली नाहीं. परमेश्वराचे मनांत असेंच कराव-याचें रुचलें त्यास कोणाचा उपाय आहे! हा प्राणही गेला असता तरी तुला दुसऱ्याचे हातीं दिलें नसतें; परंतु येथें उपाय राहिला ना हीं. महीचें पालन करणार हे ईश्वरी तेजाचेच पुतळे आहेत. यांची आज्ञा भंग करणें हें दोषास मुख्य कारण असून शिवाय सत्ताधीश असल्यानें कर्तुं अकर्तुं शक्ति यांच्या अंगीं वास करीत आहे. असो. आ ह्मां फकिरांस या विषयीं कांहींच नाहीं; परंतु तुझा कांहीं हेतु आणि याचें तुजवर मनापासून प्रेम जाणूनच या दुःखोदराची क्षणिक शां ततेची सोय मी करून घेत आहें. आतां सदैव पूर्ववत् माझें स्मरण असावें ह्मणून पुनः एकवार पोटाशीं धरून त्यास त्या भाग्यशाली

राजपुत्राचे हातीं दिलें आणि ह्मणाला महाराज, आतां सर्वस्वीं या मा झ्या प्राणपक्ष्याचें पुत्रभावानें पालन करून प्राणापलीकडे याच्या जी वाचें सदैव रक्षण करावें; कारण हा स्पष्टवक्ता असून यास खोटें आव डत नसल्यानें एकादे वेळेस तरी प्रसंगोपात कदाचित् याजवर आ- पली अवकृपा होण्याची वेळ येईल. ती न येण्या विषयीं हे माझे बो- ल जीवीं धरावे, ह्मणजे हेच तशा वेळीं आपणास शांत करतील. चां- गले वस्तूवर सर्वांचा डोळा असतो; या साठीं यास दुसऱ्यावर विसंबूं नका. अंजीर, डाळिंब, पेरू हीं फळें मुख्यत्वें करून याच्या आवडीचीं आहेत. शयनास मृदुशय्या आणि सुगंधिक पदार्थांवर तशीच स- हल करतानां संभाषणाची यास अभिरुचि आहे. प्रातःकालपासून प्रहर दिवस पर्यंत आणि तिसरे प्रहरा पासून अस्तमान पर्यंत याची वृत्ति आनंदित असते. त्याच वेळीं बहुत करून कोणतीही मसलत अ थवा सल्ला घेऊन सर्व याचे ह्मणण्या प्रमाणें वर्तन केलें असतां त्याच प्रमाणें लागलेंच अनुभवास येत आहे. कितीही कोणी संक टांत अथवा दुःखांत असो तथापि अहाहा!!! या माझ्या लाडक्या म- ध्वनाथ पक्षिरायाच्या मुखांतून ते वेळेस समयानुसार जे कांहीं शब्द निघतात त्यांच्या योगानें दुःखाचें तात्काल परिमार्जन होऊ न आणखी याचे शब्द माधुरीचे, चातुर्यतेचे बोल ऐकण्याकडे सर्व चित्त लागतें. किती ह्मणून याचे गुणांचें वर्णन करूं! जितकें करावें तितकें थोडेंच आहे. याचें अंतर होणें हेंच कम नशीब समजलें पाहि जे. असो, खेद करून उपयोग नाहीं. असा विचार करून शेवटीं राज पुत्रास ह्मणाला, यापेक्षां सुज्ञांस विशेष काय सांगावयाचें आहे! म- वोपरी याची काळजी जन्मदात्या प्रमाणें आपणास असो. असें बोल तानां अत्यंत गहिवर येऊन पक्ष्याकडे पुनः प्रेमदृष्टीनें न्याहाळून पहा त असतां ते वेळेस त्याचें शरीर कंपायमान होऊन तो अगदीं म्लान मुख जाहला आहे, हें पाहून त्यास ह्मणतो बा पक्षिराया, मी समजलों

तुला दिवसांतून एकवार सौम्य उष्ण सुगंधोदकानें मंगलस्नान करण्याची आणि तीन वेळ साजुक फलहारादि खाणें तशी-च मिश्टोदकपान करण्याची संवय आहे ती मी यःकश्चित् गरिबानें शक्त्यनुसार तुझे हेतनुरूप संभाळून मिजास राखिली. मग हे तर सार्वभौम ऐश्वर्य मंडित कमलेचें निवासस्थान आहे. येथें तुझी कोणतीही या दयार्द्र दृष्टि औदार्य संपन्नाचे हातून उणीव न पडतां सर्वथैव इच्छेनुरूप विहारादि प्रकारचें तुला सौख्य-प्राप्त होऊन तूं आनंदांत राहशील. आता या तुझे विरहें करून माझ्या मात्र स्थितीचा कोणते प्रकारें बदल होईल याचें अनुमान हेंच कीं, वारंवार तुझे स्मरणानें चित्त आनंदित न राहतां सार्वकालउ-दासीन राहील. यास तुझा व माझा उपाय नाहीं. " बुद्धिःकर्मानु सारिणी!" असो. ज्या ज्या वेळेस जसजसें सुख दुःखादि प्राप्त व्हा वयाचें असतें तदनुसार तें प्राप्त होतें. आणि आतां कितीही दुःख केलें तरी उपयोग नाहीं. ते त्याचे बोलपक्ष्याचे हृदय मर्मस्थलां तील ममत्व कंदास स्पर्श करील होत्साते त्यां पासून मोहवायु उत्पन्न होऊन त्यांच्या अभिनव शक्तीनें आंतील प्रेम जल संच याचे तुषार बनून ते नयन द्वारें आपलेकडून त्याचा ताप शम नार्थ वारंवार दृष्टिगोचर होऊं लागले. येरवरीस स्तब्धता आली तरी त्याणें त्याचे पायांवर नमनयुक्त लोटांगण घातलें, आणि हस्ताचें चुंबन करून लागलेंच उडून राजपुत्राचे मणिबंधीं प्रथम बसून नंतर मंजुळ शब्दयुक्त क्रीडा करीत स्कंधावर आरोहण केलें. असा चित्तवेधक पक्षी मिळाल्यानें राजपुत्रास धन्य वाटून बोलण्या प्रमाणें तेच वेळेस त्याणें द्रव्य आणवून अतिसंतोषानें त्या फकीरबुवाचे स्वाधीन केलें, आणि मध्यंतरींही कांहीं अडचण पडल्यास येऊन भेटण्यास सांगून त्याची सन्मानानें रवानगी केली. मग तेथें बराबर असलेल्या त्या वसुमति मित्रासमवेत कांहीं उत्साहिक गो-

ही सांगून मित्र आपले घरीं गेल्यावर त्यानें अगोदर एक हौसी जोगा स्कवर्णाचा पिंजरा आणविला. त्या मध्यें तन्हेतन्हेचे बैठकीचे खण होते. तसेच खाण्या पिण्याचे पेले ठिकठिकाणीं जडलेले असा, आणि त्यावरून भर्जरीच्या गोंड्याचे, मखमूचे, किनखापी, चित्रविचित्र कशिदा काढलेलेच झालरीदार पडदे होते. आणि बैठकीचें खणांत मृदु मखमालीचें अस्तरण व आंतून सदोदित सुगंध राहण्या करितां अत्तर अर्गजावकस्तुरीचीं पुडें दिलेल्या मृदु व जाळीदार वस्त्रांचे पडदे लावलेले होते. अशा शोभिवंत देखाव्याच्या अमूल्य तेजस्वी त्या पिंजऱ्यांत आपले हातानें त्यास कुरवाळून बसविलें. मग अवधि न करितां उत्तम फळें व मिशेरक आणवून त्याची खाण्या पिण्याची व्यवस्था त्या पेल्यांत अगोदर करून त्यानें आपले एकांतरंगम हालांत उपसर्गरहित एके हलक्यास तो पिंजरा लावून ठेविला. नंतर नित्य क्रमाकडे त्यानें आपलें मन वळविलें.

अशा प्रकारें तो मध्वनाथ पक्षी **कुसुमचापास** मनोत्साहिक प्राप्त झाल्या पासून त्याजकडे त्याचें सारें चित्त लागलें. नित्यशः त्या सह वर्तमान दोन दोन घटिका विनोदपर युक्तिप्रयुक्तीचीं संभाषणें करून त्याणें आपलें अंतःकरण रिझवावें. मध्वनाथानेंही त्याचें आपणावर विशेष प्रेम आहे असें पाहून त्याची वृत्ति सदैव आनंदित व उमेदयुक्त राहील अशीं उपदेशपर व विनोद हास्यादि प्रकारचीं रसिक भाषणें बोलून प्रसंगीं कांहीं युक्ति सांगून वारंवार त्यास संतोष द्यावा. त्या राजपुत्राची नूतन यौवनसंपन्न स्त्री असल्यानें तिजवर त्यानें इतके प्रेम असे कीं, नियम बांधलेल्या वेळे शिवाय तिचा एक घटकेचाही वियोग त्यास दुःसह होत असे. असें जरी होतें तरी त्या सद्गुणी पांखराचे ठिकाणीं निजपेक्षांही दिवसें दिवस अंतःकरणाची अंतर प्रेमवृत्ति अधिक जडूं लागली. कोठेंही त्याज वांचून विश्रांति वाटूं नये. सर्वकाल आपले दृष्टीसमोर त्यास असण्याचा यो-

जना करून ठेविली होती. कुसुमचापाचे स्त्रीचीही प्रीति त्याजवर बसून लालन करीत असे. एके दिवशीं ती विलोल नयना चतुर्थ दिवशीं आपल्या कोमलांगी दासीच्या हातानें उत्तम सुगंधिक तैलादि प्रकारचीं उटणीं अंगास लावून न्हाली. व भर्जरी बुटेदार चांदणीचा शालू नेसली व तशीच हिरकण्यांच्या जडाव केलेली सतेज कंचुकी अंगांत घातली. आणि मोत्यांचें पेंडें, चंद्रहारादि हिऱ्यांचे अमोल्य दागिने ठिकठिकाणीं अंगावर घालून ती मालती आपल्या ऐश्वर्याच्या व स्वरूपाच्या महत्वांत गर्क होऊन लागलीच कांचनमय आरशे महालांत परिचारिकांसह गेली. आणि त्या बिलोरी आरशां मध्यें आपला प्रतिबिंबित देखावा पहात असतां ते दिवशीं तिला त्या विषयीं कांहीं अप्रतिम भास झाला. खरेंच आहे जरी एकादी तारुण्यवती यःकश्चित निर्धनिकाची स्त्री असली आणि तिनें न्हाऊन साधींच वस्त्रें व भूषणें अंगावर घातलीं, तरी तिची तारुण्याची सतेज टवटवी तिच्या मुखश्रीस शोभवित आहे. मग ही तर लीलावती राजस्नुषा अलंकारमंडित असल्यानें कां शोभायमान दिसणार नाहीं? तेवेळेस तिला मजसारखी अन्यस्त्री रूपवती या भूतलावर नाहींच, असें निश्चयानें वाटून दासीकडे वळून ह्मणूं लागली कीं आज मी तुह्मांस कशी दिसत आहें? त्यांनींही चतुरस्रतेनें तिचे मर्जीचा कल पाहून तवियत खुष राहण्या साठीं तिचें असल्या पेक्षां विशेष सौंदर्याचें वर्णन करून ह्मणूं लागल्या. आपणांस वाटेल कीं, उगीच प्रशंसा करितां ह्मणून आजपर्यंत वर्णनीय असूनही या लावण्य चंद्राचें आह्मीं वर्णन केलें नाहीं, तरी स्वयंप्रकाश तेज आच्छादित होईल काय! आपल्या शरीर रूपी आकाशा वरील पूर्ण मुखेंदूचे सभोंवतीं कंठांतील नवहारांचीं रत्नें प्रत्यक्ष नक्षत्रां प्रमाणें सतेज दिसत असल्यानें आपले सर्वांगीं पूर्णिमेचा भास होत आहे. आज आह्मीं ओघानुसार आनंदानें सांगतों कीं, पृथ्वीवरीलच काय, परंतु स्वर्गस्थ अ-

असाही स्वरूप ख्यातीनें प्रख्यात मानिनी आहेत तरी त्यांनीं आपणा स पाहिलें नाहीं तों पर्यंत त्यांचा अभिमान स्थित आहे, असें आह्मां- स वाटतें. कदाचित् जर आपण इंद्रादि देवांच्या दृष्टीस पडलों तर तेही या अप्रतिम सौंदर्यास लुब्ध होऊन, या जगतीवर आपणास क्षणभरही न ठेवितां पुष्पकीं बसवून महोत्साहानें समागमें घेऊन स्वपुरीस नेताना कृतकार्य होतील. मग येथें आपला आह्मांस विर ह मात्र अवशिष्ट राहील. असो. आपल्या सारखें दुर्मिळ रत्न निर्मा- ण करण्यास विधात्यास किती वर्षें अनुष्ठान करावें लागलें असेल याचें अनुमान आमच्यानें होत नाहीं. या प्रकारचें त्या दासीचे मु- खांतून दिखिलेलें वर्णन ऐकतांच तिच्या उदरीं आनंद न मावून ती आपल्यास अंगीं धन्यता देऊं लागली. इतक्यांत एकांत रंगम- हालांत असलेल्या त्या पोपराच्या पिंजऱ्याकडे दृष्टि पोंचून यास ही विचारावें ह्मणून प्रेमानें आपले हातावर त्यास घेऊन ती ह्मणूं ला गली हे मध्वनाथ, माझे शृंगारभरित यौवनसंपन्न स्वरूपाची कां ति अतर्क्य मोहक असावी असें मला वाटतें, ये विषयीं तुझा स- त्य अभिप्राय कसा आहे हें अगोदर या माझे सतेज देहाकडे पाहू न सांग? या तिच्या भाषणानें तो धूर्त पक्षी फार बरें आहे ह्मणून लागलीच तिचे हाता वरून उडून त्या महालांतील खिडकीचे उंच झ रोक्यांत बसून ह्मणूं लागला तूं मला खरेंच विचारीत आहेस त्याअ र्थी या न्यायाचे कामांत मला निःपक्षपाती पणा धरला पाहिजे. प्रसंगीं ख रें असेल तेंच निदर्शनास येत असतें; मग तें कांहीं असो. त्यांतच वि- चारी मनुष्यानें समाधान मानिलें पाहिजे. रत्नाचे हार, बाहुभूषणें, उत्तम प्रकारचें सौगंधि चंदनादि विलेपन यांचें केवळ भूषण आहे असें नाहीं. निश्चयें करून निस्पृहतेनें सत्य भाषण करणें हेंच प्रा- णिमात्रास भूषण होय. "नान्नृतात्पातकंपरं" या महताचे वाक्या- नुरोधें करून माझें सदैव वर्तन आहे. हेंच परमेश्वर कृपेनें शेवटास

जावी. तुझ्या या प्रश्ना वरून मी मोठा संकटांत पडलों आहें, तथापि स्वहिताकडे लक्ष्य देऊन केवळ मनधरणीचें मी उत्तर देईन तर दोषा स पात्र होईन. हें भला विचारण्याची आज तुला कोणीकडून बुद्धि झाली कोण जाणे! वास्तविक आहे. "सुखदुःख समेकृत्वा लाभा लाभौ जयाजयौ" सदैव कोणतेंच स्थिर रहात नाहीं. यापासून एक मात्र आतां होणार आहे. तें हें कीं, आपणा उभयतांचा वियोग. असें त्याचे मुखांतील निस्पृहतेचें वाक्य ऐकून ती रोषयुक्त होत्साती विचा र न करितां त्यास ह्मणाली कित्येकांचे अंगीं ज्ञानाचा अभाव असून असा स्वभाव असतो कीं, आपल्याच महतीची ख्याती जगांत व्हावी आ- णि परक्यांचें खरें असलें तरी खोटें करून प्रसंगीं त्यास दूषित करावें. हें असो. जें बावनकशी सुवर्ण आहे त्यास कसोटी कशास पाहिजे. जें तुला खरें दिसेल तेंच शपतपुरःसर सांग. तिचा दुराग्रह जाणून त्य णाला तुझें वचन न मानणें हेंही योग्य नाहीं. असो. होणारे नियमा प्रमाणें कोणतेंही घडत असतें. पहा केवळ प्रशंसा करण्या सारखें तुझे स्वरूपांत महत्व नसून तारुण्य, ऐश्वर्य, आणि अमूल्य अलंकार याचें तुझे अंगीं ऐक्य असल्यानें मात्र तूं शोभनीय दिसत आहेस. वास्तविक पाहिलें असतां इतकेंच कीं या प्रदेशांतील ज्या कांहीं सा धारण रूपवती स्त्रिया आहेत त्यांपेक्षां कांहीं अंशीं तुझे अंगीं अ- धिक तेज असावें. या भूमंडळा वरील अन्य प्रदेशीं ज्या कांहीं नूतनयो षा, मानवती चंपकहेमवर्णा, हरिणाक्षी, संभोगशीला मी पाहिल्या आ- हेत, त्यांच्या आणि या तुझ्या सौंदर्याची तुलना केल्यास त्यांच्या नुसत्या पा दनखांची देखील कांति तुझ्या वक्त्रास लज्जा देणारी होईल. मग अ न्यत्र नेत्रादि प्रीतिपात्र गात्रांची स्पर्धा करण्याची वर्धमान शक्ति तुझे अं गीं कोठून येईल? त्यांतही हंसगति; प्रमत्ता, रूपवती, गुणाढ्य, अशीजी लोकमोहिनी मी पाहिली आहे तिच्या कांतीची अर्थात बरोबरी तुला तर कोठून होणार? मी उगीच या आर्जवी स्त्रियां प्रमाणें चित्त रंजविण्या-

स तोंडावर गोड बोलून बक्षिसी मिळवणारा पक्षी नव्हे. तूं काय पाहिलें आहेस? खद्योताचे दृष्टीस जावत् सूर्यबिंब आलें नाहीं तावत् तो आपले क्षुल्लक दीप्तीची प्रतिष्ठा मानीत असतो. तुझी गति किती? अवदुंबर फलांतील कीटकांस जसें तेंच ब्रह्मांड भासतें तद्वत् हें आपल्या ठिकाणीं तुझें वर्णन आहे. व्यर्थ तूं आपलेंच मुखानें निजस्वरूप गुणाची गरिमा वर्णन करून आपल्यास अंगां धन्यता देत आहेस. बहुरत्ना वसुंधरा असतां इजवर कोठें कशीं रत्नें वास करितात याचा कोणास काय अंत लागणार आहे. इतकेंच कीं, हें कळूनही अज्ञान संबंधानें तूं आपलाच हेका शेवटास नेणारी बायको मला दिसतेस. या मूर्खदासी मजहूनही तुला प्रिय वाटून यांचे असत्य आर्जवी बोल हे फोल असूनही तूं अमूल्य मानीत आहेस. आणि मी तुला अप्रिय असल्यानेंही माझे सत्य भाषणाचा सखोल अर्थाचा तोल सहन न करून त्यास आंदोलन देण्याचें तुझे मुखश्री वरून या वेळीं चिन्ह दिसत आहे. असें त्याचें भाषण हेतुउच्छेदक तिला दुःसह होऊन तें जिव्हारीं स्पर्श झाल्यानें क्रोधाग्नि भडकून अतिशय संतापानें तिचे तळव्याची आग मस्तकीं गेली. ती पासून उत्पन्न झालेला धूम्र नेत्रांत शिरून त्यांस त्यानें अतिशय आरक्तता दिल्यानें त्यांतून अश्रुप्रवाह वाहूं लागले. अन्य गात्रेंही संतापाग्नीनें संतप्त होऊन गेलीं, कर्णरंध्रांतून वाफा निघूं लागल्या, शरीर कंपायमान झालें आणि त्या त्वेषांतच याच वेळेस या पक्ष्याचे प्राण घ्यावेत म्हणून ती त्याजला धरण्यास झरोक्याकडे गेली. परंतु तो तिचे हातीं कशाचा लागतो. तिचा हस्तस्पर्श होण्याचे पूर्वींच तेथून उडून तो बाहेरच्या बगीच्याचे सन्निध एक उंच नारळीचे वृक्षावर जाऊन बसला. जे प्राणी धूर्त आहेत ते विचारानें प्रसंगानुसार आपले रक्षणाची पूर्वींच अशी कांहीं योजना करीत असतात. तो जर त्या प्रसंगीं तिच्या हातीं लागला असता तर लागलीच तिनें त्याचा प्राण घेतला असता. मग तो उडून जातांच आ-

पला अपमान करून हा पक्षी दगा देऊन गेला, हें जाणून संतापानें पूर्वी पेक्षां अतिशय जिवाच्या अट्टहास्य करून धरणीवर आंग टाकून ती आक्रंदत पडली. कंठांतील तेजस्वी नवरत्न हार तोडून त्यांतील ऐक्य भावानें गुंफित असलेलीं रत्नें व मुक्ताफलें यांस विभक्त करून एकमेकांस स्वेच्छाचारपणें विहार करण्यास परवानगी दिली. तो आलेला क्रोध सहन न होऊन तिनें हातानीं चोळून चोळून आपले डोळे सुजविले. सर्व दिवसभर विकल होऊन तळमळ लागल्यानें अतिशय त्रास होऊन तिनें अन्नपाणी सेवन केलें नाहीं. नित्या प्रमाणें त्या रात्रीं स्वात्रीची अकृत्रिम मैत्री असल्यानें तो तिचा श्रीमंत प्रियकांत छत्र प्राप्त होणारा, प्रीतिपात्र, हेतुपुरःसर, सर ज्यास नाहीं असा कुसुमचाप एकांत संधीस तिच्या अंतःपुर मंदिराचे सरजांत येऊन अवलोकन करीत आहे तों ती अतिरागी प्रियतमा मोठा आकांत करीत धरणीवर लोळत पडली आहे. आज काय हें असें झालें कोण जाणे असें ह्मणून तो तिच्या समीप येऊन हस्तास स्पर्श जों करीत आहे तों तीं झटका देऊन क्रोधदृष्टि होत्साती मागें सरली, तरी प्रीतीस्त व तिला ह्मणाला हा आजचा तुला संताप आणि दुःखकारक प्रसंग कशानें आला हें अगोदर सांग? या वांचून या वेळेस माझी अंतःकरणाची वृत्ति चमत्कारिक झाली आहे ती पूर्व स्थितीवर यावयाची नाहीं. तुझा कांहीं हेतु समजल्या वांचून मी तरी तुझें मनोदयानुरूप काय समाधान करावें? तुला कोणी दुष्टानें त्रास देऊन दुर्भाषण केलें असल्यास सांग. त्यास नीती प्रमाणें योग्य शासन करण्याचें सामर्थ्य या **कुसुमचापाचे** अंगीं आहे. किंवा कोणी अत्यंत निर्धन असून धनवान करावें अशी तुझी शिफारस असेल तर याच वेळेस तसें करीन. राष्ट्संबंधीं कोणावर संकट असून त्याचा पुढें नाश अथवा बंधन व मानहानी होण्याचा समय असतांही त्यास मुक्त करण्याची इच्छा असल्यास तीही पूर्ण करीन; परंतु हे प्रियभामिनी.

मजशीं प्रेमानें एकवार तरी बोल. अशी पुष्कळ तन्हेनें वारंवार ति
ची विनवणी करून अर्जवानें विचारूं लागला. परंतु व्यर्थ. तिचे मु
खांतून एकही शब्दोच्चार होत नाहीं असें पाहून तो महान् चिंतेंत
व्यापून गेला; कारण असा तिचा प्रकार झालेला कधींच त्याचे पहा-
ण्यांत आला नव्हता. तिनें तर अधिकच आकांत मांडला. हात,पाय
आपटून गडबडां धरणीवर लोळूं लागली. अश्रूंनीं सर्वांग भिजवून ओ
लें केलें. त्यामुळें मोह उत्पन्न होऊन पुनः पुनः तो दुःखाचें कारण ति
जला विचारूं लागला. कारण तें विचारल्या वांचून त्यास राहवेना. आ
तां आपण जर उत्तर न केलें तर निःसंशय इकडील प्रकृतीचें सारें
मन्वंतर फिरून स्थित्यंतर निरंतर होणार. यास अवंतर प्रत्यंतर
कशास पाहिजे. या लोकोत्तर अंतर्बाह्य प्रीतींत अंतर करणाऱ्या प्रा-
णप्रियाचे वदनाब्जास अकुंचितपणा आल्याचे चिन्हावरूनउघड दिस
त आहे,असें तिला वाटलें. तसाच इच्छिलेला हेतूही पूर्ण करण्यास
या वेळेचें भाषण आपणास सहाय होईल. आणि "अतिसर्वत्र व-
र्जयेत्" या म्हणीकडेही तिनें थोडेंसें लक्ष्य पुरवून लागलीच मोठ्या-
नें सुस्कारा टाकून किंचित् डोळे उघडून त्यास म्हणूं लागली अहो आ
जपर्यंत मी निश्चयानें मानीत होतें कीं,या आपल्या ऐश्वर्य सत्तात्म
क समर्थ आश्रयाचे बळें करून माझे मानीपणास किमपि धक्का पों
चणार नाहीं; परंतु त्याचा आज शेवट भलताच झाला. कायपहा!
त्या दुष्टानें माझी अब्रू घेऊन अंतःकरणास हृद्रोग लावला. याचें
दुःख मला सहन न होऊन माझी अशी अवस्था झाली, या मुळें इ
कडे येणें झालें तरी मला समजलें नाहीं. असें तिचें भाषण ऐक-
तांच त्याचे मनास कांहीं विपरीत भासून आपल्यास धिक्कार दे-
ऊन म्हणूं लागला कीं मी राजपुत्र सामान्य नसून जो माझा प्रग
र दर्प आहे त्याचें निवारण करून मला असा कलंक लावण्याचें
धारिष्ट कोणाचें झालें. काय चिंता आहे! आतांच अशाचें शीर

उडविण्यास मी सत्ताधारी असल्यानें मला काय अवघड! म्हणून सर्वांग थरारून अतिशय संतापानें आवेश येऊन तिला म्हणाला असें हृदयास झुरविणारें आणि वदनास कलंक लावणारें भाषण तूं काय बोलत आहेस? कोणीं तुजशीं भिन्न भावानें वर्तन केलें? हें विलंब न करितां अगोदर मला सांग म्हणजे आतांच कायतो ये विषयीं विचार होईल. या भाषणानें ती मनांत हर्ष पावून म्हणाली आरंभीं त्या कृतघ्न मध्वनाथ पक्ष्याचा प्राण घेतल्या वांचून हा माझा संताप अग्नि शमविण्यास कोणीं समर्थ होणार नाहीं. हो प्राणपति, पहा, त्या दुष्ट पक्ष्यानें आपल्यास न लक्षून साक्षभूत लक्षास बुडवून शेवटीं माझी स्त्रीसमूहांत निर्भर्त्सना व आपली निंदा करून तो अनुपकारी निघून गेला. सर्वांनींही माझ्या स्वरूपाची तारीफ केली आणि आपण तर वारंवार करीतच आहां. फार काय हें मोहक सौंदर्य आपणास क्षणभर ही वेगळें होऊं देत नाहीं, ही ज्यास्त प्रचीती आहेच. मध्वनाथ मला म्हणाला तुजपेक्षां रूपवती ऐश्वर्य संपन्न शशांकवक्त्रा शेंकडों स्त्रिया आहेत. पतीस च काय तूं प्रिय असशील ती असं . त्या दुष्टानें अगदींच मला तुच्छ करून टाकिलें, हें आपणास तरी रुचेल काय! तो कपटी मेंद जाते समयीं नेत्रांस पाणी आलेंसें करून मला पुनः निर्लज्ज तेनें म्हणाला (इकडचें नांव वारंवार घेऊन) तूं इतकें मात्र केलेंस कीं, आमच्या उभय प्रीतींत विघड पाडून एकमेकांचें अनिर्वाच्य सौख्य नाहिसें करून विरहांत पाडलेंस. भगवत् कृपेनें पुनश्च ऐक्य होई पर्यंत मध्यंतरींचे अवधींत या मध्वनाथाची कशी स्थिति होईल याचें आज सांगवत नाहीं. असो भगवतेच्छा. हे त्याचे कपटी बोल मी सर्व जाणत आहें. असा मानभंग करणारा पक्षी असून ही आपण त्यास आश्रय दिला आहांत हें आश्चर्य आहे. "मानोपि महतां धनम्" हें वाक्य ध्यानीं आणा. आज नाहीं तरी एकादे समयीं

आपलीही मानहानी करण्यास तो कृतघ्न कधींही चुकणार नाहीं. आतां त्याचा पूर्ण शोध करून गांठून त्यास जिवें मारल्या विना आपणाशीं माझी वाणी आणि अंतःकरण. सप्रेम वागेल असें मला खचित वाटत नाहीं. ह्याच निश्चय. हें अविचारी साग्र भाषण तिचें ऐकून त्यास दुःख व आश्चर्य वाटून मनांत ह्मणाला, अशा काममोहक स्त्रियेच्या वचनावर भरवसा ठेवून वागलों तर काय परिणाम होईल याचा नियम लागत नाहीं. काय पहा! या विनोदांत कांहींच अर्थ नसून या निर्दय स्त्रियेनें मला त्या वेळीं बुद्धिपुरःसर मोहपाशांत गोंवून माझे अंतःकरणाची एकाएकीं चमत्कारिक स्थिति करून टाकिली होती. सर्वोपरी स्त्रिया कापट्याचें मूळ आहेत. या विषयीं भर्तृहरीनें श्लोकीं वर्णन केलें आहे तें असें:—

श्लोक.

अनृतं, साहसं, माया, मूर्खत्वं, मति लोभता,
अशौचत्वं, निर्दयत्वं, स्त्रीणां दोषाः स्वभावजाः १

याचा अर्थ:— अनृत भाषण, साहस कर्म, कापट्य, मूर्खपणा, अतिलोभ, मलिनत्व, आणि निर्दयता असे दोष स्त्रियांचे आंगीं स्वभावतःवास करीत आहेत हेंच खरें आहे. विचारा अंतीं महानां माझ्या मध्यस्थाची योग्यता इतें सहवास असूनही न जाणून शेवटीं असा प्रकारही निदर्शनास आणला. मला अनुभवा वरून त्याचे खरे व न्यायीपणाची खात्री आहे. असा आतां अप्रतिम पक्षी पुनश्च कशानें मिळणार आहे! तो धूर्त होता ह्मणूनच या आततायी स्त्रियेचे हातून सुटला. नाहीं पेक्षां तेच वेळेस इचे हातून त्याचा अंत झाला असता. इला दया ह्मणून तिळमात्र नाहीं. आतां आशा तर नाहींच; परंतु तो सजीव असल्यानें एखादे वेळेस तरी परमेश्वर दयेनें मला खचित येऊन भेटेल. त्याच्या प्रीतिगुणाचे उमाळे पोटांत उभे राहून सर्वथैव सुचेनासें झाल्यानें कळवळून ह्मणतो हर हर!! हे पक्षिराया, जिवलग-

गा, मी तुला या निर्दयीचे परवशावर एकटें ठेवून फिरावयास अन्य स्थळीं कांहीं वेळ गेलों होतों. हें जाणें मला पश्चात्तापानें अतिशय दुःख देत आहे. पूर्वीच त्या फकिरानें कधीं असा प्रसंग येईल असें सुचविलें असून त्या विषयीं मीं विस्मृती ठेविली. कितीही आज्ञेंत वागून प्रेम दाखविणारी प्रीतींतील योषा असली तथापि तिचे हातून कोणते वेळेस कसें कर्म घडेल याचा नियम खात्रीनें कोणास लागणार नाहीं. याचें कारण सदैव त्यांचें चित्त अज्ञत्वामुळें चंचळ असतें. कितीही पति विद्वान्, कुलीन, नीतिशास्त्र निपुण, तरुण, ऐश्वर्यसंपन्न, ज्याचे अंगीं दातृत्वशक्ति व शृंगारादि प्रकारांत श्रेष्ठत्व ह्याचें गुरुत्व आणि अत्यंत प्रेमानें प्राणापेक्षां स्वस्त्रीस वागवीत असला तथापीही प्रसंगीं, स्त्रिया आपल्या इच्छे प्रमाणें वर्तन करण्यास कधींही चुकत नाहींत. मी आजपर्यंत अशीच इजशीं सप्रेम वर्तणूक ठेविली असून शेवटीं या पक्ष्यास मारल्या वांचून आपणाशीं मात्र उत्साहिक भाषणादि प्रकार व्हावयाचे नाहींत, असें हिचे मुखांतून वाक्य निघालें. असो. नंतर तो विचारी असल्यानें सर्व रागाची शांतता करून तिला ह्मणाला, बरें तर, तो पक्षी मिळतांच तुझे हेतूप्रमाणें मी करीन. आतां तूं आपल्या सर्व दुःखाचें परिमार्जन कर. केवळ हें पक्ष्याचें कृत्य इतकें निकरा जोगें तूं जें सांगितलेंस यावरून दिसत नाहीं. असें शेवटीं बोलून तसाच उठून आपले एकांत मंदिरीं श्रांत अंतःकरण होत्साता गेला. त्या पक्ष्या वांचून सर्वथैव त्यास उदासीनत्व प्राप्त होऊन कोठेंच क्षणमात्र चैन पडेना. मध्वनाथ केव्हां येऊन मला भेटेल या दुःख विचारांत निमग्न होऊन ह्मणतो, हर हर! त्या सारखा गंभीर, सद्गुणी व पूर्ण विचारी अन्य कोणी नसून त्याचे संगतीचे योगानें सदैव माझे अंतःकरणास प्रत्येक कामीं उभारणी येऊन दिवस आनंदांत जात होते, असे त्याचे अनेक प्रकारचे गुण आठवितांना वारंवार त्याच्या नेत्रांतून दुःखाश्रु वाहूं लागले. जेव्हां अगदींच काठें कर्मेनासें झालें

तेव्हां सर्वोपरी निराश होऊन, शोध करीत असतां दिवस अथवा रात्र आहे याचीही भ्रांति त्यास पडून शहरांतील व बाहेरील सर्व बागा, आमराया उंच उंच देवालयांचे शिखरांसभोंवतालचीं व चौफेर कोटावरील पक्षी बसण्याचीं गवाक्षें आदि करून सर्व शोधिलीं; परंतु त्याचा कोठेंच रूगावा लागेना. जेथें जेथें पक्ष्यांचा मेळा दृष्टीस पडे तेथें तेथें जाऊन, हे मध्वनाथपक्षिराया तुझा शोध तरी आतां मी कोठें करूं? असें दीन स्वरानें ह्मणून त्यानें चोहींकडे पहावें. कदाचित् आपले मंदिरीं आला असेल या आशेनें परत यावें तेव्हांमात्र कांहीं क्षुधितोदराची शांतता करावी. अशा क्रमांत एक पक्ष लोटून गेला. शेवटीं निश्चयानें तो आपणास भेटत नाहीं, कोठें तरी अन्य स्थळीं प्रीतीस्तव उदास होऊन गेला असावा हेंच खचित, असें वाटून प्रापंचिक सर्व उत्तम अवस्थेंतील असलेल्या सौख्यास तुच्छ मानून मध्वनाथ प्राप्त झाल्या व्यतिरिक्त पुनश्च स्वगृहीं यावयाचें नाहीं, त्याचें विरह दुःख सोशीत असाच अरण्यवासांत फिरेन असा निश्चय करून तो निघाला तो आसमंतभागीं व गांवोगांवचीं सर्व पक्ष्यांचीं स्थलें त्यांत कित्येक अवघड ठिकाणचींही त्यानें पाहिलीं तरी हेतुपूर्णतेचा समय आला नाहीं. आतां काय करावें? कोठें पहावें? तो मला कसा भेटेल? त्या दुष्टीचे क्रोधमुद्रेनें तो निरुपाय होऊन मला अंतरला तरी मी तेथें नसल्यानें भेटी वांचून जाणें त्यास महद्दुःखकारक होऊन वारंवार माझें स्मरण त्या प्रीतिपात्र मध्वनाथास झालेंच; काय पहा, हे पक्षिश्रेष्ठा, तूं मोठा शाहाणा ह्मणवीत असून असें करण्याचें कांहींच कारण नव्हतें. तिचा संताप जाहला होता तर तूं मोकळा असल्यानें लागलीच येऊन मला भेटावयाचें होतें. अनुभवावरून मजविषयीं तुझे मनाची खात्री झाली होतीच. आतां तुझें खाणें पिणें आदिकरून विहारादि विश्रांतिसौख्याची व्यवस्था काय असेल. सख्या, मजवांचून एक घटकाही तुला ज्ञात नसे. आतां तर कितीएक दिवस प्रस्तुत लोटून पुढें आणखी किती अवधि लागेल!!

हा वियोग तुला सहन तरी कसा होत असेल. नित्य दरबारांत आणि बागबगीच्यांत विहार करण्याची मज समागमें इतकी तुला संवय असे कीं, एक दिवस मी बाहेर न नेलें तर तुला चैन पडूं नये. माझेंच मन वेडें आहे!! तूं जेथें अससील तेथें कोणतेही गोष्टीची उणीव तुला तुझे चित्तवेधक सद्गुण पडूं देणार नाहींत. असा विलाप करीत एके दिवशीं एके अरण्यांतील निबिड आंबराईचे एके वृक्षाचे बुंधा खालीं अस्तमानाचे चार घटिका दिवसास तो विश्रांतीस्तव बसला. उपोषणामुळें त्याचे वदनकमलास म्लानता आली. घर सोडल्या पासून अन्नाचा लेश नाहीं. कोठे कांहीं कंदमुळें फळें मिळाल्यास सेवन करून दोन तीन अंजुली उदक प्राशन करीत असावें. अशानें काय होणार. ज्यास नानातऱ्हेचे विलासादि उपभोगांची तसीच सुग्रास अन्न खाण्याची संवय त्या राजपुत्राचा एका पक्ष्यासाठीं असा मनोनिग्रह झाल्यानें तो आशानिर्मुक्त होऊन त्याची अशाप्रकारची स्थिति झाली हेंच उदाहरण सर्वांनीं लक्ष्यांत वागवून सर्वऐश्वर्यविलासादि सौख्याचे ठिकाणीं सदैव अप्रीति ठेवून दृश्यमान पदार्थ सर्व क्षणिक जाणून असे प्रकारची उदासीन वृत्ति प्रपंचांत धारण करून एक सच्चिदानंद परमेश्वराचे ठिकाणीं सदैव निश्चयानें चित्त ठेविलें असतां त्यांस प्रपंच साधून परमार्थाचीही प्राप्ति होईल यांत संशय नाहीं.

अशा समयास एका एकीं त्याचे हेतुनुरूप पैंजणांचा झणत्कार आणि कांहीं खुणेचा मंजुळ ध्वनि त्याचे कानीं आला. त्या बरोबर आपले जिवलग पक्षिरायाचा हा शब्द आहे असें ओळखून सद्गदित-अंतःकरण होत्साता प्रफुल्लितवदनानें जिकडून शब्द निघाला त्या वृक्ष शाखेकडे लक्ष्य लावून पाहतां कांहीं पक्ष्यांचे मेळ्यांत त्याणें आपला तो जिवलग मध्वनाथ पाहिला. मग काय विचारावें? त्यास अनिवार्य गहिंवर येऊन दीर्घ स्वरानें हाक मारून ह्मणाला हे जीवींच्या जिवलगा पक्षिराया. तुजवांचून भ्रमिष्ट होऊन वायां जात

असलेल्या कुसुमचापाची तुला दया येऊन आज अनुपम्य दर्शन देऊन यास धन्य केलेंस. आतां कृपा करून सदय अंतःकरणानें सत्वर येऊन तूं चुंबन दिल्या खेरीज माझी प्रकृति सुधारणें कठिण आहे. हे त्याचे कोमल शब्द ऐकून मध्वनाथही गहिवरून ह्मणाला, महाराज, माझीही आपणा वांचून अशीच प्रकृतीची स्थिति जाहली आहे; परंतु काय करूं? प्रस्तुतचा हा समय माझा सन्निध येण्याचा नसून कदाचित् आलोंच तर पुढील परिणाम मला निश्चयानें दिसत आहे. कारण जरी मी निरपराधी आहें तरी अंतरंग प्रियेकडे जसें चित्त तसें मजवर बसेल काय? तिणें निश्चयानें मला मारण्यास सांगितलें असेल हें खचित; तथापि माझी पूर्ण खात्री आहे कीं, ती गोष्ट आपले अंतःकरणानें नाकारली असावी. तरी एकवार संताप आला ह्मणजे त्याचें शमन होई पर्यंत चित्तवृत्तीचें स्थैर्य नसतें तसें होण्यास आणखी कांहीं मुदत पाहिजे ह्मणून वर्तमानकालीं एथूनच आपणास नमन करावें हें बरें वाटतें. जरी माझे अंतःकरणांत आपणास भेटावें असें वारंवार येतें तरीही प्रस्तुत माझी आशा व्यर्थ आहे. काय पहा!! विचारल्या वरून खरा प्रकार मी आपले राणीस सांगितला असून तो तीस न रुचून अहंपणानें उलटें मजवरच शस्त्र धरण्याचें मांडलें. असो परमेश्वराची मर्जी; एवढेंच कां कर्मी असावें. इतके दिवस आपली भेट होऊन आपल्यास सर्व झालेला खरा प्रकार सांगून आज्ञा घेऊन अन्य देशीं जावें असें मनांत होतें, तो हेतु आज पूर्ण जाहला. आतां आज्ञा असावी. आपल्या अंतःकरणाची शुद्धि होऊन माझें अंतर्यामापासून स्मरण केव्हां होईल ही आज्ञा सांगून ठेवावी, ह्मणजे त्या नियमा प्रमाणें पूर्ववत् आपणापाशीं येऊन वास करीन. या पायांचे उपकार यावज्जीव हा मध्वनाथ पक्षी विसरणार नाहीं. या साठींच या नगरीं प्रतिमाशीं एकवार तरी येत जाईन. याचें कारण

आपल्यास पाहिल्या वांचून माझे दिवस सुखाचे जातील असें मला वाटत नाहीं. जरी मजविषयीं मनशुद्धि होणार नाहीं ह्मणूनआपण सांगितलें तरी हा नियम जन्मभर चालवीन. असें बोलून पक्ष्यानें प्रेमाश्रु जीवनाची वृष्टि त्या कुसुमचापावर केली. एक वार कायती आपली आज्ञा झाल्या वांचून एथून माझें पाऊल निघत नाहीं. अशी त्या पक्ष्याची रसभरित चित्तास कळवळविणारीं प्रीतियुक्त मंजूळ भाषणें ऐकून आतां आपल्यास हा खचित सोडून जातो असें वाटून राजपुत्र सद्गदित अंतःकरण होत्साता विरह दुःखानें विव्हल झाला. पक्ष्यासही त्याचें खरें अंतःकरण समजून सोडून जाणें उचित वाटेना. पुनः त्यास कुसुमचाप ह्मणाला, मी निश्चय पूर्वक सांगतों कीं, तुजवांचून माझीही अशीच व्यवस्था होईल, हें जाणून कृपा करून येऊन मला सौख्य द्यावें; जरी ती वामांगी माझें प्रीतिपात्र आहे, आणि तिचे वचनांत सर्वथैव मी वागतों असें तुला वाटतें, तरी किंचितही तुला दुःख देणार नाहीं. हे माझे बोल सत्य मानून मला विरह समुद्रांत पाडूं नको. असें त्याचें प्रेमाचें निष्कपट भाषण ऐकून फार चांगलें आहे, जी माझी मनीषा होती तीच पूर्ण झाली, मला आपणा व्यतिरिक्त अन्यस्थलीं राहणें एक दिवसही वर्षा प्रमाणें होईल, असें ह्मणून लागलीच मंजुळ ध्वनी करीत सन्निध येऊन त्याणें त्याचे हस्ताचें चुंबन केलें. तेव्हां राजपुत्राचे पोटीं आनंदांकुर उद्भवून त्याणें त्यास कुरवाळून पोटाशीं धरून आश्वासनयुक्त आपले सौख्यकारक विश्रांत मंदिरीं नेलें. कदाचित एथें हा पक्षि असल्याचें तिला समजेल ह्मणून गौप्य राहण्या साठीं मजवांचून या एकांत महालीं आह्मे खेरीज कोणाचाच प्रवेश होऊंनये. अशी तेथील बंदोबस्ता कडील मुख्य खासगी विश्वासू पटाइतास सक्त ताकीद देऊन त्याचें खाणें पिणें आदी करून सर्व उत्तम प्रकारची त्यानें व्यवस्था ठेवि-

ली. तेव्हां पासून त्या स्त्रिये विषयीं कुसुमचापाची अप्रीति होऊन सदोदित त्या विश्रांत मंदिरीं राहण्याचा निश्चय केला.

---

## अंक २रा.

### श्लोक.

वसंत तिलका.

जें एकवार वरिलें दृढ मानसानें ॥
तें कार्यहो कगर निंद्यहि थोर सानें ॥
तत्प्राप्तिवीण सहसा प्रिय त्यां न भावे ॥
भोगीति दुःख किति लोक अशा स्वभावें १

शिखरिणी.

असे दुर्वांछा ती षड्रिपु नसे पूर्ण ह्रदयीं,
नमुक्तीतों आली जंव नच परं ज्योति उदयीं;
अहं ब्रह्मोस्मीहें स्मरण जरि जीवाशिंच घडे,
तया सत्संगानें सुखद पद कैवल्य उघडे. २

पुढें एक दोन दिवसांनीं त्या मध्वनाथाचें चित्त स्थिर होऊन तो पूर्ववत्‌आनंदांत आहे असें कुसुमचापानें पाहून त्यास आपले हस्तावर लडिवाळपणें घेतलें. आणि कुरवाळून ह्मणाला सख्या, तुझा सहवास मला फारच सुखावह झाला आहे. तुजवांचून दुसरी वस्तु कोणतीच प्रिय दिसत नाहीं. आणि तूंही मला प्रिय मानीत असल्यानें थोडेंसें इतिहासपर विचारावें असें माझे चित्तांत उद्भवलें आहे. तें जरी मोठें महत्वाचें आहे तथापि तूं मला ममत्व भावानें निवेदन करशील हें मी निश्चयानें जाणतों. आणि तुझे मुखांतून तें ऐकल्या वांचून मदांतःकरण कधींही स्वस्थ व्हावयाचें नाहीं. त्याचे चित्तांतील हेतु नकीनें जाणून मध्वनाथ ह्मणाला असें परक्या सारखें संकोचानें मित्रा कां विचारीत आहेस? आतां ज्या पेक्षां तुझा व माझा स्नेह निष्कपट झा-

ला त्यापेक्षां तुझी आज्ञा मला मान्य करणें भाग आहे. आणि सर्वस्वी हा देहही तुझाच आहे. जें विचारणार तें मला अवगत मात्र असलें पाहिजे.

**राज० कुसु०**.— पहा आज पर्यंत माझी प्रियतमा जी मालती तिज सारखी अन्यस्त्री रूपवती कोठें नसेल असा जो माझे मनांत अतिशय मह होता तो साम्र तुझा आणि तिचा जो कांहीं विनोदपर जाहलेला संवाद तो ऐकिल्यानें नाहिंसा होऊन त्या विषयीं आतां अगदीं शंका उर ली नाहीं. तूं ज्या वधूचें तिजपाशीं वर्णन केलें आहेस ती कोठील, को णाची असून पूर्वापर तिची हकीकत कशी आहे हें मला अगोदर सां ग? कारण तुझे मुखांतून जीं भाषणें निघतात तींच खरीं अशी मा झी खात्री आहे.

**मध्व०**.— ही जरी गोष्ट महत्वाची आहे आणि सांगितल्या पासू न माझे मनास दुःख आणि तुला अत्यंत विरह होणार तरी याच आज्ञे नें मला सांगण्यास उमेद आली आहे. सर्व जादूचें मुख्य स्थान, पूर्वा पार गोडबंगाल्यांत एक **मणिपूर** ह्मणून मख्यात शहर आहे, तेथील सर्व ऐश्वर्य मंडित (नागभाली) राजाची कन्या जिचें नाम **वसंतको- किला**, ती सौंदर्यगुणाची सीमा आहे. तिच्या स्वरूपाचें प्रस्तुत थोडें व र्णन करितों. आतां तें सांगण्यास तुजपुढें संकोच युक्त अंतःकरण असल्या नें माझा अधिकार जरी पोंचत नाहीं तथापि त्यास संस्कृत वाणीच्या आश्रयाचें साह्य देऊन कथन करितों; त्यांतील गोष्पालंकार शब्दा- र्थाची अभिरुचि जाणण्यास तूं समर्थ आहेस. ज्या नवयौवन संप न्नेचें सदैव प्रफुल्लित आणि गंभीर, ज्यांत लीलायुक्त मंदहास्य खेळ त आहे असें अत्यंत मोहक तेजस्वी चंद्रा प्रमाणें वर्तुळ मुखकम ल. ज्यांत नील माणिक्य प्रभेचें वास्तव्य स्थित आहे, अशी जिची बाल हरणी सारखीं अत्यंत, शोभाय मान, विशाल नेत्रकमलें, जिच्या- नील वर्ण भृकुटि धनुष्यास लज्जा देणाऱ्या व अर्धचंद्राकृति आणि कज्जलाचे पिसाऱ्यानें चित्तास आकर्षण करणाऱ्या शोभनीय, जिच्या

शरीराची कांति सुवर्ण चंपका सारखी. जिच्या तारुण्य मधुवनांतील उरस्थल वृक्षशाखेवर चक्रवाकपक्षियुग्मानें स्तनरूपी अधिष्ठानच काय आहे. त्याचे आंतील स्फुरण जागृती मुळें त्यांवरील सोमकांत मण्याचे मालेसह रत्नहाराची चांचलता वारंवार दृष्टि गोचर होत आहे. जिची अंगकोमलता कमल मालेसही परुषत्व ह्मणजे कठिणत्व देणारी आहे. जी यौवन भारानें नम्र झाली असून केश कलाप उत्तम सौगंधिक द्रव्य सहाय्यानें वर्धनीय श्रेष्ठत्व पावून जी पूज्य मान रसा तिच्या नमन हेतूस्तव सरसावून वृद्धि पावत आहे. जिच्या कमला सारख्या आरक्त नखांच पद्मराग मण्याची कांति हरण करणाऱ्या गोंडस हस्तांचे मणि बंधांतून रत्नकंकणें आणि सरळ बोटांतून रत्नमुद्रिका लकाकून त्याचा शरीरावर देदीप्य प्रकाश पसरत असल्यानें त्या आनंद कंदर्प निधान रूपिणीचे ते हस्त बालेंदूच काय आहेत असा प्रथम दृष्टी बरोबर भास होतो, व जिचे गज छाव्याचे शुंडादंडापरी विराजमान भुजादंडांतून हरितवर्ण पाचू, नीलमणि, आरक्त माणिक्यें, पुष्पराग आणि शुभ्र हिरे अशा तेजस्वी रत्नांचा जडाव केलेल्या बाजुबंदादि बाहुभूषणांचें प्रज्वलित तेज एकत्र होऊन तें शरीर जलाशयावर पसरून त्याजवर नेत्रादि त्यांच्या विलोकन किरणांच्या मिश्रणाचें परावर्तन होत असले वेळीं त्या नयनाभिरामेच्या अंगीं इंद्रधनुष्याचा देखावा उद्भवत आहे. जिच्या पीयूषरसें करून स्निग्ध असलेल्या पातळ अधरोष्ठावर शोणितवर्ण सुरंग कांति खेळत आहे. ज्या कृशोदरीचे कटीचा समावेश मुष्टिभागाचिआवरणांत आच्छादित होत आहे. पंचपल्लवी रत्नग समुच्चाई विशाल वेणीचा बुचडा बांधला ह्मणजे त्या समस्त शृंगारविनोदशीलेच्या मस्तकास कृत्तिकापुंजासारखी अद्वितीय शोभा दिसते. अग्निमय भृकुटीनें आकर्षित केलेल्या सुंदर आणि चतुर नीलोत्पल कांतीनें हरण करणाऱ्या अशा जिच्या अर्धवीक्षणकटाक्षबाणांच्या पिसाऱ्यांचे प्रहार ज्याजवर

[library stamp]

होतील त्याचें उद्धरण त्या दिव्योषधी चतुरश्रेष्ठ वल्लीचा हस्तस्पर्श होईल तरच होईल नाहीं पेसां विरहवेदनेनें सर्व शरीर दग्ध होऊन तो प्राणी गतप्राण होईल यांत संशय नको. मी तिच्या वदनास चंद्राची उपमा दिली तथापि तीही त्या निर्दोषीला कमीच आहे. कारण चंद्राचे अंगीं पांडुरतेचा दोष आहे इच्या अंगीं तो मुळींच वास करीत नाहीं. चंद्रविकासिनी कमळिनी जशा चंद्रोदया बरोबर विकसित होतात तशा सूर्यविकासिनी प्रफुल्लित वदनानें आपल्या सोज्वलित कांतीसहसा मोन्याहोऊन आपणास वश होत नाहींत, ह्मणून नित्यशः ऐश्वर्य मंडित शशि उदय काळीं क्रोधयुक्त होत्साता आरक्तता धारण करून प्रगट होतअसतोपरंतु त्या तद्दर्शना बरोबर स्वभावतः आपलीं वदनें अकुंचितपणानें मिटून घेतात-त्या योगानेंच त्याचे अंगीं पांडुरतेचें वास्तव्य जाहलें आहे; पहा, कोणीही एकादा आपला कार्यभाग सिद्ध होण्याचे कामीं प्रथम उभारणीनें झटून शेवटीं तो सिद्ध झाला नाहीं तर खिन्न होऊन तेजहीन जसा होतो तद्वतच चंद्राचे स्थितीचें मान जाणावें. सारांश त्या पूर्ण शशांक वक्त्रेचे वदनकमलास कधींही म्लानता नसल्यानें तें वदन प्रफुल्लित असतें, व ज्यांत मंदहास्य स्थित आहे. त्या कीरनासिकेचे अंगीं जात्यासुगंध दरवळित असून त्यावरून केशर कस्तुरीचेंही नित्य चर्चन असल्यानें तिचें मनोहर मंदिर घ्राणेंद्रियाचें केवळ विश्रांतिस्थान आहे, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. जिच्या सुरंग सतेज आणि टवटवीत कपोलावर आरामांत विहार करितांना चालण्याचे कधीं कधीं श्रम होऊन त्यापासून उत्पन्न होत असलेला जो घर्म बिंदूंचा समुदाय त्यांवर तिच्या सुरेख कर्णांतील जडित तानवडें, सुरखादार मौक्तिकांचे काप आणि रत्नफुलें यांच्या आंदोलनानें अनर्घ्य तेज वरचेवर पडून त्यांचा त्यांत प्रतिबिंबित भास होत आहे. ज्या रातोत्पल मृदुलतेचे चरण कमलांतील कर्णेंद्रियांस तोष देणारा नूपुरांचा ध्वनि ऐकूं आला ह्मणजे त्यांत भ्रमरांचा समुदाय स्वेच्छाचारपणें मंजूळ शब्दयुक्त रुंजी घालीत आहे काय असें

वाटतें. पहा साक्षात् मन्मथही शंकराच्या भयें करून सर्व काल त्या मदिरेक्षणेचें दास्यत्व स्वीकारून तिजपाशीं राहिला असावा. तिची अमृतमय दृष्टि ज्यावर फिरेल त्या ठिकाणीं तो दग्ध असतांही सजीव होऊन आज्ञा होण्याची मार्गप्रतीक्षा करून जरी हात जोडून उभा असतो, तरी तो तिला अप्रिय भासून कोणतेंच सेवेचें काम अद्याप पर्यंत तिनें त्याजपासून घेतलें नाहीं. एखादे समयीं ती कमनीय बाला आपले सुवर्णरेखांकित रमणीय महालाचे खिडकींत स्वकीय बाह्य आरामांतील वायुमिश्रित सुगंधसह हवा घेत बसली असतां तिचे हस्तपाद संबंधीं आरक्त रत्नापरी नखांची पंक्ति पाहून प्रत्यक्ष दाडिमी बीजाची कल्पना करून पक्ष्यांचे समुदाय त्यांचें सेवन इच्छेनें अगदीं सन्निधान पावून लडिवाळपणानें तिचा आश्रय करीत आहेत. जिचे कंबुकंठांतून तांबूल रागाची सुरखी प्रदर्शित होत आहे. असो या प्रकारें करून तिचें अवर्णनीय सौंदर्य वर्णन करण्यास मी समर्थ नाहीं. प्रत्यक्ष इंदिराच दुसरा देह धारण करून या भूमंडलावर इच्छेनुरूप प्रगट झाली आहे, असें वाटतें. तिची ज्यास प्राप्ति व्हावयाची असेल त्याचे पुण्याची तुलना स्वतः विधात्याच्यानेंही करवेल कीं नाहीं या विषयीं संशय आहे. माझें कांहीं पूर्वार्जित उदयास आलें ह्मणून मला तिचे दर्शनाचा तरी लाभ झाला. अहाहा!!! काय तिचें तें मोहक सौंदर्य!! कीं ज्या अवलोकना बरोबर तदाकार वृत्ति होऊन त्या पासून क्षणभरही वेगळें राहवत नाहीं. असें तिचें लोकोत्तर सौंदर्याचें वर्णन ऐकताना तिची सर्व प्रकारें त्या **कुसुमचापाचे** डोळ्यां पुढें मूर्ति उभी राहून ती आतां आपणास मिळेल तरच देहाचें सार्थक आहे, नाहीं पेक्षां जन्मास येऊन व्यर्थ आहे, असें त्यास वाटून त्याचे शरीरीं रोमांच उभे राहिले. पूर्वस्थितीच्या वृत्तींत पालट पडून जिकडे तिकडे तिचाच भास दृष्टीस मोर होऊं लागला. तो विचारी असल्यानें वारंवार विवेक करी तरी तो निर्फळ होई. अशी त्याची वृत्ति अनावर पाहून पक्ष्यानें त्यास हाक

मारून कांहीं पूर्व स्थितीवर आणिलें, आणि ह्मणाला या साठींच महाराज ही गोष्ट आपणास सांगण्यास इच्छित नव्हतों. तुह्मीं असे वेड्यासारखे कां झालां आहांत? नुसत्या वर्णनानेंच तुमच्या अंतःकरणानें अशी चंचलता कां धरिली? कदाचित् देव वशात् ती सौदामिनीप्रत्यक्ष दृष्टीस पडेल तर काय परिणाम होईल? या विषयीं या वरून बोलण्यासच नको. अशा अप्राप्य वस्तूचा हेतु विचारी पुरुषांस धरणें योग्य नाहीं.

कु० चाप :– मध्वनाथ राया, तूं म्हणतोस हें सर्व खरें; परंतु आतां तो विचार राहिला नाहीं. मी सर्व लज्जेचा त्याग करून तुजपाशीं बोलतों. कारण आतां असें न करीन तर माझे जीविताची मला आशा सोडली पाहिजे. तूं आपल्या अभिनव वक्तृत्व शक्तीनें तिच्या प्रत्येक अवयवाचें वर्णन मजपुढें करून त्या वसंतकोकिलेची मूर्ति माझे दृष्टी समोर उभी केली आहेस, कीं जी कधींही वेगळी होऊं नये. आतां जिकडे दृष्टी लावण्यास जावें तिकडे तीच संचार करीत आहे असें दिसतें. तो तिचा भास एकप्रकारें मला मोठा सौख्यकारक भासतो. आणि विचारा अंतीं तिच्या अस्तित्वाचा या ठिकाणीं अपरिचय येत असल्यानें दुसरे प्रकारें शरीरीं विरह वेदनेची पीडा होत आहे. आजपर्यंत माझ्या अंगीं असे प्रकारची विरहबाधा कधींच झगटली नाहीं. आतां तें कांहीं असो. तूंच जर कृपा करशील तर हा तुझा प्रिय कुसुमचाप जगांत कांहीं दिवस वास करील. असे त्याचे निर्वाण शब्द ऐकतांच त्यास मर्सी ह्मणाला ही तुझी व्यर्थ आशा आहे. जी वस्तु स्वप्नांतही दर्शनास अशक्य तिजविषयीं जन्मपर्यंत यत्न करूनही शेवटीं तिची भ्रम हीच अवशिष्ट प्राप्ति समजली पाहिजे. अज्ञान समजुतीनें जसें बालक, चंद्र हस्तांत येण्याची इच्छा करितें तद्वत हें आहे. सख्या तुझे वृत्तीस असा विपर्यास तर कधीं होऊं नये. असाच आज पर्यंत माझे मनानें दुराग्रह धरिला होता.–

वास्तविक आहे, जावत्कालपर्यंत लीलावती स्त्रियांचे अमोघ दृष्टीप्रहाराची हृदयावर प्रेरणा झाली नाहीं तावत्कालपर्यंत पुरुषाचे अंगीं विवेक, कुलीनपणा, पांडित्य आणि विचारशक्ति हे गुण राहतात. परंतु येथें तसा प्रकार दिसत नाहीं; केवळ वर्णनानेंच तुझी अशी कां अवस्था झाली? यास काय ह्मणावें! दोन्हीं सौख्यांस अंतर पाडण्याची ही योजना आहे, असें संभाषण चाललें असतां रात्रींचे आठ वाजले अशी मुख्य जमादारानें आंत येऊन वर्दी देतांच मध्वनाथानें, त्यास स्वस्थ अंतःकरण करून आतां भोजनास उठावें, या विषयीं एखादी तडजोड निघाल्यास विचार करून उदयीक आपणास सांगेन असें कळविलें, तरी त्याची वृत्ति स्वस्थ न होतां कोणते यत्नानें ती प्राप्त होईल? सर्व राज्य हें तिजवरून ओंवाळून टाकीन अशा विवंचनेंत उठून त्याणें सरासरी अन्नसेवन केलें. आणि एकांतीं पलंगावर एकटाच जाऊन निजला; परंतु झोंप कशाची येते? कोणत्याही रितीनें मध्वनाथाची समजूत करून त्याजपासून आपला कार्यभाग सिद्ध करून घेतला पाहिजे. आणि तिचे प्राप्तीचा मार्ग या वांचून कोणासही अवगत नाहीं असा ध्यास लागून ती सारी रात्र तळमळत अलोचन त्यानें उजाडविली. सूर्योदय होतांच अगोदर त्याची खाण्या पिण्याची उत्तम व्यवस्था करून तृप्ति आनंदित झाल्यावर त्यास ह्मणाला हे जीवींच्या जिवलगा, मी जें तुला आपलें ह्मणविलें आहे तसेंच तूंही मला आपला प्रिय मानून माझें दुःख निवारण करशील अशी जी आशा होती ती समूळ नाहिशी होण्याचा प्रसंग दिसत आहे. एक तूं साह्य असल्यास हें कार्य मी सहज सिद्ध करीन अशी उमेद येत आहे. नाहीं पेक्षां आशाच खुंटली. हें बोलतांना त्याचें मुखकमल अगदीं म्लान झालें असें पाहून पक्षी ह्मणाला, बाबारे, काय हा नाद? या कामीं तूं जर पडलास तर अनर्थास कारण होऊन जन्मभर तुझ्या कुटुंबांतील मनुष्याच्या दुःखदोयाचे विभागी मला व्हावें ला.

गेल. अरे वृद्धापकाळीं माता पितरांस दुःख देणें तुला कसें उचित वाट तें. त्या महान् जादुगार राजकन्येचा मुलूख आसमंतात् भागीं एकसारखा शंभर योजनें पर्यंत भारला असून त्यांत किती एक ठिकाणीं ऐश्वर्य मंडित रूपवती स्त्रियांचें वास्तव्य आहे. त्यांस पतिसौख्याची उणीव असल्यानें तुजसारखे किती एक राजपुत्रादि तरुण जे जे त्या प्रदेशीं गेले ते पुनश्च ह्मणून पूर्व सौख्यास प्राप्त न होतां त्या मोहपाशांत पडून मध्यंतरींच कोठें अटकोन दुःख भोगीत असल्याचें मी प्रत्यक्ष दृष्टीनें पाहिलें आहे. अरे तिजसाठीं किती एक तरुण विरहांत पडून प्राणास मुकले. जे वांचले ते फशीं पडून किती एक उपायरहित पशुपक्ष्यादिकांचे देह धारण करून आयुष्याचे दिवस काढीत आहेत. तो मार्गही अति बिकट असून त्या स्त्रियांचे तावडींत एकवार सांपडलें पुरे कीं, त्याचें कामच झालें. तशांत तूं राजपुत्र तरुण आणि अत्यंत सुस्वरूप असल्यानें तुझी काय स्थिति होईल त्याचा विचार कर. आपले असलेल्या सौख्या स अंतरूं नको. जावत्काल पर्यंत तो प्रसंग तुजवर गुदरला नाहीं तावत्काल हें तुझें बोलणें तुला प्रिय वाटतें. पहा आजपर्यंत मी स्वतःची हकीकत तुला सांगितली नाहीं; परंतु खात्री होण्या साठीं आणि तुजवर माझें प्रेम असल्यानें सांगतों. तूं विचार करून पहावीं, कसाही पक्षी शहाणा असला तरी अनुभविक युक्तिप्रयुक्तीचें रसयुक्त भाषण मजप्रमाणें त्याचानें होईल काय? त्याची शिकविलेली बुद्धि आणि तशीच भाषणाची शक्ति असते. मी उपजत पक्षी आहें असें नाहीं, कोणी गर्भश्रीमान् सावकाराचा मुलगा आहें परंतु हूडपणामुळें मजवर असा प्रसंग गुदरून मी पराधीनत्व पावलों आहें. कांहीं पूर्वी सुकृत पदरीं होतें ह्मणून तरी तुझी सुखावह संगती आलीकडे मला लाभली आहे; परंतु असें सदोदित भाग्य तरी कोठून असणार? आतां तो दुरावण्याचा प्रसंग या तु

ह्या विलक्षण उभारणी वरून समीप आल्याचें दिसतें. माझी पूर्वा पार हकीकत तुला सांगितल्यास मला श्रम मात्र होतील. बाकी त्या लावण्य दीपक ज्योतीवर तुझें अंतःकरण पतंग होऊन तल्लीन झालें आहे तें पोळल्याव्यतिरिक्त तुझे मनाची कधींही खात्री होणार नाहीं. तुझे साररवीच माझीही प्रकृति बाळपणा पासून हूड असल्यानें मी संकट भोगीत आहें. पुढेंही आणखी किती दिवस दुःख भोगावयाचें माझे कपाळीं आहे, त्याचें या कालीं अनुमान करवत नाहीं. एकवार मनुष्याचे अंतःकरणानें जो ग्रह धरिला त्याचा चांगला अथवा वाईट परिणाम अनुभवास आल्या वांचून त्याची ती उभारणी कमी व्हावयाची नाहीं. मलाही तुज प्रमाणें स्वगृहीं ऐश्वर्यादि भोग्य सुखाची कमतरता नवती व मी एकटाच आई बापांस असल्यानें आणि माझे गुण व सौंदर्य त्यांस विशेष आवडून त्यांचें मजवर इतकें प्रेम असे कीं, एक घटका माझ्या वांचून दूर राहण्याचा विरह त्यांस दुःसह होत असे. आणि आतां तर माझे सौख्यांस ते किती एक दिवस अंतरले आहेत. हर हर !! प्राक्तनाचें उल्लंघन कोणासही करवत नाहीं. त्या दुष्टीचे तापा मुळें ते येथून बरेंच सन्निध आहेत तथापि त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन संभाषण करण्यास सांप्रत कालीं मला मार्ग नाहीं. मजवांचून किती चमत्कारिक वृद्धापकालीं त्यांची स्थिति झाली आहे, आणि नित्य पुत्रमोह मनांत उत्पन्न होऊन खाणें पिणें ऐश्वर्यादि सौख्य विषवत् त्यांस भासतें. मी बराच जवळ असूनही माझा त्यांस कोठेंच शोध नसल्यानें मी भेटेंन हा आतां त्यांस आशा उरली नाहीं. प्रस्तुत ते आशा निर्मुक्त होऊन अरण्यांत वास करीत आहेत. मी मात्र दुरून त्यांस केव्हां केव्हां तुरतें पाहिलें आहे. परमेश्वरानें आई बापांस दुःख देणारा असा पुत्र मुळींच उत्पन्न करूं नये. मातोश्रींचे तारुण्य विपिनाचा व्यर्थ नाश करणारा मजसारखा कुपुत्र जन्मून तरी काय उपयोग? जे आई बापांस दुःख देतात त्यांची गति कधींही चांगली

ह्मावयाची नाहीं. किती ह्मणून मातोश्रीचे उपकार आठवावे? गर्भ धारण केल्या पासून नऊ मास त्याचें जठरपुटीं ओझें ती प्रेमानें वागविते, व प्रसव वेदनेचें पुनर्जन्मरूप दुःख सहन करून पुढें त्याचे जीवितांची काळजी बाळगीत आहे. त्याचे मलमूत्रादिकांचा कधींही तिरस्कार न करितां उत्तम प्रकारें लालन करून सर्वस्वीं त्याचे कल्याणाची इच्छा करिते. "नमातुः परदैवतं" मातोश्री वांचून दुसरें कोणतेंच दैवत नाहीं. असें असूनही जे कृतघ्न होऊन तिला दुःखांत घालितात ते नर रूप जंतूच समजले पाहिजेत.

## श्लोक. भर्तृ॰.

वरं गर्भस्त्रावो वरमपिच नैवाऽभिगमनम्,
वरं जातः प्रेतो वर मपिच कन्या विजनिता ॥
वरं वंध्या भार्या वरमपिच गर्भेषु वसति,
नचाऽविद्वान् रूपद्रविण गुणयुक्तोपि तनयः॥१

भावार्थ.- गर्भपात झालेला बरा, अथवा मुळींच उत्पन्न न होणें, उपजत मरण पावणें, कन्या जन्मास येणें, किंवा वंध्या असणें, गर्भ कोटांत राहणें हें फार बरें; कारण अविद्वान् आणि मूर्खपणामुळें अपकीर्ति संपादन करणारा पुत्र द्रव्यसंपन्न जरी आहे तरी तो जन्मूनही व्यर्थ होतो. किती ह्मणून सांगूं? शरीर चर्मानें पादत्राण करून जरी मातेच्या पायांत घातलें तरी तिचे अनंत उपकार फिटावयाचे नाहींत. असें सांगतांना त्याचे नेत्रांतून अश्रुपात होऊन ह्मणाला, हे मित्रा **कुसुमचापा**, तेंच मला दुःख होत आहे. ज्या वेळेस मी त्या जादूचे मुलखीं जाण्याचा नाद घेऊन आग्रहानें चाललों तेव्हां न जाण्या विषयीं आईबापांनीं पुष्कळ प्रकारें विनवणी करून सांगितलें; परंतु आतां तुझी जशी चंचलवृत्ति झाली आहे तशीच माझी होऊन त्यांचे वचनाचा अवमान करून निघालों. ते वेळेस वृद्धापकाळामुळें जरी मातोश्री अशक्त होऊन क्षीण झाली होती तरी माझें मुख कुरवाळून सजलनेत्र झाली आणि नानाप्रकारची माझी

समजूत करून ह्मणाली आह्मांस अशा वृद्ध अवस्थेंत दुःखार्णवीं टाकू न जाणें तुला प्रिय वाटतें काय? इतकें करून जाशील तर तुजवांचून आ- मचे जीवितांचें रक्षण होण्यास मार्ग नाहीं असें बोलतानां मोह दाटून आ ल्यानें ज्या प्रमाणें वत्सासाठीं धेनु हंबरडा फोडिते तद्वत् तिनें धरणीवर अंग टाकून आक्रोश मांडिला. हर हर!! एकवार मनुष्यास कोणताही नाद लागला ह्मणजे त्याचे विचार आणि महत्व हीं लागलींच दुरावता- त. मीं कृतघ्न होऊन ईश्वरतुल्य वडिलांचे आज्ञेचा अनादर करून सर्वोप री त्यांचें जन्माचें सौख्य नाहिसें केलें. आतां तर माझे विरहानें ते फार दिवस वांचतील असें मला वाटत नाहीं. तेंच सर्व माझे पोटांत कालवू न मला अतिशय दुःख होत आहे. मित्रा राजतनया, त्यांचा मलाही आतां विरह सहन होत नसून एकवार तरी प्रत्यक्ष भेटून त्यांचें दुःख दूर क रावें असें पुष्कळ मनांत येतें परंतु तेवढें माझे स्वाधीन राहिलें नाहीं. आ हा! काय तें मातुश्रीचें प्रेम! नित्य एकवार तरी मला अंकावर घेऊन कुर वाळल्या विना तिला गोड लागत नव्हतें. असो. खेद केल्यानें स्मरणा ब- रोबर दुःख मात्र होतें. असें त्याचें मोह उत्पन्न करणारें भाषण ऐकून- **कुसुमचापास** गहिंवर येऊन ह्मणाला इतके दिवस हें वर्तमान कसें गोप्य ठेविलेंस; तुला काय ह्मणावें? कांहीं तरी युक्ति योजून या मार्गेंच मी तुझे आई बापांची भेट करविली असती. या तुझे सांगण्या वरून येथून कोठें तरी तुझे आई बापांचें वास्तव्य सन्निधच असावें. व ते संभा वित, कुलीन आणि श्रीमान असावेत असें मला वाटतें. तेव्हां त्यांचें वास्त व्य कोठें आहे व त्यांचीं नांवें काय आहेत हें अगोदर मला कथन कर. **म ध्वनाथ** म्हणाला हें सांगितल्या पासून मला फार दुःख होणार आहे, त्यास हा समय सांगण्याचा नाहीं. यास्तव क्षमा करून प्रस्तुत ही हकीकत मला विचारूं नको. असो माझा पुढील इतिहास मात्र सांगतों. जे वेळेस मी घरून निघालों ते वेळेस नुकतेंच मला अठरावें वर्ष लागलें होतें. माझा झालेला निश्चय मोडला असतां भलताच प्रसंग हा आणील कीं काय? ह्या-

पून आई बापांनीं पुढें मजपाशीं अधिक भाषण न करितां इतकेंच सांगित ले कीं, तुझे इच्छे प्रमाणें पूर्ण विचार करून आतां कायतें कर. तरी मी तें कांहीं मनांत न आणितां त्या वेळेस एक मित्र अनुकूल असलेला आणि दोन चांगले वेगवान् अश्व तशीच यथेच्छ द्रव्यसामुग्री आणि चाकर माणसें अशीं बरोबर घेऊन निघालों. कितो एक दिवस अनेक शहरें, व सृष्टिजन्य चमत्कार पहात फिरत होतों; त्या मित्रास मी आपले प्रमाणें- च संपत्यादि सुखाचा अनुभव देत गेलों. जावत्काल पर्यंत सर्व माझें ऐ श्वर्य स्थित होतें तों पावेतों तो माझे आज्ञेंत आर्जवानें राहून संपत्तीचा उपभोग आनंदानें घेत होता. जसा त्या सौख्याचा पाय मागें पडत चाल- ला तसें त्याणें आपलें पाऊल आणि मजवरील प्रीति हीं मागें वेढून एके दि- वशीं रात्रीं मला एकटेंच सोडून न विचारितां तो निघून गेला. मी त्या पाशीं- कोणताही प्रतरणा न करितां जीजी वस्तु त्याणें इच्छिली ती ती न मागतां मोठ्या आनंदानें त्याचा संतोष राहण्या साठीं त्यास देत होतों व त्याचेच्छं दानें वर्तत होतों या मुळें बरोबर असलेल्या विपुल द्रव्याचा बहुतेक ऱ्हा- स होऊन मला निकृष्ट दशा प्राप्त झाली. सारांश प्रसंगीं कोणी कोणाचें नाहीं. अनुकूलता आहे तों पावेतों मात्र प्राणी विशेष ममत्व दाखवून- आर्जवानें सन्निध वास करितात. खरेंच आहे. समुद्रानें आपल्या पासू न चतुर्दश रत्नें उत्पन्न झालेलीं त्यांतून विष्णूस लक्ष्मी, इंद्रास ऐरावत, देवांस अमृत, चंद्रास कला, शंकरास हालाहल या प्रमाणें जींजीं रत्नें ज्यांस आवडलीं तीं तीं सर्वांस वांटून दिलीं. तथापि जे वेळेस त्याचें प्राश न करण्याचें अगस्त्य मुनीनें मनांत आणलें त्या प्रसंगीं त्याणें सर्वां- ची प्रार्थना केली; परंतु एकापासूनही त्याचा उपयोग न होतां मुनीचा निश्चय तडीस जाऊन त्यास क्षारत्व आलें. या वरून प्रसंगीं ज्याचा तो च आहे. हें खरें ज्या वेळेस नलराजानें सरोवरीं तो राजहंस धरिला त्या वेळेस त्याज बरोबरील विहारास आलेले त्याचे सोबती जे अन्य राज हंस पक्षी तेथें होते ते त्यांवर आलेला प्रसंग पाहून त्याची ममता व आशा

न धरितां आप आपलें रक्षण व्हावें एतदर्थ तेथून त्यास सोडून गेले. असो. मग मी तसाच भिक्षा वांचून दुःखी होऊन द्रव्याचा व्यय झाला तरी एकटा धरलेल्या उभारणीचा कांहीं तरी शेवट झालाच पाहिजे, या ईर्षेनें मागील घरादाराची आणि प्रियेची सर्व आशा सोडून किती एक शहरें व क्षेत्रस्थलें या शिवाय ठिकठिकाणांचें हवापाणी, मनुष्य राहणी, कला कौशल्यतेचे कारखाने, उदीम व्यापार धंदे नामांकित इमारती, तलाव, सरोवरें, कालवे इत्यादि पाहण्याची मला इच्छा उत्पन्न झाली. नंतर जें कांहीं मजपाशीं अवशिष्ट थोडें द्रव्य राहिलें होतें त्याचें रक्षण करून यतिवेषांत फिरत असतां किती एक ठिकाणीं पूज्य ज्योतिर्लिंगादि देवस्थानांच्या दर्शनांचा आणि साधुसंगतीचा मला लाभ झाला त्या योगानें माझे पूर्वीचे वृत्तांत पालट पडला; तेव्हां पासून विराग स्थितींत राहणें मला प्रिय वाटूं लागलें. अंतःकरणाची प्रसंनता होऊन फलमूलादि अशनांत आणि नित्यशः नूतन पुण्यजल प्रवाहाचाही लाभ होत असल्यानें माझे दिवस आनंदांत जाऊं लागले. वास्तविक पाहतां सद्गुरु प्रसादानें आशानिर्मुक्त होऊन जे प्राणी असे तीर्थ यात्रेंत प्रवास करितात त्यांचे भाग्याची तुलना देवादिकांच्यानेंही होणार नाहीं. संसारांत कोणतेंच सौख्य नाहीं असें असून जे मानितात ते अज्ञानी समजले पाहिजेत. माझे मतें नर सार्वभौम राज्यादि जे प्रपंच करणारे आहेत त्यांतून एकहीवि स्वरूप सौख्याचा अधिकारी नाहीं. संसारांत अनेक प्रकारचे सुख दुःखादि प्रसंग या देहावर वारंवार प्रहार करीत आहेत. देह, अपत्य, कलत्र इत्यादिकांच्या संगतीचें स्वरूप हें केवल क्षणिक आहे. कमलाचा सौख्यरूप मकरंद असून गंधें करून आढ्य अशा केतकी पुष्पाचा मोहक पीत वर्ण पाहून कमल भ्रांतीनें जसा भ्रमर त्यांत पडतो आणि जेव्हां त्या केतकी पुष्पाचे कंटकानें त्याचे पक्ष छिन्न होतात व त्यांत असलेले रजःकण नेत्रांत शिरून लागलीच त्यास अंधत्व प्राप्त होतें तेव्हां मात्र त्यास पूर्ण विचार होतो कीं, अरे! मी व्यर्थ या पु-

ध्याचे स्मरंगास भुलून आंत पडलों; परंतु उपयोग काय? पक्ष गेल्यानें व अंधत्व प्राप्त झाल्या मुळें उडण्याची आणि अवलोकनाची शक्ति नाहींशी होऊन तसाच अंतरीं राहून नाश मात्र पावतो. अथवा गळास असलेलें विष सौख्य रूपी मानून जसा मत्स्य उत्कंठतेनें धांवून त्यास बिलगून तात्काळ प्राणास मुकतो तद्वत् या प्रपंच गळानें क्षणिक विषयादि सौख्याभिषास जे प्राणी लुब्ध होतात त्यांस प्रपंच अथवा परमार्थाचीही प्राप्ति न होतां त्यांचें जीवित व्यर्थ होतें. आणि प्रपंचांत जरी राहणें आहे तरी पूर्वापार चालत आलेलें शास्त्र अशास्त्र आहे काय, धर्माधर्म कोणते, खरें काय खोटें काय, मी कोण आहे? मनुष्य देहाची प्राप्ती ह्या जीवास कोणते सकृतानें लाभली आहे? आपले विषयीं जगांत काय वार्ता आहे इत्यादिकांचा पूर्ण विचार करून पुढील परिणामा विषयीं जो सावध राहतो त्यास कधींही वाईट प्रसंग न येतां तो प्राणी कीर्ति संपादन करून आपले कुळांत वंशध्वज होतो, व त्याचांशेवटही उत्तम होत आहे.सार्वकाल मनुष्यानें दिसणारे मायिक पदार्थांवर अंतःकरणीं अप्रीति ठेऊन अनुग्रहित विद्येचा निरंतर अभ्यास करावा. पहा त्या आत्मानात्म विचाररूप विद्ये सारखी जीवित साफल्या विषयीं विद्या नाहीं. एकवार कोणी सत्पुरुषा पासून या विद्येचें ज्ञान प्राप्त झालें म्हणजे (अद्वितीय) ज्याचे तुलनेस अन्य नाहीं त अशा परमेश्वराचे तेजःपुंज अक्षय्य स्वरूपाची प्राप्ति दृढतर ,अभ्यासानें होऊन तो जीव त्या स्वरूपीं मिळून जातो. आत्म्या वांचून दुसरी कोणतीच सत्य वस्तु नाहीं. या विषयीं विचारा अंतीं प्रत्यय येतआहे. हा मार्ग दुर्दैवानें नाहींसा करून टाकला आहे हें मला तरी आजपर्यंत काय माहित होतें? परंतु श्री जान्हवी तटाकीं कोणी महान् मुनीनें तत्संबंधीं थोडीशी मला माहिती करून दिली आहे, परंतु तद्रीं साधनें होण्यास महत्सकृत पाहिजे. ज्यास चतुष्टय साधन आहे तेच पुरुष तत्व मार्गाचे अधिकारी होतात हें ऐकतांनां अंतःकरणा-

ची तल्लीन वृत्ति होऊन तत्वविचार ऐकण्याची प्रीति उत्पन्न झाली, तेव्हां मध्वनाथास कुसुमचाप ह्मणाला तुझी संगति ज्यास लभ्य आहे त्याचें तरी विशेष भाग्य समजलें पाहिजे. हा प्रकार समजून घेण्याचें बरेच दिवस माझे मनांत होतें, तो योग अनायासें आल्याचें आज दिसतें.

**मध्वनाथ.**— माझी तरी इच्छा तुला सांगावें अशीच आहे; परंतु या विषयीं चित्ताची स्थैर्यता असणें अवश्य आहे तशी असूं दे सांगतों ऐक. नित्य वस्तु एक ब्रह्म त्याहून दृश्यमान पदार्थ सर्व मिथ्या भूत आहेत, हा नित्यानित्य वस्तुविवेक या मृत्युलोकींचे विषयभोग आणि स्वर्गभोग यां विषयीं इच्छा सोडणें त्यास विराग ह्मणावें. तिसरें साधन, शमादि षट् संपत्तीचें लक्षण तें असें कीं, शम, दम, तप, तितिक्षा, श्रद्धा आणि समाधान या प्रकारचें आहे. मनाचा निग्रह करणें यास शम ह्मणावें. नेत्र, कर्ण, घ्राण, रसना, हस्त, पादादि इंद्रियें स्वाधीन ठेवणें यास दम ह्मणावें. आपल्या स्वधर्मा प्रमाणें वेदप्रणित चालत आलेलें वर्णनानुष्ठान करणें हेंच तप समजलें पाहिजे. अन्य धर्म कसाही असो त्याचें आचरण केलें असतां तो श्रुति प्रमाण परमेश्वराचा अपराधी होत आहे. आतां शीत उष्ण सुख दुःखादि करून सहन करणें हें तितिक्षा साधन होय. श्रद्धेचें लक्षण, गुरूचें व वेदप्रणित उपनिषदार्थ जें वेदांत वाक्य त्याचे ठायीं विश्वास ठेवून त्या प्रमाणें वागणें हेंच आहे. निरंतर चित्ताची एकाग्रता करणें यास समाधान ह्मणावें, आणि मला सायुज्य मोक्ष प्राप्ति होवो अशी वांछा धरणें यास मोक्षत्व ह्मणतात. या प्रकारचें साधन चतुष्टय ज्यास आहे ते पुरुष तत्व विचाराचे अधिकारी होतात. मग त्यांस आत्माच परमेश्वर भासतो.

**कुसुमचाप.**— आत्मा कोणता?

**मध्वनाथ.**— स्थूल शरीर व सूक्ष्म शरीर आणि कारण शरीर यांहून आ-

त्मा निराळा आहे. आणि पंचकोश जे त्याहून भिन्न असा असून जा-ग्रति, स्वप्न, आणि सुषुप्ति या तीन अवस्थांचा साक्षी आहे. व सच्चिदानंद ह्मणजे सत्, चित् आणि आनंद स्वरूप असा जो आहे तो.

कुसुमचाप.- स्थूल, सूक्ष्म, आणि कारण हीं शरीरें कोणतीं?

मध्वनाथ.- पंचवीस विभाग केलेलीं जीं पंचमहा भूतें तींहीं करून केलें आहे आणि कर्मे करून ज्याची उत्पत्ति आहे असें सुख दुःखादि भोगावयाचें स्थान तें स्थूल शरीर होय. त्यास षड्विकारआहेत ते असे कीं, अस्ति (असणें), उत्पन्न होणें, वृद्धि पावणें, बाल्य, तारुण्य व वार्धक्य दशेनें रूपांतर होणें, क्षीणत्व आणि नाश पावणें अशा प्रकारचे सहा विकार; आतां अपंचीकृत ह्मणजे पंचवीस विभाग केलेलीं जीं पंचमहाभूतें तींहीं करून केलें असून कर्म बीजें करून उत्पन्न होत आहे. आणि सुख दुःखादि भोग घेण्याचें साधन आहे. यासच लिंगशरीर ह्मणतात. त्यास पंच ज्ञानेंद्रियें आहेत तीं त्वचा. नेत्र, कर्ण, जिव्हा; व तशींच पंच कर्मेंद्रियें आहेत तीं हीं कीं, वाणी हस्त, पाद, गुद, आणि उपस्थ या दशेंद्रियांचें सर्व चालक शक्तीचें हें सूक्ष्म शरीर अधिष्ठान आहे. व प्राण, अपान, व्यान, उदान, समान, हे पंच प्राण व एक मन आणि एक बुद्धि अशा सत्रा कला सहवर्तमान जें आहे त्यास सूक्ष्म शरीर ह्मणावें. कारण शरीराचा प्रकार ऐक. अनिर्वाच्य ह्मणजे जें सांगतां येत नाहीं, अनादि, अज्ञानरूप, स्थूल व सूक्ष्म या दोहों शरीरांस कारण, ज्यास आत्मस्वरूपाचें ज्ञान नाहीं आणि निर्विकल्प ह्मणजे जेथें कल्पना कुंठित आहे अशा प्रकारचें जाणावें.

कुसुमचाप.- वर सांगितलेल्या तीन अवस्था कोणत्या?

मध्वनाथ.- जागृति स्वप्न आणि सुषुप्ति अशा आहेत.

कुसुमचाप.- जागृति अवस्था कोणती?

मध्वनाथ.- पूर्वीं सांगितलेलीं कर्णादि पंच ज्ञानेंद्रियें जीं तींहींक-

रून शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध हे पंच विषय ज्या अवस्थेंत कळत आहेत ती जागृदवस्था होय. व या स्थूल शरीराचे आत्म्यास विश्वात्मा हें नांव आहे.

**कुसुमचाप:**– स्वप्नावस्था कोणती?

**मध्वनाथ:**– जागृदवस्थेच्या ठायीं जें पाहण्यांत व ऐकण्यांत आलें त्या योगें करून उत्पन्न झालेल्या वासनेनुरूप निद्रा समयीं जो स्वप्न विस्तार प्रत्ययास येतो ती स्वप्नावस्था. व या लिंगदेहाचे आत्म्यास तैजस आत्मा ह्मणतात.

**कुसुमचाप:**– सुषुप्त्यावस्था कोणती?

**मध्वनाथ:**– मी कांहीं जाणत नव्हतों. सुखें करून निद्रेचा अनुभव घेतला अशा प्रकारची जी गाढ अवस्था ती. या कारण शरीराचे आत्म्यास प्राज्ञ असें नाम आहे.

**कुसुमचाप:**– हे मध्वनाथा, मला आतां पंचकोशाचा विचार थोडा कृपा करून सांग.

**मध्वनाथ:**– सांगतों ऐक. अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय असे पांच कोश आहेत. अन्नरसें करून उत्पन्न होऊन त्यानेंच वृद्धि पावून जो अन्नरूप पृथ्वींत मिळून जात आहे तो अन्नमय कोश स्थूल शरीरी जाणावा. प्राण, अपान, व्यान उदान समान हे पंच प्राणवायू आणि पंच कर्मेंद्रियें यां प्रत मिळून प्राणमय कोश होतो. व मन हें पंच ज्ञानेंद्रियांप्रत मिळून मनोमय कोश होतो. व बुद्धि ज्ञानेंद्रिय पंचकास मिळून विज्ञानमय कोश होतो. या प्रकारें करून कारण शरीरोत्पन्न जें अज्ञान तें आनंदमय कोशाचे ठायीं राहतें; यास्तव जीवाचें तत्व मळीन होऊन त्यास आत्मस्वरूपाचा विसर पडतो. व विषय वृत्तीसह वर्तमान आहे ह्मणजे विषयाचा आनंद त्यास होत आहे असा आनंदमय कोश जाणावा; हे पंचकोश आणि माझें शरीर, प्राण, मन, बुद्धि, ज्ञान हीं जशीं मा-

झीं ह्मणून कळतें. तशींच सुवर्णाचीं कुंडलें, पोंची, कंकणें, बाहुभूषणें, आणि आपण बांधलेलें गृह आदी करून सर्व पदार्थ आत्याहून भिन्न आहेत त्या प्रकारें करून पंच कोशादिक जें तें माझें ह्मणून ज्ञान आहे हें कांहीं आत्मा होत नाहीं. तो सच्चिदानंद स्वरूप असून भूत भविष्य आणि वर्तमान या तीन कालांचे ठायीं सारखा राहतो. तो आत्मा सत्यनाम सत्यस्वरूप चित् ह्मणजे ज्ञानस्वरूप आणि आनंद ह्मणजे सुखरूप असा आहे. आतां चोवीस तत्वांची उत्पत्ति ही तुझी श्रवण भक्ति पाहून तुला सांगतों. ब्रह्मापासून माया, तीपासून तीन गुण, त्या पासून महत्तत्व, महत्तत्वापासून अहंकार, त्या पासून आकाश उत्पन्न झालें, त्या पासून वायु, वायूपासून अग्नि, अग्नी पासून उदक, आणि उदका पासून पृथ्वी उत्पन्न झाली. अशीं हीं पंचमहा भूततत्वें, आकाश, वायु, अग्नि, उदक, आणि पृथ्वी या प्रत्येक तत्वाच्या सत्व गुणांचे अंशें करून अनुक्रमें कर्णादि पंचज्ञानेंद्रियें, वत्याचे रजोगुणांशें करून वाणी आदी करून पंच कर्मेंद्रियें उत्पन्न झालीं. व तमोगुणांशें करून शब्दस्पर्शादि पंचभूतें झाली. यांचें पंची करण कसें तें ऐक. या एकेक भूताचे दोन दोन विभाग करून त्यांतून एकेक अर्धविभाग प्रथम ठेऊन दुसऱ्या अर्ध विभागाचे चार चार विभाग करून ते ठेविलेले पांच अर्धविभाग, त्या प्रत्येक भागांत हे केलेले चार चार विभाग मिळवावे, तेव्हां पंचीकरण होतें. आतां या पंचमहाभूत तत्वांच्या संपूर्ण सत्व गुणांशें करून अंतःकरण उत्पन्न झालें. त्याच्या व्यापार भिन्नत्वें करून मन, बुद्धि, अहंकार, चित्त आणि अंतःकरण अशीं पांच प्रकारचीं भिन्न अंतःकरणें झालीं व संपूर्ण रजो गुणांशें करून पंचप्राण उत्पन्न झाले. आणि हीं पंचवीस विभाग केलेलीं पंच महाभूतें यांच्या संपूर्ण तमोगुणांशें करून स्थूल शरीर उत्पन्न झालें आहे. जसें पिंडाचें ऐक्य तसेंच या प्रकारें करून तत्वसंबंधानें ब्रह्मांडाचें ऐक्य होत आहे. हें पिंड ब्रह्मांड उत्पन्न झालें असतां स्थू-

ल शरीरादिकांचे ठायीं जीवनाम ज्यास आहे तें तीन शरीरांत प्रतिबिंबरूप झालें आहे तो जीव ह्मणावा.प्रकृतीच्या योगानें आपले ठायींआपल्याहून ईश्वर भिन्न नसतां भिन्न आहे असें वाटतें. अज्ञान उपाधी करून आत्म्यास जीव या नामें करून बोलतों. माया उपाधियोगानें त्या आत्म्यास ईश्वर असें मानितों. अशा उपाधि भेदें करून जीव आणि ईश्वर अशी भिन्न दृष्टि जावत्काल पर्यंत राहात आहे तावत्काल पर्यंत वारंवार जन्म मरण घेणें, हेंच रूप आहे ज्याचें असा संसार निवारण होत नाहीं. तस्मात् जीव एक व ईश्वर एक अशी भेद दृष्टि कधीं नसावी. उपाधी पासून मुक्त होऊन समाधि दशेप्रत प्राप्त झालेला शुद्ध चैतन्य ह्मणजे शुद्धात्मा जो तो लक्ष्यांत आणावा. असा सर्व गुणें करून आणि सर्व जाणणारा विशेष आहे तोआत्मा तत्पद या नामें करून बोलिला आहे. मायोपाधी करून रहित असा शुद्धात्मा पहावा. या प्रकारें करून जीव आणि ईश्वर यांचा अभेद (ऐक्य) भाव झाला असतां जीवास किमपीही बाधा नहोतां जन्म मरणा पासून तो मुक्त होत आहे; परंतु जेव्हां सद्गुरु उपदेशानें सर्व भूतांचे ठायीं जीवास ब्रह्म बुद्धि उत्पन्न होते.तेव्हांच अशी स्थिति होऊन तो चित्स्वरूपीं मिळून जातो.

**कुसुमचाप**— जीवन्मुक्त कोणास ह्मणावें?

**मध्वनाथ**— मी देह,ब्राह्मण,शूद्र, स्त्री आहे असा हा दृढ निश्चय जसा करतो त्या प्रकारें करून हें मी कांहींच नाहीं.तर सच्चिदानंद स्वरूप सर्वांच्या हृदयस्थ चैतन्य आकाशरूप आहे असा दृढनिश्चय प्रत्यक्ष आत्मज्ञानें करून ज्यास झाला आहे तो जीवंत असतां निश्चयें करून मुक्त आहे. तसेंच मी ब्रह्म आहें या प्रत्यक्ष ज्ञानें करून समग्र कर्म बंधा पासून तो मुक्त होतो.

**कुसुमचाप**— कर्में किती प्रकारचीं आहेत?

**मध्वनाथ**— अगामीं,संचित, आणि प्रारब्ध अशीं तीन प्रकारचीं आहे-

त. अगामी ह्मणजे पुढें होणारें पुण्य पापरूप क्रियमाण. कर्म संचित ह्मणजे मागील अनंत जन्मींचीं कर्में जन्म घेण्यास बीजरूपमागें शिलक राहतात त्यास ह्मणावें. आणि प्रारब्ध ह्मणजे हें शरीर उत्पन्न करून या मृत्यलोकाचे ठायीं सौख्य व दुःख देणारें जें कर्म आहे तें प्रारब्ध, भोगें करूनच नष्ट होत आहे. ( प्रारब्धकर्मणां भोगा देवक्षय इति ).

कुसमचाप:- जसें प्रारब्धकर्म भोगें करून नाश पावतें तसें संचित आणि अगामी हीं कर्में नाश पावण्यास कोणतीं साधनें आहेत?

मध्वनाथ:- फार उत्तम प्रश्न केलास- यासही साधन आहे. मी ब्रह्मच आहें, या निश्चयरूप ज्ञानें करूनच संचित कर्म नाश पावत आहे. अगामी कर्मही ज्ञान प्राप्त झाल्या नंतर ज्ञान्याच्या देहाचे ठायीं कमलनीदलगतजलवत ह्मणजे कमलनीचे पत्रावरील जलाचे परी आहे. ज्ञानास तें क्रियमाण कर्म मुळींच स्पर्श करीत नाहीं.

कुसमचाप:- तरमग त्याचा विनियोग कसा होतो?

मध्वनाथ:- पहा- जे ज्ञानाप्रत भजत आहेत, स्तवित आहेत, पूजित आहेत त्यां प्रत ज्ञान्याच्या देहाकडून जें पुण्यरूप कर्म होतें तें सर्व जात आहे. आणि जे पुरुष त्याची निंदा व द्वेष करून दुःख देत आहेत त्यांप्रत त्या ज्ञान्याच्या देहाकडून झालेलें क्रियमाण पापकर्म तें सर्व जात आहे. दोन्हीं कर्मांचाही संबंध ज्ञान प्राप्त झाल्या नंतर त्या जीवाकडे राहात नाहीं. लोकत्र ग्रहण करीत आहेत, हें श्रुतिप्रमाण यथार्थ आहे. संसार तरून या लोकीं या देहीं ब्रह्मानंद सुखाचा अनुभव पाऊन तो शोक रहित होतो. जे वेळेस अशी सच्चिदानंदरूपी जीवाची स्थिति होते तेव्हां त्याची तनू जगदोद्धारणी भागीरथी मध्यें अथवा चांडाल गृहीं पडली

असतांही तो प्राणी जीवन्मुक्तच आहे. यास प्रमाणः-

## श्लोक. अनुष्टुप्छंद.

तनुंत्यज्यतुवाकाश्यां, श्वपचस्यगृहेथवा॥
ज्ञानसंप्राप्तिसमये, मुक्तोसौविगताशय १

या प्रकारें करून असा हा संपूर्ण तत्वसंबंधि विचार तात्पर्यें तुला कथन केला आहे. वर सांगितलेल्या स्थितीचा कांहींच अनुभव नसून किंवा एक दांभिकपणानें जगांत केवळ कीर्ति संपादनार्थ स्वम्रनिष्ठा मिरवून मी केवळ परमेश्वरच आहें. मला सर्वत्र स्थलीं सत्कीर्तीचा जय प्राप्त होऊन साक्षात्कारही होत आहे. असें मीपणानें ह्मणविणारे जे त्यांस अंतीं सद्गति कशी होईल?

अशा प्रकारें संपूर्ण तत्वबोध संबंधीं उपनिषदार्थ समजून घेऊन **मध्वनाथास कुसुमचाप** ह्मणाला आज तुझे मजवर मोठे उपकार झाले आहेत. ही तुसती माहिती तरी समजण्यास प्रारब्ध ओघच पाहिजे. आतां यांत थोडीशी शंका आहे ती निवारण करावी. तुझे सांगण्यांत आलें कीं, ब्रह्मबुद्धि झाल्या व्यतिरिक्त जीवास मुक्तता नाहीं आणि ती प्राप्ति तर सर्वत्र नाहीं. पूर्व सुकृतें करून तसा योग येऊन कोणी कृपा करील तेव्हां व्हावयाची आहे. यावरून सर्व प्राणी भवबंदांतून कसे मुक्त होतील?

**मध्वनाथ-** बाबा, ब्रह्मप्राप्ति कोणासही एका एकीं व्हावयाची नाहीं हें तुझें ह्मणणेंच खरें आहे. जन्म जन्मांतरीं जीवास परमेश्वराची भक्ति लागून ब्राह्मण, आरण, संहिता या वेदोक्त सप्रमाण आधारें रामकृष्णादि अवतारिक परमेश्वर विष्णु मूर्तीचें पूजन करणें तसेंच व्यास वाल्मिकादि महान् प्रभृति पुण्यश्लोक मुनींनीं भगवंताच्या लीला वेदरूप भागवतादि पुराण ग्रंथांतरीं गाइल्या आहेत त्या भक्तिपुरःसर श्रद्धेनें श्रवण करून त्यांत सांगितल्या प्रमाणें प्रपंचांत राहूनही तेरा-

स्थलेनें सर्व संगरसादि इतर विषय वासना सोडून मनासहित एकाद-
श इंद्रियें या नाशवंत मोहक पदार्थावरून क्रमानें परावृत्त करून तीं
सर्व परमात्म स्वरूपीं स्थापित करावीं. आणि वेदांत सांगितल्या प्रमा
णें सगुण परमेश्वर मूर्तीचें ध्यान करावें. त्या योगानें धारणा बसून ए
काग्र समाधी लागण्याचा हा पाया आहे. असें घडेल तरच अभ्यासानें
ध्यान करणारा जीव भवार्णवांतून मुक्त होतो. तें ध्यान असें कीं, मृदु व
अति स्निग्ध अशा सहस्र दल ह्दय कमलाच्या अंतरंगीं रत्नखचित
सुवर्ण पीठावर अंकस्थ आदिशक्ति विद्युत्कांति श्रीलक्ष्मी विराजमा
न आहे. व सहस्रादित्य कीर्णा प्रमाणें जिच्या दिव्य ज्योतीनें दिशा
प्रकाशित आहेत. असें जिचें अत्यंत रमणीय मुखकमल, कटितटीं
भरजरीचा पिवळा पीतांबर नेसलेली, मस्तकीं रत्न किरीट, कर्णीं म
कराकृति कुंडलें, बाहुभूषणें, कौस्तुभ रत्नहार वनमाला कंठांत वि
राजमान मनगटांत कडिं तोडे, करांगुलींत रत्नमुद्रिका, आणि पाद
भूषणें, जिच्या दशांगुलिकेवर दिव्य शशांक प्रकाशित आहेत. आंगा-
स उत्तम चंदन, कस्तुरीची उटी लावलेली आहे व अग्रभागीं गरुड ह
स्त जोडून सेवेंत उभा आहे. नारद तुंबरांचें चित्त वेधक गायन होत-
आहे. अशा भक्तमंडळीनें वेष्टित, त्रिभुवन सुंदर, षड्गुणैश्वर्य संपन्न,
जगद्वंद्य, भक्तकाम कल्पद्रुम, चतुर्भुज, श्रीं विष्णुमूर्ति अथवा धनुर्धा-
री श्रीराम मूर्ति जानकी सहवर्तमान किंवा प्रसन्नते बरोबर इच्छित दे
णारी गिरिजे सहवर्तमान शिवमूर्ति अशा प्रकारें ध्यानांत आणावी. अ
सें जें जें प्राज्ञ दैवत असेल त्याचें असेंच ऐश्वर्ययुक्त स्वरूप ध्यानांत
आणून तेंच आराध्य दैवत प्रथम पूजन समयीं मूर्तीचे अथवा प्रति
मेचे ठायीं प्राणप्रतिष्ठा स्थित करून अधिकार परत्वें मंत्र तंत्रानें आ
णि शास्त्रनुसार पूजा साहित्य व उत्तम सुगंधिक पुष्पादि द्रव्यानें अ
नन्य भावें पूजन करून नैवेद्य समर्पण करावा. आणि प्रार्थना झाल्या
वर तीर्थ प्रसाद ग्रहण करून ध्यान विसर्जन करावें. या योगानें प्राणी

पातक निर्धूत होऊन दुर्वासना जाऊन पुढें सन्मार्ग वर्तनानें त्याचें चित्त शुद्ध होतें. नंतर त्या पुण्य प्रभावानेंच कोणी आशा निर्मुक्त सत् पुरुषाचा समागम त्यास होतांच त्याच्या उपदेश प्रतापें करून तात्काल तो स्वस्वरूपीं मिळून जाऊन ब्रह्मरूप होतो. मग त्यास जन्म मरणादि संसार व्यावृत्ति मुळींच राहात नाहीं. असा सत्यमार्ग असलेला समजूनही किती एक बळेंच त्यास दूषण देऊन स्वकर्म धर्माचरण सोडून मताभिमानी कोणी ह्मणतील कीं, काय तो निराकार परमेश्वर आहे. त्यास साकारत्व मुळींच नाहीं. आहे असें जें कांहीं श्रुतिप्रमाण असलेल्यावर आमची श्रद्धा नाहीं. त्यास अवतार नाहींत. तस्मात् त्याची मूर्ति करून ध्यान पूजन करणें हें व्यर्थ आहे. आणि काय तो शास्त्रांत सर्वत्र एकच धर्म असून उगीच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार प्रकारचे वर्णाश्रम भिन्न भिन्न धर्म स्थापित केले आहेत. असे आपले स्वकीय बुद्धिवादानें कायतें वेदशास्त्राचें परिज्ञान आह्मींच जाणतों. इतरानें आमचें शिष्यत्व स्वीकारावें असें ह्मणणें त्यांचें केवळ आपले ठिकाणींच आपण ओंवाळून घेणें होऊन जगांत तें उलटें उपहासास्पद होतें; कारण या पृथ्वीवर एकापेक्षां एक धुरंधर वेदशास्त्र संपन्नाधिकारी कितीएक प्राणी आहेत. मी सर्वज्ञ असें ह्मणणें दोषार्ह आहे. एक परमेश्वरा वांचून सर्वज्ञ श्रेष्ठ क्यांत कोणीच नाहीं. ज्यांचा त्यांणींच धर्म आचरण करावा. अशी परमेश्वराची वेदोक्त आज्ञा आहे, तिचा भंग झाल्यास दुःखरूप पातकाचें ओझें मस्तकीं वागवावें लागतें. स्वतः ईश्वरासही मीपणा सहन होत नाहीं मग यःकश्चित अज्ञानी जीवाची कथा किती? युगायुगाचे ठायीं धर्मसंस्थापित होण्या करितां परमेश्वर अवतार घेऊन व्यवस्था करीत असल्याचें वेदप्रमाण आहे. सर्व वर्णाचे गुरू ब्राह्मण यांस यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान, आणि प्रतिग्रह या संपूर्ण षट्कर्मांचा अधिकार परमेश्वरदत्त आहे असा अन्यांस सर्व नाहीं. अ-

सें असूनही कोणी ह्मणेल कीं, मी सर्वाधिकारी आहें. हें कसें होईल जसें स्वातीचें उदक सर्व ठिकाणीं पडलें; परंतु समुद्र शक्तिमुखांत पडेल तेंच मौक्तिक होत आहे. या वरून ब्राह्मण मुखांत जे वेद आहेत तेच पूज्य असून कार्यशक्तिप्रद आहेत. इतरांनीं अहंमतें जरी बळेंच ग्रहण केलें तरी ते व्यर्थ होत असून त्या पासून त्यास फलप्राप्ती तर नाहींच; परंतु उलटा दोष मात्र घडत आहे. हें वेदाज्ञेनेंच मानलें पाहिजे. नाहीं तर कोणातेच मातापितरादिही सप्रमाण ह्मणण्यास जागा राहणार नाहीं. सारांश पूर्वापार आपले जेजे धर्म कर्माचरण अधिकार चालत आले आहेत तेच खरे मानले पाहिजेत. उगीच मताभिमान न धरतां तदनुसार वर्तन केलें असतां त्यास तेंच भूषण होऊन स्वार्थ परमार्थ साधन आहेत. दहा मनुष्यांवरही आपल्यास पुरतेपणीं सत्ता चालविण्याचा अधिकार प्रभूकडून मिळाला नसून सर्व राष्ट्रावर आपणा आज्ञा चालवूं असें ह्मणणारास विपत्तीच भोगावी लागेल, हें उघड आहे, ह्मणून मनुष्यानें आपापल्या अधिकारा प्रमाणें वर्तन करावें. अशा धर्मादि स्थिती विषयीं अनेक वेदशास्त्रांत प्रमाणें असतांही तीं तुच्छ मानून केवळ कीर्ति संपादनार्थ आणि आपलें नांव व्यासादि महान् प्रभृतींचे श्रेष्ठ पंक्तींत-मुख्य स्थानीं गाजावें, या हेतूस्तव इच्छेनुरूप मततेंच जगांत स्थापित होण्याचा प्रयत्न करणें हें जसें मूषकानें सिंहीशीं विवाह करण्याची इच्छा धरणें तद्वत आहे. ज्यानें त्यासच शोभून गेलें आहे. सागराची उपमा क्षुल्लक ओहळांदिकांशीं येईल काय? याचा विचार ज्याचा त्यानेंच करावा.

कुसुमचाप- पूर्वीं वेदांतांत कथन केलेली नाहं ब्राह्मणाः न भूद्राः इत्यादि वाक्यें आहेत त्यांस तर यावरून बाध येतो.

मध्वनाथ- तीं असत्य आहेत असें नाहीं. तशी सर्वत्र बुद्धि उगीच ह्मावयाची नाहीं. मी सांगितल्या प्रमाणें जे वेळेस भक्तिपुरःसर चतुष्टय साधनवंत होऊन दृढ अभ्यासानें आणि सद्गुरूपदेशें करून

जीव परब्रह्मरूप होईल तेव्हां त्यास मी, तूं पणा न राहून मग अर्थात कोणी च परकें दिसत नाहीं. सर्व ईश्वर रूप भासतें. आपल्यास तर तसा मुळींच अनुभव नसून षड्रिपूंच्या अंकित झाल्यानें कोणाचा उत्कर्षही सहन होत नाहीं. दुसऱ्याचें वाईट होण्याची इच्छा सदैव ह्रदयीं वसलीच आहे. तसेंच कोणी आपणाकडे नम्रतेनें पाहिलें नाहीं व मानभंगप्रद भाषण बोलला तर त्याचा सूड उगविण्याची संधि कधीं येईल हें पाहतो. आणि या लालचावलेल्या जीवास ऐष आराम पाहिजे शर्करा व मसाले मिश्रित आटीव दुधाची उत्तम बासुंदी, मलई इत्यादि मिष्ट पदार्थांवर प्रीति आहे. व अंगास मलमलीचें वस्त्रही जड वाटतें इतकी नाजुक प्रकृती आहे असें लौकिकांत दाखवितो. उत्तम वस्त्रभूषणें धारण करणें आवडतें. एखादें उपोषण लौकिका करितां करणें ह्मटलें तरी तें दुःसह होऊन पित्तांशादि विकार झाल्याचें जगांत मिरवितो असे कित्ती एक प्राणी प्रस्तुतही आढळतात. पुढें तर उत्तरोत्तर कलिसंबंधानें ग्रहणादि उपोषणाचीही ओळख राहणार नाहीं. मग बापडे एकादशीची ओळख कोठून असणार? कित्ती एक असें ह्मणतील कीं, एक एकादशीस थारा दिला ह्मणजे दुसऱ्या तिथीस राग येऊन तिची रुष्ट मर्जी आह्मांवर होईल; परंतु अशा आचरणास ईश्वरानें शासन योजलें च आहे. जावत्काल प्रसंग नाहीं तावत्काल पर्यंत असें महत्व चालतें. अशीं उदाहरणें दृष्टी समोर कित्ती एक येत आहेत पहा;– अशा नाजूक प्रकृतीचा एखादा ह्मणविलेला असतो. आणि त्यास कांहीं दुष्कर्मानुरोधें अपराध संबंधानें काराग्रहादि राज दंड शासन झालें ह्मणजे त्याचे ऐष आराम, ती मलई इत्यादिक मिष्ट पदार्थ वेळचे वेळीं, दोन प्रहरची वामकुक्षी हळु हळू चालणें, आणि पक्ष्याचाही गलबला सहन होत नसलेला निर्वेध बसणें, मृदु परादिकांची शय्या नित्य नूतन स्वच्छ पोषाग करणें अशी अनेक प्रकारची सवय लागलीच मोडून मग तेथें गिळें मानून जसें जसें वेळेस मिळेल त्याचा आदर पूर्वक

प्रीतीनें अंगीकार करणें त्यास भाग पडतेंच. हेंच मनांत आणून आ दि पश्चात विचार पूर्वक सन्मार्ग वर्तनानें प्रारब्धानुसार प्राप्त होई ल त्याचा तिरस्कार न करून सदैव संतोष वृत्ति ठेवून दुसऱ्याचा उ पमर्द न करतां चालत आलेले धर्म वृद्धिंगत करून सर्वांस पुण्य मा- र्ग दाखविणें हेंच उत्तम विद्वानाचें कर्तव्य कर्म आहे, या योगानेंच तो सर्वांत पूज्य होऊन मग आपो आप त्यास सत्कीर्ति प्राप्त होते आणि तो प्राणी जगांत भूषण व कीर्ति पावतो. आचरण शुद्ध नसून स त्कीर्ति मिळविण्याची इच्छा धरून प्रौढी मिरविल्यास तिच्या वडी ल भगिनीसच वरणें निदर्शनीं भाग पडतें. " बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें." अद्रोहता ज्यांस प्रसन्न आहे, क्षमावधूची माळ कं ठीं शोभते, सन्मार्गा खेरीज पाउल ज्यांचें पडत नाहीं, श्रीचा मद- ज्यांच्या अंगीं नाहीं, परोपकारा विषयीं ज्यांचें दयाभूत अंतःकरण, दीन याचक जनांस यथाशक्ति हस्तें परहस्तें अति संतोषानें द्रव्य अथवा अन्यद्वारें मदत करणारे, यौवनोन्मदकालीं अथवा व्याधी- प्रकोप समयीं उन्मत्त किंवा दुःखी न होतां ज्यांचें अंतःकरण स्वस्थ असतें असे जे प्राणी आहेत ते पृथ्वीचे आधारभूत स्तंभच होतात. नाहीं तर अद्रोहता आणि नैराश्यता कधींही चित्तानें वरिली नाहीं, इं- द्रिय गोळ विषयांकडे धांवत आहेत. असें असूनही मजसारखे धन्य कोणीच नाहीं; असें ह्मणविणारे जे आहेत त्यांस स्वकर्म राहित्या स दोष घडत आहे. आणि ज्यांची सर्व प्रपंचांत उदास वृत्ति असून सर्पादि महान् अरिष्टें अंगावर येऊन लोटलीतरी त्यांची त्यास मु ळींच क्षिति नाहीं. अशी दशा जीवाची जे वेळेस होईल त्या वेळेसत्यां कडून कर्म झालें नाहीं तरी त्यास पातक घडत नाहीं. " सर्वं विष्णु मयं जगत्" अशी वृत्ति बळेंच करीत ह्मटलें तर कशी होईल, यासअ नेक जन्मांतरींचा पुण्य ओघच पाहिजे तेव्हां त्यास ज्ञानाची प्राप्तिहो ते. ती तरी सहस्त्रांत एखाद्यास सिद्ध होते. परमेश्वर प्राप्तीचें ज्ञान

काय वाटेवर पडलें आहे. उगीच अनधिकारी कोणी ह्मणेल कीं, अन्य पूजादि साधनांची कांहीं आह्मांस गरज नाहीं, आणि तें करणेंही उक्त नाहीं, एक आकार रहित ईश्वराचें ध्यान तरुणोपायास करूं ह्मणजे झालें, असें जो खरोखर विचारी आहे तो कधींही ह्मणणार नाहीं. मुळींच आडांत नाहीं तें पोहऱ्यांत काय येणार आहे? ह्मणजे ज्या ऱ्हदयांत परमेश्वर स्वरूपाचें परिज्ञान यत्किंचितही बिंबलें नाहीं तेथें ध्यानाची धारणा कोणत्याही प्रकारें निश्चयें करून बसणार नाहीं. मग समाधि लागण्याची तर आशा कशास पाहिजे. जो सन्मार्ग धरावयाचा तो टाकून आडमार्गांत शिरल्यानें शेवट परिणाम कोणाचा झाला आहे? हे कुसुमचापा, आतां अंतर्यामीं दुःसंगानें जे कांहीं तुझ्या कुतर्क भरले असतील त्यांचें विसर्जन कर. अद्याप तुझी बाल्य बुद्धि गेली नाहीं. आतां या विषयांत बराच वेळ गेला तरी तुझी ऐकण्या विषयीं इच्छा पुरी होत नाहीं. तथापि हा विषय ही कधीं सरावयाचा नाहीं. आणि माझा स्वतःचा चालू इतिहासही पुष्कळ सांगणें आहे ह्मणून हा प्रकार आतां पुरा करितों. या पेक्षां सूज्ञास अधिक सांगणें नको. तूं विचारी आहेस ह्मणून हें मोठ्या संतोषानें मला समजलें तितकें तुला सांगितलें. हें पूर्ण लक्षांत आण. नाहीं तर पालथ्या घागरी वर पाणी, असें मात्र होऊं देऊं नको. शर्करा देणारे पुष्कळ मिळतील परंतु निंब देणारे मात्र दुर्मिळ आहेत हें जीवीं धर. हा तत्व विषय अति गहन असून सर्वांस अवगतही नाहीं. जे प्रयत्नें करून समजून घेऊन या मार्गीं लागतात त्यांचे सर्व कुमतींचा ऱ्हास होऊन खरें कळून येत असल्यानें सन्मार्गी वर्तन करून ते प्राणी सर्व पूज्य होतात.

कुसुमचाप:- खरोखर आज पर्यंत मी याज्ञविषयीं अज्ञानी असल्यानें कोठेंच माझी श्रद्धा बसत नव्हती; परंतु आज हा मला तुझा अनुग्रहच झाल्या सारखें होऊन पूर्वींचें आतां कांहीं एक माझें

मत न राहतां स्वच्छ हृदय झालें आहे, हें जर न कळतें तर मी असाच जन्मभर इच्छेनुरूप वर्तन करून अपात्र होतों. तुझें सुबोध व रसिक वक्तृत्व असल्या विषयीं पूर्वींच त्या फकीर बुवानें जें सांगितलें त्याचा प्रत्यक्ष अनुभव मी घेतला. असो. आतां तुझी ही हकीकत पुढें सांगून माझे मनाची शांतता कर, तीही कर्णास फार मधुर लागते.

---

## अंक ३रा.

### पृथ्वीछंद.

प्रसंग जरि एकदां सतत येउं ते लागती ॥
कमी न करवे तयां जंव असेचि त्यांची गती॥
तसेंचि मनुजा नये वधुचरित्र आकर्षितां॥
जरी सबळ त्यास ये तप बळेंचि नाकर्षितां॥१८॥ सारदल.

मध्वनाथ:- तुझ्या लक्ष्याची अवधारणा मुख्य असल्या प्रमाणें तुला सांगतों. तुझी प्रस्तुत उभारलेली हेतुरूप इमारत खचचिणें हेंही योग्य दिसत नाहीं. मग तसाच मी तीर्थ यात्रा करीत नैराश्य वृत्तीनें दूर प्रांतीं फिरत असतां एके दिवशीं अरण्यांत अस्तमान होण्याचा समय आला तरी आस पास कोठें वस्ती आहे असें मला वाटेना ह्मणून तेथेंच कोठें निवाऱ्याची जागा पाहून रात्रीची विश्रांतीची सोय कराची असें मनांत आलें. तों कांहीं अंतरावर दाट झाडींतून जात असलेला एक मार्ग दृष्टीस पडला. त्यानें अस्तमान होई पर्यंत हिंड्या करून झाडींतूनच सुमारें दोन कोस तसाच पुढें गेलों, तेव्हां एक मोठें मैदान लागलें. थोडा धीर येऊन चोंहीकडे पहात असतां पुढें पूर्व बाजूस एक रमणीय हवाशीर बाग आहे, त्या बागेचे आंत एक विस्तीर्ण अशी इमारत आहे तिचे उंच बाजूचे मनोरे दिसल्या वरून मी मग तिकडेसच संतोषानें चाललों असतां एकाएकीं दुंदुभी ध्वनी सारखा नाद कानीं येऊं लागला. व कांहीं मोठ मोठाले भयंकर शब्दही ऐकूं आले त्या योगें मला थोडीशी भीति उत्पन्न झाली. व तसाच कांहीं विद्युल्लते सारखा प्रकाश पडून नेत्रांस कांहीं

वेळ अंधारी आली. मग थोडा वेळ तेथें बसून पाहतों तों समोर आग्ने य कोनास पूर्वेस एक चिरेबंदी विस्तीर्ण आणि उंच असा वाडा राज महाला प्रमाणें सतेज दूर अंतरा वरून दिसूं लागला. त्याचे सभोवतीं नारळी पोफळी आंबरायात नाना तऱ्हेचे मनोहर वृक्ष हारीनें अस लेले त्या स्थलास विशेष शोभवीत होते. त्याचे आसमंतात् भागीं वा यूचे सहवासानें वेळो वेळीं शीतल सुगंध वाहात होता. या वरून आं त पुष्पवटिका आणि पाणीही पुष्कळ खेळविलेलें असावें असें माझें अनुमान झालें. तेव्हां मला पराकाष्ठेचा आनंद होऊन वाटलें कीं, मी आज भाग्योदयानें कोणा तरी सभाग्याचे आश्रयास आलों आहें म्ह णून अगोदर उत्कंठेनें तिकडे चाललों तों त्या बागेचे बाहेरील सीमे चा परिघ चिरेबंदी पाहून तेथपर्यंत गेलों. तोही अत्यंत देखाव्या चा होता. त्याचा वर्तुळ घेर सुमारें एका कोसाचा तरी असावा. त्यां त जागोजाग लहान लहान आंत जाण्याचे जाळीदार नकशीचे द रवाजे होते. तसेच प्रत्येकांतील बांधलेले रस्ते स्वच्छ आणि रुंद होते. व त्यांचे बाजूनें नारळी आदिकरून एक सारखे उंच वाढले ले वृक्षांचा समुच्चय एकवटून गेला होता. त्यावरून नाना तऱ्हेचे प क्षी मंजूळ शब्द व क्रीडा करीत होते. त्यांचे मधून साधित असले- ल्या चक्राकार कारंज्यांनीं आप आपले उदकाचे फवारे विहारास आकाशमार्गी सोडून दिलेले ते इच्छेनुरूप त्या वृक्षसमूहांतून क्र मण करीत असतां त्यांचा महत् वर्षाव त्या स्वच्छ मार्गावर होत होता. यामुळें जिकडे तिकडे गार हवा होऊन गेली होती. व ठिक ठिकाणीं सुगंधिक पुष्पांचे ताटवे आणि नामांकित मधुर फळांचे वृक्ष फलांनीं युक्त असून द्राक्षीचे मंडप, सदा सुहागाच्या वेली आ पली शोभा त्या आरामांत प्रदर्शित करीत असत. तसेच चौफेर बांधलेलें पाटांतून स्वच्छोदक क्रम विभागानें चोंहीकडे फिरत होतें. त्याचे सभोंवती हंस, बक, कारंड व आणखी पांडव पक्षी

क्रीडत असून आंम्रफणसादि दाट वृक्षांचे मधून शब्द करीत मयूरांचे कळप आपले नेत्रपिसारे उघडून ते मस्तकावर धारण केल्या. त्या सुंदरपणाचा देखावा दाखवीत होते. असें तें अप्रतिम स्थान या वेळेस सांगतांनां माझे दृष्टीस समोर उभें राहिलें आहे. असा सर्व चमत्कार मी चोंहींकडे हिंडून दुरून बराच पाहिला; परंतु त्यांत एकही मनुष्य कोठें दृष्टीस पडलें नाहीं. मग हिय्या करून त्यांतील एक जाळीदार दरवाजा एके बाजूस उघडा होता, त्यांतून आंत जाऊन इकडून तिकडे कांहीं वेळ फिरलों. तरी मला मनाई करण्यास कोणीच आलें नाहीं. अहाहा! काय तो बाग; जींत ऐष आराम करण्याच्या बैठकीच्या जागा व फिरण्याचे रस्ते किती हवाशीर. तशीच विलासमंदिरें, जळमंदिरें आदी करून इमारतीही कित्येक. कीं त्या पाहण्या बरोबर मी अगदीं भांबावून गेलों. अशा ठिकाणचें इच्छे प्रमाणें सौख्य ज्यास प्राप्त होईल तो प्राणी मगकधींही स्वर्गसुखाची इच्छा करणार नाहीं. याहूनही नामांकित स्थलें त्या प्रदेशीं कित्येक ठिकाणीं आहेत. त्यांचें वर्णन माझ्याच्यानें करवत नाहीं. असो. मग मी तसाच पुढें जात असतां वाड्याचा मुख्य दर्वाजा माझ्या दृष्टीस पडला. ज्याचे समीपचनीं चौफेर वर्तुळ आकृतीच्या चढत्या पायऱ्या व संगमरवरी दगडाचे पैलूदार हौद आहेत. व ज्यास बाहेरील बाजूस मजबुतीसाठीं मोठमोठाले बोंडांचे व तीक्ष्ण धारांचे खिळे मारले आहेत. आणि चांदीचे पत्र्यानीं मढविला आहे. त्याचें तेज समोरील जलभरित हौदांत पडून त्या दरवाज्याची त्यांत ते प्रतिमा दाखवीत होते. तसाच त्या उदकांत कांहीं वृक्षांचा आणि इमारतीचा सुंदर देखावाही दिसत होता. आणि कांहीं अद्भुत चमत्कारही तेथें दृष्टीस आला. तो असा कीं, त्या सर्व बागेंतून कुत्रीं, मांजरें, बोकड, हरिण, रोही, आस्वल, लांडगे व कितीएक दुसरीं इकडे पाहण्यांत

ही नाहींत अशीं पुष्कळ चित्र विचित्र रंगांचीं जनावरें इकडून तिक डे फिरत होतीं. त्यांत कोणाचें हात, कोणाचे पाय, कोणाचें मस्तक असे त्यांचे अवयव मनुष्या सारखे असून ते अत्यंत दीन दिसूं लाग ले. एकाच्याही मुखांतून शब्दोच्चार निघेना. त्यां पैकीं एक दोन जना-वरें मजपुढें येऊन कांहीं संज्ञा मला करीत होत. त्या विषयीं त्या वेळे स मला कांहींच समजेना. परंतु पुढें प्रसंगा अंतीं मला त्याणीं तेथून त्वरेनें परत जाण्याची सूचना केली असावी असें कळून आलें. असो. असा भयंकर चमत्कार पाहतांच पूर्वीं उदयास आलेल सर्व हर्षभा वळून मी फार घाबरून गेलों. आतां जीविताची आशा सर्वस्वीं सुट ली असें वाटलें. कारण असा प्रकार सर्व जादूगार लोकांत मंत्रसा मर्थ्याचा असल्या विषयीं मी जे वेळेस घरांतून बाहेर पडलों त्या पूर्वींच मला कांहीं कळून आला होता; परंतु उपयोग काय? तेथें को णीकडे जाण्यासही मार्ग दिसेना. दोन तीन वेळ मी नशांत धैर्य ध रून त्या बागेच्या पार निघून जाण्याचा यत्न केला. तरी पुष्कळ दूर गेलों असें वाटावें आणि पहावें तों पुनः त्याच ठिकाणीं आलों आहें अशा घोंटाळ्यांत पडून सर्व विचार बंद झाले. ते वेळेस-आई बापांनीं प्रवासास न जाण्या विषयींचा केलेला बोध माझे म नांत आला. तथापि त्या बद्दल म्हणण्या सारखें मला दुःख वाटलें नाहीं; परंतु तीर्थयात्रादि जी स्वतंत्रतेनें फिरण्याची इच्छा होती ती मात्र आतां येथून नाहींशी जाहली, म्हणोन मला फारच पश्चात्ताप झाला. तो प्रदेश जादूचा आहे असें जर मला पूर्वीं समजतें तर मी मुळींच तिकडे जाण्यास धजावलों नसतों. असो. बोलून उपयोग का य? अद्याप पर्यंत तोच ताप मी भोगीत आहें. त्या बिकट प्रदेशाचें स्म रण झालें म्हणजे अंगास कांटाच उभा राहतो. आतां एक तरी आ हे कीं तें सर्व जाऊन या पक्षिदेहाचेंच मला दुःख भोगावें लागतें. त री तुझे सहवासानें याचें सांप्रत कालीं मला कांहीं वाटत नाहीं अ-

सें बोलतानां दुःखकारक सुस्कारे टाकून तो **मध्वनाथ** स्तब्ध झाला.

या प्रमाणें त्याची स्थिति पाहून **कुसुमचापास** वाईट वाटलें; परंतु त्याचा पुढील इतिहास याहूनही कांहीं चमत्कारिक असावा, ह्मणून त्यास सावध करून ह्मणाला. ही तुझी हकीकत मला ऐकण्या विषयीं विशेष मोह उत्पन्न झाला आहे. ह्मणून झाले गोष्टीचा खेद न करितां पुढें सांग. तो बरें आहे म्हणून सांगूं लागला. बा **कुसुमचापा**, तशा संधीसही माझे पोटांत क्षुधा प्रदीप्त होऊन जीव गलबलून गेला. त्याचे आधले दिवसा पासून अरण्यांत चालतांना फार च श्रम होऊन उपहाराचें साहित्य कांहींच न मिळाल्या नें उपोषण- जाहलें होतें. तेव्हां मनांत आलें कीं, कांहीं असो, या बागेंत पुष्कळ खाण्याचीं मिष्ट फळें झाडांस आलेलीं आहेत. त्यांतून थोडींशीं तोडून घेऊन सेवन करावीं. परंतु तसें करण्यास धैर्य होईना, तरी ग्लानी आल्या मुळें मी जेथें उभा होतों तेथच्या कांहीं वृक्षां खालीं पक्व फळें गळून पडलीं होतीं. तीं मोठ्या युक्तीनें उचलून घेऊन त्यानें कांहीं उदराची स्वस्थता केली. व त्याहीं दांतलें दोन ओंजळी उदकही प्राशन केलें. मग मला बराच आवांका आला. तरी आतां जावें कोणी कडे, पुढें काय परिणाम होईल या भीतीनें कोठें तरी येथेंच एका दे झाडाचे आड कोनास न दिसण्या सारखें बसून आजची रात्र निरुपायास्तव काढली पाहिजे. ह्मणून दुसरे बाजू कडून चाललों तरी उपयोग जाहला नाहीं. पुनः तीच जागा पायां खालीं आहे, मग तरफार घाबरून त्या वाड्याचे आसपास कोणी दिसत नव्हतें; यास्तव आंतही कदाचित कोणी नसेल अगर असलें तरी चिंता नाहीं; आणि बाहेर एकटेंच असण्या पेक्षां आंत जाऊन राहवें हें बरें असें मनांत आलें. मग तो मुख्य दरवाजा उघडाच होता त्याच्या पायऱ्या चढून धैर्यानें आंत गेलों. ते वेळेस नुकताच सूर्य अस्तास जाऊन चंद्रानें आपलें आकाश मंडपीं प्रकाशित ठाणें घातलें होतें आणि त्यांता-

ली टेंकडी ओलांडून पहिले चौकांत जाऊन जों उभा राहतात आहे तों तेथें कोणीही नसून एका एकीं सिध्ध असलेल्या चौफेर बिलोरी झाडांची व समयांची रोषनाई एका मागून एक होत गेली. तोही प्रकार भयप्रद मला झाला. प्रसंग आल्यावर थोडें धैर्यही मनुष्याचे अंगीं येतें, हेंच खरें आहे. मी त्या चौकांत उभा होतों तो गंडकी शिळेचा चौफेर बांधलेला असोन नवीच देदीप्यमान फरशी ही त्यास होती. व सुरूचे खांब इत्यादि फारच सुशोभित आणि विस्तीर्ण होते. त्यां मध्यें जागो जाग असलेलीं कारंजीं तिसरे मजल्याचे गच्ची पर्यंत उडत होतीं. त्याचे उदकाचे तुषार, प्रत्येक मजल्याचे सज्यांतील गच्चीवर सुगंधिक पुष्प झाडांचे पेले चौफेर ठरविले होते, त्यांवर ते उडत असल्यानें त्यांचें पाणी पाहिजे तितकें त्यांवर सिंचन होऊन त्यांची टवटवी नूतन दिसत होती. व त्या चौकांत कारंज्यांसभोंवतीं समांतरावर पोफळी नारळांचे वृक्ष लाविलेले त्यांवर उदकाचे बिंदूंचा संचय झालेला वरचेवर खालीं पडत होता. तो केवळ दृष्टीस त्या तेजांत जसे एक सारखे वरपासून तळाचे फरसबंदी पर्यंत मौक्तिकांचे सरच सोडले आहेत कीं काय असा भास होऊं लागला. चौका सभोंवतीं दुजोडी चौसोपी एकसारखीं दालनें होतीं. व त्यांचे भिंतींस तेजस्वी रंग दिलेला होता. आणि त्यांवरून नाना तऱ्हेची अपूर्व देखाव्याचीं चित्रें सोनेरी शाईनें काढलेलीं खुलत होतीं. सर्व दालनांतून चित्र विचित्र गालिचादि उत्तम बिछायती घातल्या होत्या. जागोजाग खोदीव जाळीदार अति उत्तम चंदनाचे पलंग असून त्याजवर मश्रु किनखापी व पशंम्याच्या दुगाद्या घालून नित्य तयारी प्रमाणें बिछाने पुष्पशेजे सह तयार केले होते. तशींच चौफेर दालनांतून बिलोरी झाडें व समयांप्रदीप्त असलेल्या रोषनाईचा प्रकाश चोहोंकडे पसरला असल्यानें आणखी कितीएक ठिकाणीं कांहीं नामांकित अमूल्य वस्तु

ठेविल्या होत्या त्यांची सर्व शोभा दृष्टीस पडली. इतक्यांत तेथें प-लीकडे एक अर्धवट उघडलेलें दार मला दिसलें व त्यांतून उजेड दिसत असून कांहीं मनुष्यध्वनि ऐकूं येऊं लागला. आंत आणखी काय आहे ह्मणून मी त्या दाराचे समीप गेलों, तरी तें उघडून माझ्यानें एकाएकीं आंत प्रवेश करवेना, ह्मणून क्षणभर तेथेंच थबकलों. तेव्हां पुनः मनांत आलें कीं, आपण या बिकट स्थलीं कधींही यावयाचे नसून आलों आहों त्याअर्थी जें पुढें व्हावयाचें असेल तें होईल. मग उगीच भीति व काळजी तरी कशास बाळगावी! अशाही संकटांतून संरक्षणकर्त्ता परमेश्वर आहे, असें मनास धैर्य देऊन तें दार उघडून आंत गेलों, तों पहिले चौकाप्रमाणेंच चौक असून कारंजीं, झाडें, बिछायती आणि प्रज्वलित रोषणाई होती. मग कांहींवेळ तेथील सर्व प्रकार पाहून तसेंच आणखी पलीकडे दार उघडें होतें त्यांतून तिसरे चौकांत गेलों. तेथेंही तिळमात्र न्यूनता नसून त्याहीपेक्षां उत्तम व्यवस्था होती. त्या चौकाचे मध्यभागीं एक अपूर्व जलमंदिर होतें. त्यांत जाण्याचें मनांत आल्या वरून आंत गेलों, तों कांहीं जवाहीर आणि अमूल्य तेजस्वी हिऱ्यांचे स्त्रियांस घालण्याचे अलंकार चांदीचे तबकांतून व कांहीं खुर्च्यांवरून ठेविलेले मी पाहिले, त्या प्रमाणें या प्रदेशीं माझे पाहण्यांत एकही अलंकार येत नाहीं. असा तो संपत्तीचे वैभवानें युक्त वाडा असून त्यांत कोठेंच एकही मनुष्य दृष्टीस पडत नाहीं. या वरून हा चमत्कार तरी काय असावा अशा विषयीं माझा कांहींच तर्क चालेना तरी निश्चयानें मला वाटलें कीं, या ठिकाणीं कोणी तरी सत्ताधीश अतिशय संपत्तिमान् आणि कुटुंबी राहात आहे, आणि त्यांतही मुख्यत्वें करून सर्व विलासाचें साहित्य असल्या वरून येथें स्त्रियांचें प्राबल्य अधिक असावें असाही तर्क झाला. तें मंदिर फारच रमणीय असल्या वरून कांहीं वेळ विश्रांतीस्तव तेथें एके

कारक जीचें प्रफुल्लित मुख आहे अशी एक लावण्यवती सुखकारिणी स्त्री होती. तिची दृष्टि ऐश्वर्य आणि तारुण्याचे मदानें धुंध झालो आहे, जिचे अंगावर जवाहीर आणि मोत्यांचे दागिने ठिकठिकाणीं असलेले खुलत आहेत व अंगांत हिरकण्यांचा जडाव केलेली चांदणीची जाळीदार पीतवर्ण कंचुकी घातली असून त्यावर कंठांतील जडाव कंठा आणि रत्नहारांचें क्रीडायुक्त आंदोलन असल्यानें त्या पासून वरचेवर उत्पन्न होत असलेलें तेज तें तिच्याशरीरआकाशावरून ती नेसलेल्या काजळीरंगाच्या भर्जरी शालुरूपी मेघमंडळांतून विद्युत्प्राय चमकत आहे. अशी ती लोकोत्तर स्त्रीत्या आपल्या चौघीजणी सख्या व दासी यांसह सिद्ध असलेल्या बिछाइतीवर येऊन बसली. असा हा चमत्कार पाहतांच मला फार आश्चर्य वाटलें. आणि भीतीही बरीच कमी झाली. तिणें कांहीं वेळ तेथें आराम पावून दासीस सूचना करतांच मी पूर्वी सांगितलें आहे त्या पैकीं दोन रोही आणि तीन लांडगे त्यांणीं तिचेसमोर चौकांत आणून उभे करितांच तिणें उठून हातांत एक लहानशी वेताची छडी होती, ती त्यांचे अंगावरून तीनवेळ उतरली त्या योगानें लागलींच तीं जनावरें नाहिशीं होऊन तेथें अतिसुंदर आणि तरुण असे ते पांच पुरुष दिसूं लागले. तेव्हां त्या पांचीजणीनीं उठून मोठ्या सत्कारानें एकेक पुरुष आपले हातीं धरून त्यांसह पूर्ववत् बिछाइतीवर येऊन बसल्या. नंतर कांहीं वेळ त्यांचीं विनोदपर संभाषणें चाललीं आहेत तितक्या वेळांत दासींनीं दक्षिण बाजूचे सोप्यांत पाटरांगोळ्या घालून त्या पुढें चांदीचे पात्रांत पूर्वींच सिद्ध असलेल्या फराळाची सर्व तयारी करून सर्वांस पाय धुण्यास उठावें असें आर्जवयुक्त हळूच मर्यादेनें सूचविलें. तेव्हां मग त्या सर्वांनीं उठून पादप्रक्षालन केलें, आणि पात्रांवर बसून इच्छेनुरूप मोठ्या आनंदांत विनोद करीत ते फराळाचे पदार्थ तादांतून

[stamp]

सेवन केले. त्या साजूक पक्वान्नांचा स्वास मी होतों तेथपर्यंत येतअसल्यानें आणि माझे पोटांत क्षुधाही प्रदीप्त झाल्यानें तसाच त्यांचे पंक्तीचा अलभ्य लाभ समजून मी जरी कधीं अशा विषयीं इच्छा करणारा नवतों तरी त्या नियमास ते वेळेस माझे मनानें सोडण्याचा यत्न करून त्यासहवर्तमान फराळास बसण्याची आपली इच्छा आपले ठिकाणीं प्रदर्शित केली; परंतु त्याचा तो बेत सिद्धीस गेला नाहीं. बोलावतो कोण. त्यास आंतले आंत चुरमुरेच खात बसावें लागलें. त्यासही मी राजी होतों पण तें तरी कोठें होतें. हे प्रकार उगीच गमतीखातर ते वेळेचा मनांत आलेला आतां तुला सांगितला. असें त्याचें भाषण ऐकून कुसुमचापास फार हसूं आलें. असो. मग मध्वनाथ ह्मणाला पुढें त्यांचें आंचवणें झाल्यावर दोघी दासीनीं तयार करून ठेवलेलें सोन्याचें जाळीदार डब्यांतून पक्वेपानांचे विडे सर्वांचे हातीं दिले. ते त्यांनीं ग्रहण करून पुनः ते आपआपले ठिकाणीं बिछाइतीवर बसले. नंतर क्षुधेनें व्यास झाहलेलीं बाहेरील सर्व जनावरें इषारत होतांच समोरील चौकांत हारीनें येऊन दीनासारखीं उभीं राहिलीं. तेव्हां त्यांस पाहून ती तेथील मुख्य अधिकारिणी शशिरेखा पूर्ववत् हातांत छडी घेऊन उठली. आणि कांहीं तोंडानें मंत्रोच्चार करून प्रत्येकाचे आंगावरून ती उतरतांच त्या सर्वांनीं तात्काल मनुष्यदेह धारण केले. मग त्या दुजोडी सोप्यांत पात्रें सिद्ध केलेले ठिकाणीं आज्ञा होतांच त्यांणीं तेथें जाऊन भोजन केलें. त्यांसही पानसुपारी दासीचे हातें देववून त्या बागेंत कांहीं वेळ विश्रांतीस्तव फिरण्यास समस्तांस तिणें परवानगी दिली. ते फिरून येई पर्यंत तेथें कांहीं तिणें संभाषण करून तेथील व्यवस्थे विषयीं थोडा दरबार केला. तीं मनुष्यें फिरून आल्यावर तिजपुढें खालीं माना घालून हात जोडून उभीं राहिलीं. तेव्हां तिणें तीच छडी उलटी फिरवून किंचित् उदकही त्यांचे

अंगावर सिंचन करून पुनः त्यांस पश्चात्ताप दिलें आणि बागेंत परत-लाविलें. हें सारें कृत्य मी आपल्या दृष्टीनें गुप्तपणें पाहिल्यावर अ-शीच आतां निःसंशय माझी ही स्थिति होईल, ह्मणोन वारंवार दुःखानें नेत्र भरून येऊं लागले. तरी आंतले आंतच तसेंच बसणें भाग पडले हर हर!!! त्या बिचाऱ्यांचें परतंत्रादि दुःख पाहून माझें अंतःकरण कळवळलें; परंतु स्वाधीन नसल्यानें उपायरहित झालों, आणि आपली यांतून मुक्तता कशी होईल ही विवंचना लागली. पुढें त्या पांचजणी, एक एक पुरुष हातीं धरून शुभ्र चांदणें स्वच्छ पडलें असल्यामुळें बाहेरील कुंजारामांत ऐष आराम हो-ण्यासाठीं दासींसह तेथून निघून गेल्या. मग तेथें त्या रोषणाई-त मी एकटाच असलेले ठिकाणीं चमत्कारिक स्थिति होऊन पडलों. झोंप कशाची येते. उद्यां काय परिणाम होईल या धास्तीनें तळमळ लागली. तेथेंच कांहीं फळफळावळ आणि मिठाई तबकांतून असलेली पाहिली तेव्हां क्षुधेमुळें राहवेना ह्मणून मनाचा हिय्या केला. आणि त्यांतील मिठाई व थोडीं फळें खाऊन तेथेंच एक मिष्ट पाण्याचा हौद होता त्यांतील उदक प्राशन केलें. त्या योगानें पोटांत शांत होऊन कांहींशी स्वस्थता आली, तरी डोळा लागेना. असो. पुढें आ-णखी एक प्रहर गेल्यावर त्या पुरुषांसहवर्तमान त्या स्त्रियांचें पुनः त्या ठिकाणीं आगमन झालें. ते वेळेस सुमारें मागील प्रहर रात्र उरली असावी. मग तेथें त्या क्षणभरही न राहतां लागलीच मधील चौकाचे दारानें आल्यामार्गें परत गेल्या. त्यां बरोबर तरुण पुरुषां पैकीं एकजण मात्र मी असलेल्या बाहेरील चौकांत राहून बाकी चौघेजण त्यांचे मागूनच आंत गेले. तितक्यांत सारीं दारें-ही बंद जाहलीं. मग तेथें एकजण राहिलेला पुरुष मी होतों त्याच दालनांत एका पलंगावर येऊन तळमळत पडला. तेंही मला आ-श्चर्यच वाटलें. हे मित्रा कुसुमचापा, काय तुला सांगूं! त्या ठिका-

णची जांचणूक तर फारच दुःखकारक; पहा त्या पलंगावरील पुरुषा-
स निद्रा पळभरही येईना. त्यास वारंवार आपले पूर्वस्थितीचें स्मर-
ण होऊन रडूं येऊं लागलें. आणि आपणाशीं ह्मणों लागला कीं, हर
हर!! मजसारखा भाग्यहीन त्रिभुवनांत कोणीं नसेल. माझें तारु-
ण्य आणि आयुष्य व्यर्थ जात असोन इकडील क्षणिक सौख्या-
चे हेतूस्तव घरचे प्रपंच सौख्यास सर्वस्वीं अंतरलों. परमेश्वरानें
कोणतेच प्रकारची न्यूनता मला केली नाहीं. वडिलोपार्जित घ-
रांत पांच लक्षांची जहागीर चालत असून मोठमोठाले वाडे, ह-
वाशीर बागा, बगीचे, आंबराया अशीं चांगले प्रकारचीं दौलत
असून कोणाचें देणें नसल्यानें प्रतिवर्षी अधिक खजिन्यांत संच-
य होत आहे. तशीच माझी प्रियतमा रूपयौवन संपन्न आणि
आज्ञाधारक जी नामांकित सावकाराची आवडती कन्या आहे ती
माझी फार दिवस शद्ध नसल्यानें स्मरणीस लागून मरणोन्मुख
जाहली असेल. माझी धाकटी बहीण मजवांचून अगदीं वेडी
झाली असेल. तसेंच इष्टमित्रांसही कांहीं रूचत नसेल. आणि
आईबापाचें तर तोंडचें पाणी पळून दुःखानें रात्रंदिवस माझी-
काळजी वहात असतील. आणि मजवांचून स्वकीय निवासाचें
शहर तें रमणीय असूनही त्यास उदास भासत असेल. पुढें का
य तो जहागिरीचा मालक मीच त्यास आहें. परमेश्वरानें एकादा त-
री मला भाऊ दिला असता ह्मणजे इतकें दुःख मी कधींच मनांत
आणिलें नसतें. शिव शिव!! कालगति विचित्र आहे!!! मी मोठे
परिश्रमानें विद्येचा अभ्यास करून तिच्या योगानें अल्पवयांतच-
सत्कीर्ति संपादन केली. त्यांचाही माझे हातून चांगला परिणाम
कांहींच जाहला नाहीं. आणि येथूनही मी सटून जाऊन पुनश्च
आई बापांस सौख्य देईन असेंही संभवत नाहीं. असो परमेश्व-
राची मर्जी. कितीही शोक केला तरी जीवाचें कोण आहे, अशा

पश्चात्तापानें शोक करून तो त्या पलंगावर वारंवार उठून बसूं लाग-
ला. हे त्याचे मोहक हृदयास द्रव आणणारेत्या एकांत स्थलीं दुःखांत
मुखांतून निघालेले उद्गार ऐकून व जीं कांहीं भाषणें निघालीं त्यां
वरून त्यांचा व माझा नात्याचा संबंध अगदींच निकट दिसूं ला-
गला. त्यामुळें त्यास भेटल्या वांचून मला धीर धरवेना, ह्मणून ते-
थून धैर्यानें उठून त्याचे दृष्टीसमोर पलंगाचे अगदीं जवळ जाऊन
त्याचे मुखाकडे पाहतां पुर्तेपणीं मी त्यास ओळखून स्तब्ध उभा
राहिलों. तेथें मला एकाएकीं पाहून त्यास भीति उत्पन्न जाहली;
परंतु मी लागलीच ह्मणालों अहो घाबरूं नका. मी एक तुमचे सा
रखाच दुःखी प्राणी आज या कालपाशांत सांपडलों आहें. तुम
चें दुःख ऐकून मला फार वाईट वाटतें. तेव्हां त्याची भीति जाऊन
तो मला ह्मणाला तुम्हीं कोठील व कोण असून या स्थलीं कसें आ
लां आहांत? तुमची येथें कोणाची गांठ पडली आहे काय? मी ह्म-
णालों अद्याप पर्यंत मला कोणी पाहिलें नाहीं व कोणाशीं संभा-
षणही जाहलें नाहीं. दुर्दैवानें आज या ठिकाणीं मला आणल्यावर
येथील विचित्र स्थिति पाहून त्याणेंच दया करून थोडा आपला कल
फिरविला. ह्मणून या संनिधच्या पलंगाखालीं पेट्यांचे आड मला
आश्रयास तरी इतका वेळ जागा मिळाली. नाहीं तर केव्हांच कोणा
चे दृष्टीस पडून काय परिणाम जाहला असता कोण जाणे. दुःखां-
त सुख इतकेंच मला झालें आहे कीं, कांहीं माझें पूर्वार्जित तरी उद-
यास आलें ह्मणून आपली आज गांठ पडली. परमेश्वराची लीला अ
गाध आहे. तुमचे मुखांतील निघालेलीं भाषणें मीं ऐकिलीं नस
तीं, तर हा योग कधींही न येता. वास्तव पुढें कांहीं सुचिन्ह दिसत
आहे. या विषयीं मी आज निश्चय करितों. हें ऐकून त्यास मोठें आ
श्चर्य व कांहीं ओळखीचेही माझे शब्द आहेत असें वाटलें; परंतु
माझे मस्तकावर वाढलेला जटाभार त्याचे पूर्वीं पाहण्यांत नसून कांहीं

प्रवास दुःखानें माझें रूपांतर झालें होतें व भेटूनही मध्यंतरीं बराच काळ गेला होता. यामुळें त्याणें पुर्तेपणीं माझे मुखाकडे निरखून पाहतां त्यास लागलीच ओळख पटली. मग काय विचारावें. त्याचा कंठसद्गदित होऊन एकदम उठून त्याणें माझे गळ्यास मिठी मारलीआणि आनंदाचें भरतें येऊन प्रेमाश्रूनें त्याचे नेत्र भरून आले. तोंडांतून पुढें एकही शब्द निघेना तेव्हां माझीही तशाच प्रकारचीस्थिति झाली. तथापि त्याणें भीतीस्तव तें सर्व आंतलें आंत आवरून त्याची बाहेर परिस्फुरना होऊं न देतां मला हळूच म्हणाला येथें तुमचें कोणाशीं संभाषण झालें नसून भेटही जाहली नाहीं, हें बरें झालें. मी जरी येथें आलां अटकेंत आहें तरी माहित आहे तितकी तुह्मांस निघून जाण्याची कांहीं युक्ति सांगून येथून पार पाडीन. हामुलूख सर्व जादुरूप जाळ्यानें वेष्टित आहे. याचे संपूर्ण पेंचउकलून अजी सुटून जाण्याचा मार्ग मात्र मला अवगत नाहीं. त्यास निरुपाय आहे. असें त्याचे मुखांतील ममत्व भावाचें भाषण ऐकतांच मला एकपरी आनंद जाहला. व तशीच त्याची दुःखदायक स्थिति पाहून वाईट वाटलें, तथापि ती वेळ दुःख करण्याची नव्हती. यासची शक्तिन्यायें आजचें संकट उद्यांवरजाईल. व ही काळघटिका टळल्यास पुढें पाहतां येईल. ईश्वर कृपेनें सर्व संकटांतून आपली मुक्तता झाली तर याचीही सुटका हरएक प्रकारें आपण करूं असें मनांत येऊन बरेंच धैर्य आलें. तितक्यांत थोडीशी मी आपली हकीकत आणि उभयतांचें घरचें सर्व कुशलवृत्त कळविलें. पहा, कुसुमचापा, जी माझी धाकटी बहीण तीच त्याची स्त्री असून स्वरूपानें लावण्य आणि मर्जीनें वागणारी असल्यानें ती त्यास विशेष प्रिय होती. म्हणून तिच्या तारुण्य विरहाची हकीकत माझे मुखांतून ऐकतांनां त्याचें देहभान ठिकाणीं राहिलें नाहीं. तो प्रवासास निघते वेळीं तिला कांहीं महिने लोटले होते.

ते पूर्ण होऊन झालेल्या पुत्रासह ती आपले घरीं सुरक्षित आहे. असें ऐकल्यानें त्याचे चित्तास कांहीं स्वस्थता येऊन समाधान वाटलें. तो इतक्या जरी संकटांत होता तरी माझे मुक्ततेची योजना करूं लागला. तसाच थोडके वेळांत माझा वियोग होईल ह्मणोन वारंवार त्यास रडूंही येऊं लागलें. वास्तविक आहे. बायकोचा भाऊ ह्मणजे केवळ रांचेचें काळीज अशी जी लोकांत ह्मण आहे ती मिथ्या नाहीं. असो. नंतर तो मला म्हणाला काय पहा, मी हतभाग्य येथें एकटा दुःसह दुःख जाचणी सोशीत आहें. आणि तुह्मांसही दुर्दैवानें या स्थळींच कसें आणलें. या वेळेस निवांतपणें बोलावयासही विशेष अवधी नाहीं; उजाडतांच मला नित्या प्रमाणें चतुष्पद व्हावें लागेल. आतां अगोदर येथील कांहीं हकीकत सांगून तुह्मांस पार पडण्याचा मार्ग सांगतों. दैववशात् आणखीही पुढें कोणी भेटून मुक्तता जाली तर मी या ठिकाणीं असल्याची खबर माझे आईबापांस व तशीच सर्व कुटुंबांतील आप्त वर्गास तरी समजेल. आणि कदाचित् तुह्मांस दुसरें कांहीं साधन प्राप्त झाल्यास येथून तुमचे हातानें माझी सुटकाही होईल. हें इच्छिलेलें होणें जाणें परमेश्वराधीन आहे. या महान प्रदेशीं पूर्वीं कोणास येण्यास व जाण्यास तिळमात्र भीति नव्हती. सुमारें शंभर वर्षांचे आंतच अशी भयंकर स्थिति झाली असल्याचें येथें आल्यावर मला पूर्ण माहितीनें समजलें. हा सर्व बंगाल प्रदेश मांत्रिक विद्येनें संपन्न असून यांत बहुतकरून शेंकडा दहा पुरुष बाकी सर्व स्त्रियांची उत्पत्ति होत आहे. आणि ज्या स्त्रिया जन्मतात त्या बहुतेक सुस्वरूप असल्याची कीर्ति चोहों मुलखीं आहे. पूर्वीं असें नव्हतें. परंतु सांप्रत जे पुरुष इकडे आहेत त्यांच्या सर्व शक्ति स्त्रियांनीं आकर्षण केल्यामुळें कोणाचेही मुखावर तेज दिसत नाहीं. याचें कारण पुरुषां पेक्षां स्त्रीसमूह पुष्कळ असल्यानें प्रत्येक पुरुषास विवाहित स्त्रिया निदान

दहांहून कमी नाहींत. त्यांत जेथें जेथें अशीं स्त्रियांच्या आधीन संस्थानें आहेत त्या दरबारीं शिपायापासून मोठ्या हुद्या पर्यंत स्त्रिया च नोकर आहेत, व त्यांची विद्वत्ताही बरी आहे. अशा ठिकाणीं पुरुषाचें बळ कमी असल्यानें अर्थात त्या तरुण स्त्रियांस अन्य पुरूषाची अपेक्षा करणें भाग पडतें. अशा विषयीं इकडे बहुत प्रचारअसल्यानें असें त्यांचें आचरण जनांत उपहासास्पद होत नाहीं. या प्रदेशीं बहुतेक श्रीमान आहेत. ह्मणून त्यांस फग्रास खाणें, व स्त्र, अलंकार, गाड्या, घोडीं, रथ, हवाशीर बंगले, बागा, इत्यादिक सौख्याची उणीव नाहीं. व स्त्रियांचीं शरीरें निष्काळजी मुळें उफास्याचीं व निरोगी आणि सतेज आहेत. एकादी संभावित थोर गृहस्थाची कन्या पाहिली कीं, इचेप्रमाणें दुसरी रूपवती सकुमार स्त्रीच नाहीं. असें प्रत्येकास भासून तिचे वेगळें व्हावें असें वाटत नाहीं. घरोघर मंत्रविद्या वास करीत आहे. ये विषयीं मला पूर्ण अनुभव आला आहे. निदान वीस वर्षांचे आंत स्त्रियांचें लग्न होत नाहीं. त्यांचेंच प्राबल्य असल्यानें त्या इच्छे प्रमाणें स्वतंत्र विचारण करितात, त्यांचे पति केवळ आज्ञाधारक आहेत असेंच ह्मटलें पाहिजे. एक एक स्त्री मंत्रविद्येंत अशी निष्णात आहे कीं, मला वाटतें तिचे अंगीं एकादें राष्ट्रही इकडून तिकडे फिरविण्याची शक्ति असावी असें होण्याचें कारणही मला समजलें आहे, तें तुला सांगतो: पूर्वीं हा प्रदेश विशेष सौख्याधिकारी नसून यांत जादूचे वगैरेंह्या बखेडे पुष्कळ नव्हते. शेंपन्नास कोसांत एकदोन मांत्रिक असतील; परंतु पूर्वीं पासून सुंदर स्त्रियांचें वर्णन असल्यानें किती एक प्रबल लोक येऊन त्यांस फार पीडा देऊं लागले. याजवर दुसरे देशाची मुख्य राजसत्ता होती या मुळें तिकडील मोठमोठाले सरदारांनीं इकडे येऊन आपले अधिकार बळानें पुष्कळ तरुणी स्त्रियांवर प्रसंगोपात जुलूमही करावे. व संधि

सांपडल्यास त्यांस घेऊनही जावें तसें साध्य होत नाहीं, असें दिसल्यास इच्छेनुरूप स्वसत्तात्मक नवे नवे कायदे प्रसिद्ध करून जमीनी वरील सारे व कर अधिक वाढवावे. असे प्रकारचा ताप पावून लोक अतिशय त्रास पावले. तथापि निर्बलतेमुळें निरुपाय होऊन त्यांचे अनेक जुलूम त्यांस सोसणें भाग पडत असत अशा वेळीं विष्णुपुरी येथें शाक्त देविभक्त एक महान संस्थानिकाची अग्निशिखा नामें पूर्ण वयांत आलेली कन्या असून ती स्वभावानें अतितीक्ष्ण आणि केवळ मूर्तिमंत रतीच होती. ती निरंतर आपले आईबापांचे आज्ञेंत राहून पातिव्रत्य रक्षण होण्या विषयीं फार जपत असे. तिचे लोकोत्तर सौंदर्याची कीर्ति ऐकून कितीएक तिच्या अभिलाषा विषयीं अनेक प्रकारच्या बलात्कारादि युक्ति योजून इच्छा धरून होते. परंतु तिच्या उग्र दर्पा मुळें एकाचाही हेतु शेवटास जाईना. तिणें एक त्या विष्णुपुरींतीलच श्रीमंत गृहस्थाचा आपले मनायोग्य सस्वरूप आणि धूर्त व विद्वान असा वर पाहून त्यास बापाचे मतें वरण्याचा निश्चय करून अभिवचनही दिलेलें होतें. मत्पस विवाहित होण्यास मात्र तिला संधि सांपडेना. कारण तेथें एकापेक्षां एक बलिष्ठ आणि सत्ताधीश तिला हरण करून न्यावें या आशेनें आपले जय्यत फौजेचे तयारी निशीं ठाणीं घालून संधि पहात होते. या मुळें इच्छिलेलें होण्यास तिचा उपाय चालेना. कदाचित् गुप्त रितीनें आपण विवाह केला आणि तो त्यांस समजला तर प्राणघातादि काय अनर्थ होईल असें तिचे बापासही वाटून त्याणें तो बेत रहित केला. असें पाहून तिला वारंवार त्या विषयीं खेद होऊं लागला. शेवटीं तिणें असा निश्चय केला कीं, एकवार मी ज्यास मनापासून वरलें आहे तोच माझा पति. त्याजवांचून अन्य पुरुष मला सर्व पित्याप्रमाणें आहेत. आतां जरी हा माझा प्राण गेला तरी जावो; परंतु या देहास अन्यांचा तिळमात्रही स्पर्श होऊं देणार नाहीं. हाच निश्चय माझा शेवटास पोंचो. असें ह्मणून

एके दिवशीं अस्तमानाचे संधीस ती आपले बागेंतील एकांत विहार मंदिरीं येऊन उदास होऊन बसली आहे. इतक्यांत तिची अत्यंत प्रियकर वेत्रवदेवीनामें सखी तेथें आली. तिला पहातांच नेत्र भरून येऊन तिनें दुःखाचा सुस्कारा टाकिला. आणि ह्मणाली बाई तूं माझे इच्छेची तृप्ती करणारी आहेस. ह्मणून या माझ्या दुर्घट प्रसंगाचे वेळीं तुझें हें आगमन मला फार सुखावह आहे. माझे दुःखाचा तुला सर्व प्रकार अवगतच आहे, मी सांगावें असें नाहीं. ज्यास मी मनोभावानें वरलें आहे त्याचे प्रीतीचा लाभ मला कधीं तरी होईल असें आजपर्यंत वाटत होतें परंतु त्याजविषयीं नाद सोडून देण्याचें जेव्हां प्रत्यक्ष बापानें मला सांगितलें तेव्हां सर्व परी माझी निराशा होऊन मनानें कांहीं चमत्कारिकच ग्रह घेतला आहे! आलीकडे तर माझे समजण्यांत असें आलें आहे कीं, मजवर कित्तीएक बलिष्ठांची नजर आहे. त्यांस मी प्राप्त होत नाहीं असें पूर्णपणें त्यांचे लक्ष्यांत येऊन ते आतां माझे बापाशीं युद्ध करून बलात्कारानें मला घेऊन जाणार तथापि माझा बाप केवळ त्यांस हारीं जाऊन एकाएकीं मला त्यांचे हातीं जाऊं देईल असें वाटत नाहीं. असें जरी आहे तरी न जाणो तशीच वेळ आल्यास कोणावर कसा प्रसंग गुदरेल याचा नेम सांगवत नाहीं. कदाचित त्यांसच जय आला तर आमचे कुटुंबाची काय स्थिति होईल हें बोलावयास नको. मजकरितां आईबापानीं दुःख भोगावें याजपेक्षां आपणच या जगांतून नाहींसें व्हावें अथवा कदाचित् माझे प्रियाचा पुढें दैववशात् मला लाभ होईल त्या आशेस्तव प्रस्तुत कोठें तरी अन्यस्थलीं जाऊन गुप्त रितीनें राहावें असेंही मला वाटतें. परंतु हें करणें मला सुखावह होणार नाहीं. कोठें जरी गेलें तरी हें मेलें माझे अंगीं सौंदर्यमधु आहे त्याचे भोंवती निरंतर स्वभावतः पुरुषरूपी मक्षिकांचें वेष्टण पडणारच आहे यास काय करावें मृगांस मांस, गजास दंत, व्याघ्रास चर्म मनुष्यास सुवर्ण व

स्त्रियांस स्वरूप असे हे एकमेकांस बाधक आहेत. आतां मी अगदीं वेडी झाल्यें आहें. तूं तरी ये विषयीं कांहीं योजना करून एकादा पोक्त विचार मला सांग. तुजपेक्षां दुसऱ्याचे अंगीं योजनाशक्ती अधिक आहे असें मला वाटत नाहीं. सरवे, कांहीं तरी याचा शेवट लागल्यावांचून माझें गलबलून गेलेलें चित्त पूर्वस्थलीं स्वचित यावयाचें नाहीं. पहा, पराधीनत्वामुळें बायकांस निर्बलत्व येऊन स्वस्थ बसणें भाग पडतें. जरी त्या विचारी असल्या तरी अतिशय त्रास होऊं लागला ह्मणजे निरुपायास्तव त्यांचे हातून साहस कर्म घडतें. यावरून स्त्रियांचे अंगीं निरंतर मूर्खपणाच वास करितो असें होत नाहीं. ज्यांस चांगला सहवास असतो त्या अशा वेळींही कांहीं विचार करीतच असतात. असें असोन कोणींही स्त्रियांस चांगलें ह्मणत नाहीं, हें मोठें आश्चर्य आहे. फार काय सांगूं. मोटमोठाले विद्वान् व कवीश्वर यांचाही पूर्ण कटाक्ष त्यांजवरच आहे. त्यांचे ग्रंथांत स्त्रियां स्त्रिया निर्दय, अविश्वासनीय अशा प्रकारची निर्भर्त्सना आढळते. कायतो चोंहीकडून मेली बायकांचेच कपाळीं अडचण येते. परंतु पुरुषास तर त्यांजवांचून एक घटकाही चैन पडत नाहीं. आणि उगीच जगांत थोरवी दाखविण्या साठीं प्रतिष्ठा मिरवितात. वास्तविक पाहतां बायकांपेक्षांही पुरुषांचे अंगीं किती एक दोष आहेत; परंतु ज्याचे तेच वर्णन करणारे असल्यानें ते उघडकीस येऊं देत नाहींत. जर स्त्रिया पुरुषां सारख्या विद्वान् असत्या तर त्यांजप्रमाणें आपल्यास श्रेष्ठत्व देऊन त्यांनीं आपले अंगीं किंचित्ही दोषाचा कलंक लागूं दिला नसता. असो. जर तुझे अंगीं आज कांहीं स्वतंत्रता असती तर अशी वेळ तुजवर का येती? आजपर्यंत तुला मी सांगितलें नाहीं पण आज ओघानुसार प्रीतीस्तव सांगतें पहा. मजवर जर अशी कांहीं वेळ आली असती तर तिचें निरसन होण्यास बापाचे साह्या मुळें मला एक घटका न लागती यांचें कारण आमचे घराण्या-

त श्री महाकाली प्रसादाने कांहीं अद्भुत मांत्रिकविद्या चालत आली आहे ती जर माझे हस्तगत असती तर तुलाही या संकटांतून स्वतः मीच मुक्त केलें असतें; परंतु काय करूं, ती माझे बापास मात्र अवगत आहे; तथापि तिचा प्रयोग करण्याचें बरेच दिवस त्यानें वर्ज्य केलें आहे. यामुळें तो ही गोष्ट मनांत आणील न आणील या विषयीं मला संशय आहे. तरी त्यापेक्षां तूं आपले जिवावर निश्चयानें उदारच आहेस त्या अर्थी ती मुख्य विद्याच तुला साध्य होईल असें मला वाटतें. तिचें साधन महद्दुर्घट आहे, त्याचा प्रकार मलाही सर्व अवगत आहे. तूं जर तें साध्य करण्या विषयीं तयार असशील तरच तुला सांगेन. नाहींपेक्षां आजपर्यंत गोप्य असलेली गोष्ट उगीच कशास प्रगट करूं? असे तिचे मुखांतील शब्द ऐकून आपले ठिकाणीं पूर्ण विचार करून तो ह्मणाला तुला काय कठिण वाटत असेल तें वाटो; परंतु ज्या प्रमाणें तूं सांगशील त्याच प्रमाणें किंबहुना त्याही पेक्षां अधिक असलें तरी करून कार्यभाग सिद्ध करून घेईन. येऊन जाऊन जिवाची भीति असते. ती तर मला तिळमात्र राहिली नाहीं. सर्वस्वीं मी जिवावर उदार आहें. हाच कृतसंकल्प समजून त्याचा सर्व विधियुक्त प्रकार अगोदर मला कृपा करून सांगून माझें चित्त स्वस्थ कर. ते खरे असे तिचे अंतःकर्णापासून निघालेले उद्गार पाहून इचे हातून हें महाकाली अनुष्ठान खचित शेवटास जाईल असें जाणून तिला ह्मणाली तुला जें दुःख तें मलाच आहे असें मी समजतें. ह्मणूनच तुझे कल्याणार्थ ही परिस्फूट न होण्याची गोष्ट तुजपाशीं काढली आहे. भलत्याचें हें काम नाहीं. जर तुझे हातून हें कार्य सिद्ध झालें तर तूं सर्वत्रस्थलीं विजयी होशील. आणखी या प्रदेशांतील सर्व प्रकारें लोकांचाही त्रास बंद होईल. आतां तुला सांगतें त्याकडे पूर्ण लक्ष्य देऊन त्या प्रमाणें मात्र कर. येथून समारें बारा कोशांवर उत्तरेस दाट झाडी आहे. तींत मध्यभागीं एक

पुरातनचें बांधलेलें विस्तीर्ण भुयार आहे. त्यांत जाण्याचा मार्ग त्यान ठिकाणीं आहे; परंतु गुप्त असल्यामुळें तो बाहेरून समजण्यांत येत नाहीं. तेथून पलीकडे गोळीचे टप्पावर लहानशी डोंगराची उंच टेंकडी आहे तिचे पृष्ठभागाचे पायथ्याचे खडपास झाडींत एक भयंकर दरी आहे तींतून तेथपर्यंत अंधारांत जावें लागतें. मधून मधून तीस घव्या पडल्या आहेत त्यांतून कांहीं उजेड दिसत असून थोडा वाराही लागतो. त्या भुयारांत पुरातन एक महाकाली यक्षिणीनामक देवीचें जागृत् स्थान आहे तेथेंच माझे आजोबानें अनुष्ठान करून थोडी मंत्रविद्या घरांत आणली. त्या सारखा धैर्यवान कोणीं नव्हता. तरी नवरात्रीचें महान्यास अनुष्ठान आपले हातून होणार नाहीं, म्हणून त्यानें त्रिरात्रीचा लघुन्यास मंत्राचा संपूर्ण संकल्प केला. आणि त्या प्रमाणें तें सगासरी संपूर्ण करून प्रसाद मिळविला. या लघुन्यास अनुष्ठानांत जरी महाकालीचें प्रत्यक्ष दर्शन होत नाहीं तरी अदृश्य रूपानें तिची प्रसादवाणी होऊन इच्छिलेला कार्यभाग सिद्ध होतो. हें च अनुष्ठान तूं कर म्हणजे एवढ्यांत तुझें काम होईल. आतां ते महान्यास अनुष्ठान जें आहे त्याचा प्रयोगविधि जो करावयाचा तोच ऐकल्यानें अगोदर अंगावर कांटा उभा राहतो. मग प्रत्यक्ष तें करण्यास कोण धजावणार आहे? मला वाटतें देवादिकांसही हें साधन दुर्घट आहे. आतां एक मात्र आहे कीं, माझे बापास त्याची सर्व क्रिया अवगत असून ती त्याणें सर्व लिहून ठेविली आहे. सहज एके दिवशीं त्याचें पुस्तक माझे पहाण्यांत आलें मला वाचतां येत असल्यानें व ग्रंथ वाचण्याचा नाद असल्यानें ती निवांत वेळ होती म्हणून कोणास समजूं न देतां त्याचीं एकंदर जीं पांच महा पत्रें होतीं तीं मला गोडी लागल्यावरून साग्र वाचलीं. त्यांजवरून तो अनुष्ठान विधि माझे मनांत जागृत राहिला आहे त्याचा उच्चार आज काय तो तुजपाशीं केला. पहा कुसुमचापा, तो माझा मेहुणा मला म्ह-

णाला कीं, अशी त्या वैश्वदेवीचे मुखांतील हकीकत त्या अग्निशिखे-
नें ऐकून ती तिला ह्मणाली. या महान्यास मंत्रानुष्ठानाची तुला क्रिया
माहित आहे तशीच मला सांग. ती ऐकण्यासही माझें मन फार उ-
त्सुक झालें आहे. त्या वरून फार बरें आहे ह्मणून ती सांगूं लागली.
हें अनुष्ठान करण्याचा संकल्प होतांच त्याचे आदले दिवशीं ह्म-
णजे अमावास्येचे दिवशीं उपोषण करून सूर्योदयाचे पूर्वीं त्या टें-
कडीवर जावें लागतें. तेथें जातांना दोन तांबडीं वस्त्रें, मद्यानें भर-
लेले तीन कलश, थोडे उडीद, पिवळे केलेले कांहीं जोंधळे, लिंबें, शें-
दूर, हरिद्रा, कुंकुम, आरक्त पुष्पें, सुगंधिक तेल, प्रज्वलित स्वर्ग, व धू-
पदीप नैवेद्यादि पूजासाहित्य, आणि एक तरुण जिवंत माणूस अ
सें न्यावें लागतें. प्रथमतः प्रतिपदेचे दिवशीं तेथें असलेले भद्रका
ली टांक्याच्या सन्निध त्या मनुष्यास नेऊन त्याचे मस्तकीं, आपले
हातानें तैलाभ्यंग करावें नंतर त्यास त्यांतील उदकानें स्नान घालू
न आरक्तवस्त्र परिधान करवावें. व आपणही स्नान करून तांबडें
वस्त्र नेसावें. मग त्या मनुष्याचे मस्तकावर अभिमंत्रणायुक्त शेंदूर
उडीद आणि पिवळे जोंधळे टाकून कुंकुमाचा मळवट भरावा. व त्या
चे ते आर्द्र केश तसेच मोकळे असूं द्यावे. उपरांत बरोबर एक
निराळा पूर्वींच कलश आणावा लागतो. त्यांत त्या टांक्यांतील उ-
दक भरून घेऊन सांगितलेले मार्गानें त्यासह आंत जावें. नंतर
त्या मनुष्यास महाकालीचे सन्निध उभें करून तिची आणलेल्या
साहित्यानें षोडशोपचारें पूजा करावी. मग त्याजकडून हात जोड-
वून असे शब्द बोलवावे कीं, मी हा महान्यास प्रयोग सिद्ध कर-
णारास अनुकूल होऊन स्वसंतोषानें प्राणावर उदार झालों आहें.
असें त्याणें ह्मटल्यावर लागलीच बरोबर आणलेले कलशांतील
त्यास मद्यपान करवून खड्गानें त्याचें मस्तक धडापासून वेगळें
करावें. मग तेथील अंगारा जेथून मस्तक भिन्न झालें त्या धडाचे

भागावर व मस्तकाचे तुटलेले भागावर टाकावा ह्मणजे त्याचें तेज जसेंचे तसेंच राहतें. तें मस्तक त्या महाकाली सन्निध एके स्वच्छ रुमालावर ठेऊन ते त्याचे मस्तकावरील शेंदुरादि द्रव्य मिश्रित मोकळे ओले केश त्याजवरच सोडावे. आणि त्याची व आपली एक दृष्टि करावी. व जो मंत्र आहे त्याणें त्या धडावर उडीद टाकून देवतेचें आवाहन करावें. पुढें सांगितल्या प्रमाणें जपाचा संकल्प करून पूर्वांग मुखानें त्या प्रेतासनावर पद्मासन घालून बसावें. व आरंभ कोणत्याही शुद्ध प्रतिपदेपासून होत असून त्याची समाप्ति त्या नवमीच्या रात्रीं पूर्ण होत आहे. तेथें मोठा धैर्यवान् असला तरी सरासरी दोन तीन दिवस धीर धरतो. पुढें भयंकर व्याघ्र व सर्पांचे आणि विक्राळ पिशाच्चादिकांचे नाना तऱ्हेचे भीतीप्रद प्रकार दृष्टीसमोर होऊं लागतात. तथापि आसनाचा चल झाला नाहीं तर त्यांचा अंगास कधींही स्पर्श होत नाहीं. दुरूनच कायती त्यांची कृति चालते. जर चल झाला तर पळभरही मग प्राणाची आशा धरणें नको. अशा प्रकारें हें महाप्रयासयुक्त अनुष्ठान जर भगवत् सत्तेनें पूर्ण जाहलें तर नवमीचे रात्रीं प्रत्यक्ष ती आदिशक्ति मांहामाया यक्षिणी देवी प्रगट होऊन इच्छिलेला हेतु पूर्ण करित्ये. ज्या वेळेस ती प्रसन्न होऊन वरंरोहि या शब्दाचा उच्चार वारंवार करून सान्निध्य उभी राहते, त्या वेळेस तिला असें मागणें मागावें लागतें कीं, अगोदर या प्राण्यास संजीवन करून इच्छिलेलें देणें द्यावें. कदाचित् त्यास जीवंत करण्या विषयीं तिणें आपली इच्छा न दर्शविली तर आसनाचा चल होऊं न देतां तुझी मर्जी असें ह्मणून पुनः नेत्र मिटून जपास आरंभ करावा लागतो. नंतर त्या अनुष्ठानिकांचा पूर्ण निश्चय पाहून तिला तेंही मागणें मान्य करावें लागतें. तिणें बरें आहे असें ह्मटल्यावर लागलीच तो अनुच्छिष्ट स्फटिकलश दोन्हीं हातांत घेऊन तिजपुढें समर्पण-

करावा. आणि स्तुतियुक्त ह्मणावें कीं, हा तुझा आणलेला भाग अति संतोषानें ग्रहण करून प्रसाद करणें. तेव्हां ते कलश तीआपले हातांत घेऊन मोठे आनंदानें त्यांतील मद्यपान करण्याचे अगोदर इच्छिलेला वर देऊन शेवटीं शिराचें आणि धडाचें ऐक्य करून त्यास सजीव करिते. इत्यादि सर्व साधनविधि तिला सांगून ह्मणाली यांतून कोणतें साधन तुझ्यानें होईल असें तुला वाटतें? मग ती अग्निशिखा क्षणभर स्तब्ध होऊन मनाचा निश्चय झाल्यावर माझा हेतु लघुन्यास अनुष्ठानानें अपूर्ण राहील असें जाणून हें मोठें महान्याससाधन करण्या विषयींच माझें मन मला उमेद देत आहे; परंतु काय करूं? मी जरी आपल्या जिवावर उदार आहें तरी मजप्रमाणें जिवावर उदार होणारें मला दुसरें कोण मिळणार आहे? जर कोणी माझा वध करून माझे धडावर अनुष्ठान करणारा मिळेल तरीही मी कबूल आहें. परंतु तसें होणार कोठून? सारांश माझे हातून कांहींच होईलअसें दिसत नाहीं. जें कर्म पुढें ओढवलें आहे तेंच खरें, असें ह्मणून रडूं लागली. तिच्या ठिकाणीं वैश्वदेवीचें विशेष प्रेम असल्यानें हिचा कार्यभाग शेवटास नेणें, तसेंच परोपकारार्थ राष्ट्रांतील स्त्रियादिकांचे ताप दूर करणें हेंही तिला प्रशस्त वाटून तिला ह्मणाली सखे, मी असतां तूं तिळमात्र खेद करूंनको. तुझ्यासाठीं मी आपल्या जिवावर उदार आहें. माझा वध करून सांगितल्या विधीप्रमाणें पूर्ण धैर्य धरून अनुष्ठान कर ह्मणजे तुला व मला या आदिमायेच्या प्रसादाचा लाभ होईल. आणि दुसऱ्यानें दुःख दूर केल्याचें श्रेय मिळून कीर्ति जगांत राहील. कधींतरी हा क्षणभंगुर देह नाहींसा व्हावयाचा आहे. मग उगीच या नाशवंताची आशा धरून दुःखांत राहणें या पेक्षां हें मलाही बरें वाटतें. अशा तिच्या कार्यसाधक भाषणानें तिला पूर्वीपेक्षां अधिक धैर्य येऊन परमानंदाचा आनंद झाला. आणि सांगितलें कीं,

तूं कांहींएक काळजी करूंनको. प्रत्यक्ष काळ जरी आला तरी त्या पासून मला तिळमात्र भीति न होतां मी अनुष्ठान पूर्ण करीन. आणि तुझे जिवाचें रक्षण करून कृतकृत्य होईन. या तिच्या उमेद युक्त भाषणानें आपणास या पासून तिळभरही धोका होणार नाहीं, असें वाटून ह्मणाली फार चांगलें आहे. अनायासें परवांचे दिवशीं नवरात्रप्रतिपदाच आहे. तस्मात् सर्व साहित्याची मी तयारी करून उद्यां दोन प्रहरीं तुझे बागेंतील बंगल्यांत येईन. तेथें तूंही तिकडे जाण्यास सिद्ध ऐस. ह्मणजे आपण तेथून गुप्त रितीनें कोणास आपली ओळख न पटण्या विषयीं पुरुष वेषानें तेथून इच्छिलेले कार्यास निघून जाऊं.

हे मध्यनाथा पहा, काय त्या स्त्रियांचें धारिष्ट! त्यांणीं निश्चय केल्या प्रमाणेंच दुसरे दिवशीं तेथून निघून रातोरात त्या टेंकडीवर गेल्या. आणि पूर्वीं सांगितलेल्या विधीनें त्या अग्निशिखेनें तें महात्म्यास अनुष्ठान नऊ दिवस धैर्यानें करून शेवटास नेलें. असें तिनें तें निराहार निरुदक यथाविधि निर्वाण अचल अनुष्ठान पाहून ती साक्षात् महामाया यक्षिणी देवी भयंकर रूप धारण करून नवमीच्या मध्यरात्रीच्या समयास तिजपुढें प्रगट झाली. आणि मोठी गर्जना केली. यांतील हेतु, अगोदर निश्चय पाहून प्रसाद करावा, इतकाच असावा. तरी ती न भितां आसनारूढ होती. तशीच ध्यानस्थ बसली आहे त्या योगानें तर त्या भगवतीचे अंगीं सद्गद रोमांच उभे राहून आपले हातानें तिला सावध करून नेत्रांस उदक लाविलें, आणि ह्मणाली हे धैर्यशीले सुंदरी, तुझा मनोरथ आहे तो प्रसन्नतेनें वर देऊन पूर्ण करण्या साठीं तुजपुढें तूं जिचें ध्यान करीत आहेस तीच मी प्रगट जाहलें आहें. काय इच्छा असेल तें माग. यावेळेस तुजप्रमाणें दुसरें मला कोणींच प्रिय नाहीं. अशी तिची अभयप्रद आणि उत्साहिक वाणी ऐकून तिनें

नेत्र उघडून पाहिलें तों ती त्रैलोक्यसुंदरी अष्टादशभुजा देवी भयंकररूप नटली आहे. कपाळीं शेंदूर चर्चिला असून एके हातांत सुराकलश व दुसरे हातांतून त्रिशूल, खड्ग, तोमर, इत्यादि आयुधें विराजमान आहेत. अशी ती प्रत्यक्ष काळासही दंड करणारी दिसूं लागली. तिचें तेज दृष्टीस सहन होईना ह्मणून डोळे मिटून दोन्हीं हातांनीं तिचे तिणें घट्ट पाय धरले. आणि मानसपूजा करून ध्यानयुक्त तिच्या पराक्रमाची स्तुति आरंभिली. हे आदिमाये, महिषासुरमर्दने, दिव्य नयने, जगन्मोहने, दयाघनें दुवदने, विश्वकुटुंबिने, नीलोत्पलद्युते, संगीतरसिके, त्रैलोक्य माते, भगवती देवी, तुझें ध्यान मनास व वाचेसही अगोचर, ब्रह्मा, विष्णु, महेश, हीं तुझीं बाळें होऊन तुझे इच्छेनुरूप विचारण करितात. सर्व ब्रह्मांडें तुझेउदरस्थ असून त्यांची घडामोड, तुझेच अद्भुत लीलाशक्तीनेंच होत आहे. तुझा ज्यावर प्रसाद होईल तो त्रिविध तापापासून मुक्त होऊन स्वर्ग, मृत्यु, पाताळ या लोकींही अजिंक्य होईल. वेळोवेळीं देवादिकांसही पीडा करणारे शुंभनिशुंभासारखे असे जे जे मोठमोठाले दैत्य उत्पन्न झाले त्या वेळीं तूं आपलीं नानारूपें धारण करून बाहुपराक्रमानें त्यांचा नाश करून सर्वांस सुख दिलेंस. तूं सर्वत्र पूज्य असून तुजसारखे धन्य अन्य कोणीच कोठें नाहींत. सर्वांचे अंतर्गत आत्मारूपी तुझी ज्ञानज्योती प्रकाशित असल्यानें माझें ल्ह्दृत दुःख तुला अवगत होऊन हें महान्यास अनुष्ठान मला निमित्तमात्र पुढें करून माझे हातानें तूंच सिद्धीस पाववितें आहेस. शेषादिकांस ही जें तुझें वर्णन अशक्य तेथें मी यःकश्चित पामरीनें काय वर्णावें? गद्यपद्यादिकेंकरून सुस्वर रागांत तुझी स्तुति नारद तुंबर आणि विद्याधरादि गंधर्व हे निरंतर गात आहेत. इंद्र, अग्नि, वरुण, कुबेर, विघ्नेश, क्षेत्रपाल, अष्टदिक्पाल, अष्टभैरव, अष्टवसु, द्वादशादित्य व लक्ष्मी आदिकरून अष्टशक्ति इत्यादिकांच्या

आवृत्तें करून तूं विराजमान आहेस. जे तुझी भक्ति करणार आहेत त्यांस तूं परम कल्याणकारक आणि योग्यांचे मानसांत निरंतर वास करणारी आहेस. अशी जी तूं सर्व विद्यात्मक जगद्धात्री, त्रिपुरसुंदरी, तुला मी अनन्यभावें शरण आल्यें आहें. हे दुर्गे, तुझी प्रसन्न मुद्रा पाहून मी आज कृतकृत्य झाल्यें या प्रकारें तें स्तवन करून पुढें फलादि नैवेद्यसाहित्य आणि अनुच्छिष्ट दोन सुराकलश असलेले ठेवून ह्मणाली, तुजसाठीं हें भक्तिपुरःसर मी आणलेलें भक्ष्य ग्रहण करून तूं तृप्त हो. अशा स्तुतिपर तिचे मुखांतील वाक्शक्तीपासून उत्पन्न झालेल्या शब्दमौक्तिकांचे दैविक कंठहार झाल्यानें ती अंबिका अष्टभावानें दाटून अतिसंतोष पावली. आणि तात्काळ आपलें तें उग्ररूप झांकून, ज्यावरून कोटिमन्मथ ओंवाळून टाकावे असें स्वप्रकाश दिव्य ज्योति वस्त्राभरणमंडित, सुकुमार आणि मोहक, तारुण्यरूप तिणें धारण करून तिला उठून प्रेमालिंगन दिलें. आणि ह्मणाली या वेळेस तुझे मनांत जें इच्छित असेल तें मागून घे. मी देण्यास समर्थ आहें. तुजसारखी धैर्यवान् आणि निश्चयाची या मागें माझे पहाण्यांत नसून पुढें होईल असेंही वाटत नाहीं. धन्य तुझा मनोनिग्रह! कीं, ज्याणें माझें अंतःकरण अति स्निग्ध व दयार्द्र दृष्टि केली. त्या योगानें केव्हां तुजवर प्रसाद करीन, असें मला झालें आहे. आतां पळभरही अवधि न करितां तुझा हेतु मला कळीव. या तिच्या अभयें करून ती अग्निशिखा निर्भय मानसानें हर्ष पावून ह्मणाली हे माते, ज्या अर्थीं तूं निश्चयानें माझे मनोरथ पूर्ण करणार त्या अर्थीं आतां ते पूर्ण झालेच असें मी समजतें. मला मुख्यत्वें करून दोन वरांची अपेक्षा आहे. त्यांत पहिल्या वरानें हो माझी प्राणप्रिय सखी वैश्यदेवी जिणें मजसाठीं आपला प्राण देऊन मला तुझे प्रसादयुक्त दर्शनाचा लाभ दिला. तिला उठवून तिजवर

प्रसाद करावा, आणि हा सर्व बंगालप्रदेश दुसऱ्याचे प्राबल्यानें निकृष्ट दशेस येऊन पोंचला आहे. यांतील सर्व राजेरजवाडे यांची धूळधाण होऊन त्यांस केवळ परतंत्रता प्राप्त झाली आहे. व स्त्रियांचें वैभव तृणतुल्य होऊन कितीएक पराधीन झाल्या आहेत. असा अनेक प्रकारचा या देशास त्रास झाला असलेला सर्व दूर होऊन इच्छेनुरूप सौख्य प्राप्त व्हावें तें असें कीं, सर्व प्रदेशभर तुझे कृपेनें ज्या दुमंत्राची सिद्धि व्हावी. आणि अन्य देशांतून जे तरुण पुरुष इकडे येतील त्यांस मोह पडून मंत्रसामर्थ्यानें त्याणीं स्त्रियांचें आज्ञांकित व्हावें, तसेंच कोणाचेंही मंत्राचें इकडील लोकांवर तेज पडूं नये, व मला एक तुझे मुखांतील प्रसादिक मंत्र मिळावा कीं, त्याच्या प्रभावें करून वाटेल त्या मनुष्यास पशुत्व, पक्षित्व आणि जलचरत्व यावें व तोच उलट मंत्र ह्मटला ह्मणजे पुनश्च त्याणें पूर्ववत् व्हावें. राज्य संबंधीं दुसऱ्याची सत्ता या देशावर चालूं नये. आणि प्रस्तुत यास निर्धनत्व आलें आहे तें दूर होऊन सर्व देश द्रव्यैश्वर्यानें मंडित व्हावा. तसेंच स्त्रियांचें प्राबल्य विशेष व्हावें. धरित्री प्रतिवर्षी सुपीक होत असावी. हें देणें जरी विचाराचें आहे खरें तरी मजसाठीं हे चंडभैरवी, तूं मान्य करशील असें जाणून तुझे पायीं ही माझी विनंति आहे. हें दुसरे वरांत देणें देऊन मला आपली कन्या असें ह्मणावें. आणि आमरणपर्यंत माझें सौभाग्य स्थिर राहून अंतीं तुझे चरणाचा लाभ मला व्हावा. या वचनानें ती श्री महाकाली मुहूर्तमात्र विचारांत पडून तिला ह्मणाली असें आजपर्यंत कोणींच मागणें मागितलें नसून मींही कोणास दिलें नाहीं. व हें कलिसंबंधानें होण्यास अशक्य आहे तरी एकवार देतें ह्मणोन सांगितलें आहे आणि तुझे ठिकाणीं तसेंच माझें प्रेम आहे तेव्हां हे मानसप्रिये ही सर्व व्यवस्था निरंतर चालेल असें जरी नाहीं तरी एकंदर पांचशें वर्षे पर्यंत म्हणजे मध्यंतरीं

पुढें तुझे वंशांत आजपासून सुमारें साडेतीनशें वर्षांनीं महासाध्वी मैनाव
ती राणीचे पोटीं जगांत कीर्तिमान् साधु **गोपीचंद** नामक राजा उत्पन्न
होईल. त्याचे तिसरे पिढीपर्यंत तूं मागितल्या प्रमाणेंच माझे वरप्रसा-
दें करून फलप्राप्ति होईल, तों पर्यंत इतका काळ जाईल. नंतर मी दि-
लेल्या मांत्रिक विद्येचा लोप होऊन पुढें या प्रदेशीं तिचें नांव मात्र राहि-
ल. असें ह्मणून तिला आपले मुखांतून ती मुख्यमंत्र सांगून त्याची तं-
त्रादि कृती कळविली. आणि आपले हातानें तिचे सखीचें तें भिन्न शीर
धडास जोडून त्यावर तीर्थसिंचन करून तिला उठविलें. तिचा ही भ-
क्तिनिग्रह पाहून तिच्या इच्छेनुरूप तिला सौख्यकारक वर दिला. आ-
णि ह्मणाली जें मी देणें दिलें आहे हें निर्विघ्नपणें नियमित कालप-
र्यंत चालेल. आतां स्वस्थ अंतःकरणानें हे **अग्निशिखे**, तूं आपले
या सखीसह स्वगृहीं जाऊन पातिव्रत्यरक्षण करून राहा. असें बो-
लून ती आदिशक्ति तेथेंच अदृश्य झाली.

ज्या वेळेस त्या दोघीजणी दोन प्रहरीं बागेंतून कोणास न सम
जूं देतां अनुष्ठानास निघून गेल्या त्या वेळेस **अग्निशिखेची** एक
विश्वासुक दासि त्या बागेंत होती तिचे हातीं त्यांणीं पूर्वींच लिहून आ-
णलेलीं मोहोरबंद पत्रें देऊन **अग्निशिखा** तीस ह्मणाली आह्मीं
कांहीं जरूरीचे गुप्त कार्यास बाहेरगांवीं जात आहों तर आजपासून
अकरावे दिवशीं विजयादशमीचे रात्रीं आनंदानें घरीं येऊं. आमचे
विषयीं तिळमात्र काळजी करूं नये. असें घरीं जाऊन तूं स्वतः आम
चे आईबापांस सांग आणि हीं पत्रें एकांतीं त्यांचे हातीं देण्याची त-
जवीज करून त्यांचे चित्ताची स्वस्थता कर. ही बातमी तूं कोणास
कळऊं नको. असें साग्र मनानें त्या दासीनें भाषण ऐकून तीं पत्रें घे-
ऊन तेच दिवशीं त्यांचे वडिलांस गुप्त रितीनें देऊन त्यांचें समाधा-
न केलें होतें. जरी त्यांस त्या गेल्यामुळें वाईट वाटलें होतें तरी त्यां
च्या विचारी वर्तणुकी वरून त्यांचे हातून भलतेंच कर्म होणार नाहीं.

कांहीं तरी चांगले कृत्यास गेल्या असतील व नियमित वेळीं बोलल्या प्रमाणें खचित् येतील, असें मनास धैर्य देऊन तो मजकूर कोणासही कळूं दिला नाहीं; अशामुळें त्या गेल्याचें बाहेर परिस्फूट न होतां दशमीचे रात्रीं अस्तमानापासून त्यांचे आईबाप वाटेकडे लक्ष्य लाऊन वाट पाहत बसले होते; तों प्रहर रात्रीचे सुमारास त्या पूर्ववत् पुरुष वेषानें आपआपले घरोघर येऊन महान्यास अनुष्ठान सिद्ध झाल्याचें व महाकालीचे दर्शनाचा अलभ्य लाभ मिळून जें वरप्रदान मिळालें त्याचें शुभ वर्तमान वडिलांस सांगून त्यांस परमावधीचा आनंद देत्या झाल्या.

---

## अंक ४था.

श्लोक (विबुधप्रियावृत्त.)

होय ज्या अनुकूल दैव तया प्रसंग न बाधती ॥
धैर्य संगति लाधतां मग हेतु अर्थहि साधती ॥
साह्य संकटिं जो करी प्रिय बंधु तो सम सत्कृती ॥
रम्य भामिनिंच्या लिला दिसती असे जरि सूकृती ॥

श्री महाकालीचा प्रसादयुक्त वर अग्निशिखेस मिळतांच दुसऱ्याचें प्राबल्य हरयेक प्रकारें कमी पडून हा सर्व देश सुपीक आणि सधन होऊन यांत स्वातंत्रतेचें आणि मंत्रविद्येचें माहात्म्य दिवसें दिवस अधिक झालें आहे. एकवार दुसरे प्रदेशांतील कोणी तरुण पुरुष इकडे येऊन स्त्रीमोहांत बद्ध झाला कीं, बारा वर्षे पर्यंत त्याची सुटका होण्यास मार्ग राहात नाहीं. तितक्या काळांत बहुतकरून त्याचें तारुण्य लयास जातें. दैव वशात् वांचला अथवा कोणाचें चांगलें साह्य मिळालें तर मध्यंतरींही सुटका होते; परंतु असें होणें क्वचित्. मला येथें येऊन तीन वर्षे झालीं आणखी हें ज्ञाचणुकीचें वैभव दोन वर्षे पर्यंत भोगलें पाहिजे. पुढें सुटका होऊन मी घरीं जाईन असें वाटतें; कारण त्या संधीस येथील संस्थानास दुसरी मालकीण व्हावयाची आहे.

प्रस्तुत जी आहे इचें मजवर प्रेम असल्यानें जातेवेळेस मुक्तता करीन. असें हिनें मला अभय दिलें आहे. तरी आज खचित नेम सांगवत नाहीं, तों पावेतों बहुत करून माझे शरीरीं क्षीणता जडेल. आतांच तें निमें राहिलें आहे. मजसारिखे या ठिकाणीं तरुण पुरुष आणखी कित्ती एक दुःख भोगीत आहेत. प्रत्येकास महिन्यांतून आठ आठ दिवस मनुष्यदेहाचें सौख्य प्राप्त होतें. बाकीचे दिवस चतुष्पाद अथवा पक्षिदेहांत घालवावे लागतात "विधेरिच्छाबलीयसी" ह्मणून राहणें भाग आहे. असो. आतां एक उपाय सांगतों, त्या प्रमाणें घडल्यास तुमची सुटका होईल असें वाटतें. या ठिकाणाहून उत्तरेस सुमारें पांच कोशांवर एक सिद्ध अरण्यस्थान मोठें रमणीय आहे, त्याजवर मात्र जादुमंत्राचा प्रयोग होत नाहीं; कारण कोणी ऋषीनें त्या ठिकाणीं भगवतीची स्थापना केली आहे त्या सिद्धपुरुषानें आपल्या तपोबलें करून त्या स्थलाचे आसमंतात्भागींही दोन दोन कोशापर्यंत जादूचें कोणी सामर्थ्य चालवूं नये, चालविल्यास त्याची विद्या नष्ट होऊन तो धोका पावेल, असें पक्कें करून ठेविलें आहे. ह्मणोन तेव्हडी तरी इकडे निर्भय जागा आहे; तथापि येथील अधिकारिणीचा त्या ठिकाणचे उदकाचे भागावर थोडा अमल चालतो. तें झाडीचे मध्यभागीं लवणांत असल्यानें लोकांस त्याची माहिती नसून मंत्रबळानेंही अदृश्य आहे. अशा मुळें तेथें कोणाचा प्रवेश होत नाहीं. जाण्याचें साधन निराळेंच आहे. तें तरी त्यांतीलच जे कोणी मार्मिक आहेत त्यांसच माहित. तशीच मलाही त्याची माहिती कळून आली आहे, ती तुह्मांस सांगतों. त्या बागेंत एक जास्वंदीचें झाड आहे त्याचें फूल हातांत असलें ह्मणजे तें आपल्या सामर्थ्यानें तेथपर्यंत जाण्यास कोणाचाही प्रतिबंध होऊं देत नाहीं. परंतु त्यास पूर्वी येथील स्त्रियादिकांनीं पाहिलें आहे त्यांचे हातीं तें फूल येत नाहीं. बरें झालें कीं, तुह्मांवर कोणाची दृष्टि पोंचली नाहीं यामुळें हें तुमचें निमें काम झालें. नाहीं तर परिणाम

शब्द झाला नसता. आतां तें निर्भय स्थल सत्वर जवळ करा. मी म्हणालों एकत्यानें जाऊन काय करावें? तेथें अन्नपाण्यावांचून सरासरी हाल होऊन चोरासारखें राहून किती दिवस घालवावे? यापेक्षां येथेंच आतां जें होणार असेल तें होवो. तो ह्मणाला भिऊं नका. तेथें अन्नमात्र नाहीं. परंतु त्याही पेक्षां जमिनींत मोठमोठाले कंद आहेत ते कुपाळ्यांत भाजल्यावर त्याचे आंतून अतिस्निग्ध व रवाळ मगर निघते. ती फार स्वादिष्ट व मिष्ट मोहनभोगासारखी किंबहुना त्याहीपेक्षां अधिक रूची देते. तो एकच कंद सेवन केला ह्मणजे तीन दिवस क्षुधा लागत नाहीं. आणि त्या ठिकाणीं एक मोठें चौफेर बांधलेलें सरोवर आहे. तें सदोदित उदकानें उचंबळलेलें असतें. तेथें उदकपानार्थ व विश्रांतीस्तव पलीकडील अरण्यांतील वनगाई येतात, त्या सभोंवतीचे आम्रफणस इत्यादिकांच्या दाट झाडींतून फिरत असतात. त्यांतून कितीएक व्यालेल्या गायी फिरत असतानां त्यांचे स्तनांतून वेळोवेळीं दुग्धस्राव होऊन तो गोठत असल्यानें त्याच्या खरवसासारख्या वड्या त्या ठिकाणीं पडत असतात. तशाच सरोवराचे पाटाचे कडेस त्या गायींचें आगमन होतें, तेथेंही त्या वड्या सांपडतात. इच्छा झाल्यास त्या सेवन कराव्या. त्यांचीही गोडी शर्करेपेक्षां एकप्रकारची मधुर असते. इत्यादि प्रकारची तेथें राजसौख्यासारखी परमेश्वर कृपेनें सर्व सोय आहे यामुळें कोणतीच काळजी नको. तेथील सौख्य प्राप्त होण्याचें तरी नशीबी पाहिजे. अनुभव आल्यावर सर्वकाळ तेथेंच राहण्याची इच्छा होणारी आहे. तेथें नानातऱ्हेच्या उपयुक्त आणि सुगंधिक वनस्पति आहेत. व त्या सरोवरासभोंवतीं विश्रांतिकारक, चित्तास आनंद देणारे अनेक जातींचे पत्रफलांनीं सुशोभित उंच वडेरेदार वृक्ष आहेत. तसेच त्यांवरून अनेक रंगांचे सुंदर पक्षि दृष्टीस पडतात. तें सरोवर मध्यभागीं साधलें असून त्याचे चौफेर संगमरवरी दगडाचें विस्तीर्ण पटांगण आहे, त्यांतील उदकाचे प्र-

वाह पलीकडे आण्यास त्या पटांगणांतून मधून मधून प्रमाणभागां-
त चारी बाजूंस सांडी बांधून दिल्या आहेत. त्यांतील वाहातानां उचं
बळून कांठावर उडत असलेले स्वच्छोदकाची स्फटिकवत् धवलिमा-
नेत्रांस फार संतोष देते. त्या पटांगणा वरील चारी बाजूंचे कोंपऱ्यां-
वर सरोवराचे कांहीं उंच उंच मनोरे आहेत. उत्तर बाजूचे प्रस्तृत
पटांगणावर हवा घेण्यास बसण्याचे चबुतरे आहेत त्यांचें काम
तर अप्रतिम आहे. त्यांचे प्रमाणांतील संगमरवरी फरशीच्या व बाजूं-
च्या दरजा सर्व सोन्याचे पाण्याचे मिश्रणानें भरल्या असल्यानें त्यां
चे तेजाचा सूर्यकिरणांत समावेश होऊन पाहाणारांचे नेत्र क्षणो
क्षणीं दिपतात. तसेंच, त्या चबुतऱ्यास कडांवर जाळीदार कठडेआ-
हेत. त्यांवर सोन्याचे वरर्ख चढविले आहेत. त्या उत्तरभागाचे बाजू-
स अनेक जातींचे सुगंधिक पुष्पांचे ताटवे पुष्पांनीं आणि फळ-
झाडांचे तक्के फळांनीं सदोदित मंडित आहेत. ते कोणीं तेथें आ-
ल्यास त्यांस अगोदर दृष्टीस देखाव्याची न घ्राणेंद्रियांस सुगंधा-
ची मेजवानी करितात. पलीकडचे बाजूस ह्मणजे पूर्वेचे पटांग-
णावर त्या सिद्धाच्या आश्रममठ आहे. आणि त्या समोरचे पश्चिमे
चे पटांगणावर पूर्वाभिमुख श्रीमहालक्ष्मीचें उंच मनोहर स्फटिका
चें मंदिर आहे. व दक्षिणभागीं पटांगणावर एक शान्ति आणि एक
सारस्वत या नांवाचीं दोन कुंडें आहेत. त्या चौफेर पटांगणा सभो-
वतीं नारळी, पोफळी, सुरु, अशोक, बिल्व इत्यादिक देखाव्याचे
उंच वृक्ष एकसारखे हारीनें दाट असलेले तेही फारच रमणीय दि
सतात. आणखी त्या सर्व सिद्धाचे भागांत हजारों पारिजातकांचे
वृक्ष असल्यानें या चातुर्मास्यांत तर त्यांच्या पुष्पांचा सुगंध चोंही
कडे भरून जाऊन तो प्रदेश सुगंधमय होत आहे. असें सर्व प्रकारें
तें अप्रतिम सिद्धारण्य सांप्रत कालीं या पृथ्वीवर दुसरें नंदनवनच म्ह-
टलें पाहिजे. तेथें प्रतिवर्षी कार्तिकमासांतील शुद्धपक्षीं त्रयोदशी-

पासून त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत एकसारखी तीन दिवस त्या सरोवराचे तटाकीं पटांगणावर चोफेर हारीनें, आणि पुष्पांचे ताटव्यांतून, पाणी जाण्याच्या सां-डी भोंवतीं, चारी बाजूंचे मनोऱ्यांवर, चबुतऱ्यावर, सभोंवतीचे झाडींतून आणि श्रीमहालक्ष्मीचे मंदिरावर तळापासून शिखरापर्यंत अशीं चोफे-र ठिकठिकाणीं हजारों दीपकांची रोषनाई होत असते. शिवाय त्या पौ र्णिमेस तऱ्हेतऱ्हेच्या रंगाचीं देखाव्याचीं झाडें, नळे, चंद्रज्योति, अनेक ताऱ्यांचे बाण इत्यादिक प्रकारची दारू त्या रोषनाईंत मधून मधून सु-टत असलेली त्याचा तर फारच प्रकाशमान देखावा त्या जलाशयांतील उदकांत हुबेहुब दिसत असतो असें तें अपूर्व स्थळ पाहाण्यांत आलें म्ह-णजे चित्तांतील उद्विग्नता मुळींच राहावयाची नाहीं. भाग्यशाली पुरु षाचेंच पहाण्यांत येईल, त्या ठिकाणीं मनुष्यमात्र दृष्टीस पडावयाचें नाहीं. दुसरें असें ऐकण्यांत आलें आहे कीं, तेथील तो सिद्धपुरुष स-माधिस्थ झाल्याकारणानें सांप्रतकालीं त्या स्थलावर जादुमंत्राचा अंमल बराच होत चालला आहे तरी त्या सिद्ध मठांत निर्भय जागा आहे त्याचे आंत कोणाही मांत्रिकाचा प्रवेश होत नाहीं ह्मणून तेथें राहण्याचें करावें व गुरुवारचा दिवस खेरीज करून बाकीचे दिवशीं बाहेरील सर्व भागांत फिरण्यास मनाई नाहीं, तर मी आतां तें जास्वंदीचें झाड दाखवीन त्या-चे फुलास स्पर्श करण्यास मला अधिकार नसून तें माझे दृष्टीसही प-डावयाचें नाहीं. तुह्मांस मात्र दिसेल. त्याचें फूल तोडून घेऊन बराबर नेण्याचें करावें. आणि तेथें गेल्यावर जे जे वेळेस त्या मठांतून बाहेर जाणें होईल त्या त्या वेळीं तें फुल बराबर नेत जावें. म्हणजे तेथील किं-चितही बाधेचा स्पर्श तुह्मांस न होतां कोणाची दृष्टीही तुमचेवर पोंच णार नाहीं. त्या फुलाचें सामर्थ्य दोन महिनें पर्यंत चालतें. तोंपर्यंत त्याची टवटवीही कमी होत नाहीं. रात्रीचे समयीं मात्र मठाचे बाहेर गेलें असतां कदाचित् धोंका पोंचेल, या करितां जाणें वर्ज्य करावें. ज री त्या ठिकाणीं रात्रीचे समयीं मोठमोठाल्या आरोळ्या कानीं येऊं लाग-

तील तरी प्रीति धरण्याचें मुळींच कारण नाहीं. त्या सरोवरांत मगरी, सुसरी आदीकरून जलचरें आहेत, तीं कधीं कधीं बाहेर येऊन परांगणावर बसतात. त्यांस कोणतेही प्रकारची पीडा न देण्याचा आणि हस्तस्पर्श न होण्याचा विचार ठेवावा; कारण तीं अन्य द्वीपांतील या देशांत त्रास देणारीं पूर्वीचीं मनुष्यें आहेत त्यांसही मंत्रसामर्थ्यानें नियमित कालपर्यंत जलचरत्व भोगावें लागत आहे. सांगितलेल्या गुरुवारचे दिवशीं बाहेर न पडण्याचें कारण असें आहे कीं तेथील बागेची व देवस्थानची वगैरे सर्व नीट व्यवस्था होण्यासाठीं याच संस्थान-च्यामालकीणीकडून कांहीं वीर जात असतात. यामुळें कदाचित् तुह्मीं तेथें असल्याचें समजण्यांत येईल, एवढेंच कारण आहे. त्रिपुरी पूर्णिमेचे दीपोत्साहाची तरी व्यवस्था इकडूनच होत असते तथापि केव्हां कोण रोषनाई करून जाते हें समजण्यांत येत नाहीं. हा सर्व जो मी प्रकार तुह्मांस सांगितला त्याजवर लक्ष्य देऊन कांहीं काळपर्यंत वर्तन करावें, तरी देवानें आज पासून एक महिना त्रिपुरी पूर्णिमा उरली आहे तों पावेतों तेथें तुह्मांस राहवें लागेल असें वाटतें. धैर्यमात्र धरिलें पाहिजे. पुढील कार्य मी सांगतों तें परमेश्वरकृपेनें शेवटास जावो. त्या वेळीं ह्मणजे दशमीपासून सहा दिवस पौर्णिमेपर्यंत तेथें देवीउपासक कांहीं तरुण स्त्रिया आपल्या प्रीतीचे पुरुषांसहवर्तमान मंत्रसामर्थ्यानें क्रौंच पक्ष्यांचे वेष धारण करून येत असतात. ते पक्षी अगोदर दक्षिण बाजूचे शक्तिनामक कुंडांत स्नानें करून पूर्ववत् स्त्रिया व पुरुष होतात. आणि लागलीच त्या महालक्ष्मीचे देवालयांत जाऊन प्रथम तिचें प्रार्थनापूर्वक दर्शन घेतात. मग आपल्या इच्छेप्रमाणें त्या परांगणावर व बगीच्यांतून इत्यादिक ठिकाणीं विहारादि क्रीडा करून तेथें पौर्णिमे पर्यंत मोठे आनंदांत दिवस घालवितात. पौर्णिमेचे दिवशीं त्या सरोवरीं स्नान करून शक्तिमूर्तिपणानें त्या सर्वजणीं

स्त्रिया सूर्योदयाबरोबर पाण्यांत उभ्या राहून जादूमंत्राचा बीजांसह पाठ ह्मणून त्यास शब्द करून घेतात. मग नित्या प्रमाणें दिवसभर त्या दिवशीं विहार व इच्छिलेलीं फळें भक्षण करून ती रात्रही दीपोत्साह आणि दारुकाम वगैरे अद्भुत देखावे पाहून मोठे आनंदांत घालवितात. उजाडतांच प्रतिपदेचे दिवशीं तेथील सारस्वत कुंडांत त्या स्त्रिया व पुरुष स्नानें करतात, त्या योगानें पुनः त्यांचे क्रौंचपक्ष्यांचे थवे होऊन आकाशमार्गे आपआपले स्थलीं उडून जातात. आणि त्यांपैकीं एक **सुमेधा** नामें तरुण स्त्री त्यांजबरोबर न जातां मागें राहते, व ती त्या सरोवराचे उत्तरबाजूचेच बुत्र्याचे मेघडंबरी खालीं बसून त्या प्रतिपदेचे दिवशीं सूर्योदयापासून दुसरा दिवस उजाडे पर्यंत आपले प्रियाचा अत्यंत शोक करीत असते. उजाडल्यावर मोठ्या दुःखानें पुढें त्या ठिकाणीं राहण्यास प्रतिबंध असल्यामुळें निरुपाय होऊन त्या सारस्वत कुंडांत स्नान केल्यानें तिच्या शरीरीं क्रौंचपक्षित्व येऊन ती उडून जाते. त्या निर्वांतवेळीं तिचे स्नानापूर्वींच त्या सारस्वत कुंडाचे बाजूस कोठें तरी गुप्त बसून ती येतांच तिच्या सन्निध जाऊन तिला ह्मणावें कीं, तूं ज्या साठीं दुःखित आहेस त्यास मी दाखवून देतों. त्याचा प्रकार तुह्मांस सांगतो तो तिला कळीव ह्मणजे तिचा कार्यभाग होईल. आणि त्या योगानें तुमचेंही कार्य झालेंच समजावें. हें गोप्य आहे. तथापि तुमच्या साठीं मला सांगितल्यावांचून राहावत नाहीं. तिचे दैवानें एक अतिसुंदर तरुण पुरुष प्राप्त झाला होता त्यामुळें त्याचा वियोग अर्धक्षणही तिला दुःसह होई, व त्याजवर अन्य स्त्रियांचेंही चित्त फार लुब्ध होत असे. जेथें जेथें तिचें जाणें होई त्या त्या ठिकाणीं त्यास ती आपले बरोबर नेत असे. त्यास क्षणभरही ती विसंबत नसल्यानें कितीएक जादूस्त्रियांचे सख्यांतही तिचा द्वेष वाटला. या संस्थानचीं पूर्वींची मालकीण एकवार येथील दीपोत्साह समयीं त्या सिन्धू-

अरण्यस्थलीं स्वतः गेली होती. तेव्हां तो पुरुष तिजसमागमें बगी चांतून विहार करीत असतानां तिचे दृष्टीस पडला. त्याचें सस्वरूप अवलोकन करतांच ती अगदीं मोहित झाली. आणि त्याचे प्राप्तीची आपले मनांत तिणें इच्छा वाढविली. तथापि त्या वर्षीं तिचे मंत्रसा र्थ्य अधिक असल्यामुळें तिचे मनांतील हेतु शेवटास गेला नाहीं; तो रोष मनांत आणून जरी तो हस्तगत होण्यास अशक्य होता तरी दुसरे वेळेस ती त्यासह तेथें आल्यावर पौर्णिमेचे दिवशीं क्रमा प्रमा- णें नेत्र मिटून एकाग्रचित्तानें पाण्यांत उभी राहिली आहे अशी सं- धि राखून, तो तिचा प्रियकर त्या पटांगणावर एकटाच उभा होता.— त्या ठिकाणीं इकडील मंत्राचा प्रभावही जास्त पोंचण्यासारखा पाहू न तिणें आपले सामर्थ्यानें त्या तरुण पुरुषास मगर करून सरोवरांती ल उदकांत सोडून दिलें आणि तोच संतोष मानून गुप्त रीतीनें जशी गेली त्याच प्रमाणें परत स्वगृहीं आली. इकडे ती सुमेधा आपले मंत्राचा पा- ठशब्दी करून त्या ठिकाणीं येऊन पहात असतां कोठेंच त्याचा तिला शोध लागला नाहीं. ती जरी जादुमंत्रांत निष्णात होती, तरी त्या स्था- नमाहात्म्यें करून तो त्या ठिकाणीं मगर केल्याचें तिला समजलें नाहीं. शेवटीं निरुपाय होऊन ती त्याचा शोक करीत तिला आपले स्थलीं पर त जाणें भाग पडलें, तेव्हांपासून त्याच्या विरहानें तिची अगदीं प्र- कृति बिघडून गेली आहे. आणि त्या वांचून वेड लागून आठ आठ दिवस अन्न पाण्याचीही शुद्धि न राहतां रात्रंदिवस घरीं, दारीं, वि लासस्थलीं, बागबगीच्यांतून त्याचे वारंवार स्मरणानें शोक करीत असते. पाहिलेंतना? या प्रदेशीं आश्रय असला तरी जादुसंबंधानें अनेक प्रकारचीं आपोआप विघ्नें येऊन गुदरतात. त्याजवांचून ति ला सर्व उपभोगादि विलास विषवत् वाटून उदासीनता आली आहे. जर त्या मित्राश्रमीं तिला सदोदित राहण्यास सवड असती तर तेथें च राहून रात्रंदिवस ती त्याचा शोक करीत गतप्राण झाली असती.

परंतु वरील सांगितलेले दिवसांशिवाय, त्या **स्फमेधेस** तेथें राहण्याची मुळींच मनाई आहे, यामुळें तिचा हेतू पूर्ण होत नाहीं. तिचा प्रिय जो त्या सरोवरीं मगर होऊन पडला आहे, त्यास खूण अशी आहे कीं, त्याचे सर्व शरीराचा रंग पिंगट असून डोकें मात्र रक्तवर्णाचें आहे, आणि तो नित्य प्रातःकाळीं सूर्योदयाबरोबर त्या सरोवराचे कांठीं दक्षिणभागास एक तांबड्या दगडाची घोंटीव पायरी आहे तिजवर मुहूर्तपर्यंत येऊन बसत असतो, अशी त्याची फ़ादि तुमचे मुखानें समजली तर तिचे अंगीं जें मंत्र सामर्थ्य आहे त्याचे योगानें ती त्यास पूर्ववत् मनुष्य करून फारच आनंद पावेल. आणि तिचा प्रिय तिलाभेटविला ह्मणून तुमचे उपकार ती न विसरतां त्या प्रयास घेऊन जाते समयीं तुमच्याही मुक्ततेची ती कांहींतरी योजना करील. ही सर्व कच्ची माहिती मला एक प्रियमानीत असलेले स्त्रियेकडून येथें सहज मिळाली. ही बातमी तरी येथील पूर्वीचे यजमानणीची ती अत्यंतजिवलग सखी होती, ह्मणून तिला समजली. बाकी येथील दुसरे कोणासही विदित नाहीं. या संस्थानचे राणीचे सहवासांतील ज्या कांहीं तरुण स्त्रिया आहेत त्या बहुतेकांची माझी ओळख होऊन माझें सौंदर्य आणि स्वभाव त्यांस प्रिय वाटत असल्यानें सर्वांपेक्षां त्यांची प्रीति मजवर विशेष जडली आहे. यामुळें त्यांचे हातून आलीकडे मला बरेंच सौख्य मिळतें, तरी कांहीं सुटका करून घेण्याची गोष्ट काढली कीं, त्यांची क्रूर मुद्रा होते. काय करावें! अशा कचाटींत मी सांपडल्यामुळें एक दिवसही अन्नपाण्यादि येथील सौख्य मला न रुचून वारंवार घरचे स्मरणानें फार वाईट वाटतें, आज तुमचे भेटीचा योग झाल्यानें मात्र स्फदीन दिसतो. यावरून पुढें कांहीं सद्भाग्याचा उदय होईल अशीही माझी मनदेवता लवते. मागें सांगितलेले अनुक्रमाचे पाळिपाळीनें येथील स्वामिणी बरोबर नित्य तरुणस्त्रिया येत असतात. आज फारच थोड्या आल्या होत्या. कधीं कधीं पं-

चवीस पर्यंतही येत असतात. व पुढील उपहारादि सौख्यप्रकारनुमचे पाहण्यांत आलाच आहे, तो होऊन बागेंत गेल्यावर इच्छेनुरूप विलासमंदिरांतून व बगीच्यांतून अशा निरनिराळ्या स्थलींआपआपले आवडीचे पुरुषांसहवर्तमान आनंदानें क्रीडा करून पुनः बांधलेल्या वेळीं उत्तररात्रीचेसमयास त्यांसह येथें परत येतात. मग त्या कांहीं वेळ कर्मणुकीच्या गोष्टी सांगून इच्छा झाल्यास येथें सिद्ध असलेल्या तल्पंकावर अथवा अंतरगृहांतील निद्रास्थलीं जाऊन शयन करितात. आणि येथें जी कांहीं गुप्त शब्द व आरोळ्या अशींभ्रीतीप्रद चिन्हें, अदृश्यपणानें दीप लागणें, अशा भासल्याचे अनेक प्रकार होतात ते सर्व येथील गुप्त विरांचे आहेत. व त्या विरांचें एकच ठिकाणीं राहणें आहे असें नाहीं. या सर्व जादुप्रदेशीं त्यांचें वास्तव्य आहे. नानातऱ्हेचीं कार्यें त्यांचेच साह्यानें होत असतात. इत्यादिक तेथील हकीकत मोठ्या काळजीनें सांगून हे कुसुमचापा, तो माझा ग्रालक मला ह्मणाला, सांगितल्या प्रमाणें त्या सिद्ध अरण्यांत व्यवस्था राहून आपली सुटका करून घ्या. आतां पुनः त्यांची येण्याची वेळ झाली. उठा लोकर. चला मजबरोबर. येथें बसून परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं, असें तो बोलत आहे, इतक्यांत बागेंत कांहीं मनुष्यांचा शब्द ऐकूं येऊं लागला. ह्मणून त्वरा करून अगोदर त्याणें मला उठविलें. आणि आलिंगन दिलें. मी बाहेर पडतांनां त्याचे नेत्रांतून अश्रुप्रवाह वाहून त्यास मोठा हुंदका दाटून आला. माझीही तशीच स्थिति झाली. परमेश्वर कृपेनें पुनश्च भेटीचा योग लवकर येवो. असें ह्मणून त्याणें तें सर्व दुःख आवरलें. आणि अगोदर मला हातांत धरून गुप्त रितीनें दरवाजा उघडून बाहेरचे बागेंत ज्या ठिकाणीं तें जास्वंदीचें झाड होतें तेथें नेलें, आणि पुढील मार्ग दाखवून कांहीं माहितीच्या खुणा सांगून माझा हात सोडला. मग मी त्यानें सांगितलेले खुणे प्रमाणें त्या जास्वंदीचें फूल तोडून

हातीं घेतांच तो मला दिसेनासा झाला. काय चमत्कार हा मंत्रसामर्थ्याचा !! हे मित्रा, त्या दिवसापासून आजपर्यंत त्या माझ्या प्राणदात्या मेहुण्याची व माझी गांठ पडली नाहीं. त्या सारखा परोपकारी मला कोणीं दिसत नाहीं. मी तेथून गेल्यामागें माझी सुटका करण्याचे कारणावरून त्यास फार विपत्ति भोगावी लागत आहे, असेंही पुढें कळून आलें आहे. हर हर!! अद्याप पर्यंत त्याचे ते उपकार माझ्यानें फिटत नाहींत. तस्मात् मला धिःकार असो. असें सांगतांना अतिशय दुःख होऊन त्याचे नेत्रांतून अश्रुबिंदु धरणीवर पडूं लागले. पुढें बोलावयास जिव्हा स्तब्ध झाली. त्यास कांहीं सुचेना. त्याच्या दुःखानें **कुसुमचापाचें**ही हृदय भरून आलें. मग कांहीं वेळानें त्या मधनाथाचे चित्तीं थोडी स्वस्थता आल्यावर तो ह्मणाला, ईश्वर कृपेनें माझा हेतु पूर्ण होईल तो सुदीन. असो. तें फूल हातांत आल्यानें जरी मी कोणांस न दिसेंन अशी माझी खात्री झाली होती, तरी त्या बागेंतून केव्हां पार पडेंन असें होऊन मोठ्या त्वरेनें मी झाडाचे आडून जात असतां माझे समोर दोन भयंकर मांत्रिक ज्यांचे हातांत वीरकंकणें आणि कपाळीं मळवट भरलेले आहेत असे येत असतांना मीं पाहिले, तेव्हां मला भीति उत्पन्न झाली. परंतु ते माझे अगदीं जवळून गेले तरी त्यांची मजवर मुळींच दृष्टि पोंचली नाहीं. मग मला धैर्य येऊन त्या बागेचे पार झालों. कांहीं अंधार होता तरी त्याणें दाखविलेले मार्गाचे धोरणानें मी जाऊन पुढील झाडींतून पार पडलों. पुढें त्या सिद्ध अरण्याचा सर्व प्रकारचा शोभायमान भाग दृष्टीस पडून आंतील नानातऱ्हेच्या वनस्पतींचा आणि पुष्पांचा सुगंध येऊं लागला. तेव्हांच मला पराकाष्ठेचा आनंद झाला. दैवाची अनुकूलता वाटूं लागली. मग स्वस्थ चित्त झाल्यामुळें तेथें एक निर्मळ पाण्याचा ओढा वाहात होता, त्याजवर कांहीं वेळ विश्रांति घेतली, व मुखमार्जनादि विधि आटोपून त्या परमेश्वरा-

चे कृपेनें तें विघ्न दूर झालें त्याची अंतर्यामापासून दोन घटिकापर्यंत स्तुति केली. नंतर पुढें त्या सिद्ध अरण्यांत जात असलेल्या मार्गानें जाऊन सरोवराचे तटाकावरील सिद्धमठांत पोहोंचल्यावर मी आपल्यास निर्भय मानिलें. सख्या काय तुला सांगूं? त्या स्थलाची शोभा फारच रमणीय आहे. माझे मेहुण्यानें तर ऐकलेलें वर्णन करून सांगितलें; परंतु तें मी प्रत्यक्ष पाहिल्यावर त्या पेक्षां सहस्रपट अधिक आहे असें माझे अनुभवास आलें. तेथें कोणतेही जागीं उभें राहून पाहिलें असतां त्या जलभरित सरोवराची व पटांगणाची, पलीकडील सघनवनाचे शोभायमान वृक्षांची, त्या महालक्ष्मीचे मंदिराची आणि चबुतरे, पुष्पवाटिका, बगीचे इत्यादिकांची शोभा पाहण्या बरोबर तनमन हरून क्षुधा, तृषा शांत होत्ये. व त्या चोंफेरच्या सांडीतून तें कासारोदक जोरानें वाहात जाऊन त्याचे तुटित बिंदु पडतात ते केवळ मौक्तिकेंच आहेत असा भास होतो. मी तेथें असलेले दिवसांत एक दोन वेळ सरोवराचे तटाकीं मौक्तिकांनीं भरलेले दोन चार शिंपले मला सांपडले. त्यांतील मौक्तिकें मोठीं व रंगांतही सुरखीदार आणि भारी किंमतीचीं होतीं, तसेच कोठे कोठे त्या स्वच्छोदकांत दोनप्रहरचे वेळेस, कडेजवळ, उत्तम सुवर्णाचे रजही दृष्टीस पडत. यावरून त्यांत मौक्तिकांची आणि सुवर्णाची उत्पत्ति आहे, असें खात्रीपूर्वक मला वाटलें. त्या पटांगणावरील-सरोवराचे कांठाचे चोंफेर गलथ्यांस सर्व गंडिकेचे घोंटीव रुंद चिरे असून त्यांच्या दरजांत सोन्याचा मिना भरला होता. त्याच्या तेजाचा व त्या चिऱ्यांचे बाजूस तटाकावर पल्लवयुक्त अप्रतिम शोभायमान पुष्पांची व फळांची हारीनें चोंफेर असलेली लहान लहान डेरेदार कलमी झाडें त्यांचे छायेचा आणि मधुन मधुन हजारी कारंजी उडत, त्यांचे फवाऱ्यांचा त्या उदकांत व पटांगणावर एक प्रकारचा फारच अपूर्व देखावा दिसत होता. त्या सांडींतून पलीकडे वा-

हेर निघून जातें असलेलें पाणी चारी बाजूचे वळणांतील सपाटींत असलेल्या बागा, अंबेवन, गुलाबाचे आणि मोगिऱ्याचे ताटवे वपारिजातक वृक्षांच्या हारी, मोठमोठालीं वाफ्यांचीं व केतकींचीं बेटें, आणि अंजिराचीं, नामांकित फळझाडांचे तक्के त्यांतून तें वांटणी प्रमाणें सारखें वाहात जाऊन सर्वांची दखरची राखीत आहे. तें चोंहीकडील उदक एकत्र होऊन त्याचा दक्षिणदिशेकडे बराच मोठा प्रवाह जात आहे. सदोदीत तेथें स्वच्छ हवा आणि सुगंध दरवळलेला असतो. त्या सरोवरांत अनेक जातींच्या रंगाचीं कमळें आहेत, तीं सूर्योदया बरोबर प्रफुल्लित होतांच त्यांचे आंतील सुरंग कांती उदकावर पसरत असलेली ती सूर्य किरणांच्या मिश्रणानें अनेक रंगांचा भास दाखवित्ये, व त्यांजवर गुंजारव करीत असलेले भ्रमरांचा आणि त्या तटाकीं हंस, कारंडव, पांडवपक्षी, मयुरें, बगळे, टिटव्या, हे आपले इच्छेनुरूप विहार करीत असल्याचा व सरोवरांतील मगरी, सुसरी, कांसवें, अनेक जातीचे मोठमोठाले मच्छ, बदकें, बेडूक, खेंकडे, जलकुक्कुट आदिकरून नानाप्रकारचीं जलचरें बुड्या मारून उदकांत क्रीडत आहेत, त्यांची ही एक वेगळीच मौज दिसते. दक्षिण बाजूचे पटांगणाचे दोहों बाजूंस जलक्रीडा करण्याचे दोन हौद आहेत; त्यांची लांबी सुमारें शंभर हात व दहा हात रुंदी आणि उंची तीन हात असे. उत्तम बांधलेले असून चारी बाजूंस त्यांस आंत उतरण्याच्या पायऱ्या आहेत. त्यांतील भरलेलें उदक नेहेमी स्वच्छ व उष्ण असतें. तें कोठून शोधून आणलें असेल तें असो. असें तें एकांत स्थल योग्यांस तपश्चर्या करण्यास परम पवित्र आणि विषयीजनांची इच्छा तृप्त करण्यास योग्य आहे. भाग्य उदयास आलें ह्मणूनच तें माझे दृष्टीस पडलें. कोणी असेंही सांगतात कीं, त्या ठिकाणीं कधीं कधीं नुस्तें मैदान व झाडीच दृष्टीस पडते. सरोवरादि शोभा कांहींच दिसत नाहीं.

काय चमत्कार असेल तो परमेश्वर जाणे. जितके दिवस मी तेथें होतों, तितके दिवस त्यानें सांगितल्या प्रमाणें वर्तन करून मोठे आनंदांत तो काळ घालविला. तेथील वनगाईच्या दुधांच्या वड्यांची व कंदाची तरी काय रुचि सांगू? इकडे कोणत्याही पदार्थास तशी गोडी व स्वाद नाहीं. या प्रमाणें त्या मध्वनाथ पक्ष्यानें आपली स्वतःची येथपर्यंत हकीकत कुसुमचापास सांगून ह्मणाला. दोन प्रहर गुदरून गेले तरी तुला स्नान व भोजनाची शुद्धि राहिली नाहीं, यास काय ह्मणावें? माझाही आत्मा क्षुधेनें व्याकूळ झाला आहे. आतां सांगणें पुरे करितों. इच्छा असल्यास पुढील राहिलेला इतिहास उदयीक सांगेन. आतां उठावें. भोजनोत्तर चार घटिका बागेंतील बगीच्यांत फिरावें पुढें चित्त स्वस्थ करून रात्रभर निद्रादि विश्रांति घेणें असें बोलून त्यानें आपलें बोलणें संपवून त्यास स्नानास उठविलें. मग मध्वनाथानें सांगितल्या प्रमाणेंच ते दिवशीं त्यासह भोजनोत्तर बगीच्यांत विहार वगैरे करून अस्तमानीं घरीं आल्यावर रात्रीं आठ वाजतां फराळ झाल्या नंतर राजपुत्र आपले विलासमंदिरांतील एकांतस्थलीं पलंगावर जाऊन निजला. तथापि पक्ष्याचा पुढील इतिहास ऐकण्याकडे सारें चित्त वेधून गेल्या मुळें ती रात्र सरासरी कांहीं निद्रेंत व कांहीं जागृतपणांत त्यानें घालविली. उजाडतांच नित्या प्रमाणें त्यानें अगोदर त्या पक्ष्याचे खाण्या पिण्याची व्यवस्था करून त्यास आपले हातावर घेतलें, आणि त्या रंगमहालांतील एके हवाशीर बारींत मृदु गालिचावर लोडाशीं टेंकून बसून त्यास तो कुसुमचाप ह्मणाला मित्रा, तुझें पुढील वर्तमान ऐकण्या विषयीं उत्कंठा लागली आहे ती पूर्ण करावी. फार बरें आहे. असें ह्मणून त्यानें सांगण्यास आरंभ केला. पुढें माझे पालकानें सांगितल्या प्रमाणें ती त्यांची येण्याची तिथि कार्तिक शुद्ध पक्षांतील दशमी आली. ती केव्हां येईल असें पूर्वीपा-

सूनच मी दिवस मोजीत होतों ते दिवशीं प्रातःकाळीं त्या सरोवरीं स्नानविधि आटोपून नित्यनेमा प्रमाणें तेथील श्री आदिशक्ति महालक्ष्मीचें पूजन करून नमनयुक्त प्रार्थना झाल्यावर स्वस्थचित्तानें पश्चिम बाजूचे दक्षिण भागांतील मनोऱ्यावर जाऊन बसलों आणि त्यांचे येण्याचा चमत्कार पाहण्या साठीं एकसारखे आकाशाकडे मी डोळे लावले होते. मला अनुभवावरून पक्कें माहित होतें कीं, तें फूल हातांत असल्यावर आपणास कोणीही पाहणार नाहीं. यामुळें तेथें मोकळे मनानें बसण्यास यत्किंचित्ही मला भीति वाटली नाहीं. इतक्यांत प्रहर दिवसाचे सुमारास एकाएकीं पंखांचा भरभराट शब्द ऐकूं येऊं लागला. त्याजवरून मी जास्ती निरखून पाहतां क्रौंचपक्ष्यांच्या टोळ्या दूर अंतरावर एकामागून एक आकाश आक्रमण करीत वेगानें येत आहेत असें दृष्टीस पडलें तेव्हां पुढील होणारे स्वकीय कार्यसिद्धीस्तव मला आनंद होऊन त्यांचे अगाध सामर्थ्याचें मी जों आश्चर्य करीत आहें तोंच तेथील दक्षिणभागाचे पटांगणावर ते पक्षी जोड्यांनीं भराभर येऊन उतरले. मग पळभरही अवधी न लावितां त्यांनीं अनुक्रमानें त्या शक्तिकुंडांतील उदकांत स्नानें केलीं. त्या योगानें लागलीच त्यांचें तें पक्षित्व नाहिंसें होऊन सर्वांस दिव्य मनुष्यदेह प्राप्त झाले. आणि त्या पटांगणावर वस्त्रालंकार मंडित तरुण स्त्रिया व पुरुष ते एकमेकांचा हात धरून मोठ्या आनंदानें तेथील सरोवरादि शोभा पहात एकत्रपणें उभे राहिले आहेत असें पाहून त्या वेळेस त्या रूपवती ऐश्वर्यमंडित स्त्रिया अप्सरे सारिख्या व ते तेजस्वी तरुण पुरुष जसे गंधर्व त्या नंदनवनतुल्य सिद्धारण्यांतील आदिशक्ति महालक्ष्मीचे पूजनासच इच्छेनुरूप उतरले आहेत काय? असें मला भासलें. माझी जरी योग्या प्रमाणें तेव्हां तृप्ति झाली होती तरी त्यांच्या प्रसन्न मुखकमलांचें तेज पहातांच देहभान नाहिंसें झालें. त्यांत एक अतिदेदीप्यमान लाव-

ण्य सुंदरी पुरुषरहित एके बाजूस उदास मुद्रेनें कपाळावर हात-
ठेऊन उभी असलेली मी पाहिली. त्यावरून ही स्त्री त्याणें सांगि-
तलेली आपली मुक्तता करून देणारी आहे असें निश्चयानें मीजा
णलें. असो. मग त्या स्त्रियांनीं प्रथम महालक्ष्मीचें दर्शन घेऊन ब-
गीच्यांतील वगैरे ठिकाणीं विहार, बुद्धिबळें, सारिपाट खेळ, जलक्री-
डा, आणि इच्छेनुरूप फलाहार, इत्यादिसुखांचा अनुभव आपआप-
ले प्रियांसह घेतला. त्याचप्रमाणें पौर्णिमेपर्यंत दिवस मोठ्या आ-
नंदांत त्यांनीं घालविले, आणि पौर्णिमेचे दिवशीं त्या सरोवरांत त्यां
नीं उभें राहून आपआपले मंत्रांचा पाठ केला. रात्रौ त्या पुरुषां
सह दीपोत्साहादि चमत्कार पाहून सूर्योदयाच्या पूर्वीं त्या सारस्व
तकुंडीं स्नानें केलीं, आणि पूर्ववत क्रौंचदेह धरून जोड्यांनीं तीं
मार्गस्थ झालीं. त्यांचें गमन झाल्यावर तेथें ती एक स्त्री मात्र राहि
ली. तिणें त्या चबुतऱ्यावरील मेघडंबरी खालीं बसून विरहशोकक-
रण्यास आरंभ केला, तो माझ्यानें वर्णवत नाहीं. पहा, ती रंभोरू
दिव्यदर्शनी, कुरंगनयनी, लीलावती केश मोकळे सोडून दुःखा-
चा सुस्कारा टाकून ह्मणूं लागली हे ममप्राणजीवना, मकरध्वजका-
म्यदेहा, कंठविहारा, सकुमारा, राजकुमारा, उदारा, सुधीरा तुजवां-
चून सारा, संपत्यादि पसारा मला अप्रिय भासून त्याची वारासार
करून मी उदासीन झाल्यें आहें. तुझा अलभ्य लाभ झाल्यापासू-
न मुळींच उभयतां मध्यें कापट्यभाव नव्हता. व मीही इच्छेबाहेर
न जाऊन सेवेंत तत्पर होतें. कधींही आपले वेगळें मला होऊं
दिलें नाहींस. असें असून आतां इतकी निष्ठुरता अंतःकरणा
नें कां वरिली? मला कोठेंच कांहीं तुजवांचून विश्रांति वाटत नस-
ल्यानें तुझें वेड लागून दीनासारखी झाल्यें आहें. कोणापाशीं संभा
षण करणें, तसेंच सुग्रास खाणें, उत्तम वस्त्रालंकार अंगावर घाल
णें, सुगंध तेलांचा व पुष्पादिकांचा स्पर्श करणें, बागेंतील मजा

पाहणें, मंचकावरील मृदुशय्येवर शयन करणें. त्या सर्व भोग्य सौ-
रव्यांचा तूं एक भोक्ता नसल्यानें चित्तीं तिरस्कार उत्पन्न होऊन सदो-
दित विरहानलाच्या तापानें या माझ्या सकुमार शरीराचें तेज हरण
करून त्यास क्षीणत्व दिलें आहे. आहा!! हे मानस विहारा, सौख्य
कंदा. तुझी संगती मला किती सुखावह झाली होती, त्या वेळेस
क्षणाप्रमाणें सौख्यांत दिवस घालवीत होतें, तेच आतां वर्षां प्रमा
णें झाले आहेत. माझ्या उदास वृत्तीमुळें जरी मजवर नेहेमी आ.
ईबाप रागावतात तरी मुळींच आतां या देहाची आशा उरलीन
सल्यानें त्या विषयीं मी कांहींच न गणून निर्ममत्व झाल्यें आहें!!
या माझ्या सौंदर्यआरामांतील तारुण्यमालती वसंतऋतु पुष्पकलि
केची प्रफुल्लता तूं एक प्राणवायु साह्य नसल्यानें विरहाग्नीनेंक-
रून संकोचित होऊन तिच्या उत्साहरूप सुगंधाची वाहक शक्ति
कुंठित झाली आहे. जावत्काल या पुष्पाचा ऋतुबहार कमी झाला
नाहीं तों पावेतों याचे अंगीं आर्द्रता व सुगंध स्थित आहे. एकवा
र यौवन अतिक्रांत झाल्यावर त्यांतील तत्व नाहींसें होऊन त्यास
निर्माल्यत्व प्राप्त होणार. वर्षास घटकेचें रूप देणारा असा जो स्त्रि
यांचा रसभरित तारुण्यकाल त्याच्या प्रहराचा एक क्षणही ज्यास
वियोग झाला नाहीं तोच पुरुष भाग्यशाली मी समजतें. उत्तम
सरोवर असूनही त्यांतील उदक शुष्क झाल्यावर तें जसें विशो-
भित दिसतें तद्वतच या गतयौवन शरीराची स्थिति आहे. सदो
दित कोणतेंच सारखें राहात नाहीं. कालपरत्वें सर्वांस स्थित्यंतर
आहे. प्रस्तुतच्या या माझ्या तारुण्य अवस्थेंतील विरहजन्य दुः
खाचा परिचय स्वतःहाच मी भोगीत आहें. ह्मणून निश्चयानें,
ह्मणत्यें कीं, श्रीमान् अथवा गरीब कोणी कसाही असो त्यानें स
न्मार्गवर्तक आणि आज्ञापर अशा यौवनसंपन्न स्वकीय स्त्रियां-
स विरहांत पाडून तद्वाच कांहीं प्रसंगावांचून बुद्धिपुरःसर आ-

पण स्थलांतर कधींही करूं नये. अशा संधीस कित्ती एक कामें वि चारानें राहतील तिनकीं एकीकडे ठेऊन वियोग न होण्याचे कामीं झटावें, मागील उदाहरणा वरून नियमित काल जाऊन तारुण्य- संपत्तीचा ऱ्हास झाल्यावर त्या पूर्वस्थितीचे सौख्याचा पुनश्च कधींही उभयतांस लाभ होत नाहीं. असें असून जे कोणी निष्ठुरअंतःकरणाचे पुरुष बुद्धिपुरःसर विरहांत पाडतात त्यांचें आयुष्य पुढें व्यर्थ होऊन भ्रूणहत्यादि पातक त्यांस सोसणें भाग पडतें. अशा समयीं त्यांचे जे कोणी आप्तसंबंधी वडील असतील त्यांनींही उभयतांचा जेणेंकरून ऐक्य भाव राहील अशी संतोषानें योजना केली पाहिजे. हेंच त्यांस भूषण आहे. मर्यादेस्तव उभयतांसही तो ताप मोठे दुःखानें सोसावा लागतो. कित्ती एक तर आपली त्या अल्पवयस्क सासरवासणीवर जरब राहावी ह्मणून शुष्क कामीं वैमनस्य धरून घरांतील सासवा अथवा नणदा ज्या कोणी वडील असतील त्या दुष्ट भावानें तिला तिचें पतिमुखचंद्राचें नुसतें दर्शन घेण्यासही सवड होऊं देत नाहींत. मग त्याच्या सौख्य रूपी चांदण्यांतील विरहताप शमविणारी गार हवा तीस कोठून प्राप्त होणार? हर! हर!! तशाही जाचांत तिला दिवस काढावे लागतात. त्या आपल्या पूर्वजन्मींचा वैरभाव साधून घेतात, असें वाटतें. असा प्रकार सर्वत्र आहे असें नाहीं. तथापि कोठे कोठें ऐकण्यांत व आढळण्यांत येत आहे. त्यांस पूर्ववयांतील सर्व परंपरा अनुभव असूनही त्यांनीं असें करणें अगदीं निंद्य आहे. कधींही एकमेकांचे प्रीतीचा भंग करूं नये. केल्यास विघड पाडणाराचे शिरीं त्या तारुण्यवती अबलांचा शाप बसतो. तारुण्यकालीं पतिविरहाचें जें कांहीं स्त्रियांस दुःख होतें त्याचें वर्णन प्रत्यक्ष सरस्वति जरी करूं ह्मणेल तरी तिला अशक्य आहे. व अशा पीनपयोधरांच्या विरहताप शमविण्यास वापी अथवा पयोधर म्हणजे मेघ हीस-

मर्थ होत नाहींत. हे प्राणवरा, हे अनुभवजन्य ओघास आलेले तोंडांतून सहज उद्गार निघाले आहेत. तुझे इच्छेनुरूप जीमीअपार द्रव्य खर्च करून नूतन आरामवाटिका तयार करविली आहे तिजमध्यें नानातऱ्हेचीं कारंजीं, पुष्पांचे ताटवे, व नामांकित फळांचे आणि देखाव्याचे वृक्ष लाविले आहेत. त्यास प्रस्तुत पूर्ण दशा येऊन पोंचली आहे. तरी तें सर्व शून्यवत् भासून त्यांतील सौख्यकारक विहारादि उपभोग अथवा तिकडे नुसतें पाहणें, एक दिवस ही मला गोड वाटत नाहीं. तसेंच स्वकीय विलासमंदिर मनोहर असून भयंकर भासतें. आतां तुझी आणि माझी ग्रंथी या जन्मीं होईल असें मला दिसत नाहीं. थोडी असलेली आशाही आली कडे सरली आहे. ह्मणून या देहाचा कंटाळा येऊन जीव नकोसा झाला आहे. हे विशालनयना, गंभीरवक्त्रा प्राणप्रिया, सारांश तुजवांचून आईबाप आदिकरून सर्व कुटुंबांतील मनुष्यें, तशाच मैत्रिणी, दासदासी, बागबगीचे, उत्तम मंदिर, असें सौख्यकारक असलेले वैभवांत राहण्या पेक्षां अरण्यांतील एकांत पर्वताचे दरींत अथवा वृक्षाचे तळीं बसून तुझ्या गुणांचा शोक करणें हेंच मला प्रिय वाटतें. काय करूं? निरंतर तुझी मूर्ति माझे दृष्टीचे वेगळी होत नाहीं. केव्हां येऊन भेटशील असें झालें आहे. मी आपलेकडून पुष्कळ विवेक करित्यें; परंतु क्षणोक्षणीं तुझा विरह होत असल्यानें देहभान नाहिसें होत आहे. हें दुःख कोणास सांगूं? आणि सांगितल्यापासूनही उपयोग काय होणार! असेंच तुझेंही मजवर प्रेम असून मला सोडून एकटें राहणें कसें प्रिय वाटलें? या ठिकाणीं जर निरंतर राहण्यास मला मोकळीक असती तर रात्रंदिवस इच्छे प्रमाणें तुझे संगतीचा अनुभव आठवून जावत्कालपर्यंत या देहांत प्राण आहे तों पावेतों ही दुःखरूप कालक्रमणा येथेंच केली असती. पूर्वीं या ठिकाणीं दोनवर्षे

तुझ्यासहवर्तमान उत्साहिक दिवस किती आनंदांत घालविले! त्याचेंच उलट दुःख प्रस्तुत मी भोगीत आहें. मजबरोबर माझ्या मैत्रिणी आपले प्रियांसह येथें येऊन किती आनंदांत असतात? ते वेळेस तर माझ्यासह वर्तमान तुला त्याणीं पाहिलें कीं, लागलीच त्या गलितामिमान होऊन आपलें भाग्य तुच्छ मानीत होत्या. आहा, हे स्मृहास्यवदना वल्लभा, या वेळेस तुझा विरह मला फारच होऊन दुर्निवार्य कामाचे सर्वांगीं बाण खिळल्यानें तत्संबंधीं वेदनेचा होत असलेला दुःसह ताप मला सहन होत नाहीं. कांहींतरी माझी दया येऊन त्याची पीडा दूर कर. किती शोक करावा. मोकळे मनानें घरीं तर तुझे गुण आठविण्यास मला मार्ग राहात नाहीं. जे ते समजूत करण्यास महालांत येऊन उपदेश करितात. तो मला कशाचा रूचतो? जे दिवशीं पूर्वीं तुजसहवर्तमान येथें आल्यें ते दिवशीं आपलीकाय उभारणी होती? परंतु दुर्दैवानें ती सिद्धीस जाऊं दिली नाहीं "मनसा चिंतितं कार्यं, दैवो अन्यत्र चिंतयेत्" मनांत चिंतावें एक आणि दैवानें होतें एक. काय करूं? जीव अगदीं फुटून गेला आहे. कितीही विवेक केला तरी तो निष्फळ होतो. कर्मापुढें कोठेंच जाववत नाहीं. "यथाधेनु सहस्रेषु वत्सोविंदति मातरं" ह्मणजे हजार गायींचा कळप असला तरी त्यांत त्यांचीं वासरें आपआपल्याच मातेस ओळखून निजपाशीं जात असतात. त्या प्रमाणें "तथापूर्वतरं कर्म कर्तार मनुगच्छति" ज्याचें जसें पूर्वकर्म आहे तसें त्याजकडे तें धांव घेतें. मला तर निःसंशय असें वाटतें कीं, या ठिकाणीं तुला कोणी तरी जादुगरीनें रूपांतर करून अदृश्य केलें असावें. परंतु त्या विषयीं येथें कांहीं जाणः होत नाहीं; तरी तुझे जीवंत असण्याचे आशेस्तव आजपर्यंत मी प्राणाचें रक्षण केलें. या पुढें मात्र तो मला सोडील असें वाटतें;

जसा कुमरी पक्षी एक सरूचे वृक्षा खेरीज दुसरे कोणतेही वृक्षा वर बसत नाहीं. तसा तुजवांचून इतर मला कोणीच प्रिय नाहीं. दिवसें दिवस अन्नपाणी जात नसल्यानें आणि शरीरीं चिरहृता वसल्यानें मला माझा आतां भरवसा वाटत नाहीं. असा तेथें अनेक प्रकारचा विलाप करून तिणें ती सर्व रात्र घालविली. प्रातःकाल होतांच तेथून ती मोठे कष्टानें उठून मुखमार्जन विधि उरकून उदासीन अंतःकरणानें पुनः त्याचे गुण आठवीत त्या सारस्वत कुंडासन्निध पटांगणावर बसली आहे असी ती संधि पाहून मी निर्भय होत्साता गुप्त बसलों होतों, तेथून तिच्या समीपभागीं येऊन तिचे दृष्टीस पडण्या सारखा एके बाजूस नम्र भावानें उभा राहिलों. मला पाहतांच प्रथम ती चपापली. परंतु माझें दीन वदन पाहून म्हणाली, अरे तूं कोण आहेस? येथें तुझा प्रवेश कसा झाला? अद्याप पर्यंत यत्किंचित्‌ही जादूचा स्पर्श तुझे अंगीं दिसत नाहीं हें मला मोठें आश्चर्य वाटतें; कारण हें स्थल या प्रदेशांतील मोठमोठाले सामर्थ्यवान्‌ लोकांसही दर्शनास अगम्य आहे. मग तुजसारख्याचे दृष्टीस पडावें ही शंका तर मुळींच नको. कदाचित्‌ दैववशात्‌ या संस्थानचे राजबागेंतील एक झाड आहे त्याचें पुष्प जर मिळेल तर हें प्राप्त होणारें आहे; परंतु त्या विषयीं कोणासही माहिती नसोन ज्यास आहे त्यास आज्ञे खेरीज त्या पुष्पास हस्तस्पर्श करण्याची मनाई आहे. बरें त्या बागेंत दुसरा कोणी जाईल तर त्यास ही अंतरखूण कशावरून समजणार? उलटे लागलीच बंदिपाशांत पडून त्याजवर मंत्रप्रयोग होत असल्यानें पश्वादि तनूचे आश्रयानें दुःखांत कालक्रमणा करावी लागते. त्यांतही तसाच कोणी भाग्यानें कोणाचे दृष्टीस न पडून येथें चुकून आला तर तें पुष्प नसल्यानें त्यास हें स्थल अरण्यमय दिसतें, अशा अनेक अडचणी आहेत तस्मात्‌ तुला

कोणी तरी महान जादुगाराचें साह्य असलें पाहिजे. तसेंच माझें दर्शन होणें दुर्मिळ आहे. असें तिचें भाषण ऐकून मी ह्मणालों स र्व तुझें बोलणें खरें आहे. या विषयींची हकीकत मागाहून सांगेन. परंतु प्रस्तुत ज्याच्या विरहानें तूं अत्यंत दुःखी आहेस तो सर्व-तुझा विरह दूर करावा या इच्छेनें त्याची आणि तुझी ग्रंथी याच कालीं या स्थलीं करून तुला सौख्य द्यावें असें मनांत आलें आहे. हे त्याचे मुखांतील शब्द तिला अमृतासारखे वाटून त्यास तिणें-लागलीच साष्टांग नमस्कार घातला, आणि ह्मणाली आज मी-तुझ्या या भाषणानें धन्य झाल्यें आहें. माझें दुःख दूर करण्याचें सामर्थ्य इकडील सर्व प्रदेशांतील महान् जादूगार जे ह्मणवीत आहेत त्यांचेंही नाहीं. असें असून तूं ज्या अर्थीं माझें सौख्य मला भेटवून जात असलेल्या प्राणांचें रक्षण करणार आहेस त्या अर्थीं प्रत्यक्ष तूं ईश्वरच मला आज भेटलास असें वाटतें. अहाहा! काय हें अद्भुत वर्तमान!! कधींही ऐकण्यांत यावयाचें नाहीं तेंच आज मी या मुखांतून ऐकत आहें. आतां पळभरही धीर धरवत नाहीं. जशी ही वार्तेची मजवर तूं दया केली आहेस तसा तिचा प्रत्यक्ष अनुभव दाखवून त्या धर्मभगिनीचा आत्मा संतोषित करावा; असें बोलून हात जोडून सजलनेत्र होत्साती नम्रपणें एके बाजूस उभी राहिली.—— पहा, हे कुसुमचापा, त्या वेळीं तिची फारच दीनमुद्रा पाहून मलाही वाईट वाटलें. कारण तिचें त्याजवर कसें प्रेम होतें हें तिनें जो रात्रभर चित्तास द्रव आणणारा अवर्णनीय शोक केला त्याजवरून मी जाणलें होतें. मग लागलीच मलाही धीर न धरवून तिला ह्मणालों बाई तूं ज्यापेक्षां मला सुखानें आपला बंधु म्हटलें आहेस त्या अर्थीं त्याच भावानें मी तुला सांगतों. आतां तुझे प्रिया विषयीं तुला कांहीं काळजी करणें नको. त्याची भेट झालीच असें समज. असें बोलत आहे तों त्या वेळेस तो आरक्तमस्तकी मगरही निय-

या प्रमाणें त्या पायरीवर निवांतपणें तिजकडे पहात बसला होता ती तिला मी बोटानें दाखवून ह्मणालों हाच तुझा जीवींचा जिवलग प्राणदाता मगररूपानें निरुपाय होऊन या सरोवरीं तुझे विरहाचें दुःख भोगीत आहे. हर हर!! तिचा किती हा निर्दयपणा!!! ज्या दिवशीं यास तूं बराबर घेऊन येथें आलीस तेच दिवशीं या संस्थानची मुख्य अधिकारीण जी इचे पूर्वी हेमा,नामक होती तिला हा तुला प्राप्त झालेला सौख्यकारक जोडा सहन न झाल्यामुळें दुष्ट भावानें तिणें तुला समजूं न देतां तूं मंत्राचा पाठ करीत एकाग्रचित्तानें उदकांत उभी आहेस ही संधी पाहून आपले मंत्रसामर्थ्यानें या सरोवरीं यास मगर करून टाकिलें आहे. तुझेंही मंत्रसामर्थ्य आज या स्थलीं जागृत आहे, असें जाणून आतां विलंब न करितां येथें तुला आजचे दिवस मोकळीक आहे तोंच यास सिद्ध मंत्रें करून पूर्ववत् मानुषत्व देऊन पक्षिदेहानें समागमें घेऊन आपले स्थानीं आनंदानें जाण्याचें कर. हें साकल्य खुणेचें गोप्य वर्तमान त्याचे मुखांतून समजतांच ती त्यास ह्मणाली तूं आज मला धन्य केलें आहेस. तुझी ग्रंथी जाहली नसती तर यावज्जीव हें सौख्य प्राप्त होण्याची आशा नव्हती. तुझी उतराई होण्यास कोणत्याही प्रकारानें मी समर्थ नाहीं, तथापि माझ्याच्यानें जितके हे उपकार फेडवतील त्या विषयीं होईल तितका मी यत्न करीन. आतां मात्र असें कर कीं, एक मुहूर्त पर्यंत या सरोवराचे हद्दीचे पलीकडील बाजूस दूर जाऊन बैस; कारण माझी मंत्रशक्ति फारच भयंकर आहे ही पाहण्यास कोणीही समर्थ होत नाहीं आणि इच्या अंगाचा दुसऱ्यास नुस्ता धका जरी बसला तरी तोही प्राणघातक आहे असें जाणून इतकी कृपा व्हावी असे तिचे आर्जवी बोल ऐकून मी लागलीच दूर जाऊन बसलों इतक्यांत एकाएकीं आकाश दगानीं व्यापून जाऊन मेघगर्जनेसारखे मोठमोठाले आवाज कानीं येऊं लागले. दिवस अ-

सतांही चोंहीकडे अंधःकार पसरल्यानें रात्र वाटूं लागली. मधून मधून विद्युत्प्राय त्या शक्तिमंत्राचा प्रकाश पडत असल्यानें नेत्रांची अवलोकन शक्ति क्षणोक्षणीं बंद होत असे. तिणें हातांत वीरकंकणें घालून कपाळीं शेंदुराचा मळवट भरला. आणि चोंहीकडील दिशा मारून आपले मंत्राचे प्रभावानें तात्काल त्या मगरास पूर्ववत् मनुष्य देह दिला. आणि अगोदर मी जेथें होतों तेथें येऊन तिणें मला लागलीच हाक मारली. नितक्यांत आकाशाही स्वच्छ झालें मग काय विचारावें? त्या उभयतांचा आनंद गगनीं न मावून वारंवार माझे आभार मानून ते ह्मणूं लागले. आज तुझे कृपेनें आम्ही पूर्वसौख्याचे अधिकारी झालों आहोंत. आतां दुःखाचा म्हणून लेश राहिला नाहीं. या वेळेस कृपा करून तुझी पूर्वीपासून हकीकत आह्मांस ऐकवावी. मग घराहून निघाल्या पासून मी तेथें येई पर्यंत घडलेलें सर्व वर्तमान थोडक्यांत कळवून त्यास मंत्रयोगानें मगर करून टाकण्याची वगैरे ज्याजकडून माहिती मिळाली त्याचे उपकारही दर्शविले. आणि तिला ह्मणालों आतां तुझे आश्रयानें कोणतीच काळजी मला राहिली नाहीं. माझी येथून सोडवणूक करून सौख्य देण्याचें तुला रूचेल तसें कर. ती ह्मणाली एकवार तुला मी आपला बंधू ह्मणून ह्मटलें आहे तसेंच मजवर तुझे हे महदुपकार झाले आहेत त्याची उतराई काय होऊं? हा देह जरी विकला तरी ते फिटणार नाहींत. आतां हरएक प्रयत्नानें मी तुझें रक्षण करीन स्वस्थ असावें. जो तुजवर प्रसंग आला आहे तो मजवरच आहे असें तूं समजून त्या विषयीं निष्काळजी राहा. आणि तुझ्या भगिनीच्या पतीनें परोपकारार्थ या माझ्या प्रियाचे सुटकेचा मार्ग सांगितला. त्याचीही तुजप्रमाणेंच काळजी मला ठेवणें भाग आहे. प्रत्यक्ष परमेश्वरानें परोपकार आणि मोक्ष या दोहोंची तुलना करून पाहतां परोपकाराचें पारडें जडत्वसंबं-

धानें नव्हीं बसलें. व मोक्षाचें हलकें होऊन वरचेवरच तरंगून राहिलें पहा, चंद्र आणि सूर्य हे जीव, वनस्पति, आणि धान्यें यांच्या सौख्यवृद्धी सांठीं उदयास येतात. जरी त्यांचे ग्रहणइच्छेनें राहु, केतु, त्यांस पीडा देत आहेत, तथापि ती सहन करून ते आपले दुःखा विषयीं कांहींच न पाहतां तशा ग्रहणकालींही दान, धर्म, जप, जाप्य, या योगानें दुस ऱ्याचीं पातकें दूर करून त्यांस पुण्याचा ठेवा प्राप्त करून देतात. आणि असे जे आपपर न पाहतां ज्यांची समसमान सर्वांवर प्रीति राहून ज्ञानदृष्टया परक्यास दुःख तें आपणासच मानून त्याजवर दया करितात, ते प्राणी वंशध्वज होऊन त्रिलोकीं धन्य होतात. या वरून परो पकारासारखें दुसरें कोणतेंच पुण्यसाधन नाहीं. जे परोपकारशून्य आहेत त्यांचें जीवित व्यर्थ होऊन जन्मास येऊन न येऊन सारखेंच. दुसऱ्याची विपत्ति कांहींच मनांत न आणून स्वकीय कामीं मात्र झटतात, ते लघु अंतःकरणाचे प्राणी होत. असे जे अनुपकारी दयाशून्य आहेत त्या पेक्षां तृणासही थोरवी अधिक आहे. तें ग्रास होऊन पशूंचें पोषण करितें. आणि समरभूमीचे ठायीं जे भीति पावून केवळ संसार सौख्याचे इच्छेनें जीविताची आशा करितात, त्यानीं तें तृण दांतीं धरलें म्हणजे त्यांचेंही रक्षण करितें. ज्या वर जो प्रसंग गुदरेल त्यास होईल तितक्या प्रयत्नानें यथाशक्त्या मुक्त करावें, हें उत्तम पुरुषाचें काम आहे. जरी सर्व प्रकारें आपणा पाशीं द्रव्यादि साधनें आहेत आणि तीं दुसऱ्याचे कामीं खर्च केलीं तर प्रसंगीं अडचण पडेल या हेतूनें किती एक नाडून जातात. कोणतीही अवस्था सारखी राहात नाहीं. सर्वांस जरेच्या योगानें क्षीणत्व आहे. ज्या ठिकाणीं एकच मनुष्य असतें तेथें पुष्कळ होतात. जेथें पुष्कळ असतात तेथें एकच राहतें. तथापि अंतीं कांहींच अवशिष्ट राहात नाहीं. या भूतलाचा पट करून त्याजवर प्राण्यांच्या सोंगट्या मांडून रात्र आणि दिवस या दोन फांशांनीं जो काळ आहे तो आपले कालीं-

नामक मायेसहवर्तमान सदोदीत खेळत आहे. यामुळें प्रपंचडावाची-घडामोड नेहेमी चालू असते. तोही सारखा शेवटास जातो असें नाहीं. सर्व काळाची सत्ता आहे. त्याची इच्छा फिरल्यास मध्यंतरींही तो मोडून जातो. असें प्रत्यक्ष सर्व आपण पहात असतां आपली दृष्टि अज्ञानानें फिरून जाऊन या विषयीं कोणासही भान राहात नाहीं. या साठीं हें सर्व विचारपूर्वक मनांत आणून, अशा प्रकारचें जें कांहीं ईश्वरप्राप्तीचें साधन मनुष्याच्यानें होईल तितकें करीत असावें. असो. आतांच अवधि न करितां या सारस्वत कुंडांत तूं आह्मां बरोबर स्नान करून पक्षिवेषानें चलावें, ह्मणजे बहुत करून तुझे दुर्दैवास तुझ्या स्नानाबरोबर या सारस्वत कुंडीं मुक्ति मिळेल. असे त्या प्रसन्न वक्त्रेचे प्रेमाचे शब्द ऐकतांच मीही हर्ष पावून त्यांत स्नान करून पक्षिदेहानें त्यांजबरोबर आनंदानें आकाशपंथें मार्गक्रमण करूं लागलो.

---

## अंक ५ वा.

श्लोक. ( मदिरा अथवा सवाई वृत्त. )

यौवनकाल महानचि दुष्कर, पुष्कर दृष्टि निशाकर पावे ॥
ते समयीं विरहानल बाधित, साधित संधि तयासि जपावें ॥
प्राप्त महाग्रह त्यांतहि इंद्रिय निग्रह आग्रह शीघ्र धरावा ॥
नश्वर सर्व यशस्कर ईश्वर ध्याउनि तो भव दूर करावा ॥ १ ॥

काय पहा, **कुसुमचापा**, ती **सुमेधा** त्या प्रियासह मलाही पक्षि देह देऊन निघालेली तेच दिवशीं स्वकीय नगरीं पोंचून लागलीच आपले रमणीय आरामांतील महालीं गेली. तों तिची एक ( माल्यभारा ) नामें सखी अत्यंत रहस्यांतील असलेली तेथें तिची वाट पहात बसली होती. तीही निजसारिखीच लावण्य आणि तरुणी वस्त्राभरण करून मंडित अशी प्रियंवदा मी पाहिली. तिणें येतांच अगोदर निजवर मग आह्मां दोघांवर मंत्रोदक सिंचन करून तिघांसही पूर्ववत् केलें. तेव्हां

त्या सुमेधेस धीर न धरून उतावेळ अंतःकर्णानें तिनें त्या सखीचे अंगांत मिठी मारली. आणि तिजपाशीं माझें वर्णन करून तिला ह्मणाली आज याचे कृपेनें माझें अंतःकरण स्वस्थ होऊन मी पूर्व सौख्याधिकारी झाल्यें. याणें माझ्या या प्रियाचें आणि माझें ऐक्य करून प्राणाचें रक्षण केलें आहे; हे उपकार यावज्जीव कोणात्याही प्रकारें माझ्यानें फिटतील असें मला वाटत नाहीं. यासही प्रस्तुत कांहीं संकटाचे दिवस आले आहेत तथापि त्यांतून पार पाडावें या हेतूनें बंधु मानून आपले बरोबर त्या सिंद्धारण्यांतून घेऊनआल्यें आहें. या तिच्या भाषणानें, तिला आश्चर्य व परमावधीचा आनंद झाला. आणि कांहीं वेळ मजकडे निरखून पाहून तिला ह्मणाली बाई या तुझे प्रियाचा तुला अपूर्व लाभ पूर्व भाग्योदयानें आजच्या पर्वणीस होऊन या पुनर्वसूचाही ठेवा सांपडला. मी तुझी प्रिय ह्मणविणारी सखी आहें असें जाणून या नूतन उदयास आलेल्या नक्षत्ररूप अर्थसौख्याची अर्थात् विभागी तुझे कृपेनें होईन असें वाटतें. असो. आज हा असा योग येईल असें स्वप्नींही नव्हतें. यावरून तुझें खरें पातिव्रत्य असलेलें तुला कामास आलें. तुझ्या पूज्य स्वभावाचें आणि सत्यत्वाचें जितकें वर्णन करावें तितकें कमीच आहे. या तुझ्या प्रियपतीचा तुला वियोग झाल्यापासून अशा तरुण अवस्थेंतही नैराश्य वृत्ति होऊन तुझें तापस्यां प्रमाणें वर्तन होतें. कोणतेंच विषयादि सौख्यावर एक दिवस ही तुझी प्रीति न बसतां त्या विषयीं तुला आनंदही वाटला नाहीं. धन्य तुझा निग्रह कीं, इच्छे प्रमाणें जें पाहिजे तें प्राप्त होणारें असून कधींच तूं धर्म, नीति आणि मर्यादा यांचें उल्लंघन केलें नाहींस. कोणा तरुण पुरुषा बरोबर हास्य, विनोद, हें तर कोठचें; परंतु नुस्तें संभाषणाही तुझें झाल्याचें एक दिवसही आढळलें नाहीं. तशांतून प्रस्तुत या प्रदेशीं शृंगार रस प्राधान्य असल्यानें अशा कामीं कोणीच कोणास दू-

षण देत नाहीं असें असूनही तूं त्या विषयीं सर्व प्रकारें तिरस्कार करून अन्य इच्छा न धरतां केवळ याजवर अवलंबून रात्रंदिवस याचे भास्यर्थ स्फुरणीस लागली होतीस, हें बोलतां मात्र येतें; परंतु एकीच्यानेंही तुजप्रमाणें सर्व सौख्यें अनकूळ असतां यौवनोन्मद-दशेंतील उत्पन्न झालेल्या वासनेच्चें आकर्षण होईल असें मला-वाटत नाहीं. उगीच कां सर्वांत धन्यता मिळून कीर्ति संपादन होते? तुझें पातिव्रत्य रक्षणाचें खरें निर्वाण पाहून जगनियंत्या परमेश्वरानेंही तुजवर कृपा केली आहे. या तुझ्या सदाचरणाचा तारुण्यवती स्त्रियांनीं कित्ता घेऊन आपलेअंतःकरणास वळण लाविल्यास तें दुर्धर प्रसंगींही त्यांस चंचल होऊंनदेतां क्षणोक्षणीं विचार आणि विवेक यांचे सात्धोदकानें चित्तास गलबलविणारा जो मन्मथाग्नि त्याचें तें शांतवन करील. आणि तेंच वळण त्यांनां दोहों लोकीं धन्यता देऊन त्यांचे उभय कुळांस तारणारें होईल. हें मोठें महत्वाचें कृत्य समजून जन्मास येऊन तरी हेंच मिळविलें पाहिजे.

स्त्रीदेह केवळ कांचेची कुपी आहे. मौक्तिकासारखा त्यांचे अंगीं पातिव्रत्यपणाचा ढाळ असतो. तो एकवार नष्ट होऊन त्यांस भ्रष्टता आली तर लागलीच त्यांचें पाणी उतरून किंमत कमी होते.म्हणून सत्समागम धरून पूर्वींपासून अत्यंत दुर्लभ अशा नरदेहास अन्यांचा स्पर्श न होऊं देण्या विषयीं तुजसारख्या ज्या कोणी सुविचारी स्त्रिया आहेत त्या निरंतर जपतात. त्या पतीसच ईश्वर मानून त्याचे ठिकाणीं प्रेम ठेवितात. असाच पुरुषाचाही दुर्भेद्य एकव्रती नेम असण्याचा निग्रह पाहिजे. स्त्रिया अथवा पुरुष कोणीही असो, त्यास दुराचरणाचें पातक सारखेंच आहे. प्रथम विवाहसमयीं पुरुष धर्म, अर्थ, कामें करून सदोदित विवाहित स्त्रीचेंच पोषण करीन. आणि इजवांचून परस्त्रीकडे अंतःकरणाची वृत्ति बदल होऊं देणार नाहीं. इत्यादिक नियमाचे शप-

थेचा उच्चार विप्राग्नीसन्निध मुखानें करीत असून पुढें त्या विषयीं स्मृति न राहून त्या साक्षभूत स्वकीय वचनास बाध आणीत आहेत. ही त्यांची कृति किती निंद्य आहे; तरी ते त्या विषयीं आपले ठिकाणीं भूषण मानितात खऱ्या मार्गानें वर्तन होत नाहीं ह्मणूनच वारंवार अनेक योनीचे ठायीं गर्भवासादि व संसारसंबंधीं दुःख भोगणें भाग पडतें; या साठींच प्रथमपासून जपलें पाहिजे. इतकेंच आहे कीं, विस्मृति होत असल्यानेंमात्र गर्भातील वास्तव्याचें काय दुःख आहे, हें कांहींच कोणास कळत नाहीं; तथापि विचारदृष्टीनें पाहिलें असतां, जें दृष्टिगोचर आहे त्याजवरून त्या विषयीं ज्ञान होऊन होणारे दुःखाचे भीतीस्तव कोणत्याही प्रकारानें, दुर्वासनेचा संग सोडावा हें त्यांस बरें वाटेल; परंतु अशा विषयीं कोण विचार करतो. हर हर !! गर्भांत जीव असतां उदरस्थ क्षुधित असलेले जंत्वादि कीटक त्याचे सकुमार तनूस क्षणोक्षणीं क्षतें पाडीत आहेत. अशा समयीं त्याचे मातेस डोंहाळे होऊन आम्ल, तीक्ष्ण, कटु, लवण, क्षार या मिश्रणाचे उष्ण उष्ण पदार्थ प्रिय वाटत असल्यानें ती त्याचें सेवन करते; परंतु त्या सर्वांचा उदरस्थ अग्निसंयोगानें पाक होऊन, शेष रसाचा त्यावर स्पर्श होतो, त्या योगानें त्याचे सर्व शरीरीं वेदनेचें अत्यंत दुःख होऊन वारंवार त्यास मूर्च्छा प्राप्त होत आहे. असें दुःख स्वतः तिणें पूर्वी गर्भवासांत अनुभवलें असूनही तिचे हातून अज्ञानसमजुतीनें असा प्रकार घडतो. आणि ती गरोदर असल्यानें जे कोणी आप्तवर्ग इष्ट असतात ते मोठे आनंदानें तिला डोंहाळजेवणाचे समारंभ करितात. त्यांतही असेच बुद्धिपुरःसर तिजसाठीं आवडीचे तीक्ष्ण पदार्थ त्याणीं केले असलेले तिचे खाण्यांत येतात. त्या बापडे जिवाचे क्लेशांकडे कोण पहातो? किती ह्मणून गर्भस्थितीचे दुःखाचें वर्णन करावें !! ज्या प्रमाणें पक्षी पिंजऱ्यांत बद्ध असतो, त्या प्रमाणें तो जीव मांस, मेद, आणि रक्त यांनीं लिप्त होऊन त्याचें सर्वांग जरेनें बांध

लेलें असतें. आणि त्याचें मस्तक अधोभागीं होऊन तेंही कुशींत चां-
कून राहतें. त्या योगानें त्याचे सर्व चलनादिव्यापार बंद होऊन श्वासो-
च्छ्वास सोडण्यास तो असमर्थ होतो. तें दुःख सहन होत नसल्यानें
त्यास पूर्वकर्माची आठवण होऊन त्यांतून मुक्तता होण्यास्तव अह-
र्निशीं परमेश्वराची प्रार्थना करून पुनश्च कुमार्गी वर्तन करणार-
नाहीं असें ह्मणत असतो. बहिर्निस्सरन् कालीं तरी त्यास किती दुः
ख आहे? ज्या प्रमाणें यंत्रांतून धातु ओढून निघते तद्वत् वेदना
होऊन त्याची सुटका होत आहे. पुढें तो तें लागलीच विसरून ज्ञा-
तो. यामुळें वारंवार अशा दुःखरूप भोंवऱ्यांत जीवास भ्रमण करा
वें लागतें. द्रव्य, मित्र, स्त्री राज्य हीं पुनः पुनः प्राप्त होतात; परंतु ज्ञा
नविशिष्ट नरतनु पुनश्च प्राप्त होत नाहीं. प्राप्त झाल्यानें मात्र सुल-
भ वाटतें. पण अत्यंत दुर्लभ आहे म्हणूनच प्रपंचांत राहून परि-
णाम गोड होण्या साठीं निरंतर सन्मार्गी वर्तून सायुज्य मुक्तिसदना
चें द्वार उघडण्या साठीं धर्म आणि गर्भवासादि दुःखांतून मुक्त हो-
ण्यासाठीं यथाशास्त्र परमेश्वर चरणाचें ध्यान सर्वकाल अंतर्यामीं
भक्तिपुरःसर जागृत ठेऊन मातेचें जसें बालकाचे ठिकाणीं प्रेम
असतें तद्वत् परोपकार बुद्धीनें सर्व प्राणिमात्रांवर प्रेम ठेऊन कि
तीएक सत्पुरुष या जगांत वास करितात. तुझी तरी योग्यता अशी
च आहे असें तिचे त्या **माल्यभारा** सखीनें सम्यक् वर्णन क-
रून तिला विचारून ती मोठे आनंदांत आपले मंदिरीं गेली.

मित्रा **कुसुमचापा**, पुढें ती **सुमेधा** त्या आपले **पुष्प
हास** नामक प्रिया बरोबर स्वकीय कुंजआरामांतील सौख्य मं-
दिरांत राहून मोठे आनंदांत काळ घालवूं लागली तें पाहून तिचे मा
तापित्यांस अत्यंत सौख्य वाटलें. तें तिचें मंदिर सर्व उपभोग सा-
हित्य संपत्तीनें भरलेलें असून कोणत्याही पदार्थांची त्यांत न्यूनता
नव्हती. व तो इच्छेनुरूप तिनें तयार करविलेला बागही त्या समयीं

सर्व अवस्थेनें तारुण्य दशेस येऊन पोंचला असल्यानें पुष्पें व फळें व सुगंध यांहीं करून विराजमान होता. पूर्वी ज्या वेळेस तो तिचा प्रिय कांत त्या स्थलीं नव्हता त्या वेळेस जो आराम तिला त्रासदायक दिसत होता तोच त्याची ग्रंथी झाल्यावर सुखावह वाटूं लागला. यावरून जी वस्तु ज्या बुद्धीनें आपण पहावी त्या प्रमाणेंच भासते. पहा एकच देह असून पहाणाराचे दृष्टीनें तीन प्रकारचा होतो, तो असा, योग्यास दुर्गंध्यादि सादृशास्तव प्रेतवत्, विषयी जनास स्त्रीरूपें करून मोहक, आणि तोच श्वानास मांसरूप दिसतो. हें उदाहरण सर्वांस परमेश्वरीं चित्त स्थापित करण्यास विचारपूर्वक लक्ष्यांत वागविण्या सारखें आहे. असो. एकंदरीनें पहातां ऐष आरामाचें सौख्य त्या प्रदेशा सारखें अन्यस्थलीं नसून त्याचा उपभोगही निकडील स्त्रियांनींच घ्यावा. इतरांस तो सोहळा दृष्टीनें पाहण्यासही दुर्मिल आहे. त्या माझ्या धर्मभगिनीचे घरीं मी कांहीं दिवस सौख्यांत असतां एके दिवशीं तिची ती प्रियसखी **माल्यभारा** एकाएकीं त्या तिचे महालांत घाबरलेली येऊन तिला म्हणाली ताई सावध राहा, तुजवर भोग प्रसंग या पुढें येण्याची वेळ येईल असें दिसतें; कारण जिणें तुझे प्रियास मगर केलें होतें ती जादुगर हेमा, प्रस्तुत या शहरीं येऊन तुझे प्रियास आणि मानलेल्या बंधूस पुनः दुःखांत पाडण्यास जादूचे साह्यानें कांहीं यत्न करीत आहे असें मला एकीकडून समजलें म्हणून अगोदर हें तुला सांगण्यास मी आल्येंआहें. आतां स्वस्थ न राहतां सावध ऐस. असें तिचे मुखांतील भाषण ऐकून ती **सुमेधा** घाबरून गेली. तरी ती तिला म्हणाली कीं, माझ्या प्राणप्रिया बद्दल मला कांहीं एक वाटत नाहीं. कारण ती हेमा, ज्या गुरूपाशीं मंत्रविद्या शिकली आहे त्याजपासूनच यास दुसऱ्याकडून कोणतीच बाधा न होण्या साठीं पूर्वीच मी असावध न राहतां साधनाची तजवीज करून ठेविली आहे. मात्र या

माझे भावाचे रक्षणा विषयीं अद्याप हलम सिद्ध झाला नसल्यानें मला काळजी वाटते, तथापि मी भीत नाहीं. तसाच प्रसंग आल्यावर याचे जिवाचें कोणत्याही प्रकारें रक्षण करीन. तूंही मजसाठीं जास्ती सावध राहून मला खबर देत जा. ही तुला काळजी मज सारखीच आहे. या विषयीं मीच अधिक सांगितलें पाहिजे असें नाहीं. असें बोलून तिला घरीं पाठविलें. आणि माझे रक्षणार्थ कांही योजना तिची चालली आहे तों पुनः तिसरे दिवशीं ती माल्यभारा पूर्वीपेक्षां अधिक घाबरलेली येऊन म्हणाली, आतां चिन्ह चांगलें नाहीं. त्या हेमेचें अनुष्ठान पूर्ण होऊन तिला सिद्धिप्रसाद प्राप्त झाल्यानेंच आजचे रात्रीं हा तुझा महाल आकाशमार्गी उडून अन्य स्थलीं नेण्याचा तिचा विचार झाला आहे. या साठीं तूंही आजआपले सिद्धमंत्रासह जागृत राहा. हें ऐकून ती त्या सखीस ह्मणाली. तिचा मजपुढें किती अभिमान टिकेल? मला अशा तिच्या कृत्यामुळें कांहींच काळजी वाटत नसूनही अंतःकरणाची वृत्ति स्वस्थ आहे तथापि या बांधवांचें रक्षण कसें होईल ही भीती मनांत उत्पन्न होऊन कांहीं सुचत नाहीं. मी यास एकवार आपले मुखानें बंधु म्हणून तुझें रक्षण करीन असें बोलून येथें आणालें आहे. आणि जें कांहीं याचें रक्षण होण्याचें साधन करीत आहें तें सिद्ध होण्या पूर्वींच हें संकट संनिध येऊन पोहोंचलें यास काय करावें? असें तिला सांगून मला ह्मणाली भाऊराया, आणखी कांहीं दिवस तुझे कपाळीं पुनः वनवासाचें दुःख आलें आहे या दुर्घर प्रसंगीं येथें तुझें आज राहणें होईल तर जिवास धोंका आहे असें जाणून तुला मी स्वकीय मंत्रसामर्थ्यानें पक्ष्याचा देह देऊन सोडतें ह्मणजे लागलीच उडून जाऊन या सीमेचे पार आजचे आज होशील. कोठें तरी अरण्यवासांत दोन वर्षें पर्यंत तूं गुप्त राहून पुढें निर्धास्तपणें इकडे पुनश्च येण्याचें कर. मग लागलीच तुला पूर्ववत

हा देह देऊन तुझी मुक्तता मी करीन. कदाचित् अशाही संकटां-
तून तुझें आज मी येथें रक्षण केलें असतें; परंतु माझ्या आवांक्या
बाहेर एकादा प्रसंग तुजवर आल्यास मग मात्र मला उलटें दुःख
होऊन तुझा परिणाम काय होईल याचा नेम लागत नाहीं. कारण-
प्रस्तुत मजपेक्षां तिचा अधिकार ज्यास्त असल्यानें आज तिचें ज्या-
दूचें सामर्थ्य अधिक चालेल असें वाटतें. या साठीं जीव जातो अ
सें ह्मणून माझे कंठांत तिणें प्रेमानें मिठी मारली. ते वेळेस तिचे
नेत्र अश्रूंनीं भरून येऊन ह्मणाली तूं मला जरी सहोदर बंधूपे-
क्षांही अंतर्यामापासून अधिक प्रिय आहेस तरी काय करूं? या
वेळेस निरुपाय आहे, यास्तव तुझा कांहीं दिवस वियोग सहन
करणें माझे कपाळीं आलें. तूं कांहीं काळजी करूं नको. दोन वर्षे
पर्यंत कसें तरी कोठें आपले जिवाचें रक्षण करून सांगितल्या-
प्रमाणें पुनः येऊन मला भेट ह्मणजे तुझे सर्व दुःखाचें परिमा-
र्जन होईल. नंतर जीही माझी प्रिय सखी नवोढा, कृशोदरी, सौंद
र्यलहरी माल्यभारा आहे इचें तुजवर फार अंतःकरण जडलें आ
हे ह्मणून इला विवाहित पत्नी करून इच्या सहवर्तमान आणि जो
तुझा शालक त्या ठिकाणीं अटकेंत आहे त्यासही घेऊन आपले-
स्थलीं आनंदानें जाशील. कदाचित तूं ह्मणशील कीं, तेव्हां तरी अ-
धिक काय आहे अशा अडचणी येतीलच. हा संशय मुळींच घेण्या
चें प्रयोजन नाहीं. त्या वेळेस त्या संस्थानची मीच मालकीण व्हाव
याची आहें, हें मनांत पूर्ण निश्चयानें बाळगून पक्षिदेह जरी होईल त
री पुढील चांगले परिणामावर दृष्टि देऊन राहणें बरें. तुला असें पा-
ठविणें हें तरी मला फारच दुःखकारक झालें आहे. असो. आतांची
वेळ विचार करण्यास उरली नाहीं. तुला सर्व या स्वकीय पूर्व देहा
चें स्मृतियुक्त ज्ञान राहील तों पावेतों या प्रदेशीं आलास तरमात्र
धोका पावशील. आतां त्वरा होईल तितकी करून एक दोन दिवसां

त जितकें दूर जाववेल तितकें जाण्यास मला सांगितलें. नंतर तात्का ल तिणें आपले मंत्रसामर्थ्यानें मला प्रस्तुत असलेला हा शुकपक्ष्या चा देह देऊन आपले हातानें उडविलें. तरी ईश्वराची कृपाच जाह ली आहे, ती आभारपूर्वक मी मानून ते दिवशीं तर अन्नापाण्याची ही आशा न करितां अस्तमानपर्यंत सुमारें पन्नास कोश गेलों. रा त्र झाल्यावरही मागील भीतीस्तव अरण्यांतील एके वृक्षावर उजा डे पर्यंत सावधपणानें राहून प्रातःकालीं पुनः उडून मार्गस्त झालों. पुढें चार घटिका दिवसाचे समयास एक बाग दृष्टीस पडला. त्यांती- ल फळझाडांस पक्क फळें, पेरु, अंजीर असलेले पाहून माझे मना नें तिकडे धांव घेतली. कारण ते वेळेस पोटांत क्षुधा फारच प्रदी- प्त झाली होती. मग मी आंत शिरून त्यांतील कांहीं इच्छिलेलीं फ- ळें भक्षण केलीं आणि झाडांचे तरवत्यांतून भरलेलें असलेलें उ- दक प्राशन करून चित्त विश्रांति जों घेत आहे तों एकाएकीं कांहीं पं- खांतून वहात असलेला नादयुक्त वायु कानीं आला. मागें वळून पा- हिलें तों एक बहिरी ससाणा पक्षि आपणावरच चाल करून येत आहे असें समजलें. त्या **क्षमेधेचे** सहवासानें थोडी जादूसंबं- धीं माहिती मला कळून आली असल्यानें तत्संबंधी त्याची खूण ओळखून आतां याचे हातून आपला प्राण निःसंशय वांचत नाहीं असें वाटलें. मग काय विचारावें? सर्वांस प्राणा सारखें कोणतेंच दुसरें प्रिय नाहीं. तो ससाणा तेथें येण्या पूर्वींच मी उडालों. त्याणेंही त्वरा करून माझा पाठलाग केला. बा मित्रा **कुसुमचापा**, तसा प्र- संग वैऱ्यासही न यावा. तेथें माझा कांहीं उपहार होऊन मला दोन घटिका विश्रांति मिळाली होती, म्हणून त्याचें व माझे उडण्यांत वरचेवर बरेंच अंतर पडूं लागलें. तरी त्याणें माझा पाठलाग करून चारपांच वेळ मला गांठून फार त्रास दिला. त्या योगानें माझा अ गदीं धीर सुटला. एकसारखे सूर्य माध्यान्हास येई पर्यंत वेगानें

उडण्याचे श्रमा मुळें मी अगदीं थकून जाऊन माझ्या पंखांचा वेग कमी झाला. तशांत थोडी संधी सांपडून मागें पाहिलें तों तो दुष्ट ससाणा पाठीशीं आहेच; तेव्हां तर कांहीं सुचेनासें होऊन मी प्राणरक्षणासाठीं कोठें विश्रांती स्थल चोंहीकडे पहात असतां; तें मोठें भयंकरअरण्य होतें तरी, दैवयोगानें त्यांतही एक मोहाचा वृक्ष दृष्टीस पडला. त्याची छाया निबिड व तो दाट पर्णांच्या योगानें अगदीं डवरून गेला असल्यानें त्याचे भागांत सूर्यास आपले प्रखर किरणांचा ईषन्मात्रही शिरकाव करण्यास संधि उरली नवती. तेव्हां मला आनंद होऊन तशांतही त्वरा करून त्या ससाण्याची नजर भ्रमणांत चुकविली, आणि त्यांतील एका साग्र शाखेचे आंत शिरून गुप्त पणें दबून बसलों. अशा त्या निर्भय स्थलीं मग कांहीं शीतल आणि सौख्यकारक वारा प्राप्त होतांच क्षणमात्र विश्रांती घेतांना अंतःकरणास थोडी स्वस्थता आली; तथापि माझें विसाव्यारहित एक सारखें अत्यंत भ्रमण झाल्यानें पंखही हालविण्याची मला शक्ति उरली नव्हती; आणि त्यांत त्या दुष्ट ससाण्यानें शरीरावर पंखांचे तसेच चंचूचेही प्रहार केले होते यामुळें त्यांतून रक्तस्राव होत असून ग्लानी येऊन मी विचारांत पडलों कीं, आतां काय करावें? कोठें जावें? येथून जर एकदां बाहेर पडलों तर तो ससाणा आपणास वृक्षासभोंवतीं आणि अरण्यांत चोंहींकडे शोधित आहे; त्याची पुनः गांठ पडल्यास प्राणाची आशा सोडली पाहिजे. पुनः उडण्याचे श्रमामुळें पोटांत क्षुधा लागून कांहींच सुचेना. इकडे तिकडे पाहूं लागलों तों तेथें कांहीं अंतरावर समोर अप्रतिम ज्याचें काम आहे असा मैदानांत एक विस्तीर्ण महाल असून त्याचे तिसरे मजल्याचे खिडकींत एक अतिलावण्य, नवयौवना स्त्री वस्त्राभरण मंडित माझे दृष्टीस पडली; त्या मृगाक्षीचे अवलोकना बरोबर, योग्याचीही वृत्ति भ्रमित होईल. मग इतरांच्या स्थितीचें काय कथन करावें? तथापि तिचे मुखावर कामोद्दीप-

नाचें असावें तसें तेज दिसत नवतें. अशा तिच्या दर्शनानें मला पुष्क ळच धीर येऊन कदाचित् इचा आश्रय आपल्यास होईल तर कांहीं सुखाचे दिवस येतील. अशा विचारांत मीं जों आहें तोंच एकाएकीं तो ससाणा पुनः त्या वृक्षाचे गुप्त द्वारेवंत मी ज्या ठिकाणीं होतों ते थें माझा सुगावा लावून अकस्मात अगदीं समीप आला. त्याची- माझी एक नजरानजर होतांच मग काय विचारावें, माझें देहभान नाहिसें होऊन गेलें, तरी जिवावरच प्रसंग आल्या मुळें त्याचा अं- गास स्पर्श होऊं न देतां तेथून मी युक्तीनें भरारी मारली. हें पाहून तोही माझे पाठीस चवताळून लागला. त्याचे हातून आतां निःसंश य प्राण राहात नाही अशा भीतीस्तव मी ओरडून मोठा कोलाहल मांडिला. जरी माझे मनांत तिचे महालांत शिरावें असें आलें, तरी तो दुष्ट मला तशी संधी मुळींच येऊं देईना; हा सर्व चमत्कार ती तेथें उभी असल्यानें तिचे दृष्टीस पडून तिलाही माझी दया आली; परंतु उपयोग काय? त्याचें निवारण करण्यास कांहीं मार्ग दिसेना. त्या- महाला भोंवतीं माझ्या पुष्कळ फेऱ्या होऊन शेवटीं थोडी संधि सांप- डतांच आणि आपल्या दुःखानें ज्या प्रेमोदरीचे सजल नेत्र होऊन एक- सारखी आपणाकडेसच पहात आहे, असेंही वाटून इच्या हातून त्या दुर्धर विघ्नांतून आपले जिवाचें रक्षण होईल या निश्चयानें धैर्य धरून त्यांतच चपळाई केली. आणि ती ज्या खिडकींत उभी होती तिचे आंत शिरून महालांत गेलों. माझ्या मागून ससाणाही तसा च आंत शिरणार तों त्या सदय अंतःकरण सुशीलेनें खिडकीचें दार बंद करून त्याचें निवारण केलें. या योगानें तो कृत्रिमि ससा णा निरुपाय होत्साता मजविषयीं कितीही यत्न केला असतां निष्फ- ळ आहे. आणि कदाचित इचे हातूनही कांहीं आपलेच प्राणाव र संकट येईल कीं काय असें वाटून त्याणें आपलें पूर्वस्थल संनिध करण्याचा परत मार्ग धरिला. त्या महालांत मी जाऊन एके कोंपऱ्यांत

बसलों; तों माझे सर्व गात्रांस कंप सुटून मी मरणोन्मुख झालों. नेत्रांतून रक्तबिंदु गळूं लागल्यानें ग्लानी येऊन धरणीवर निचेष्ट पडलों, असें त्या अश्विनीकुमार भगिनीनें पाहून औषधतुल्य स्वकीय मृदुकरानें मला उचलून अंकावर घेतलें. माझ्या दुःखानें ती कोमल हृदया विव्हल होत्साती वारंवार पदराचा वारा घालून मला कुरवाळूं लागली. आणि किंचित् गार पाण्याचे थेंब ही तिनें माझे मुखांत घातले. त्या शीतलोपचारें करून पुढें कांहीं वेळानें माझे अंतःकरणांत शुद्धि येऊन मी किंचित् नेत्र उघडले. ते वेळेस चित्तस्वस्थ होऊन आपले हातानें या अनाथाचे प्राण वांचले ह्मणून तिला धन्य वाटलें. मग कांहीं वेळानें ती बिंबधरा मोठे लडिवाळपणानें माझे मुखाचें चुंबन घेऊं लागली. आणि आपला हस्त मजवर फिरवीत असतां माझी सर्व तनु पुलकित होऊन गात्रेंही कंपित झालीं. व एकसारखें त्या तिच्या गंभीर आणि सुहास्य वदनाकडे माझें चित्त वेधून गेलें असें पाहून हा पक्षी असतां याची कांहीं तऱ्हा विलक्षण दिसत आहे, ह्मणून तिला मोठें आश्चर्य वाटून तिनें विचारदृष्टीनें पाहतां हा पुरुष असून जादूचे योगानें यास पक्षिदेह प्राप्त झाला आहे हें लागलीच तिला कळून आलें. मग कांहीं मंत्राचा प्रयोग मजवर करून मला पूर्ववत् मनुष्य केलें. काय पहा? एकापेक्षां एक अधिक तिकडील सामर्थ्यवान् स्त्रिया आहेत. तेव्हां त्या एकांत महालीं मीं तिजपुढें एका एकीं तरुण पुरुष उभा राहिलों. असें जाणून ती इंद्रियनिग्रहवती आपले ठिकाणीं मोठा विस्मय पावली. आणि लज्जायुक्त होत्साती खालीं मान घालून ह्मणाली, पूर्व सुकृतें करून आज या ठिकाणीं तुझे दर्शनाचा मला लाभ झाला. यावरून मजवर आलेल्या प्रसंगाची निवृत्ति होण्याची आतां संधि दिसते. नाहींपेक्षां आशा निर्मुक्त होऊन या ठिकाणीं मीं कालक्रमणा करीत होतें. व ही तुझी येण्याची वेळही चांगली आहे. या पुढें तूं

स्वस्थ अंतःकरणानें असावें. जी भीति तुझे हृदयांत वास करीत होती, ती इतःपर दूर राहिली असें समज. जावत्काल पर्यंत माझें साह्य आहे, तावत्कालपर्यंत किंचित्‌ही तुला धोका नाहीं. आतां फारच श्रम होऊन तुला क्षुधा लागल्याचें दिसतें. असें बोलून तिनें आपले हातें मला उष्णोदकें करून मंगल स्नान घातलें. मग तसेच कांहीं उत्तम साजूक पदार्थ करून त्यांचें मजकडून सेवन करविलें. त्या योगानें माझ्या सर्व श्रमांचा परिहार होऊन चित्तांतील भीति नाहींशी झाली. पुढें विडा घेऊन क्षणेक मऊ गालिच्यावर बसून विश्रांती घेतल्यावर ती मला म्हणाली ही वेळ निवांत आहे तर कृपा करून तूं पूर्वीपासून आपला इतिहास व हा पक्षिदेह कोणत्या प्रकारें प्राप्त झाला असे विषयीं मला सांगून संतोष द्यावा. आणि केवळ अविकारी चित्त ठेऊन मजसह वर्तमान बंधुत्व भावानें वर्तन करावें. उभयतांसही दुर्घट प्रसंगाचे प्रस्तुत दिवस आहेत, हे परमेश्वर कृपेनं अल्पकाळांत नाहिसे होतील, आणि पुनश्च सौख्याचे दिवस येतील. पहा कुसुमचापा, असें तिचें भाषण ऐकून माझे मनाची पूर्णखात्री झाली कीं, ही कोणी तरी मोठ्या घराण्यांतील कुलीन कन्या आहे. तशांत तर त्या एकांत स्थलीं तिसरें कोणीही नसून ती व मी तरुण असतांही तिच्या अंतःकरणांत यत्किंचित्‌ही विकार न येतां, मज विषयीं तिणें पूज्यबुद्धि ठेविली. ही गोष्ट सामान्य आहे कीं काय? अशा निग्रहवंती स्त्रिया फारच थोड्या असतील. या तिच्या भाषणानें माझेंही तात्काल तिजविषयीं अंतःकरण निर्मल झालें. पहा, तिचें तरी लोकोत्तर सौंदर्य आहे. ती एक दुसरी वसंत कोकिलाच आहे, असें ह्मटलें तरी चालेल. **वसंतकोकिलेचे** अंगीं विशेष चांचल्य आणि प्रकृती तलरव असून विशिष्ट मानिनी आहे. आणि इचा स्वभाव फार शांत व विचारी आहे. तशीच सर्व लक्षणांनीं युक्त असून केवळ सुवर्णाची वल्लीच आहे काय? असें भासतें. जिच्या वदनावर

तुझाच तारुण्यचंद्राचा प्रकाश पडून त्यांत कामोद्दीपनाचे तेजाचा समावेश होत आहे. काय सांगूं. धन्य त्या विधात्याची शक्ती कीं, एक एक अशीं जगतीतलावर रत्नें निर्माण केलीं आहेत. जे जे तिचे मुखांतून शब्द निघत. ते केवळ अमृता प्रमाणें कर्णास, व तसाच प्रत्येक भाषणांत रस उत्पन्न होत असलेला अंतःकरणास तृप्ती देत होता. मला वाटतें माझ्या नेत्रांनीं कांहीं तरी पूर्वी तपश्चर्या केलीहोती, म्हणूनच अशा लावण्यलीलावतीचे दर्शनाचा लाभ त्यांस मिळाला. किती तिचें सकुमारत्व!! पहा कीं, किंचित् तिला श्रम झाला कीं, सर्व शरीराचीं गात्रें आरक्त होऊन त्यांतून रक्तस्राव होईल कींकाय असें वाटे. सदैव तिची नासाग्र दृष्टि असत्ये. प्रसंगोपात प्रवासांत ऱ्ही असा एखाद्या दुर्मिल वस्तूच्या दर्शनाचा लाभ होतो. तद्देशीं मीं पुष्कळ पर्यटन केलें त्यांत रूपवती स्त्रिया आणखीही दोनचार अशाच दृष्टीस आल्या; परंतु कोणी स्वभावानें व कोणी ऐश्वर्य व कांहीं अंशीं सौख्यानें यांच्यापेक्षां कमीच आहेत. असो मग मी थोडक्यांत तिला समजण्या सारखा तेथें येई पर्यंत माझा इतिहास सांगून म्हणालों तुझेंही कांहीं वृत्त ऐकावें, ही इच्छा आहे तीपूर्णकरणें तुजकडे आहे. पहा अशा अघोर अरण्यांत आसमंताद्भागीं सर्व निबिड झाडी व मोठमोठाले पहाड असून दूरवर मनुष्यांची वस्ती अथवा तुस्ती हालचालही दृष्टिगोचर होत नाहीं. अशा बिकट स्थलीं हा एकटाच नूतन बांधलेला महाल दिसतो. यांत तूं एकाकी तारुण्यवती अतिसकुमारी वस्त्राभरण मंडित असून विराग स्थिति धारण करून राहात आहेस. व दुसरें ही येथें कोणी तुझे सहवासास दिसत नाहीं, याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. यावरून तूं कोणाची कोण असून अशा स्थितींत कां वास करीतआहेस? ज्या अर्थी मजवर तुझी बंधुत्व प्रीति आहे त्या अर्थी त्या भावानेंच तुजविषयीं माझी मनोवृत्ति आहे असें जाणून आतां तिळमात्र सं-

कोचित न होतां स्वच्छ अंतःकरणानें हें अगोदर मला कथन कऱ्या माझ्या अबाधित भाषणानें तिची प्रसन्न मुद्रा होऊन संतोषानें फार बरें आहे असें ह्मणून ह्मणाली. प्रस्तुत माझे कांहीं ग्रह अनिष्ट आहेत त्यांचेंच एथें एकटें राहून दुःखरूप फल मी भोगीत आहें. मी एक मांडलिक राजाची कन्या असून एकटी असल्यानें त्याचेंअत्यंत प्रीतींतील आहें. यामुळें मजवांचून त्यास कोठेंच कधीं चैन पडत नाहीं. मी घरीं असतां एकदां सहज त्याचे मुखांतून भाषण निघालें कीं, तान्हे, तूं आतां उपवर झाली आहेस. एकवार लग्न होऊन मी आपले पतीचे घरीं गेल्यावर तुजवांचून माझी स्थिति कशी होईल? तूं जवळ नसल्यावर मला तर वेड लागेल कीं काय असें वाटतें. हें त्याचें भाषण ऐकून माझे मनाचा निश्चय झाला आहे, कीं, जावत्काल पावेतों हे आपले वृद्ध आईबाप स्थित आहेत तों पर्यंत त्यांस माझा विरह न होण्या साठीं मीं लग्न करणार नाहीं. पुढें मोठे संस्थानिकाचे घराण्यांतील सुस्वरूप वरांकडून दोन चार मला मागणींही आलीं; तथापि त्यांस वरावें असें मनांत न येऊन सांप्रत कालीं मला लग्न कर्तव्य नाहीं, असें बापास मी सांगितलें; तेव्हां त्याचा निरुपाय होऊन त्यांजकडून आलेल्या कारभाऱ्यांस माघारीं लावणें त्यास भाग पडलें. माझे बापाची इच्छा मी लग्न करावें अशी जरी आहे तरी मजपुढें त्यास अधिक बोलवत नाहीं. पूर्वीपासून त्याची प्रपंचांत नैरास्यता असल्या वरून त्यानें सर्व राज्याचा अधिकार बंधूचे मुलास देऊन तो प्रस्तुत आपले कुटुंबा समवेत बरोबरीनें थोडे ऐश्वर्यानें एके रमणीय पुण्य आरण्यांत वास करीत आहे. मजसाठींच त्यांचे बरोबर ऐश्वर्य असून तीं उभयतां माझीं मातापितरें तापस वेषानें योग्याचे वृत्तींत राहून एकसारखा परमेश्वरध्यानांत आपला काळ घालवीत आहेत. मजसाठीं त्याणीं एक उत्तमनूतन आराम वाटिका तयार करवून त्यांत हा महाल बांधला होता.

आणि तशाच शंभर दासी नित्य माझे सेवेंत ठेविल्या होत्या. कोणतीही त्यां-
चे कृपेनें मला न्यूनता नव्हती; परंतु कालचक्र मोठें विचित्र आहे.
त्याजपुढें कोठें जावें. पहा त्या ठिकाणीं कोणी एक जादुगारानें म-
जवर पापदृष्टि ठेऊन तो पुष्कळ दिवस जपणीस लागला होता.
परंतु त्या पेक्षां माझे बापाचें सामर्थ्य अधिक असल्यानें त्याचा उ-
पाय चालेना; तरी त्याणें माझा नाद सोडला नाहीं. एकदां तो माझा
पिता एकाग्र चित्तानें योगाभ्यासांत निमग्न बसला आहे अशी त्याणें
निवांत संधि पाहून एके दिवशीं मध्यरात्रीचे समयास मला एक
टी महालांत पाहतांच तो हा महाल त्याणें आपले मंत्रसामर्थ्यानें
आकाशमार्गी उडवून या ठिकाणीं मजसहवर्तमान एके घरकेंत
आणून ठेविला आहे. असें हें त्याचें कृत्य माझे बापास पूर्वी स-
मजतें तर माझे रक्षणाची कांहीं तरी त्याणें योजना करून ठेवि
ली असती. मी या ठिकाणीं आज चार महिने त्यांचे विरहाचें व
एकटें राहण्याचें दुःख भोगीत आहें. तथापि परमेश्वरानें मा
झ्या पातिव्रत्यास त्याचे हातून यत्किंचित्ही कलंक लागूं दि
ला नाहीं. त्या जादुगारानें इकडील सर्व दिशा भारून टाकल्या
आहेत, या मुळें माझे बापाचे मी कोठें आहें हें ध्यानीं येत नसेल
यास्तव निरूपाय होऊन मी नाहींशी झाल्यामुळें तो अगदीं मर-
णोन्मुख झाला असेल किंबहुना या पुढें तो थोडके दिवसांचासो-
बती होऊन माझी व त्याची गांठ आतां पडेल असेंही मला वाटत
नाहीं. माझा दर्प असल्यामुळें त्या जादुगारास माझे अंगास यत्
किंचित्ही स्पर्श करवत नाहीं. कसाही पुरुष असला तरी त्याचें
सामर्थ्य स्त्रियां पुढें काय चालणार!! त्या मात्र सत्यमार्गी वर्तन
करणाऱ्या आणि निर्धाराच्या पाहिजेत. अशा कामिक पुरुषास ए
कवार अशा प्रसंगीं झिडकारून टाकलें कीं, पुनः अग्रभागीं ये-
ण्यास त्यास शक्ति उरत नाहीं. उभयतांचेंही मन लालचावलेंअस

लें ह्मणजे मात्र ऐक्यभाव साहजीक होतो, ह्मणूनच असे दोष घड-तात. कीं कितीही व कशांही पुरुषांचीं दुर्मार्गाचीं भाषणें, विनो-दयुक्त हांसणें असलें तरी जी खरोखर आपलें पातिव्रत्य रक्ष णाची निरंतर इच्छा करणारी व जी सत्कुलोद्दीपक मातापितरांचे वद नास सत्कीर्तीनें शोभविणारी आहे तिला तशा लीलेचा उलटा त्रास उत्पन्न होऊन त्या विषयीं ती तिरस्कार करीत असते. पुरुष तरी तों पावेतोंच स्त्रियांचे ध्यानीं असतो. एकवार तिजकडून अ-ब्रूस कलंक लावणारी अशी चांगली वादाण्यांचीं अक्षरें त्यास मि-ळालीं कीं, लागलीच तिजविषयीं नाद सुटून पश्चात्ताप पावतो. सर्व आपलेपाशीं आहे. ज्या कुश्चलमार्गी दुःसहवासानें निरत होऊन वर्तन करणाऱ्या स्त्रिया आहेत, त्यांचा परिणाम स्वतःचां-गला होत नसून त्या आईबापांचे मुखास मात्र कालिमा लावतात.- या पेक्षां जन्मास न येणें हें चांगलें. सुख दुःख प्राप्त होणें हें सर्व आपलें पूर्वार्जित कर्मा प्रमाणें आहे. एकीस सौख्य प्राप्त असू-न एकीस तें नाहीं ह्मणून या अप्राप्य देहास तिणें अन्यांचा स्पर्श होऊं द्यावा काय? विचार विचार तो काय सर्व हाच आहे. जसें नि-रशनाचे दिवशीं पक्वान्नांवर इच्छा गेली तरी निश्चय असल्या मुळें त्याचें सेवन करवतच नाहीं, तसेंच हें आहे. विषयादि क्षणि क सौख्याचे तृप्त्यर्थ केवळ अविचारानें वर्तन करूं नये. ते वेळे-स असेंच मनांत आणलें पाहिजे कीं, कांहीं पूर्वी दुष्कर्म केलें-होतें ह्मणून प्रस्तुत हा विरहजन्य ताप मी भोगीत आहें. आणि आतांही आणखी दुष्कर्म घडलें तर याहीपेक्षां उत्तरोत्तर अधिकच दुः ख भोगावें लागेल ह्मणून कशी तरी ती प्रसंगाची वेळ विचारसौख्या चे आश्रयानें पुण्यमार्गी वर्तन करून काढली पाहिजे. हेंच निदर्शनीं सौख्य देईल अशा विचारानें मी आपली येथें दिवस कंठीत आहें. त्या जारदुगाराचा मला फार ताप आहे; त्याचे मनाप्रमाणें होत नाहीं ह्म-

णून असाच तुझा सर्व तारुण्यकाल दुःखांत घालवीन, असें हा निश्च-
यानें तो ह्मणत आहे. आजपर्यंत आशा नव्हती; परंतु तूं आल्यानें मा-
झे आईबाप पुनश्च मला भेटतील, असें आतां वाटतें. प्रस्तुत तो जादु
गार या स्थळीं नसून अन्य प्रदेशीं कांहीं आपले कामास गेला आहे.
तरी या ठिकाणीं अन्यांचा किंचित्‌ही उपसर्ग न लागण्या साठीं त्याणें आ
पले सामर्थ्यानें बंदोबस्त करून माझे रक्षणार्थ अष्टदिशांस वीरही
ठेविले आहेत. त्यास येथें येण्यास आणखी पंधरा दिवस तरी ला-
गतील. इतक्या अवसरांतच जें काय होणें तें होईल. येथें त्याणें मा
झे रक्षणास जरी गुप्त मांत्रिक वीर ठेविले आहेत तरी ते दयाभूत-
असल्यानें मजविषयीं त्यांचें अंतःकरण फार कळवळतें. व व्योम प-
थ म्हणजे आकाशमार्ग मात्र या वेळेस त्यांचे हातून भागला गेला-
नाहीं. हें एक मी मोठेंच भाग्य समजतें. नाहीं तर कांहींच उपाय चा
लला नसता. आतां तुला पुनः पूर्ववत् पक्षिदेह मी देतें. तो मजसा
ठीं धारण करून मी अशा स्थितींत याठिकाणीं आहें असें माझ्या बा-
पास जाऊन कळीव, ह्मणजे त्यास माझी शुद्धी समजण्याचाच काय
तो अवकाश लागेल. मग क्षणाचीही अवधि न करितां, या महाला-
सहवर्तमान तो आपले मंत्रसामर्थ्यानें मला येथून संनिध नेऊन सु-
खी होईल. आणि तो तुझे उपकार निरंतर विसरणार नाहीं, या वे-
ळेस कोठें तरी तुला स्थलांतर करणें भाग आहेच. एकवार तो जादु
गार येथें आल्यावर तुझा परिणाम वाईट होईल. अनायासें माझें-
कार्य परोपकारार्थ तुझे हातून सिद्ध झाल्यास तुला श्रेय मिळून मी
सांगतें या प्रमाणें केलें असतां तुझे जिवाचेंही रक्षण होईल, तें अ-
सें कीं, ही माझी शुद्धि सांगून तेथून त्याची आज्ञा घेऊन तूं तसाच पू-
र्वदिशेस मणिपूर म्हणून एक राजधानी आहे तेथील राजाची क-
न्या जिचें नांव **चमंतकोकिला** आहे ती या प्रस्तुत तुझे नाशास
प्रवर्तक असलेली जी **हेमा** तिजपेक्षां मंत्रसामर्थ्यानें अधिक अ-

सून नशीच दयाभूत आहे. तेथें जाऊन हरएक प्रयत्नानें तिची प्रीति संपादन करून तिजपाशीं तूं राहण्याचें कर ह्मणजे. त्या सुमेधेनें तुलाजितकें दिवस अन्यप्रदेशीं राहण्यास सांगितलें आहे तितकें दिवस त्या ठिकाणीं निर्धास्तपणें तुझा आनंदांत वेळ जाईल. पुढें त्याच सुमेधेच्या आश्रयानें तुला ती सकुमारी माल्यभारा ही अनायासें प्राप्त होईल. नंतर सर्व जादूचे पेंच मोकळे होऊन त्या शालकासहवर्तमान थोडा इकडील विद्येचाही लाभ होऊन तूं आपले वृद्ध आईबापांस भेटून सुखी होशील; असें त्या हेमकुंतलेनें भाषण ऐकून मला फार आनंद झाला. व तिचे ह्मणण्या प्रमाणें तिला मी रुकार देतांच लागलाच मग अवधी न करितां तिनें आपला बाप जो हिरण्यगर्भ त्याचें राहणें ज्या अरण्यांत होतें त्या ठिकाणचा पत्ता सांगून पक्षिदेह देऊन मला वाटेस लाविलें. पुढें मी पुनश्च आपणावर प्रसंग न येण्यास्तव गुप्तरीत्या त्या स्थलीं शीघ्र गतीनें मार्गांतथोडी विश्रांति घेत चार पांच दिवसांत जाऊन पोंचलों. तों सुमारें प्रहर दिवस आला होता. तें अरण्य मोठें रमणीय असून श्री जान्हवीचे तटाकीं, त्यास त्या हिरण्यगर्भ राजर्षीनें आसमंतात्भागींही फारच शोभा आणली होती. तेथें कित्तेएक नूतन देवालयें सुवर्ण कळसांनीं तेजस्वी दिसत असून ठिकठिकाणीं पुष्पवाटिका, तुळशींचीं बनें, बिल्ववृक्षांचे समुदाय, हवाशीर बागा व आश्रम पाहून माझे चित्तास फारच समाधान वाटलें. मग मी त्याचे मुख्य आश्रमासन्निध जाऊन एका वृक्षावर त्याचे दर्शनाची वाट पाहात बसलों. तितक्यांत तिची ती वृद्ध मातापितरें बाहेर आलीं. त्यांस मीं पाहिलें तों उभयतांही अगदीं दीना सारखीं दिसूं लागलीं. वारंवार त्या कन्येचें त्यांस स्मरण होऊन दुःखाचा सुस्कारा सोडून तो तिचा बाप आपले स्त्रियेस म्हणूं लागला. आतां आपली लाडकी कन्या कशानें भेटणार आहे? पहा, मी तिजसाठीं तिचे इच्छेनुरूप हें रमणीय स्थल

करविलें आहे. आणि सर्वस्वाचा त्याग जरी मी केला आहे तरी तिचा वि
योग मला सहन होत नाहीं, हें तिला पक्कें माहीत असतां मला या वृ-
द्धापकाळीं सोडून तिला जाणें कसें प्रिय वाटलें. तिची कांहीं शुद्धि म-
ला समजत नाहीं. किती दिवस तरी तिचे येण्याची इच्छा धरून राहावें.
आतां तिचा आशा नसल्यामुळें कोणते वेळेस हा प्राण या देहास सां-
डील याचा मला नेम लागत नाहीं, असें ह्मणून क्षणोक्षणीं त्यास व त-
सेंच तिचे मातेस शुद्धि न उरून तिच्या स्मरणानें आक्रोशित होत्साती
विकल होऊन शक्ति नसल्यामुळें वारंवार अंगास कंप सुटून तीं उभय
तां मूर्छित धरणीवर आंग टाकूं लागलीं. त्यांचें तें दुःख पाहून मला-
ही फार गहिंवर येऊं लागलीच तेथून उठून त्यांचे समीप गेलों. आ
णि त्यांस नमनयुक्त लोटांगण घातलें. मला पाहातांच त्यांस चमत्का
र वाटून विचारांत जों आहेत तों मी ह्मणालों, आपलें दुःख दूर करू
न सौख्य देण्या साठीं मी आपणा सन्निध दूतत्व भावानें प्राप्त झा-
लों आहें. आपली प्रिय कन्या आजपर्यंत सुरक्षित असून आपल्या
दर्शनाचें रात्रंदिवस तिला वेड लागलें आहे, तथापि त्या शुद्ध सत्वीच्या
परस्वाधीनपणामुळें यत्किंचितही उपाय राहिला नाहीं, असें माझे-
मुखांतून तिची सद्वार्ता ऐकून ज्या प्रमाणें प्राण परत येतो तद्वत्
त्याची स्थिति होऊन ह्मणूं लागली, अरे बाबा, तूं आज हें शुभवर्त-
मान सांगत आहेस हें आह्मीं स्वप्नांत अथवा जागृदवस्थेंत ऐकत
आहों, याविषयीं आह्मांस स्मरणशक्ति राहिली नाहीं. जर हें जागृ
तपणांत कन्ये विषयीं वर्तमान तूं खरें सांगत असशील तर आज पर-
मेश्वरानें त्या दीन वृद्धांवर कृपा केली हेंच खरें. नाहींपेक्षां ही स-
द्वार्ता आमचे स्वप्नांतही यावयाची नव्हती. आतां कृपा करून ती को
ठें कोणाच्या अटकेंत कशा संबंधानें बद्ध झाली आहे, हें अगोदर-
सांग. मग मी त्या ठिकाणासह वर्तमान निजविषयीं व मजविषयीं स-
र्व प्रकार सांगून जाण्यास आज्ञा मागितली. तेव्हां त्यांनीं तेथें राहण्या

विषयीं मला पुष्कळच आग्रह केला. तरी मी त्यांस ह्मणालों सांप्र-
तकाळीं माझे उभारलेले हेतूनुरूप मला आपले आशीर्वादासह
आज्ञा मिळावी. पुनश्च कांहीं दिवसांनीं आपणास सौख्यांत असले
लें मी पाहण्यास येईन. नंतर त्यांनीं विशेष आग्रह न धरितां आशी
र्वादयुक्त मला संतोषानें जाण्यास आज्ञा देऊन ते ह्मणाले ही शुद्धि सां-
गितलीस या योगानें आतां आजच अस्तमान पर्यंत कन्या आह्मांस भे-
टेल. असो. आतां तूं जाऊन बोलल्या प्रमाणें आपला नियमित काल-
तेथें घालवून जाते वेळीं आह्मांस भेटून जाण्याचें कर. मग मी तसा-
च निघून सांगितलेल्या मार्गानें त्या मणिपूर शहरीं अल्प काळांतच
पोंचून तिसरा प्रहरचे समयास त्या वसंतकोकिळेचे मंदिरा समो-
रील आसमांतील तिचे दृष्टीस येण्या सारखा एके कारंजावर बसलों.
तों ती त्यासमयीं आपले सखीसह वर्तमान बगीच्यांत हवा घेत-
पुष्पवाटिकेंतून फिरत असलेली मी पाहिली. अहाहा! कायतें सौंद-
र्य!! पूर्वींच तुजपाशीं मीं वर्णन केलें आहे. तिचे स्मरणा बरोबर
परमेश्वराचे लीलेचें अगाध सामर्थ्य दृष्टिगोचर होतें. सर्व सौ—
ख्यानें हेंच स्थान आहे असें भासून तिजकडे माझें तनमन वेधून
दर्शनाचा लाभ झाला ह्मणून मला धन्य वाटलें. असो. मग मी आप-
ला मंजूळ शब्द वारंवार करून ती त्या सखीसह त्या आरामांत सह
ल करीत जिकडे जिकडे फिरत होती, तिकडे तिकडे मी तिचे समोर जा
उं लागलों. तेव्हां तिची दृष्टि मजवर पोंचून निरखून पाहूं लागली
व तिणें माझें कृत्रिमी स्वरूपास ओळखलें. आणि मजपुढें येऊन म्ह
णाली तूं ज्या पेक्षां माझ्याच आश्रयाची इच्छा धरून प्राण रक्षणा
र्थ निश्चयानें आला आहेस त्या पेक्षां तुला आश्रय न देणें हें मला
उचित नाहीं. आणि तूंही निर्मल मानसाचा आहेस असें मी जाण-
तें. व माझे प्रियसखीनें तुला मजकडे पाठविलें आहे म्हणून तुझा
मी अव्हेर करीत नाहीं. आतां सर्व तुझी भीति दूर राहिली असें

समज- या प्रमाणें बोलून तिणें आपला हस्त पुढें करून मला त्या-
वर येण्याची संज्ञा केली. मग काय विचारावें? इच्छिलेलेंच कार्य-
झालें ह्मणून तसाच तिचे हस्तावर येऊन लडिवाळपणानें त्याचें
चुंबन केलें. तेव्हां तिलाही परमावधीचा आनंद होऊन तो दिवस
तिणें सुदीन मानला. मग आणखी कांहीं वेळ त्या सखीसह वर्त-
मान त्या आरामांत विहार करून मला घेऊन ती आपले महालांत
आली. अगोदर माझे खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था करून नंतर
कांहीं वेळानें माझे श्रमच परिहार झालेले पाहून मला ह्मणाली
या ठिकाणीं तिळप्रायही संकोचित चित्त न करितां आनंदानें राह
ण्याचें करावें. या प्रमाणें तिचे संगतीचा मला लाभ होऊन बरेच
दिवस तेथें मी आनंदांत काढले. नित्य तिनें माझे खाण्यापिण्याची
तर्तूद उत्तम राखून सदोदित मजसहवर्तमान रसभरित नानाप्रकार-
च्या गोष्टी बोलून माझे चित्ताची प्रसन्नता ठेविली होती. व बागेंत अथ
वा सख्यांचे मंदिरीं मेण्यांत बसून जाणे होई तेव्हां कधीं कधीं मला
ही बरोबर नेत असे. तथापि ती पापभीरु असल्यानें मला तिनें क-
धीं मनुष्यदेह दिला नाहीं. तसेंच पक्षिदेहांत ठेविलें. तुसतें तिच्या
मुखेंदूचें दर्शनाच्या इच्छेनें माझें चित्त चातक होऊन तिचा सहवास
त्यानें फारच सुखकर मानिला होता. एके दिवशीं स्वच्छ चांदणें प-
डलें होतें तेव्हां ती नवोढा, कृशोदरि आपले कुंज आरामांतील मध्य
भागींचे जलभरित हौदासभोंवतीचे वसंत बगीच्यांत एके प्रियस-
खीसह बसली असतां नाना तऱ्हेच्या वनस्पति आणि पुष्पांचा सु-
गंधवायू वहात असून त्याचा सौख्यकारक स्पर्श तिच्या शरीरीं हो-
त असल्यानें चित्तवृत्ति गलबलून जाऊन तिला पतीच्या सौख्यप्राप्ती
ची इच्छा उत्पन्न झाली तों पावेतों एक दिवसही तिनें लौकिकांतही
गोष्ट आणिली नव्हती. तिचें तें आरामस्थल स्वतंत्र असून त्याचें
नांव प्रीतीनें आनंदवन असें तिनें ठेविलें आहे. मला वाटतें प्रत्यक्ष

शचीनें आपलें नंदनवन सोडून त्या सारखें हें दुसरें आपले इच्छेतु रूप विश्रांतीस्तव आनंदवन वसवून तेथें ती राहिली असावी. त्यांत जागोजाग मोठमोठाले जलभरित हौद व कारंजीं आणि विश्रांतीचे हवाशीर मनोरे व देशोदेशींचे दुर्मिळ आणि नामांकित फळांची व नन्हेतन्हेच्या चित्तवेधक अत्युत्तम सौगंधिक पुष्पांचीं असलेलीं झाडें आपल्या फलांच्या व सुगंधांच्या ऐश्वर्यात सदोदित डोलत आहेत व त्याचे सीमेचे सभोंवती चौफेर अशोक, कदंब, फलांनीं घोषयुक्त फणस व आम्रवृक्ष, जंबू, आमलकी, तुती, चंदन, बिल्व, बकुळ, असे नानाविध वृक्ष एकसारखे हारीहारीनें एकमेकांशीं सलग्न स्नेह संपादून ऐक्य भावानें उंच वाढलेले विलसत आहेत, त्यांवरून पक्षिगणांचे समुदाय आनंदांत वास करितात. त्याचे भोंवतीं एकमोठा चिरेबंदी रमणीय खंदक असून त्यांत हरणांचे कळप, वनगायी, रोही, सांबर इत्यादिक पशुसम बुद्धीनें विचरण करीत आहेत. दक्षिणबाजूस एक मोठा शिकारखाना बांधलेला आहे त्यांत सिंह, व्याघ्र, चित्ते, गेंडे, अशीं नाना प्रकारचीं द्वीपांतरींचीं भयंकर आणि हिंसक जनावरें असून त्यांचे खुराक रोजचे रोज चांगले प्रकारें चालत असल्यानें त्या सर्वांचीं शरीरें पोसून तीं मदोन्मत्त झालीं आहेत. तेथें त्यांचे रक्षणार्थ रात्रंदिवस बाहेरील कोटाचे अष्टदिशांचे बुर्जांवर आरबांदिकांचे पहारे सावधपणानें स्थित असून तिचे सेवेंत अल्पवयस्क तरुण आणि सुस्वरूप अशा नित्य तीनशें दासी सादर असतात. त्यांचा इतमाम उत्तम आहे. त्याही कोमलांगी वस्त्राभरण मंडित असल्यानें एके ठिकाणीं कांहीं समारंभास श्रीमान् गृहस्थांच्या कन्याच काय जमल्या आहेत असें भासून कोणी कां असेना तो त्यांचे स्वरूपास तेथें भुलून त्यास वेड लागेल. मग प्रत्यक्ष त्या यजमाननीस अवलोकन केल्यावर कशी स्थिति होईल याचें अनुमान तूंच कर. ती तिचा सोनेरी महाल नगी फारच

अपूर्व. त्यांत कोणतेही विलास पदार्थादि वस्तूंची उणीव नसून सर्व सि द्धता असते. त्यांतील मौक्तिक रत्नादि अमोलिक जवाहीर पहाण्यां त आल्यावर हें कुबेराचेंच मंदिर आहे असें देवादिकांसही ह्मणणें भाग पडेल. अशा प्रकारें तें सर्व संपत्तीनें युक्त आहे. त्याचे दुसरे भ जल्याचे सज्ज्यांत अनेक जातींचे पक्षी एकसारखे हारीनें सोनेरी छता खालचे पानास रुप्याचे आंकड्यास लटकाविलेले पिंजऱ्यांतून असलेले नित्य आपापले स्वरानें प्रभात व सायंकालचे समयांस सुस्व- र रागदारींत तिचे वर्णनाचें गायन करीत असतात. तें चित्तास फा- रच मधुर लागून आनंदांकुर उत्पन्न करितें. तसाच त्या कालीं वृक्षांवरून पिकावली, मयुर, भारद्वाज, सारिका, इत्यादिकांचा श- ब्दध्वनि सुरू असतो. असो. या प्रकारची ऐश्वर्यसंपन्न ती भोग विशाल दक्ष मानवती बसंतकोकिला त्या वेळेस मदविव्हल हो- ऊन तिला कांहीं स्फुरेनासें झालें. तेव्हां आपले सन्निध असले- ल्या प्रियसखीस म्हणाली परमेश्वरानें मला हें अलौकिक सौंद- र्य दिलें आहे, त्यांत सांप्रत माझे अंगीं तारुण्योदय सतेज प्रक- टित झाला असून अद्याप पर्यंत त्याचा भोक्ता कोणीच प्राप्त हो- त नाहीं काय करावें? समजूं लागल्या पासून आजीकडे मी हें मो- ठ्या निग्रहानें विचार करून दिवस काढीत आहें. आतां त्या निग्र- हास दूर करावें असें जरी मनांत येतें तरी या माझ्या स्वरूपैश्वर्या च्या तुलनेस येण्या सारखा तसाच जेव्हां कोणी प्राप्त होईल तेव्हां त्यासहवर्तमान मी विवाहित होईन; या विषयीं सर्वज्ञ प्रभूनें कां- हीं तरी योजना करून ठेविलीच असेल. उगीच मन तशा विषयीं मेलें काळजी वाहतें. आजीकडे रोजचे रोज आई बापांचें म्हणणें हेंच आहे कीं, तुझा विवाह काल प्राप्त झाला आहे आणि मोठ मोठाले थोर थोर घराण्यांतील सुस्वरूप राजपुत्र तुला वरण्या विष यीं प्रयत्न करीत आहेत त्या पेक्षां आमचें म्हणणें मान्य करून इच्छे

नुरूप वर वरून त्यासहवर्तमान तूं आपला तारुण्यकाल प्राप्त हो-
णारें अवर्णनीय सौख्यांत घालीव. असें न करशील तर पुढें पश्चा
त्ताप पावशील. हें सांगत असून किती एक तरुण राजपुत्रांच्या त-
सबिरी दाखविल्या; तथापि त्यांतून एकही माझे हेतनुरूप नस-
ल्यानें कोणाविषयींही माझी प्रीति उत्पन्न होत नाहीं; काय करूं?
मी इच्छित आहें त्या प्रमाणें लक्षणयुक्त पति केव्हां मिळेल असें झा
लें आहे. एकादे समयीं तूं व दुसऱ्या माझ्या मैत्रिणी कांहीं अलंका-
रिक शृंगारयुक्त भाषणांनीं मजपाशीं आपापल्या पतिसौख्याचीथो
रवी वर्णन करीत असतां त्या श्रवणाच्या सहवासानें मनीस विभ्रं-
श होऊन मनोमय व्यथा होऊं लागली आहे तसेंच उपभोगादि साहि
त्यांनीं विराजमान या आनंदवनांतील पुष्पवाटिकेंतून सहल करितां
नां एकांत सुवर्णमंचकीं गात्रांस प्रदीप्त करणारीं नानाप्रकारचीं अ-
त्तरें व परिमळ दर्वळित पुष्पशय्या, अशा सौगंधिक द्रव्य सा त्यानें
शय्यास्थानीं पुष्पबाणाची पीडा होऊन सर्व शरीरीं दाह होत आहे.
एक वस्तु दोन ठिकाणीं करणारे धन्वी म्हणजे योद्धे पुष्कळ आ-
हेत; परंतु सम्यक् दोन वस्तूंचें एकत्र ऐक्य करणारा एकच पुष्प
धन्वी (काम) आहे त्याचा संचार मात्र शरीररूप समरंगणीं झाला
पाहिजे. असें कितीएक विद्वान् म्हणतात, तरी त्या विषयीं मला
अनुभव नसल्या वरून तें खरें आहे अशी माझी खात्री होत नाहीं.
पहा- सांप्रत असा प्रसंग येऊनही अद्याप तो मला आपला परि-
चय दाखवीत नाहींच. वास्तविक आहे, हा त्याचा काय अपराध.
तो पुष्पधन्वा माझे सेवेंत तत्पर असूनही मी त्याचा वारंवार निषे-
ध करीत आल्यें. म्हणून त्यास क्रोध येऊन मला ताप द्यावा असें
त्यानें मनांत आणिलें असावें. तसाच रोहिणीपति जो चंद्र तो आ-
पल्या शीत रश्मींच्या योगानें मला सौख्य देण्याचें सोडून मी या
दिवसांत ऊष्मा फार होतो म्हणून महालाचें झरूकें उघडें ठेऊन

मंचकावर निजल्यें ह्मणजे तो रात्री त्या गवाक्षांतून येऊन माझे विगलित वस्त्र गात्रांचे ठिकाणीं आपले करांचा (किरणांचा) स्पर्श करीत असल्यानें मला सौख्य होणें एकीकडे राहून उलटा ताप मात्र होतो. यांत त्याचा काय हेतु असेल कोण जाणे!! त्याचे स्पर्शा बरोबर सर्व गात्रें रोमांचित होऊन शरीरीं दाह होतो त्यास सीतरश्मी कोण म्हणत असतील ते असोत; परंतु तशा समयीं तो मला उष्णरश्मी भासतो. हें असें करणें त्यास उचित आहे काय? थोरांनीं जरी कांहीं असें अघटित कृत्य केलें तरी त्यास तें उपहासास्पद होत नाहीं. अशा प्रकारें तिचें विरही भाषण ऐकून ती तिची सखी ह्मणाली तुजप्रमाणें इंद्रियदमन करणारी स्त्री एकही माझे पाहण्यांत नाहीं. आपले साम्यतेचा पति करण्याची जी तुझी इच्छा आहे ती तुझे निश्चयामुळें परमेश्वर पूर्ण करील. या तुझ्या लावण्य चंद्रिकेचें तेज हरण करणारा एखादा तरी पुरुषरूप तारा, या पृथ्वीवर विधात्यानें निर्माण केलाच असेल, यांत संशय नाहीं. जर स्त्रीपुरुषांचा जोडा सम्यक् नाहीं तर सर्व प्रपंचांत कधींही त्यांची प्रीति सारखी रहात नाहीं. पहा कितीएक स्वहिताकडे न पाहणारे च सद्धर्मवर्तक आणि नीतिमान् असे जे सूज्ञ आईबाप असतात ते आपले मुलींस बरोबरीचा वर पाहून देतात. केवळ द्रव्यास भुलून दहा वर्षांचे कन्येस पन्नास वर्षांच्या वरांची योजना करीत नाहींत. मग तो तिचे भाग्यानें श्रीमान् अथवा गरीब कसा का असेना, एक उत्तम कुलांतील, विद्या संपन्न आणि हुशार असला ह्मणजे त्यांस पुरे होतें, मी हें तरी पीत पीतच बोलल्यें; परंतु कितीएक त्या वरा पासून आपलें कल्याण होत असेल तर तो साठ वर्षांचा असला तरी त्यास देण्यास ने, निष्ठूर अंतःकरणी, तिळमात्रही शंका आणीत नाहींत असे जे आहेत ते तिचे आईबाप नव्हेत. वैरीच समजले पाहिजेत. दहा वर्षांचे मुली-

स पन्नास वर्षांचा जरी वर ह्मटला तरी ती जों यौवनांत येत आहे तों त्याचें वय निदान पंचावन्न छपन्न वर्षांचें होतें. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां तो लक्षाधीश असला तरी त्या पासून तिला कोणत्याही प्रकारें सौख्य प्राप्त होत असेल असें मला वाटत नाहीं, हें निश्चयानें सांगतों मग साठ वर्षांचे वयातीतास दिल्यावर तिला सौख्य लाभेल याची वार्त्ताही नको. निदान चाळीस वर्षांचे आंतील पुरुषास काहीं तशाच प्रसंगीं ह्मणजे कोणास पुढें वंश नाहीं व वृत्ति अथवा इनाम जाहागिरी असून ती संतती नसल्यानें बुडत आहे किंवा मुलीस शरीरपीडा वगैरे असल्यानें तिला तसा अल्पवयस्क वर मिळत नसेल तर दिली असतां चालेल, तथापि हा गौण पक्षच. कितीएक लोक तर असा कांहीं नडीचा प्रसंग नसतांही केवळ आपणास विशेष सौख्य व्हावें या हेतूस्तव किंवा घरांतील कांहीं चुरशी वरून थोडी द्रव्याची अनुकूलता असली ह्मणजे पूर्वभार्या सुशील असून व संतती असतांही तिचा अव्हेर करून दोन किंवा तीन पर्यंत विवाहित स्त्रिया करितात. मध्यंतरीं लज्जास्पद असा रुईशीं लग्न लावण्याचाही प्रसंग आला तरी तो त्यांस पत्करतो. या मुळें उत्तरोत्तर त्या बिचाऱ्या पहिल्या स्त्रियांचें मातेरें होतें. हें करणें ईश्वरास कसें रुजू होईल? जर ईश्वरानें आपणास द्रव्य साधन दिलें आहे तर त्याचा व्यय असा न करितां सन्मार्गीं करावा. अशास मुली देणाऱ्यांनींतरी विचार केला पाहिजे. व कन्या विक्रयाचें द्रव्य कधींही कोणी घेऊं नये. घेणारांस व तत्संबंधि वाटाघाट करणारे जे असतात त्यांस शास्त्राधारें त्या कर्माचे गोहत्यादि पातकांपेक्षां विशेष पातक भोगावें लागतें. प्रत्यक्ष आपण जन्म दिलेली कन्या असतांही आपली तुमडी भरण्या साठीं तिजविषयीं तिळमात्र कळवळा न येऊन पुढील तिचा होणारा परिणाम माहीत असतांही निर्दयपणानें तिचे कंठास विवाहित दावें लाऊन एकादे वयातित तारुण्यहिंसकाचे

इवाली तिला करून देतात. हर हर!! तशांचें क्षणिक सौभाग्य अ सतांही पराधीनत्वामुळें निरुपाय होऊन त्या अबलांस तशांचा अं गीकार करणें भाग पडतें. असे जे अविचारी आईबाप असतात त्यांस त्या दोषा मुळें मार्जार जन्म प्राप्त होऊन आपलींच मुलें प्रस वतांच भक्षण करावीं लागतात. असेंही खात्रीपूर्वक एका पंडिता चे मुखांतून मीं ऐकिलें आहे. पहा वयातीत पुरुषाचें तारुण्यत्व नाहींसें होऊन दंतपंक्ति विगलित होतात. मुखांतून दुर्गंधियुक्त लाळ वहात असते. पाहण्याची, ऐकण्याची आणि गमनाची शक्ति मंद होते. अशाचे ठिकाणीं त्या अल्प वयस्क बिचाऱ्या तारुण्यवती स्त्रि यांचें कसें प्रेम वाटेल? त्यांनीं समाधान कोणतें ह्मणून मानावें? ल ग्नांतील भोजन प्रसंगीं घांस देणें व विड्या तोडणें त्या सोहळ्या पासून शेवटपर्यंत बरोबरीचा वर नसल्यामुळें त्याजविषयीं ति चे हृदयीं सर्वोपरी तिरस्कार उत्पन्न होतो. पुढें मध्यंतरींही एखा दा भलताच प्रसंग येऊन तारुण्यकालचें अनिर्वाच्य दुःख सहन होत नसते वेळीं त्यांस असें वाटतें कीं, मुळींच आपण जन्मास आ लोंच नसतों अथवा जन्मतःच मरण येतें किंवा निर्दय आई बापांनीं असा पति करून दिला, या पेक्षां एखाद्या विहिरींत लोटून दिलें अ सतें तर त्याचें एकचवेळ दुःख होतें; परंतु असें जन्मभर सोसावें न लागतें. एखादे समयीं विचार करीत असतांही एखादीचे हातून समयानुसार अविचार घडतो. त्या पातकाचे विभागी आई बाप अ थवा अन्य कोणी लग्न लाऊन देणारे आप्त वर्ग आणि जे खोटें बो लून बुद्धिपुरःसर आपला कार्यभाग सिद्ध करून घेणारे मध्यस्था दि असतात त्यांस व्हावें लागतें. मनुष्यानें प्रसंगीं कोणास मदत्त करणें ती निष्प्रांजल बुद्धीनें परोपकारार्थ करावी हें श्रेयस्कर आ हे. द्रव्य मिळविण्यास आणखी मार्ग काय थोडे आहेत? व अशा पातकरूप विवाहांत उत्साह मानून सुहृत्संबंधी आप्तवर्ग इष्टमित्र

मोठ्या डौलानें मिरवून भोजनाची व दक्षिणेची इच्छा करणारे उपाध्यायादि असतात त्यांसही तिच्या विरहजन्य पातकाचा अंश सोसावा लागतो. असाच कृश शरीरी मुलास उफाड्याची मोठी मुलगी देण्याचा प्रचार असलेला निंदास्पद होतो. मुळींच करतांनां कोणतेंही कर्म विचारानें करीत असावें. समजून उमजून कांत्यांवर वस्त्र घातलें तें घड जरी आहे तरी तें फाटल्या वांचून कधींही राहणार नाहीं. मग वाईट झालें ह्मणून जो शोक करावा त्या पेक्षां अगोदरच त्या विषयीं विचार कां करूंनये? या प्रदेशीं असा निंद्य प्रकार कोठें आढळण्यांत येत नाहीं; परंतु दक्षिण हिंदुस्थानांत कोठें कोठें समजूतदार मनुष्यांचे हातूनही घडत असल्याचें माझे ऐकण्यांत आलें आहे, हें फारच आश्चर्यकारक म्हणून मी तुला सांगितलें. जर माझें तिकडे जाणें होईल तर मी या विषयीं कांहीं तरी चांगली त्यांची कानझाडणी करून त्यांस खालीं पाहण्यास लावीन. असो. आज तुझी प्रकृति स्वस्थ नसून मलाही येऊन फार वेळ झाला. आतां मी आपले घरीं जातें. असें विचारून ती तिची कामदा नामक प्रियसखी तेथून घरीं गेल्यावर लागलीच ती प्रमोददायिनी वसंतकोकिला मला घेऊन आपले मंदिरीं आली. तरी कोठेंच विश्रांति न वाटून कांहींच सुचेनासें झालें, असें पाहून मी म्हणालों सांप्रत तुझी स्थिति चमत्कारीक झाली आहे, ह्मणून मला वाईट वाटतें. जर प्रसन्नतेनें आज्ञा देशील तर तुझी जशी इच्छा आहे त्या प्रमाणें अतिसुंदर मोठे घराण्यांतील प्रयत्नानेंही न मिळणारा असा तुला पति मी प्राप्त करून देईन. त्याचा सहवास झाल्यास तुझे दिवस या वयीं अशा विलास स्थळीं फारच आनंदाचे जाऊन तुला त्याचा मग एक घटकाही वियोग दुःसह होईल. या विषयीं तुला सांगावें असें माझे मनांत दोन चार वेळ आलें, तरी आज

जशी सांगण्यास संधि दिसली तशी या मार्गें न आल्यानें बोलवलें नाहीं. कदाचित् हें अमर्याद भाषण माझें वाटत असल्यास क्षमा व्हावी. असें माझे मुखांतील तिचे इच्छेनुरूप निघालेलें भाषण ऐकतांच तिला फार आनंद होऊन मला ह्मणाली, असा योग येईल तर मी मोठी भाग्यशाली आहें असें आतांच समजतें. या साठीं कृपा करून तो कोण कोठील असून त्याचा लाभ मला केव्हां होईल हें अगोदर सांग. तेव्हां मी मनांत आणलेल्या राजपुत्राचें नांव सांगून त्याचें सौंदर्य आणि गुणांची तारीफ करून त्याची हुबेहूब मूर्ति तिचे न्हृदयांत भरवून दिली. तेव्हां पासून तिला त्याजविषयीं वेड लागून केव्हां तो दृष्टीस पडेल असें झालें आहे, आणि त्याजवांचून अन्य वर वरणार नाहीं, असा तिचा कृतनिश्चय होऊन, मी त्या अर्जवानें ह्मणाली, आजपर्यंत कधीं कधीं आपणास साम्यतेचा पति मिळावा असें मनांत मात्र येत असे; परंतु ज्या वेळेस तसा ईश्वर योग आणील तेव्हां हेतु पूर्ण होईल. या समजुतीनें इतकें वाटत नव्हतें. आतां मात्र जी मूर्ति तूं माझे डोळ्यां पुढें उभी केली आहेस तिचें प्रत्यक्ष दर्शन केव्हां होईल हें मला खरें सांग. या पुढें भेट होई पर्यंत माझा एकही दिवस सुखाचा जाणार नाहीं. मी म्हणालों आतां चित्त स्थिर करून स्वस्थ राहावें. जसें मीं तुला सांगितलें त्या प्रमाणें त्याची भेटही करून देईन; परंतु यास कांहीं अवधी लागेल, तों पर्यंत तुला विवेक करणें भाग आहे. ती ह्मणाली अशी जरी या वेळेस माझी स्थिति झाली आहे तरी मी आपले कृतसंकल्पास कधींही बाध आणणार नाहीं. तसा योग येईल तेव्हांच मी त्या सहवर्तमान विवाहित होईन. उगीच भलतीच गोष्ट माझें स्वाधीन असलेलें अंतःकरण कधींही स्वीकारणार नाहीं. तूं मात्र आपलें वचन सत्य राखून माझ्या इच्छेची तृप्ति सत्वर कर. नाहीं तर दगा घडल्यास माझें जीवित्व वांचून व्यर्थ होईल. असें-

मात्र न व्हावें. उद्यांच प्रातःकालीं दहा घटिका दिवस पर्यंत उत्तम असा अमृतसिद्धियोग आहे, आणि अशा त्या सुमुहूर्तांतच्यान्च शुकदेहानें माझ्या कार्यसिद्ध्यर्थ जाण्याचें करून त्या प्रियास हरएक प्रयत्नानीं येथें समागमें घेऊन येण्याचें करावें. ह्मणजे माझा हेतु उत्तम प्रकारें पूर्ण होऊन लागलीच तुझीही सुटका होईल. मग तूं आनंदानें आपले घरीं जाशील असें बोलून आणखी कांहीं तिकडील जादू संबंधीं नडीचीं संस्थानें आहेत तीं टाळून जाण्याच्या मार्गांतील कांहीं खुणा बरोबर रितीनें सांगून तिनें मला निद्रा घेण्या विषयीं सूचविलें. आणि नंतर आपण आपल्या अंतरमहालीं गेली. उजाडतांच तिणें आपल्या दुसऱ्या एका प्रियसखीस एकांतीं बोलावून आपून मी सांगितलेल्या पतीच्या (अमृताराच्या) प्राप्त्यर्थ सर्व मजकूर सांगून मला पाठविण्या विषयीं तिचाही तिणें योग्य अभिप्राय घेतला. मग मी निघण्याचे वेळेस त्या वसंतकोकिले समक्ष ती मला ह्मणाली तूं हें कार्य सिद्ध करून सत्वर यावें. हे उपकार कधींही न विसरतां, ही तुझें कल्याण करील; परंतु कदाचित् तूं आपले देशीं गेल्यावर आईबाप, आप्तवर्ग यांच्या भेटीनें मोहांत पडून तुला इकडची अगदीं विस्मृति होईल, मग हें कार्य तसेंच राहील, ह्मणून कोठें जरी गेलास तरी आपली ओळख आई बाप किंवा आप्तवर्ग यांस देऊं नको. दिल्यास असाच तुझा पक्षिदेह कायम राहील. ही तुला आमची अनेगा आहे, असें शपथपूर्वक सांगितलें त्यावरून ती वसंतकोकिलाही मला म्हणाली या विषयीं तूं वाईट वाटूं देऊं नको. हें आपलें इच्छित कार्य झाल्यावर तुला मी उत्तम असा मनुष्यदेह देऊन सौख्यांत आनंदानें घरीं पाठवीन. ह्मणून इचें वचन वेदतुल्य मानून मजवर दया कर. अशा मधुर भाषणानें तिणें फार बरें आहे असें मजकडून ह्मणवून स्वस्थ झाली

## अंक ६वा.

(आर्यावृत्त)

तो धन्य फिरे ज्याची, सत्कीर्तिनदी असे जिला भरती॥
दुर्घरही कार्य घडे, पत्नें देतेचि सौख्य लाभ रती॥१॥
जें प्राप्त फल तपानें, फल पानें भक्षुनींच जलपानें॥ ॥
लाभे परोपकारें, सेवावें जेवि अब्ज मधुपानें॥२॥-भ्रमर

पहा, कुसुमचापा, वरील अंकांत सांगितल्या प्रमाणें निरुपायास्तव तिची अशा दुर्घर नियमाचीही आज्ञा मला मान्य करणें भाग आलें. "जों जों रावा बोले तों तों पिंजऱ्यांत पडे." हें वचन खरें आहे त्या प्रमाणें च माझी स्थिति होऊन त्या प्रसंगीं जरी दुःख वाटलें तरी त्या मुहूर्त वेळेंत लागलीच तिला विचारून मार्गस्थ झालों. तिजपाशीं त्या महालीं चांगल्या आनंदांत काळ घालवीत असतां हें तिला सांगण्याची मला कशी बुद्धि झाली कोण जाणे. कर्मा प्रमाणें अंतःकरणाची प्रेरणा होत असते. आपल्यास जरी एखादें माहीत असलें तरी तसा अधिकार नसतां कोणी विचारल्या वांचून उगीच प्रौढी मिळविण्या साठीं मध्यंतरीं कोणतेंही भाषण करूं नये. तें मान्यतेचें असलें तरी उलटें उपहासास्पद होऊन प्रसंगोपात त्या पासून विपत्तीही भोगावी लागते. यास प्रमाणभूत अनुमोदनः-"श्लोक- आत्मनोमुखदोषेण बध्यंते शुकसारिकाः॥ बकास्तत्र न बध्यंते मौनं सर्वार्थ साधनं॥१॥" आपल्याच मुखदोषानें ह्मणजे दुसऱ्यास संतोष देणारें भाषण व मधुर स्वरें करून शुक व मैना हे पक्षी बंधन पावतात. बकपक्षी मौनव्रती असतात ते कधींही बंधन न पावतां इच्छेनुरूप स्वातंत्र्यतेचा विहार व मत्स्यादि आहार त्यास प्राप्त होतो. यावरून मौन हेंच अर्थ प्राप्तीचें साधन आहे. असो. याच कारणानें मी आपलें पूर्वींचें नांव गोप्य करून त्या **वसंत कोकिलेनें** ठेविलेलें **मधुनाथ** हें

धारण केलें आहे. आणि प्रत्यक्ष जन्मदात्या आई बापांस दृष्टीनें पाहिलें असून त्यांस ओळख देऊन भेटण्याचें या हतभाग्याचे कपाळीं आलें नाहीं. मी तेथून निघाल्यावर त्या जादुप्रदेश सीमेचें उल्लंघन करून इच्छेनुरूप स्वातंत्र्यतेनें पुण्य नद्यांतून व तीर्थांतीर्थाचे ठिकाणीं स्नानें करीत आणि विश्रांती घेत प्रथम आपले स्वपुरीस आलों. तेथें प्रथमारंभीं आदिदैवत श्रीशिवप्रासाद शिखराचें दर्शन घेतलें. मग लागलीच मातोश्रीचें आणि तीर्थरूपाचें दर्शन केव्हां होईल या उत्कंठेनें आमचे वाड्याचे मागील चौकांत पूज्यमान औदुंबराचे वृक्षा खालीं श्रीमद्दत्तात्रेयाचें स्थान आहे तेथें जाऊन त्या वृक्षास प्रथम वंदन करून त्याचे एका फांदीवर बसलों तों कांहीं वेळानीं ते उपयतां माझे आई बाप स्नानादि विधि आटोपून तेथें भक्तिभूतपणें पूजनास आले. त्यांची वृद्धावस्थेंतील व माझ्या विरहें करून शरीरास क्षीणत्वदशा आलेली तीसह मी त्यांस पाहतांच मला अनावर गहिवर येऊन त्या वेळेस जें दुःख झालें तें काय सांगूं? हर हर!! त्यांची पूजा झाल्यावर श्रीदत्तास प्रार्थना करून आई ह्मणूं लागली, हे सच्चिदानंदा तूं सर्वज्ञ असून आह्मा अनाथांची करुणा तुला कां येत नाहीं? किती दिवस तरी पुत्रभेटीची अपेक्षा करून बसावें? तुझी मर्जी! सर्व तुझ्या इच्छेनुरूप होत आहे. आतां ह्या शरीराचा काय भरवसा, कोणते वेळेस ह्यास प्राण सोडून जावील हें सांगवत नाहीं. तुझे कृपेनें तेवढेंच कायतें पुत्ररत्न असून तेंही त्या अवस्थेंत आह्मांपाशीं नसावें काय? अवयवादि गात्रांची शक्ति कमी होत चालली. मात्र थोडे दिसत असून ऐकूं येत आहे. हें एकदां बंद झालें ह्मणजे सर्व आटोपलें; मग तो जरी आला तरी त्यास व आह्मांस काय सौख्य होणार आहे. आलीकडे त्याची मूर्ति माझे स्वप्नांत रोजचे रोज येत असून तो कांहीं संकटांत असल्याचें दिसतें. कधीं कधीं ह्मणत असतो कीं, आई, तुझी आज्ञा उल्लंघन केल्यांच्या दोषामुळें मी

महद्दुःखांत आहें. तुह्मांस सौख्य देण्याचें माझे कपाळीं आहे, असें मला दिसत नाहीं. परमेश्वरा काय करूं? पुत्रमोहा सारिखा दुसरा कोणताच मोह नाहीं. त्याचें स्मरण झाल्या बरोबर पोटांत भडभडा होऊन अतिशय दुःख होतें. माझ्या सकुमार बाळा, आतां तूं कोठें असशील? कोणीकडे तुला पाहूं? नित्य तुझें खाणें पिणें व प्रकृतीस कोण जपत असेल, तुजवांचून आह्मीं दीनासारखे झालों आहों. तूं आज येशील, उद्या येशील अशा आशेवर इतके दिवस काढले; परंतु दिवसानुदिवस अन्नपाणी तुटत चाललें, यावरून तुझी भेट होईल अशी आह्मांस आशा राहिली नाहीं. अहा हा!! देवा त्याचें तें गोजिरवाणें मुख दृष्टीस व मधुर भाषण कर्णांस आतां कशानें प्राप्त होणार आहे? व्यर्थ आमचें मन वेडें ह्मणून रात्रंदिवस त्याजविषयीं उलाघाल करतें. त्यास तर आम्हां वृद्धांचें स्मरण होत असेल कीं नसेल हें सांगवत नाहीं. त्याचे सहवासावरून व स्वभावा वरून माझे मनाची अशी खात्री आहे कीं, तो आम्हांस विरहांत पाडून उगीच कोठें राहणार नाहीं. खचित् कांहीं तरी त्याजवर प्रसंग येऊन तो निरुपाय झाला असावा. मनोमय दुःखासारखी कोणती ही व्याधि नाहीं. तिणें आमचे शरीरांतील सर्व रक्त आटविलें आहे. त्याचे खुशालीची वार्ता जरी कोणी सांगेल तरी आह्मांस मोठें सुख होणार आहे. परंतु आम्हीं भाग्यहीन असल्यानें असा योग आमचे कपाळीं कोठून येणार? असो. तुजकडे काय बोलूं? पूर्वार्जित कर्माचें हें दुःखरूप फल आह्मीं भोगीत आहों. अशी तिची हृदयास व नेत्रांस पाझर आणणारीं शोकपर भाषणें ऐकून माझें देहभान नाहिसें झालें. व कांहीं केल्यानें डोळ्यांचें पाणी तुटेना तेव्हां मनांत आलें कीं आपण त्यांस भेटून दुःख दूर करावें; परंतु त्या तिच्या आज्ञेचें बंधन तसें करण्यास मला मोकळीक देईना तरी हळूच ह्मणालों तुमचा पुत्र खुशाल असून अल्प काळांत तो तुह्मांस ये-

ऊन भेटेल. आतां त्याजविषयीं तुह्मीं काळजी व दुःख ह्रदयांत वाग वूं नका. त्यास पराधीनत्यामुळें तुह्मांस भेटण्याचा आजपर्यंत-मार्ग नव्हता. सांप्रतकालीं तो जेथें आहे तेथें आनंदांत असून तुम ची भेट केव्हां होईल असें त्यास झालें आहे. तथापि तो या प्रसंगीं निरुपाय होऊन कांहीं महत् कार्यांत गुंतला आहे. यामुळें निदान आणखी एक संवत्सर त्याचा वियोग तुह्मांस सोसावा लागेल. तो पावेतों स्वस्थ चित्त ठेऊन धैर्यानें परमेश्वर चिंतनांत काळ घालवावा तोच आयुष्य वृद्धिंगत करून तुह्मांस सुरक्षित ठेवो. इतकें भाषण त्यांस ऐकण्या सारखें संतोषार्थ स्थिरपणानें बोलून पुढें दुःख होऊन जास्ती बोलवेना. कदाचित् ओळख पडून मोहपाशांत पडण्या चा प्रसंग येईल कीं काय असें वाटून पुढील सौख्यकारक परिणा-मीं विचारानें दृष्टि पोंचवून ते सुखरूप आहेत, हेंच मी आपणास ध-न्य मानिलें. मग कठोर ह्रदय करून तसाच तेथून निघून गेलों. त-थापि त्यांचा मोह सुटेना ह्मणून तेथेंच कांहीं दिवस राहण्याचा नि-श्चय केला. तो तिसरे दिवशीं रस्त्यांत कोणाचा परस्पर संवाद चालू ला असतां त्यांत ते घरची व्यवस्था कारभाऱ्याकडे सोंपवून सर्व आ शा सोडून दोन चार माणसांनिशीं बिल्ववनांत राहण्यास गेल्या चें ऐकलें. तें निवास स्थान तेथून जवळच दहा बारा कोशांवर अरण्यांत असून मला माहित असल्या वरून लागलीच मी त्या स्थ ळीं जाऊन गुप्तपणें पाहिलें. तेथेंही माझें स्मरण झाल्या खेरीज एक घटकाही त्यांस लोटेना. तथापि माझे तुस्ते खुशालीची शुद्धि समजल्याचे योगानें त्यांचे मुखावर थोडी हुशारी दिसूं लागली. तें च समाधान मी मानून पत्करले कार्यास तेथून सात आठ दिवसां नीं मार्गस्थ झालों. पुढें स्वच्छंदानें मार्ग क्रमीत असतां एके दिवशीं दोनप्रहरचे समयास एके गांवा बाहेरील एका शिवालया समोर चे आम्रवृक्षाखाली विश्रांतीस्तव मी बसलों. तो कांहीं चव्वानीं त्या वृ-

क्षारवालीं एक सत्स्वरूप फकीर बसलेला मी पाहिला. त्याचा आणि त्या सहवर्तमान तेथें असलेल्या आणखी एका फकिराचा संवाद चालला होता. त्यांत उभयतांनींही सहज आप आपली पूर्वींची स्थिति एकमेकांस कळविली, ती साग्र चित्तानें तसेंच कांहीं कारण दिसल्यावरून मीं ऐकिली, त्या योगानें मला फार वाईट वाटलें. याचें कारण असें कीं, ज्या फकिरानें या नगरीस आणून मला तुझे स्वाधीन केलें तोच फकीर तेथें होता. मी त्याचें भाषणावरून व आणखी कांहीं दुसरे शरीराचे खुणेवरून त्यास लागलीच ओळखलें. पहा जो मित्र मला पूर्वीं प्रवासांत सोडून गेला तोच तो असून कर्मदशेनें त्याचें सौख्य नाहींसें करून त्यास फकिरी बाणा दिला होता. हेंही मला त्याचे संवादावरून कळून आलें. तो त्या प्रवासी फकिरास असें बोलला कीं, माझ्या स्थितीचा विचार केला असतां सर्वोपरी विपरीत आहे. पहा पूर्वीं माझी स्थिति उत्तम असून मला एक श्रीमान वसतुणी असा मित्र मिळालेला होता त्याचें मजवर इतकें प्रेम असे कीं, मजवांचून त्यास कोठेंच चैन पडू नये. व ज्या ज्या वेळेस मी जी द्रव्याची वस्तु त्यास मागत असें ती त्याणें यत्किंचित्ही प्रतरणा न करितां मला देत असावी. मीच त्या विषयीं कृतघ्न होऊन त्यास प्रवासांत एकटें दुःखांत सोडलें. त्या दोषाचेंच हें प्रस्तुत दुःख भोगीत आहें. तेव्हां पासून एका मागून एक विपत्ति मला प्राप्त होऊन पूर्वींचें सर्व सौख्य मावळलें, ते वेळेस मात्र त्यास सोडण्या विषयीं दुर्बुद्धि उत्पन्न झाली; परंतु पुढें दोन चार दिवस लोटले नाहींत तोंच पश्चात्ताप होऊन त्याच्या प्रीतीचा वियोग मला क्षणभरही सहन होईना. मग मी आपल्या गांवीं येण्याचा निश्चय करून तेथपर्यंत आलों खरा; परंतु असें मनांत आलें कीं, आपण घरीं गेल्यावर आपले बरोबर तो श्रीमान गृहस्थाचा मुलगा असलेला नाहीं असें पाहून त्याचे आई बाप आणि इष्टमित्र, सोयरे आदिकरून भलतीच कल्पना मनांत आणून आपणा-

स दोष लावनील. अशा विचारानें प्रस्तुत तो येई पर्यंत आपण कोठें तरी अन्यस्थलीं दिवस काढावे हेंच योग्य वाटलें. मग तसाच परत फिरून कितीएक दिवस बाहेरच घालविले. पुनः मनांत आल्यावरून हा फकिरी बाणा कोणास आपली ओळख न पटण्या करितां धारण करून आपले शहरीं एके दिवशीं रात्रीचे समयास गेलों, आणि फिरत फिरत घरींही जाऊन गुप्त रितीनें शोध करितां आईबाप व स्वस्त्री आणि एकच मुलगा असलेला हे सर्व सुखरूप असल्याचें समजलें, तरी पूर्वी कांहीं संचित द्रव्य होतें त्याचा व्यय होऊन कोणीच पुढें मज वांचून उत्पादक नसल्यानें ते फार गरीब दशेंत आहेत असें समजलें. मला त्यांची तशी स्थिति पाहून वाईट वाटलें तरी उपयोग काय? त्यास सुखी करण्यास मजपाशींही द्रव्यादि साधन नसल्यानें माझे हातून त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. उलटें मला दुःख होऊन कोणीकडून येथें आला असें झालें तेव्हांपासून तसाच हा वेष मी कायम ठेऊन सरासरी उदर भरून आपली कालक्रमणा करीत आहें. व कधीं कधीं तो आपले शहरीं आला असेल असें वाटून शोधा अंतीं न आल्याचें समजतांच मला दुःख होतें. ईश्वर करो आणि तो माझा प्राणमित्र सत्वर परत घरीं येवो. म्हणजे माझी खात्री आहे कीं, तो अद्रोही आणि परोपकारी असल्यानें मजपासून घडलेला अन्याय सर्व पोटांत घालून मजवर दयाच करील. त्या योगानें पुनः मी आपले कुटुंबांत राहून पूर्ववत् सौख्याधिकारी होईन. असा योग ईश्वर कृपेनें ज्या वेळेस येईल तो सुदीन. पहा, कुसुमचापा, असें त्या माझ्या मित्राचें भाषण ऐकून त्याजविषयीं मला फारच करुणा उत्पन्न झाली. आणि वाटलें कीं, याची विपत्ति दूर करून देववेल तितकें सौख्य द्यावें. याचें अंतःकरण आतां शुद्ध झालें असून केवळ आपले प्राप्तीची इच्छा करीत आहें. कोणी कसाही असो तथापि त्यास विपत्तीकालीं होईल तितकी

मदत करणें हें मनुष्याचें कर्तव्य कर्म आहे. प्रत्यक्ष शत्रु असल्यान री संकटसमयीं त्याचे गुणदोष न पाहतां त्यांतून त्यास मुक्त केल्यास त्याची पूर्वीची अपूज्य बुद्धि असली तरी ती तात्काल नाहींशी होऊन मीच या विषयीं कृतघ्न आहें, असें त्यासच वाटूं लागतें. मग अर्थात वैरभाव नाहींसा होऊन साहजिक सख्य होतें वास्तविक पाहतां कोणाशींही वैरभाव नसावा. एकविचार असणें हें फार चांगलें. या पासून सर्व परस्परांचे हेतु शेवटास जाऊन सौख्यलाभ होतो. धान्य उदक आणि अग्नि यांचें सम्यक् ऐक्य केल्यास अन्न सिद्ध होतें. शाई लेखणी आणि लिहिणार असला ह्मणजे मोठमोठाले दस्तऐवज होऊन त्याचे आधारें जाहागिरी इनामें इत्यादि सत्ता चालू होऊन उपजीवनादि कार्यें होतात. अशीं ऐक्यपणापासून सौख्य होण्याचीं उदाहरणें दृष्टीसमोर पुष्कळ येतात, अन्यां विषयीं काळजी न घेतां आपलेंच हित पाहणारे जे असतात ते हलक्या मनांचे समजले पाहिजेत. उदार पुरुषास सर्व वसुधाच घर भासून त्यांतील मनुष्यें आपलेच कुटुंबांतील आहेत असें भासतें. यामुळें त्याची कोणा विषयींही द्वेषबुद्धि नसत्ये. सारांश ज्या कार्यास ज्याची आवश्यकता होणें अवश्य आहे त्या कार्यास त्याची ऐक्य भावानें योजना झाली असतां हेत्वनुरूप कार्य घडून साहजीक सौख्य मिळतें. नाहीं तर कितीएक जगांत कीर्तिसंपादनार्थ आरंभीं सात्वता व प्रीति दाखवून प्रसंगीं मुळींच तसा संकल्प नसल्यानें त्यास त्या विषयीं कळकळ न वाटून ते त्यांतून आंग काढून घेतात. प्रत्यक्ष तोंडावर विश्वासनीय मधुर भाषण बोलून मागें त्या कार्याची बुद्धिपुरःसर हानी करणारे "एतादृशं मित्रं वर्जयेत्" अशा प्रकारचे मित्र तेही शत्रु समजून त्यांची संगती तात्काळ वर्ज करावी. "विषकुंभ पयोमुखं" ह्मणजे, घटांत सर्व प्राणनाशक विष भरून तोंडी मात्र दुग्ध घालून त्याचें जसें गोपन करणें अथवा अंतर्कोशांत तीक्ष्ण धारांचे खड्ग अस-

तांही त्या वरील आच्छादनास सोनेरी मिना वगैरे चढवून तें शोभवि लें असतें नहूत् असे प्राणी दुरून वंदनास योग्य होतात. हा अप कीर्तिकारक अंगीं डाग न लागावा या साठीं अशी कोणाची विपरीत बुद्धि दुःसंगानें झाली असेल किंवा होऊं लागेल तिचा विचारानें त्याग करून त्यानें सर्वत्र पूज्य बुद्धि ठेविली असतां सत्कीर्तीचा आणि परो पकारार्थ देह झिजविल्याचे पुण्य प्रभावानें प्रपंचांत राहूनही अं- तीं मोक्षसुखाचा लाभ होतो. दुसऱ्यास जें दुःख तें आपणास सम- जून त्याचें निवारण कधीं होईल हा ध्यास लागणें हेंच काय तें आ हे. एकवार ही ज्ञानविशिष्ट अप्राप्य नरतनु प्राप्त झाल्यावर ती व्य- र्थ घालवूं नये. कांहीं तरी अशा पुण्यमार्गानें साधन करून पश्चात् मेल्यानें माहात्म्य आहे तें पावेतों कीर्ति राहील अशा विषयीं नि रंतर झटावें. केवळ गिरिकंदरींच जाऊन बसलें पाहिजे असें नाहीं आणि तसें करणें कलिसंबंधानें या विषयीं जिवाचें सिद्धीसही जाणार नाहीं. ज्या स्थितींत आपण आहों तींतच सन्मार्गीं वर्तन ठे- ऊन निर्द्रोह आणि परोपकार बुद्धीनें प्राप्त असल्यांत समाधान मानू न ईश्वरीं निष्ठा ठेविल्यास दोन्हीही साधल आहेत. हें ऐकल्यानें आ श्चर्य वाटून मध्वनाथास कुसुमचाप ह्मणाला तुह्मी धन्य आहे. इतकें ज्ञान तरी तुला कोठून प्राप्त झालें? त्याजवरून मध्वनाथ ह्मणाला तुला काय वाटत असेल तें असो; परंतु माझे अंगीं धन्य ह्मणविण्या सारखा कांहींच अधिकार नाहीं. हें थोडें बहुत त्या साधु समागमानें प्राप्त झालें आहे. त्याचा अधिकार पाहिल्यावर मग काय तुला वाटेल? साधुसंगती सारखा कोणताच लाभ नाहीं. ती दुर्बु- द्धीचा नाश करून वाणी मध्यें सत्यता आणिते. जगांत सर्वत्र ठि- कांणीं सन्मान देऊन कीर्ति वाढविते. त्रिविध कर्माचा लोप करून पातक निर्धूत करते. सार्वकाल चित्ताची प्रसन्नता ठेऊन शेवटीं जि- वास ब्रह्मरूपत्व प्राप्त करून देते. आहाहा!! काय सांगूं! अशा साधूंचा

प्रसादमात्र झाला पाहिजे. तो योगच येणें कठिण आहे. ज्यावर प्रसाद आहे तोच त्याच्या संगतीचें माहात्म्य जाणून सौख्यानुभव घेत आहे. तों पावेतों आपले जन्म मरणादि कर्मकांड असेंच चालू आहे. आतां मागील गोष्टींकडे थोडें अवधान द्यावें. रूप, गुण, आणि आभरण यांहीं पेक्षां पुरुषास क्षमेचें भूषण फारच शोभविते. एकास उर्मी आल्यावर दुसऱ्यानें त्या समयीं शांतताच धरली पाहिजे. ह्मणजे लागलाच कलह बंद होतो. अतृणस्थलीं (खडकावर) अग्नीची प्रेरणा केली तरी त्याचे दाहक शक्तीचा प्रभाव त्या ठिकाणीं यत्किंचित्‌ही न चालून त्याचें आपोआप शमन होतें; तद्वत्‌ कोणी क्रोधाविष्ट होऊन आपले नाशास प्रवर्तक झाला आणि त्या समयीं आपले हातांत क्षमारूप शस्त्र असल्यास तें लागलीच त्याचे क्रोधाचें दमन करून त्यास शांत करितें. हें उदाहरण सर्वांस अशा प्रसंगीं वारंवार उपयुक्त आहे. एक मधुर भाषण आणि हृदयांत क्षमा असली ह्मणजे सर्व लोक आपणास प्रिय मानितात. असो. असें माझे मनांत आलें. मग कांहीं वेळानीं तो त्याचा प्रवासी सोबती फकीर तेथून गेल्यावर तो एकटाआहे असें पाहून मी त्यास हाक मारून ह्मणालों फकीर बाबा, तुमचा इतिहास ऐकल्यानें मला दुःख होऊन कांहीं तरी तुमचा ताप दूर करावा असें मी वांछित आहें; परंतु तुह्मीं जर मला सदोदित मोकळें राहण्यास परवानगी देऊन इच्छेस येईल त्या वेळेस कोठेंही जाण्यास अटकाव होणार नाहीं, असें वचन देत असाल तर तुमचे संगतीस मी कांहीं दिवस वास करून जाते समयीं तुमचा हेतु पूर्ण करीन. त्यास या माझ्या वचनानें कांहीं तरी आज दैवाची अनुकूलता होऊन सुदीन आला आहे असें वाटलें. मग मजकडे पाहून मला ह्मणाला तुजसारिखा अशा संकटांतमला नानोज्ञ पक्षी मिळाल्यास मी आपलें श्रेष्ठ भाग्य आहे असें मानीन. तुझी गंभीर आणि मधुर वाणी ऐकून मला फार मोह उत्पन्न झाला आहे. तूं आपले इच्छेनुरूप राहून वर्तन करावें. को-

णानीही अटक तुला मजपासून व्हावयाची नाहीं. हेंच माझें वचन सत्य आहे असें जाणून सत्वर येऊन मला सौख्य दे. असें त्याचें अभिवचन हेतूप्रमाणें मिळतांच लागलीच उडून मी त्याचे स्कंधावर आरोहण केलें, तेव्हां पराकाष्ठेचा आनंद होऊन त्याणें मला आपले हातीं घेतलें. पुढें दिवसें दिवस मजवर विशेष प्रेम जडून तो माझें खाणें, पिणें, लालन, पोषण उत्तम प्रकारें करूं लागला. नित्य कांहीं विषयावर उभयतांचा संवाद होत असल्यानें त्याचे व माझेही दिवस आनंदांत जाऊं लागले. मजवांचून दुसरें त्यास कांहींच प्रिय वाटेना. तो आपले पूर्व धर्मा प्रमाणें आचरण शुद्ध वर्तत असल्यानें त्याची संगती मला फार सुखावह झाली होती. मग थोडकेच दिवसांत त्यासह मी राजधानींत येऊन पोंचलों. येथें तुझी भेट होण्याचे पूर्वी मी तुला दोन वेळ पाहिलें. तेव्हां समक्ष भेट होऊन तुझे संगतीचा मला लाभ होण्याचा समय आला नाहीं. योग येणारा असला ह्मणजे सर्व गोष्टी घडून येतात. तुझ्या उत्तम गुणांची तारीफ ऐकून व तुझ्या सात्यानें इच्छिलेला कार्यभाग होईल असें जाणून तुजपाशीं राहण्याची इच्छा उत्पन्न झाली. आणि ज्या दिवशीं तसा योग घडून आला त्या दिवशीं फकीर वेष धारण केलेल्या मित्राचा वियोग सहन करून उभयतांचेही कार्य सिद्ध्यर्थ त्याजपासून अर्जवानें सुटका करून घेऊन तुजपाशीं राहिलों. विचार करून पाहतां प्रेमभाव मोठा विचित्र आहे. त्याजपुढें सर्व तुच्छ असतें. तो इतक्या विपत्तींत असून द्रव्ययोग जरी प्राप्त होत होता तरी त्याजवर त्याची प्रीति न बसून मला द्यावें असें त्यास वाटेना. या वरून प्रीती पेक्षां द्रव्य अधिक आहे असें ह्मणवत नाहीं. हे मित्रा कुसुमचापा या प्रमाणें मी अनुभवलेलें स्वतःचें वर्तमान इत्थंभूत तुला सांगितलें. आतां या विषयीं पूर्ण विचार करून धरलेला नाद सोडून दे. आणि आनंदानें आपलें असलेलें सार्वभौमत्व सौख्यांत राहण्याचें करून मी दूतत्व स्वीकारून आलेल्या कार्यास

कांहीं दिवस जाण्यास मला आज्ञा दे. आतां अस्तमान होण्याचा समय आला आहे असें ह्मणून मध्वनाथानें त्यास उठविलें. मग तयार असलेले रथांत बसून त्यासह शहरा बाहेर हवा घेण्यास कुसुमचाप गेला.

रात्रौ घरीं आल्यावर भोजनोत्तर एकांतीं एकटाच तो राजपुत्र शय्यास्थानीं निजला असतां मयास दुःखाचा व त्या वसंतकोकिलेस मनायोग्य वर नेण्यास आल्याचा मध्वनाथानें सांगितलेला इतिहास फारच अद्भुत वाटून त्या विषयीं आपले मनांत वारंवार विचार करूं लागला. कीं या प्रदेशीं प्रस्तुतकालीं मीच ह्मणावें असें नाहीं; परंतु मजप्रमाणें ऐश्वर्य संपन्न व स्वरूपानें सुंदर मला दुसरा कोणीच दिसत नाहीं, आणि ज्या पेक्षां हा मध्वनाथ इतक्यातांनडीनें आला असून दुसरे कोठें आपलेकार्यासिन जातां येथेंच मोर्चा देऊन आनंदानें राहिला आहे, त्या पेक्षां त्या भामिनी पाशीं माझेंच वर्णन करून मला नेण्यास खचित आला असावा. आतां हें जरी हा उघड करीत नाहीं तरी याचेच सहवासानें आणि माझे बुध्धीचे सात्यानें माझा असाच तर्क चालतो. हें खात्रिपूर्वक मनांत आल्यावर तिजविषयीं त्याची अधिकच प्रीति वाढली, आणि तिकडील जादू संबंधीं प्रसंगोपात अटकेचेंही दुःख सोसावें लागेल. याचें तिच्या प्राप्त्यर्थहेतू पुढें कांहींच न वाटून ह्मणाला कीं. आज निश्चय करतों हा सहस्त्र हिशानीं खरा होईल. कदाचित न झाल्यास तिची तुस्ती दृष्टिभेट तरी मी घेईन. नाहीं पेक्षां माझें जीवित व्यर्थ आहे असें मी मानीन. या पायीं जें होणार असेल तें होवो. उद्योग, साहसकर्म, धैर्य, बुद्धि, शक्ति, आणि पराक्रम हे सहा गुण ज्या पुरुषाचे अंगीं जागृत आहेत त्याणें कोणतेंही कार्य हातीं धरलें कीं, त्या ठिकाणीं परमेश्वराची अनुकूलता होऊन तें सिद्धि पावतें. असें सत्पुरुषाचें वाक्य असलेलें कधींही असत्य

होणार नाहीं. प्रथम, मनुष्यानें एखादे कार्या विषयीं आपले बुद्धिवादानें विचार करून त्याची तुलना झाली तर त्या कामीं धैर्यानें उद्योग केला असतां तो सफल होईल. मुख्य जन्मास येऊन एक परमेश्वराची प्रार्थना करून घ्यावी. ती नच होईल तर अथा एखाद्या अमाप्य अपूर्व वस्तूंचा तरी लाभ मिळवावा. कोणतें तरी एखादें असें सत्कीर्तिदायक कृत्य करावें. इत्यादि अनेक वाक्यांची आपल्या हेतूससा त्यता मिळतांच तिजविषयीं निजध्यास लागून नेत्रांस तटस्थताआल्यानें त्यास सर्व रात्र निद्रा आली नाहीं. उजाडतांच शौचादि विधि आटोपून **मध्वनाथास** हातावर घेऊन त्यास आर्जवयुक्त भाषणानें ह्मणाला तूं जो इतिहास मला सांगितलास त्या पासून बरेंच ज्ञान होऊन बहुतेक प्रकार मला कळून आला आहे. आतां मजविषयीं अंतर्यामीं कांहीं गूढ हेतूची प्रतरणा असेल ती सोडून दे. आणि निष्कपटपणानें मी विचारतों हें मला सांग. तूं त्या राजकन्येस कोणते वराची योजना करून आला आहेस. हें जरी तूं गोप्य ठेविलें आहेस तरी मी समजलों. तें आपले मुखानें मलाही सांगण्यास तुजसारिखाच संकोच होतो. असें त्याचें भाषण ऐकून **मध्वनाथास** त्याच्यानिष्कपट स्नेहभावा मुळें धीर न धरवून ह्मणाला तूं आतां यत्किंचित् ही खिन्न न व्हावें. परमेश्वर तुझा इच्छित हेतु शेवटास नेवो. मी आतां सांगतों त्या **वसंतकोकिलेस** तुझ्याच स्वरूप गुणाचें वर्णन करून नांवही सांगितलें आहे. परंतु येथें आल्यावर तुजकडे पाहून माझे अंतःकरणीं तुला न्यावें असें येत नाहीं याचें कारण तिणें जरी सांगितलें आहे तरी त्या प्रदेशीं एकापेक्षां एक बलिष्ठ मांत्रिक असून त्यांस गुप्त बिरांचे साह्यानें कोठें काय होतें हें लागलीच समजतें, व त्याचा शोधही नेहेमी असतो या मुळें तेथ पर्यंत जातांनांच हीं मलतेंच तुजवर संकट येईल कीं काय या विषयीं मला काळजी उत्पन्न जाहली आहे. माझें कांहीं जरी झालें तरी आतां मीं कांहींच ग-

णित नाहीं. व तुझा माझा बराच निकट संबंध असल्यानें तुझें येथी ल सर्व सौख्य माझ्यानें अंतरवत नाहीं. ह्मणूनच तुला मी त्या प्रदेशाची अगोदर दुःखदायक हकीकत सांगून तुझें मन तिकडे न लाग वें अशी योजना करीत आहें; परंतु तिजविषयीं नाद सुटून उलटी तुझी प्रीति वृद्धिंगत झाली यास काय करावें? राजपुत्र ह्मणाला जर तूं मला तिचे प्राप्तीची सात्वना देत नसशील तर माझ्या स्त्रियेचे सौभाग्य विच्छिन्नतेचा व तसाच आई बापांस मजविषयीं जें दुःख होईल त्याचा उत्पादकपणा तुजकडे येईल हें निश्चयानें समजून काय करणें तें कर. हें माझें तुला शेवटचें सांगणें आहे अशा त्याच्या निकराच्या भाषणानें त्यास मध्वनाथ ह्मणाला मी केवळ तुझे मर्जी वेगळा जाईन असें नाहीं. बरें तर आतां तिकडे येण्याची कधीं तयारी करितोस? कुसुमचाप ह्मणाला हें तुझे मुखांतील भाषण ऐकण्याचीच काय ती अवधि होती. आतां याच वेळेपासून तूं ह्मणशील त्या वेळेस माझी तयारी आहे. आज सर्व इकडील व्यवस्था करून उद्यांच निघावें असें मला वाटतें. फार बरें आहे असें पक्ष्यानेंही म्हटल्यावर कुसुमचापाचा आनंद गगनांत न माऊन तो निघण्याचे तयारीस लागला. त्याच रात्रीं आपले बरोबर नेण्याचे वस्त्रालंकारादि सामान आणि खास पागेंतील एक वेगवान् उत्तम शिकारी घोडाही तयार ठेविला. व त्या बिकट प्रदेशांत जाणें आहे या साठीं दुसरें कोणींच बरोबर नको. केवळ गरीबीनेंच गेलें पाहिजे, असें त्या मध्वनाथानें सुचविल्या वरून जरी पूर्वी कांहीं रक्षण व व्यवस्थे साठीं चार पांच मनुष्यें व त्या वसुमती मित्रास बरोबर न्यावें असा कुसुमचापाचा विचार होता तरी तो रहित केला. आणि प्रत्येक दिवशीं समयास सादर असणारा असा गर्गाचार्य मुनींचा मुहूर्त व सव्य होरा अनकूळ पाहिला. आणि " प्रयाणे गरुडारूढं, पारिजातं हरं हरिम्; सत्ययासहितं देवं चिंतयेत्कार्य

सिध्ययेत् "॥१॥" हा पुण्यश्लोकाचे मुखांतील कार्यसिद्धिप्रद वरदी श्लोक ह्मटला. मग रात्रींच लिहून बंद करून ठेवलेला एक लखोटा आपले खासगी विश्वासुक, वृद्ध जमादारा पाशीं देऊन यौवराज्याधिपति जो स्वकीय बंधु भुवनसुंदर त्यास तो एकांतीं देण्यास व मला कांहीं निकडीचे कामास कांहीं दिवस जाऊन यावयाचें आहे, तिकडून येई पर्यंत तूं येथेंच राहून येथील सर्व बंदोबस्तादि व्यवस्था पहावी. आणि कांहीं येण्यास अवधि लागल्यास माझे प्रियमालतीसवरचेवर धीर देत जाऊन तिचे चित्ताची स्वस्थता राखावी. मी येथें सिद्धकार्य होऊन आल्यावर तुह्मांस उत्तम प्रकारचें इनामादि देणें देऊन सुखी करीन. व हें वर्तमान गुप्त ठेवावें इतकें त्यास सांगितलें आणि ते वेळेस त्यास कांहीं रोख द्रव्य देऊन आपले महालाच्या व आंतील जवाहिर वगैरे सामानाच्या मोहरबंद पेट्यांच्या किल्यांचेंही सर्व झुडगें त्याचे स्वाधीन करून ठेविले. नंतर त्या मध्वनाथ पक्ष्यास हातावर मोकळें घेतलें. आणि सरंजामानिशीं त्या सिद्ध असलेले घोड्यावर बसून मोठ्या जलदीनें प्रयाण करून दोन घटिका दिवस आला नाहीं तोंच सुमारें १० कोश आडमार्गानें निघून गेला. पुढें आनंदानें दरकुच दरमुकाम करीत मार्गक्रमीत जातांना मध्वनाथानें एके दिवशीं त्या मणिपूर शहरीं जाण्याचा मार्ग व त्यांतील जागोजागचीं स्थलें व खुणांचे माहितीनें ठिकाण त्याचे हृदयांत भरवून दिलें. अशा प्रकारें तो मार्ग क्रमीत असतां एके दिवशीं दीड प्रहर दिवस आला होता त्या समयास मागं दोन तीन दिवस बिकट अरण्यांतून चालतांना अन्न न मिळाल्या कारणानें पोटांत क्षुधा लागून ग्लानी आली आणि उदराची तृप्ति केव्हां होईल या विचारांत आहे इतक्यांत त्या मार्गावरून समोर जात असलेला एक मांसाळलेला मृग अकस्मात दृष्टीस पडला. ज्याच्या सर्व शरीराची सतेज त्वचा असून तो फारच देखणा आणि अत्यंत चपल असा पाहून

कुसुमचापास मोठें आश्चर्य वाटलें. व ही ईश्वरानें अशा काळीं आपणास क्षुधेचें शांत्यर्थ शिकार पाठविली ह्मणून आनंद वाटून तो आपला चपल घोडा त्यास धरण्या साठीं त्याचे मागें भरधांव फेंकला. आणि त्यांतच तीर लाऊन कमठा हातांत सज्ज केला; हें पाहण्या बरोबर पक्षी चपापून त्यास ह्मणाला आतां सावध राहा. या तुझ्या उभारणी वरून आज कांहींतरी निःसंशय मला दुश्चिन्ह दिसतें. येथूनच मी सांगितलेल्या जादुसीमेचा कांहींतरी भाग लागला असावा, असें मला दिसतें. तरी कुसुमचाप क्षुधाक्रांत झाला असल्यानें या भाषणावर ते वेळेस त्याचें दुर्लक्ष्य होऊन केव्हां ही शिकार साधीन असें त्यास झालें. तो मृग त्या जादुसीमेचा रक्षक असून एखादा असा कोणी तरुण आणि सुंदर पुरुष तेथें आल्यास त्यास भुलवून त्यास सीमेचे आंत नेण्याचें त्याजकडे काम होतें त्यानें आपलें कपट कृत्य त्यास कळूं न देतां त्याचे भरधांव घोड्याचे पुढें अतिचपलतेनें भ्रमण करून हुलकावण्या देत इकडून तिकडे अष्ट दिशांस धांऊं लागला. क्षणामध्यें हातीं लागण्या सारखा अगदीं जवळ आहे असें त्यास भासवून एकदम तेथें नाहींसा होऊन त्यानें एक गोळीचे टप्यावर पुढें त्याचे दृष्टीस पडावें. शिकारीचे कामांत तो कुसुमचाप फारच तरबेद होता, ह्मणून त्यास वारंवार तो हातीं लागत नसल्यानें खिन्नता पावे. त्यापों त्यास धरण्या विषयीं होती तितकी पराकाष्ठेची आपली करामत लढविली. शेवटीं त्यास दिशाभूल पडून मी कोठें आहें हेंच समजेना. तरी कांहीं शुद्धी धरून मागें पुढें पाहूं लागला. तों हरिण नाहींसा होऊन पक्षीही दिसेना. तो कोठें मागें राहिला या विषयीं त्यास मुळींच शुद्धि राहिली नाहीं. तेव्हां त्यास कांहीं न सुचून तो अगदीं घाबरून गेला. त्या वेळच्या त्याच्या स्थितीचें अनुमान रसिक वाचकांनींच करावें. मृगासाठीं पक्षी नाहिसा झाला. दिशा भूल होऊन

पूर्वीचा मार्ग सुटला. जिच्या प्रीत्यर्थ घर दारादि राजोपभोग सौख्यास तुच्छ मानिलें तिच्या प्राप्तीची केवळ आशा विच्छिन्न दिसूं लागली. मग काय विचारावें? तिचे अगदीं वेड लागून नाना प्रकारचे विचार एकामागून एक पोटांत येऊं लागले. प्रवास दुःखाचा कधींच परिचय नसल्यानें ते भीतीप्रद अतिश्रम वाटून त्यास वरचेवर रडूं येत असे; तें कांहीं केल्यानें आवरेना तरी करितो काय? वेळ आली खरी. मुख्य मध्वनाथ अंतरल्यानें सर्व प्रकारें हिंमत खचून क्षुधेनेंही व्याकुलता आणली. तरी तसाच घोड्यावर बसून त्या अरण्यांत त्याचे शोधार्थ फिरतानां ह्मणूं लागला. हे मानसप्रिया मध्वनाथा, तूं कोठें आहेस? तुजवांचून मी एकटा दुःखांत पडून दीन झालों आहें. तुझे जिवावर जी माझी उभारणी होती तिजवर भारणी पडून ती निष्कारणी झाली. असें जर कपट करावयाचें होतें तर पूर्वींच माझें मन फिरवून मला इकडे आणावयाचें नव्हतें. सर्वस्व अंतरल्याचेंही. मला कांहींच वाटत नाहीं; परंतु तुझा विभक्तपणा झाल्यानें मात्र माझी स्थिति विपरीत झाली आहे. आतां ती चंद्रिका या हतभाग्य चकोराचे दृष्टीसही पडण्याचा संभव दिसत नाहीं. सर्व विचार मनांतले मनांतच राहिले. तूं तर मला निःसंशय सोडून राहणार नाहींस हें खचित. तुजकडे काय बोल? मींच तुझें न ऐकून कपटमृगाचे पाठीस लागलों यामुळें मजवर असा प्रसंग गुदरला कदाचित् तूं पूर्वी सांगितल्या प्रमाणें ज्या जादुप्रदेशसंस्थान सीमेंत प्रवेश होण्यास मनाई आहे. तोच हा वर्ज्य प्रदेश नसेल कशावरून असेंच असल्यास तुझा निरूपाय होऊन माझा वियोग तुला सोसणें भाग आलें असेल. मृगाचे पाठीस मी लागतानां तूं जें भाषण बोललास तें यावेळेस मला स्मरतें. त्या विषयीं सर्व विचार मजकरवीं क्षुधेनें गुंडाळून ठेवविले. शिव शिव!! ज्यास वेळचे वेळीं खाण्यापिण्यास मिळतें त्याचे समजुतीस क्षुधेचा अनुभव कोठून येणार?

परंतु कित्येकांस तर गरीबी मुळें नित्य वेळो वेळीं अन्न न मिळून दोन दोन दिवस उपासही काढावे लागतात. त्यांचा आत्मा किती तळमळत असेल! त्याचा अनुभव मी स्वतःच घेत आहें. जरी घरीं सुग्रास खाणें मिळत असे तरी या वेळेस मला शिळें अथवा साजूक साधारण अन्न मिळेल तर तेंच पंचपक्वान्नां पेक्षांहीअधिक रूचकर मी मानीन. किती एक लोक क्षुधातुर असतां उपाय नसल्यानें अरण्यांतील फळमूळांवर निर्वाह करितात. क्षुधे सारखें कोणतेंच दुःख अथवा कोणताही रोग विशेष नाहीं. ती प्रथम मुखावरील तेज हरण करून कृशता आणिते. कामादि विषयांकुरांचें व गर्वाचें छेदन करून तपाचा क्षय व धर्माचें निर्मूल करिते. आप्त, मित्र, बंधु, स्त्री, आई, बाप यांच्याही प्रेमबंधनांत अंतर करिते. सारांश तिच्या तडाख्यांत जावत्काल पर्यंत सांपडलें नाहीं तावत्काल पर्यंत सर्व यथास्थित असतें. एकवार तिनें आपला अम्मल बसविला कीं, कांहींच न रूचून बाग बगीचे, हवाशीर मंदिरें, सहल करणें, विश्रांतिकारक निद्रा इत्यादि ऐष आरामाचे प्रकार हीं पळभरही सौख्य देत नाहींत. असा कारण परत्वें एखादे वेळेस तरी क्षुधेचा प्रसंग सर्वांस येतो. तोच अनुभव मनांत आणून सर्व दानांत श्रेष्ठ असें जें अन्नदान तें सर्व क्षुधार्त जनांचे मुखीं समर्पण करीत जावें. यांत कृतिभेद मुळींच धरिला नाहीं. जसा आपला आत्मा क्षुधाकाळीं व्याकुळता पावतो तसाच दुसऱ्याचा प्रकार समजून त्यास तृप्त करण्या विषयीं मनोभावें करून साह्य करणें हेंच श्रेयस्कर आहे. केवळ लौकिकार्थ भरीवर भर म्हणजे वेळेस आलेल्या क्षुधातुर याचकांस बसलेल्या पात्रा वरून उठवून त्या ठिकाणीं ज्यास मुळींच अपेक्षा नाहीं, अशास बळेंच अर्जवानें निमंत्रण करून गौरवानें बसविणें; हा प्रकार उलटा अधर्म कारक असून आयुष्य व संप-

त्यादि वैभव सुखाचें त्यास कारणभूत आहे. जसा आपला प्री-
तीचा पाहुणा, जामात अथवा बंधु, श्यालक इत्यादि घरीं आल्या
वर त्याचे ठिकाणीं आपली जशी आदरातिथ्याची प्रीति राहते,
तशीच सभयास आलेल्या याचकाचे ठिकाणीं पूज्यबुद्धि व प्रे
माचा उत्कर्ष असावा; यांतच परमेश्वर राजी होऊन संतोष पाव
तो. असो. जर आज मी क्षुधेनें पीडित झालों नसतों तर हे पक्षिग
णा मध्वनाथा, तुझा वियोग मला कधींही झाला नसता. आतां
तूं मला भेटून पुनश्च मी सौख्य पाहीन असें वाटत नाहीं. सख्या
मध्वनाथा, असेंच जर कपट करावयाचें होतें तर मुळींच माझेंम
न फिरवून मला इकडे आणावयाचें नव्हतें. सर्वस्व अंतरल्याचें
ही मला कांहींच दुःख वाटत नाहीं; परंतु तुझा वियोग झाल्यानें
मात्र माझी स्थिति विपरीत झाली आहे. तुला तरी काय दोष-
द्यावा! सर्व कर्मानुसार होणें चुकत नाहीं. इतकें मनांत बोलून
पुनः धैर्य धेऊन ह्मणाला, आतां ज्या संकल्पानें मीं घरींहून प्रया
ण केलें आहे तोच संकल्प सिद्धीस पाववीन. या कामीं एक ज-
गदीश्वराची मात्र अनुकूलता असावी. कृतसंकल्पानें जें एक-
वार बाहेर पाऊल टाकलें आहे त्या कार्याचा कांहींतरी शेवट ला
गल्या वांचून परत व्हावयाचें नाहीं. असा त्याचे मनाचा पूर्णनि
श्चय होऊन तसाच त्या अरण्यभागीं फिरत असतां माध्यान्हीं
सूर्य येऊन त्याच्या किरणांच्या प्रखर तापा मुळें सर्व शरीरीं दा-
ह होऊं लागला; कोठेंच विश्रांतीस छाया व पान करण्यास उ
दक दृष्टीस पडेना; अरण्यांतील पक्षिगणांचे समुदाय व तृषि
त श्वापदें हीं झुडुपांचे छायेचा अथवा जाळीचा जसा ज्यास
आश्रय मिळेल तेथें आपापलीं तोंडें आच्छादित करून बस
लेलीं दृष्टिगोचर होऊं लागलीं. डोंगर, दगड, माति तप्त होऊन
त्यांतून उष्णवाफा व झळया उत्पन्न होऊं लागल्या; मार्गांत को-

ठें कोठें असलेल्या विहिरी, तळीं व ओढे चालतानां आढळू
न त्यांत कांहीं हिरवें शेवाळ अथवा उदकाची आर्द्रता दिसूं
लागल्या मुळें सन्निध जाऊन पाहतां त्यांतील मत्स्यादि किती
एक जलचरें तीरावर पडलेलीं व कित्येक प्राणरहित झाले-
लीं दृष्टीस पडत. मृगजळसरोवरावरील जलतरंगाच्या ला
टा सर्व अरण्यांत दृष्टीपुढें खेळूं लागल्या मुळें ठिकठिकाणीं
उदकाचा भास होऊन तेथें गेलें असतां निराशा व्हावें लागे. अ-
शा दुर्धर प्रसंगांत तो राजपुत्र **कुसुमचाप** सांपडून त्यास
अत्यंत तृषा लागल्या मुळें आतां प्राण वांचणें कठिण असें
त्यास वाटूं लागलें. घोडाही अगदीं थकून तो एक एक पाऊल
मोठ्या प्रयासानें टाकूं लागला. तेथें आसपास उदक अथवा
त्याचा सुगावाही दिसेना, तरी धैर्य धरून तसाच कांहीं वेळ
पर्यंत आडमार्गानें जात असतां दूर अंतरावरून समोरून शी
तळ वाऱ्याची झुळुक आल्या मुळें त्यास थोडें समाधान वा-
टून जाऊं लागला. तों पुढें एक जवळच एका डोंगराच्या पा
यथ्याशीं लवणांत असलेला एक प्रचंड पालवलेला वटवृक्ष दृ
ष्टीस पडला. मग **कुसुमचाप** मोठा हर्ष पावून त्या ठिका
णीं बहुत करून उदकही असावें असा तर्क करीत घोड्याच्या
छंदानें हळुहळू तेथपर्यंत मोठ्या श्रमानें जाऊन पोंहोंचला. ते
व्हां मात्र अतिशय थकून खालीं उतरून बसतांच त्याला मू-
र्छा आली. केव्हां उदक मिळेल असें होऊन प्राण कंठीं आले
तरी त्याचा शोध करण्यास त्यास उठवेना. तोंडास कोरड प
डून मस्तक फिरून गेलें. तशीच त्या घोड्याचीही स्थिति-
होऊन त्यानें एकदम अंग धरणीवर टाकिलें. आणि त्याचे
तोंडांतून फेंस येऊन डोळ्यांतून रक्तबिंदू गळूं लागले. नंतर
कांहीं वेळानें त्या वटवृक्षाची शीतळ छाया अंगास स्पर्शित

झाल्यानें शरीरांतील उष्णता थोडी कमी होऊन कुसुमचाप किंचित् सावध होऊन पाहतो तों घोड्याची चमत्कारिक स्थिति होऊन तो धापा देत धरणीवर असावध पडला आहे. असें दृष्टीस पडलें तरी उठून त्याजपाशीं जाण्यास शक्ति न उरून जीवए कवटूं लागला. त्या समयीं तर त्यास खचित वाटलें कीं, आपलें व आपला हा जो साथी घोडा याचें याच ठिकाणीं देहावसान होणार. तसाच प्रसंग आल्यास मी राजपुत्र असतांही अशा समयीं मजजवळ कोणीच नाहीं! परमेश्वरा, हें ठीक केलें नाहींस. मी खरोखर कोणाचा घातपात केला नसून मजवर अशी वेळ गुदरावी काय? आहाहा!! बा,सख्या,मधुनाथा,या वेळेस तूं कोठें आहेस? तुझा हा प्राणमित्र तुझ्या भेटी वांचून व ज्या प्राणप्रियेचा चित्तीं ध्यास लागला आहे तिचे मासी वांचून,उत्तम कुळांत जन्मला असूनही सर्व निरर्थक होत्सातां देहास सोडणार- हरहर!! याची शुद्धी तुला आणि त्या प्राणप्रियेस तशींच जन्मदाते आई,बाप,बंधु,स्त्री आणि इष्ट,मित्र यांस कोण सांगणार!! कशानें समजतें! काय उमेद होती आणि काय होत आहे! शिव शिव!! या देहाकडून कोणतेंच सत्कीर्तिकारक कृत्य घडलें नाहीं. मनांत होतें कीं, त्या अप्राप्य वसंतकोकिळेची प्राप्ती करून आनंदानें घरीं येऊन राजभोग सौख्याचा इच्छेनुरूप अनुभव घ्यावा. ती सर्वोपरी आशा आज नाहींशी झाली. अंतीं कोणी कोणाचें नाहीं. ज्याचा तोच आहे. कुटुंबांतील अत्यंत प्रिय शेंकडों मनुष्यें असतांही ज्या ठिकाणीं ज्याचें निधन व्हावयाचें असतें, त्या ठिकाणीं त्यास आपोआप नियमा प्रमाणें ब्रह्मसूत्र ओढून नेतें यांत संशय नाहीं. म्हटलें आहे. श्लोक.

विवाहमर्थ मन्नंच, जन्म मरणयोस्तथा॥

कंठे बध्वा इदं सूत्रं, यत्रस्थं तत्र नीयते १

असें असतांही सर्व माझें माझें ह्मणून मायापाशांत बद्ध हो-त्याते प्रसंगीं दुःख पावतात. श्री मार्कंडेया सारख्यांनीं आप-लें आयुष्य चवदा कल्प वर्षे खात्रीचें असतांही सर्व क्षणिक जा णून राहण्यास पुरतें घर ही बांधलें नाहीं. शीतोष्ण निवारणार्थ मस्तकावर तृणाची एक पेंढी मात्र धारण केली. हें उदाहरण सर्व प्रसिद्ध असून दृष्टांतासही घेतात. तरी केवढा मीपणा व खटाटो प या अज्ञानी जिवास आहे. या कलियुगांत जी शतवर्षाची आयु ष्यमर्यादा केली आहे तिजमध्यें रोगादिकांचे या देहावर वारंवार प्रहार होत असतात. देहघटांतील आयुष्यरूप उदक हें दिनर-जनीं बिंदुरूपें करून एकसारखें परिस्रवत असल्यानें तें संपून केव्हां हा घट रिकामा पडेल ह्मणजे कोणत्ये वेळेस या जिवावर काळाची धाड पडून नाश होईल याचा नियम नाहीं. या साठीं जावत्काल पर्यंत इंद्रियांच्या शक्ति कायम आहेत तावत्कालप र्यंत होईल तितकें मनुष्यानें आत्महित ह्मणजे जन्मासआ ल्याची सार्थकता करण्यास झटावें. असें असून माझ्या हातून आई बापांची सेवा अथवा परमार्थ साधनोपाय हें कांहींच घड-लें नाहीं. केवळ ऐहिक सुखसंबंधानें आशा बद्ध होत्साता मी या दुरावस्थेंत पडलों आहें. तथापि अद्याप पर्यंतही उत्पन्न झालेली वांछा सोडण्या विषयीं माझें मन मला रुकार देत नाहीं. हा सर्वश्रेष्ठ जो मनुष्य जन्म तो मी विषयादि सौख्य वांछेंतव्य-र्थ घालविला. ज्या प्रमाणें अज्ञान समजुतीनें चिंतामणि रत्न कों-डीच्या मोलानें विकावें तद्वत् माझी स्थिति झाली आहे. असो. आ तां उपाय काय! अशा दुःखार्णवांत तो राजपुत्र बुडून गेला आ-हे, इतक्यांत तो ज्या ठिकाणीं तळमळत पडला होता त्या वट वृक्षाच्या पृष्ठभागीं थोड्या अंतरावर असलेल्या दरी मधील-

गुहेंतून वस्त्राभरणमंडित सौभाग्यवती एक पोक्त स्त्री एका एकीं बाहेर निघून तेथें आली. तिनें त्याची ती अशी अनावर स्थिति पाहून ती त्याच्या दुःखानें कळवळली. त्यास तसेंच दुःखांत सोडून तीस तेथून जाववेना म्हणून ती त्याचे अगदीं समीप येऊन त्याची ती सकुमार तनु पाहतांच तिला फारच त्याची करुणा आली, आणि ह्मणाली हे सकुमारा, तुझे सौंदर्याकडे आणि मुखकमलाकडे पाहिलें असतां तुझे गुणैश्वर्यादिकांची तुलना किती आहे हें अनुमान आतांच भीं केलें. अरे मी आज या समयीं या ठिकाणीं तुला पाहिलें नसतें तर निःसंशय या पेक्षांही तुझी प्रकृति अधिक बिघडून तुझें काय होतें कोण जाणे. आतां तूं स्वस्थ ऐस. या दोन घटकांत जितकें साह्य मजकडून होईल, तितकें करून तुला सुखी करीन. तुला असा दुर्धर प्रसंग न यावा; परंतु दैवयोगापुढें उपाय काय? तूं कोठील कोण? व येथें येणें कसें झालें? हें वृत्त अगोदर मला सांग. हें तिचें वचन त्या संकटांत त्यास अमृततुल्य होऊन जरी भाषण करण्यास खरोखरी शक्ती उरली नव्हती तरी मोठ्या श्रमानें हळूच ह्मणाला कीं, माझे तोंडास फार कोरड पडली आहे असें जाणून तुझे हातांतील सुवर्ण झारींतील थोडें उदक अगोदर माझे मुखांत घालून माझा तृषित आत्मा संतोषित कर. आज तीन दिवस अन्न पाण्यावांचून प्रवास दुःखांत कंठले. आतां मात्र अगदींच अवांका उरला नाहीं. आज या माझ्या अंत समयीं प्राणदान करण्यास तूं प्रत्यक्ष माहेश्वरीच भेटली आहेस. त्या अर्थी सर्व प्रकारें मजवर कृपा होऊन दुःखाचें निवारण झालेंच असें मी समजतों. त्या त्या उदार पुरुषाच्या गंभीर मुखांतील करुणापर भाषणानें तिचें मन अगदीं द्रवून गेलें. मग लागलीच आपल्या

हातांतील झारींतलें थोडेसें उदक अगोदर त्याचे मुखांत घालू न स्वहस्तें करून नेत्रांस लाविलें त्या योगें करून तत्काल त्यास थोडीशी हुशारी वाटून तिनें त्यास हात दिल्याचे साह्यानें तो- हळूच उठून बसला. मग तिनें तबकांत असलेलीं रंभाफळें, अंजीर व थोडीं काळीं द्राक्षें त्यास खावयास दिलीं. तीं सेवन करितांच बऱ्याच प्रकारें त्यास तकवा आला. तितक्यांत ती द- यात्रील स्त्री पुनः त्या घरांत जाऊन तेथील टांक्यातील उदका नें झारी भरून आणून उदक प्राशनार्थ त्याचे हातीं देती झाली. तें स्वच्छ गोड व थंडगार पाणी पिऊन चित्ताची स्वस्थता झा- ल्यावर त्यास तिनें विचारल्यावरून तीस त्यानें आपली ह- कीकत थोडक्यांत सांगितली. ती ऐकून ती म्हणाली बाबा, तूं प्रस्तुतकाळीं मोठ्या जादूचे पेंचांत सांपडला आहेस. तुझें चांगलें व्हावें असें माझ्या मनांत पुष्कळ येतें; परंतु या गोष्टी स माझा निरुपाय आहे. पुढें उत्तरोत्तर तुजवर महान् संक- ट येण्याचा संभव आहे. कदाचित् येथून परत जाण्याची तुझी इच्छा असेल तर मात्र कांहीं उपाय मी योजून पाहतें. त्या यो गें या संकटांतून पार पडशील. तथापि आजच ही गोष्ट मा- झे स्वाधीन नाहीं. कांहीं अवधी लागेल. तरीही तुझें हें अव- र्णनीय सौंदर्य पाहून या कामीं मला कोणीच सल्ला देणार नाहीं. यामुळें मात्र हेंही कार्य माझे हातून घडेल किंवा ना- हीं या विषयीं विचार आहे. तथापि तुझे जिवास कोणाकडून ही धक्का पोंचूं देणार नाहीं, हें तुला खात्रीनें कळवितें. इतकें- मात्र होईल, कीं, सर्व तुझें तारुण्य या संस्थानच्या अधिकारि णीकडे तुला खर्चावें लागेल. हें तिचें वचन ऐकून **कुसुम चाप** तिला ह्मणाला तुझे कृपेनें आज मीं वांचलों आहें व असाच प्रसंग पुढें आल्यास ईश्वरकृपाप्रसादानें त्याचें नि

वारण होईल; परंतु जी माझी उमेद आहे तिचा भंग झाल्यास पर-
त जाऊन तरी काय करावयाचें आहे? माझें अंतःकरणीं जिचा ध्या
स लागला आहे त्या सौंदर्य लहरीच्या प्राप्ती निमित्त जें होणार
असेल तें होवो. परंतु जेणें करून माझीही उमेद ताजी राहील
अशी कांहीं योजना मला सांगून तूं आपले स्वस्थळीं जाण्याचें
करावेंस. आतां तूं कोण असून या उपहारादि पूजासाहित्यास
ह वर्तमान या अशा घोर अरण्यांत येथें कशा करितां आली
आहेस या विषयींचा मला थोडा इतिहास सांगून माझें अंतः
करण स्वस्थ कर. या तुझ्या उपकाराचें स्मरण यावज्जीव म
जला वेगळें होऊं देणार नाहीं. ती म्हणाली येथें या वटवृक्षा
खालीं पुरातन यक्षिणीचें स्थान असून आमचें हें पूज्य दैव
त आहे व आमच्या मंत्रसिद्धीही येथेंच होतात. यास्तव प्र-
त्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारीं पंचवीस कोस पर्यंतलों-
बीच्या सभोंवार प्रदेशांतील सुमारें पांचशांवर स्त्रिया पूजा
साहित्य घेऊन या श्रीकालिकेच्या पूजनास येथें येतात. आणि
पूजाद्रव्य समर्पण करून लागलीच परत जातात. मला वाटतें
सर्वांची पूजा होऊन त्या परत गेल्या असाव्या. आमच्या अंगीं
मंत्रसामर्थ्य असल्यानें येण्या जाण्यास आह्मांस कांहींच वेळ
लागत नाहीं. मलाच येण्यास आज फार उशीर झाला. हेंही
बरेंच झालें, ह्मणून तरी तुझी स्थिति कांहीं तरी नीट राहि
ली. नाहींपेक्षां तूं असाच जर येथें न समजून राहतास तर.
या ठिकाणीं रात्रीं नाना प्रकारच्या देवतांचे, वेताळाचे, झोटिं
ग पिशाच्यादिकांचे भयंकर खेळ होत असतात. त्या तडाक्यां
त कोणी तुजसारिखा सांपडला कीं त्यास लागलीच ते आका
शांत फेंकून देऊन खालीं पाडून जीव घेतात. इतक्यावरही
दैववशांत कोणी चुकून वांचतो; परंतु तसें घडणें क्वचित् अ-

सो. तुझें भाग्य मोठें असें तूं समज. तुला आपला हेतु जर परिपूर्ण करणें आहे तर मी सांगतें कीं, बहुत करून आड मार्गाचे रस्त्यानेंच दिवसा जात जाऊन रात्रीचा अरण्यांतच कोठें तरी विश्रांति स्थान पाहून राहात जा. एखादें गांव अथवा शहर दृष्टीस पडल्यास त्यांत जेणें करून प्रवेश न होईल असा अंतःकरणांत पूर्ण विचार ठेव. तुझे सत्भाग्यानें मीच तुझ्या दृष्टीस पडलें ह्मणून बरें झालें, नाहींपेक्षां अगोदर येथें येऊन गेलेल्या तरुण स्त्रिया यांतून कोणा एकीची जर तुझी गांठ पडली असती तर तुला पाहतांच ती मोहित होऊन अन्यांची प्रीति न जडावी या हेतूनें लागलीच तुला पक्षी अथवा पशूचा देह मंत्र सामर्थ्यानें देऊन गुप्त रीतीनें बरोबर घेऊन गेली असती. या समोरील पायरस्त्याचे मार्गानें येथून दोन कोशांवर एक शिवालय थेट पूर्वेच्या बाजूस लागेल, तेथें उदक व घोड्यास गवत ही पुष्कळ आहे त्या ठिकाणीं जाऊन त्या शिवमंदिरांत रात्रीं स्वस्थ रहा, व पुढें नीट तसाच समोरील डोंगरा कडील रस्त्यानें उदयीक चालता हो. आतां पळभरही येथें राहूं नको. पाहिजे असल्यास तें स्थळ मी तुला दुरून दाखवितें, चल ऊठ. असें बोलून तिनें त्यास आपल्या हातीं उठविलें. आणि पुनः झारी भरून आणून पाणी तबकांत ओतून घोड्या पुढें ठेऊन त्यास पाजिलें त्या योगानें त्यास थोडा दम आला. मग पलीकडील दरडीवरील थोडेसें बाळलेलें गवत आणून त्यास खाण्यास घातलें. इतकें होई पर्यंत ती दयाळू बाई परताप निवारणार्थ अंतःकरण पूर्वक स्वतः खपत होती. मग त्यास घोड्यावर बसवून त्या बरोबर थोडी दूर जाऊन जेथून तें शिवालय दिसत होतें तेथून त्यास तिकडे जाण्यास सांगून आपण त्याचे समक्ष एका अरण्यपशूचा देह धारण करून मार्गस्थ झाली. भाग ६ वा समाप्त.

## अंक ७ वा.

त्या रात्रीं त्या शिवालयांत तो कुसुमचाप स्थित होऊन मनांत असलेली उमेद व प्राप्त झालेलें संकट यां विषयीं नाना प्रकारचे कल्पनातरंगांत निमग्न होत्साता त्यानें तळमळत ती रात्र उजाड दिली. अरुणोदयाची प्रभा व पक्ष्यांचा किलकिलाट अवलोकन व श्रवण करून उठून तो कुसुमचाप घोड्या जवळ येऊन त्याचे पाठीवर हात फिरवीत असतां मनांत ह्मणतो मजवर हा असा दुर्धर प्रसंग आला आहे खरा तरी जें होणें असेल तें होवो. तथापि जी माझे मानस मंदिरांत सतत वास करीत आहे ती सौंदर्यखाणी वसंतकोकिला प्राप्त झाल्या शिवाय परतावयाचें नाहीं. मग घोड्यावर बसून कांहीं डोंगर वगैरे-च्या त्या शुकपक्ष्यानें सांगितलेल्या खुणांच्या धोरणानें आड-मार्गानेंच चालता झाला. त्या दिवशीं त्या अरण्यांत त्यास कोणी न भेटून मार्गही उंच सखल व खडकाळ असल्या मुळें घोडा अगदीं थकून जाऊन कुसुमचाप क्षुधा व तृषा यांहीं करून श्रान्त होत्साता डोकीवर कडक ऊन व समोरून ऊन वाऱ्याच्या झापा यांच्या अतितर तापानें फारच श्रमी होऊन ग्लान झाला. परंतु सूर्यास्ताचे सुमारास एके लहान डोंगराच्या पायथ्याशीं बांधानें उचंबळलेलें एक चिरेबंदी टांकें व एक झोपडी अवलोकन करून त्यास जरा हिंमत येऊन संतोष वाटला. त्या ठिकाणीं एक म्हातारा जोगी राहात होता, त्यास त्याची अशी ग्लानी व थकवा पाहून दया येऊन त्यानें आपले जवळ असलेल्या पैकीं कांहीं फराळास दिलें. तो उपहार व प्यावयास थंडगार पाणी मिळाल्या मुळें त्याचा थकवा मोडून समाधान झालें. घोड्यासही पाणी व गवत मिळून हुषारी आली. ती रात्र राजपुत्र कुसुम

चाप आणि तो जोगीबावा या दोघांनीं मुख दुःखाच्या गोष्टींत घालविली.

उजाडल्यावर इच्छित स्थानास जाण्यास अमुक रस्त्या क-रून मार्ग ज्ञात आहे असे विषयीं राघूनें सांगितलेली पहिली खूण पटून या ठिकाणाहून पुढें जाण्याचा मार्गही त्यानें सांगून ठेवलेल्या खुणां प्रमाणेंच असल्याचें त्याचे ध्यानांत आलें. मग त्या बावाचा निरोप घेऊन खुणांच्या मार्गानें चालता झाला.

तें महाअरण्य असून सभोंवतालच्या डोंगराच्या दऱ्यांतून व्याघ्रादि श्वापदांच्या होत असलेल्या गर्जनांचे प्रतिध्वनी वरचेवर कानीं पडत होते तथापि धैर्य धरून चालला तों बराच दिवस आला, उन्हाच्या प्रखर तापानें सर्वांगाचा दाह होऊन-जीव घामाघुम झाला, क्षुधा व तृषा यांचा पूर्ण अंमल त्याजवर बसून व्याकुल झाला; तोंडास कोरड पडली, घोड्याचीही तीच दुर्दशा. त्याचें एकेक पाऊल श्रमानें व संकटानें पडूं लागलें. समोरील डोंगर तप्त होऊन वाऱ्यासरसे आगीचे लोट अंगावर येऊन तो राजपुत्र फारच घाबरा झाला. तरीही येथें पडून मरावें त्या पेक्षां हळु हळू डोंगर चढून वर गेलें असतां दैववशात् कोठें तरी पाण्याचा झगावा लागून तें प्राप्त जाह-ल्यास प्राण वांचतील. अशा विचारानें तो चित्तीं परमेश्वर चिंतन करून मोठ्या प्रयासानें तिसरा प्रहरचे समारास चढून वर आला, तों मोठें मैदान लागलें. समोरून आलेली गार वाऱ्याची झुळुक अंगास स्पर्शून जिवास थोडें समाधान वाटून जरा उमेद येऊन थोडा दूर गेला तों पुढें कांहीं अंतरावर गर्द आंबराई दृष्टीस पडली. तिजमधील असलेल्या सुगंधराय आणि वाळ्यांच्या बेटांवरून सुवास दरवळत येऊन घ्राणेंद्रियास स्पर्श करीत होत्साता जणु काय तो अर्जवानें पाचार-

ण करून आपल्या गृहीं येण्या विषयीं आपणास (राजपुत्रास) प्रार्थना करावयास आला आहे, असें राजपुत्रास वाटलें.

तसाच पुढें आंबराईंत जाऊन पाहतो तों एक संगम रवरी दगडांच्या पायऱ्यांची बारव दृष्टीस पडतांच अत्यानंद होत्साता तींतील शीतळ व स्वच्छ उदक थोडेंसें पान करून विश्रांत झाला. घोड्यासही आवाराचे मधून वाहात असलेल्या पाटाचें प्यावयास पाणी व त्या भोंवतालीं हिरवी गार उगवलेलीं खावयास थोडी हरळी मिळाल्या मुळें शीण हरून थोडा दम आला. इतक्यांत समोर जवळच एक दुसरी रमणीय व अतिशोभायमान आराम वाटिका अवलोकन करून तिकडे चालता झाला.

त्या विस्तीर्ण आराम वाटिकेच्या सभोंवारचे नारळी, पोफळी, बकुळी, जांभळी, सोनचांपा, अंबा फणस आदिकरून गगनचुंबित वृक्ष पर्ण व फलानीं युक्त होते. त्यांचे आंतील बाजूनें चोफेर तऱ्हेत्या तऱ्हेत्यांनीं कलमी आंबे, द्राक्षीचे मंडप, पपनस, अननस, बिही, चकोत्रे, साखरनिंबी, शिताफळी, रामफळी, पेरू, डाळिंबी, अंजीर आदिकरून फळ वृक्ष आपापल्या फळभारानें वांकले आहेत. त्यांचे आंतील बाजूचे घेरांत जाई, जुई, मोतिया, बटमोगरा, शेंवती, निशिगंध, गुलाब, मदन बाण मालतीआदिकरून सुवासिक फुलझाडांचे ताटवे पुष्पांनीं प्रफुल्लित असून त्यां मधून पाच, दवणा, मरवा, या सुवासिक वल्लींचीं लहान लहान बेटें विलसत आहेत. मधून सतत वाहणाऱ्या संगम रवरी बांधीव पाटांतून पाणी यथाक्रम सर्व झाडांस विपुल पोंचून त्यांची एकसारखी टवटवी राखीत आहे. त्या आराम वाटिकेंतील साधलेल्या चौरसी काटबंदी सडकांच्या दुतर्फा अंतरा अंतरानें असलेलीं हजारी कारंजीं सतत जोरानें उडत असून त्यांचे तुषार सडकांस गार राखीत आहेत. अशी ती आल्हादकारक शोभातो

राजपुत्र (कुसुमचाप) पहात चालला. पुष्पवाटिकेंतील हारी हारी नें साधलेल्या संगमरवरी मार्गानें रूपयौवनसंपन्न कांहीं तरुण स्त्रिया मेळ्या मेळ्यांनीं प्रेमभावें करून एकमेकींचे हात धरून फुलझाडांची शोभा पहात व त्यांचें वर्णन करून पुष्पांचा सुवास घेत घेत इकडून तिकडे आनंदानें सहल करीत फिरत आहेत. मधोमध साधलेल्या संगमरवरी मोठ्या पटांगणाच्या मध्यभागीं एक असलेल्या स्फटिकमय उंच विस्तृत अष्टपैलु चबुत्र्याच्या सभों वतालच्या पायऱ्या पायऱ्यानीं तऱ्हेतऱ्हेच्या रंगाच्या फुल झाडांच्या ठेवलेल्या विलोरी कुंड्या खुलत आहेत. व त्या चबुत्र्यास भोंवती प्रत्येक पैलूपैलूचे ठिकाणीं एक एक सुरूचें झाड विलसत असून त्या सर्वांचे शेंडे एकवटून चबुत्र्यावर मंडपाकार शोभा देत आहेत. त्या पटांगणा वरून चौफेर हारीनेंच सारख्या अंतरावर असलेलीं कारंजीं उंच उडतानां विलक्षण शोभा देत असून त्यांचे फवारे त्यांच्या मधील अंतरांतून लावलेल्या उंच सुरूंच्या झाडां वरून उडून तें पाणी त्यांवरून खालीं ठिबकतानां त्यावर सूर्य किरण पडून ते बिंदू मौक्तिकवत् चमकत आहेत. त्या चबुत्र्या वरील रत्नजडित कांचनमय सिंहासना वरच्या मृदु बिछायतीवर अंगावर अमूल्य जडावाचे रेखलेले डागिने घालून भरजरी शालू परिधान केलेली एक देदीप्यमान मुखरिण स्त्री बसली असून तिच्या तत्परतेंत शेंकडों रूपवतीं दासी हात जोडून तिजपुढें उभ्या असून आज्ञेची वाट पहात आहेत. असें पाहून आपला घोडा एका झाडाचे खांदीस लगामानें अडकावून कांहीं शंका अथवा भीति न धरितां तो चमत्कार पाहावा, म्हणून कुसुमचाप त्या पटांगणा वरून त्या चबुत्र्या सन्निध जाऊन ती वैभवदायक मजा आश्चर्यानें पहात स्तब्ध उभा राहिला. त्यास अवलोकन करून एक दासी पु-

हें घेऊन ह्मणाली, तुमचा पूर्वीच्या ओळखीचा कांहींच संबंध नस-
तां तुह्मीं परपुरुष योग्यायोग्य विचार न पाहतां निःशंकपणें एक-
दम चाल करून या स्त्रीमान स्थानाप्रत कसे आलांत तें सांगा. ति-
च्या या वचनें करून कुसुमचाप घाबरला, तरी जिवावर उदा-
र असल्यामुळें कांहींच उत्तर न देतां तसाच धैर्यानें पुढें सरसा-
वून चबुऱ्याच्या पायऱ्या चढून भोंवतालच्या सर्व स्त्रिया, हं हं हं
ह्मणत असतां तो यत्किंचितही भीति न धरून त्या सिंहासनावर
चढून मुख्य राणी शेजारीं जाऊन बसला. सर्व स्त्रिया चकित
होत आहेत. इतक्यांत ती मुखरिण स्त्री चकोरी त्या चंद्रा
स अवलोकन करितांच मोहित होत्साती अत्यानंद पावून ह्म-
णाली, माहाराज, आपलें हें सौख्यदायक दुर्मिल आगमन को-
णीकडून झालें? राजपुत्र ह्मणाला, आह्मीं प्रवासी फिरत फिरत
सहज या ठिकाणीं येऊन पोंचलों. असें बोलत आहे, या अव
सरांत त्या स्त्रीनें आरामवाटिकेंतील ज्या ज्या पुष्पावर व ज्या ज्या
मेव्यावर आपली इच्छा दर्शविली तीं तीं फुलें व तो तो मेवा त्या
त्या झाडाचा एकदम तुटून तत्क्षणींच आपो आप तिचे जव-
ळ येऊन दाखल होतांच त्यांतून कित्येकांचें ग्रहण केल्यावर शे
ष फुलें व फळें आपापल्या स्थानास ह्मणजे झाडांस परत जा
ऊन आपआपल्या स्थानीं स्थित झालीं. असा अद्भुत चमत्कार
पाहून राजपुत्र मनांत चपापला. ( हा सर्व जादूचा खेळ त्या स्त्री
नें आपलें मंत्रसामर्थ्य त्यास दाखविण्या करितांच त्या समयीं
मुद्दाम प्रदर्शित केला ) आणि मनांत ह्मणतो राघूनें सांगित
ल्या प्रमाणें आपण मोहपाशांत पूर्ण पडण्याचा हा समय
खचित दिसत आहे. तो चिंता व भीतीनें ग्रस्त झाला हें मनां-
त जाणून ती पुनः ह्मणाली कीं आपलें येणें कशा करितां को-
णीकडून झालें? तीस कुसुमचाप ह्मणाला कीं, तूं सर्व मनो-

भाव जाणत असून कां विचारतेस? तिनेंही हास्यवदन करून स-र्वी कडून कांहीं अमृती पदार्थ इशारतीनें आणवून आपला कोमल वामहस्त त्याचे कंठाभोंवती वेढुन स्मित हास्यानें आप ल्या नेत्रकटाक्षाची प्रेरणा त्याचे अंतःकरणावर करून त्या प-दार्थानें भरून तयार केलेला सुवर्णाचा पेला, हेम रत्न भूषणा नीं युक्त अशा आपल्या गौर वर्ण कोमल, मृदु व सतेज सव्य करानें त्याजपुढें करून ह्मणाली, आपणा साठीं श्रम निवारणा र्थ हा सुगंधयुक्त गुलाबी शिरका आणिला आहे. याचा स्वी कार व्हावा. हें ऐकून तत्क्षणीं त्यानें विचार केला कीं, या स-मयीं नाहीं ह्मणावें तर एकादें प्राणांतही संकट मजवर आ-णावयासही चुकणार नाहीं. बरें हें सरबत घ्यावें तर न जा-णो यावज्जीव इच्या कबज्यांत राहणें भाग पडेल. परंतु-न घेऊन परिणाम नाहीं, असें जाणून त्यानें परमेश्वर चिंतन करून मोठ्या विवंचनेनें त्याचें ग्रहण केलें. तिनेंही तें घेत-ल्या मुळें अतिशय उन्मत्त होऊन विषयसुख प्राप्त्यर्थ हावभा व नेत्रकटाक्ष हास्य व विनोदयुक्त भाषण आणि अंगस्पर्शादि लीला यांहीं करून त्याचें चित्त सर्वथैव हरण करण्यास तो वर चेवर प्रहार करीत असतां कुसुमचापासही भीतीस्तव तिच्या हेतूंस वारंवार रुकार देणें भाग पडे.

वास्तविकच आहे जी स्त्री आपणास प्रिय आहे ती सा-धारण आहे तरी समयानुसार तिचें दुर्भाषणाही मनास संतो-ष देतें. आणि जी अत्यंत सुस्वरूप असून निजविषयीं प्री तिभाव नसल्यास तिचें आर्जवयुक्तही भाषण विषतुल्य वाट तें. या विषयीं विशेष सांगणें नको.

इतक्यांत दासीनें भोजनाचें ताट सिद्ध करून सर्व तया री तिशीं आणून ठेविलें. तिचे अत्याग्रहामुळें त्यांतून पांचचार

घांस तिला स्पष्ट न दाखविनां मोठ्या कष्टानें खाऊन थोडें पाणी प्याला. तिणें यथेच्छ भोजन केलें. तों अस्तमान झाला. मग ती जबरदस्त सहस्रस्त्रियाधिकारीण क्षणेक स्वस्त न राहतांने मस्तपणाचा त्याग करून केवळ मस्तपणानें त्याचा हस्त धरून हेतुनुरूप स्वचित्तास स्वस्थ व्हावयास आपल्या अंगस्पर्श हावभावादि लीलांची शिकस्त करिती झाली. तदनंतर पलीकडील लालबागेंतील शृंगाररसभरित रोषनाई वगैरेंनी सिद्ध झालेल्या विलास मंदिरांतील कांचनमय बिलोरी हवाशीर रंगमहालांत ती त्यास आपल्या बरोबर मोठ्या अदबीनें घेऊन जाताना त्याचे घोड्यास पागेंत नेऊन लावण्या विषयीं आज्ञा देऊन चालती झाली.

त्या राजपुत्रासहवर्तमान ती त्या रंगमहालांत जाऊन आर्जवयुक्त भाषणानें चंदनाचे सर्जेदार विस्तृत पलंगावरील मृदुशय्या स्थानीं गुलाब पाचादि अत्तरांनीं सिंचित केलेल्या पुष्पशेजेवर त्यास गौरवानें बसवून लागलीच आपणही अर्धांगीं बसली. हें त्यास महदाश्चर्य वाटून गालांत हांसून धैर्यानें तिजपासून सरकून थोडा दूर झाला. हें त्याचे आपले हेतूस प्रतिकूल कृत्य पाहून ती अतिशय संतप्त होत्साती बोलली कीं, मी तुझ्यावर जिवें भावें करून तल्लीन झाल्यें असतां तूं माझें वचन अमान्य करशील, तर गांठ मशीं आहे, हें खूप समज. तुझें मनेच्छित कार्य मी कधींही घडूं न देतां यावज्जीव सर्व सौख्यास मुकशील. अरे सर्व जादुगारांचा गुरु जो सर्व प्रसिद्ध दिक्पालचंद्राजा त्याची मी औरस लाडकी कन्या असून रूपयौवन संपन्न आहें. तशीच माझे च पित्याचे बलवत्तर जादुविद्येच्या बलानें मी मोठमोठ्या युवराजपुत्रांसही तृणवत लेखीत आहें. शेंकडों सुंदर व तरुण राजपुत्र मज

प्रीत्यर्थ झुरणीस लागले आहेत. तथापि त्यांस तुसतें माझें धूळद-र्शनही होणें दुर्लभ. असें असतांही तुजवर माझें अंतःकरण जडून मी सर्वपरी वेडी होऊन कामेच्छा तृप्त्यर्थ स्वतः दासी होऊन विनय पूर्वक अर्जव करीत आहें. तरी तें सर्व व्यर्थ झालें. अरे, ही कामधेनु अथवा हें चिंतामणी रत्न दैवयोगें करून तुला प्राप्त झालें असतांही तूं त्याचा त्याग करीत आहेस, त्या अर्थी तुजहून भाग्यहीन मनुष्य या दुनयेंत दुसरा कोणीच नसेल असें खचित. असो. आतां तूं माझ्या हातांत आहेस. कोणतेही प्रकारें तुजला येथून सुटून जाण्यास मार्ग नाहीं. याचा तूं पूर्ण विचार कर. माझी अनुकूलता असल्यास सर्व सिद्धि होऊन पाहिजे तें प्राप्त होईल. मग ती **वसंतकोकिला** कधींही प्राप्त व्हावयाची नाहीं. (ही त्याचे मनांतील गुप्त गोष्ट जादुविद्या मंत्रसामर्थ्यानें तिजला कळून आली होती.) असें तिचें सक्रोध भाषण ऐकून **कुसुमचापास** प्रथम फार भीति वाटून घाबरला. परंतु तिनक्यांत धैर्य धरून ह्मणाला, हें तुझें ह्मणणें सर्व खरें आहे. असें तूं जादुविद्येंत प्रवीण असल्याचें कळून आल्या वरून मी पक्कें जाणतों; परंतु तूंच पहा-कीं, जीच्या साठीं जो मी आपलें सार्वभौम राज्य, गृह, दारा, आई, बाप, बंधु, इष्ट, मित्र, वगैरेचा एकदम त्याग करून जिवावर उदार होत्साता भटकत फिरत आहें. त्याचे प्राणाची तूं शत्रु आहेस. तुजवर तरी काय भरवसा ठेवावा? या जगामध्यें तीन प्रकारचे शत्रु आहेत. एक तर खुद्द आपला शत्रु, दुसरा शत्रूचा स्नेही आणि तिसरा मित्राचा वैरी हे सर्व समान आहेत. आतां एकी विषयीं कृतनिश्चय करून येऊन तिची सर्वथैव आशा सोडून अन्य सौख्यांस आज लुब्ध होणें हें केवळ कृतघ्नपणाचें काम समजलें-पाहिजे. मी द्रव्यसुख विलासाचा व वरपंगी उपचारांचा भुकेला नसून केवळ प्रीतीनें बद्ध असा आहें. जर तुझें अंतःकरण म-

जवर खरें आहे तर हें वचन घे, आणि मला संतोषानें तूंच त्या प्रियतमा **वसंतकोकिलेची** भेट करून दे. म्हणजे माझ्या संकल्पानुरूप हेतुपूर्ण होऊन शपथ पुरःसर सांगतों कीं, मग मी येथें नेमून देशील त्या मुदतींत येऊन तूं सांगशील तें ऐकण्यास सिद्ध होईन. हें राजपुत्र बोलत असतां तिकडे लक्ष्य पुरवून ती आपणाशींच विचार करून कांहीं वेळानें झिरकारून ह्मणाली, आतां फार काय सांगूं? जर माझ्या मनाच्या या समयीं तूं भंग करशील तर पहा. याच वेळीं याच ठिकाणीं तुझी प्रियतमा जी **वसंतकोकिला** ती मी आपल्या मंत्रसामर्थ्यानें तुजपुढें आणून एके क्षणांत जाळून खाक करून टाकून मी आपला सर्व उद्देश लईास नेईन. या कठोर व उग्र भाषण खड्ग प्रहारानें त्याचें हृदय भेदून भयभीत होत्सांता **कुसुमचाप** विचार करूं लागला. कीं इचें वचन मीं मानीन तर सर्व आशा निर्मुक्त होत्सांता इच्या मोहपाशांत गुंतून जन्मपर्यंत येथेंच कुजून मरणें भाग पडेल. बरें, न मानावें तर जी सर्व सौख्याधिकारीणजी व प्राण **वसंतकोकिला** इचा जीव निःसंशय वांचत नाहीं, असें मनांत येऊन दुःखानें त्याचें अंतःकरण अगदीं विव्हळ होऊन तळमळ लागली. अनेक प्रकारचे तर्क तरंग त्याचे मनांत वारंवार येऊन शेवटीं त्यानें विचार केला कीं, तिचे जिवावरील आज हें विघ्न तर टाळलेंच पाहिजे. आतां या दुष्टेस रुकार देऊन प्रेमदारवबून राहिलों तर त्या प्राणवल्लभेचा प्राण वांचवून कदाचित् पुढें दैवानुसार आपलें इच्छित कार्य साध्य होईल. माझें सत्यत्व व निजविषयींचा खरा कृतनिश्चय यांहीं करूनच परमेश्वर तुष्ट होत्साता तें माझें इच्छित कार्य घडून येण्या करितांच या गोष्टीची प्रेरणा माझे मनांत करून हा मार्ग दाखवीत आहे, त्या अर्थीं त्यानें अवलंबन करणें हेंच सर्वपरी इष्ट आहे.

असें जाणून तो तिला ह्मणाला कीं हे कमल नयने, स्मितहास्यवद-
ने, चारुगात्रे, रूपयौवन संपन्ने मजवर तुझें प्रेम कसें आहे, हें
इतका वेळ मी कसून पाहिलें. परंतु आतां त्याजविषयीं माझी
पूर्ण खात्री होऊन तुजसारखी मनोरमा स्त्री माझे सुदैवें करून
च मला प्राप्त झाली, असें मी पूर्ण समजतों. जसा क्षुधित भ्र-
मर अरण्यांतीलच पुष्परसा विषयीं इच्छा धरून फिरत असतां
त्यास दैवयोगानें अकल्पित प्रफुल्लित मालती पुष्पवाटिका प्रा-
प्त झाली; अथवा शर्करा इच्छितास अमृत प्राप्ति; किंवा क्षुधि
त जन साधारण भोजनास राजी असतां त्या ठिकाणीं त्यास पंच
पक्वान्नाचें ताट प्राप्त झाल्यावरही तो त्याचा अव्हेर करील तर
त्याजसारखा मंदभाग्य दुसरा कोण आहे? त्याच प्रमाणें तुझा
त्याग हेंच माझें दुर्भाग्य समजलें पाहिजे. फार काय सांगूं? जा
वत्काल पर्यंत नंदनवन अवलोकनांत नाहीं तावत्काल पर्यंत इत
र बागांची प्रशंसा. सूर्यकिरण दीप्ती पुढें दीपक प्रकाशाची-
मातब्बरी किती। "जंव ना देखिलें पंचानना, तंव जंबुक करी गर्ज
ना" त्या प्रमाणें तुजपुढें इतर सर्व स्त्रिया तुच्छ असून तुजकडे
माझें अंतःकरण उतावीळपणानें धांव घेत आहे; परंतु इतका वे-
ळ दम धरून केवळ विनोदार्थ हें तुजशीं भाषण केलें. हें तूं स-
मजून संतापलीस हेंच आश्चर्य! पहा, तिसरे प्रहरीं त्या आराम
वटिकेंतील चबुत्र्याच्या समीप येऊन तुझा निष्कलंक पूर्णमुख
चंद्रमा तशीच शरीराची दिव्य कांती व बांधेसूद ठेवण, व या
सर्व गोष्टींस अनुकूळ अशी तुझे डोळ्यांची मुरड, आणि ऐटदा
र झोंक अवलोकन करितांच सर्व तन मन धन तुजकडेस लागू
न मी वेडावून गेलों. कांहीं न सुचून तेथें इतकी अटक व प्रति
बंध असतांही तुझा प्रीतियोग केव्हां घडेलसें होऊन गेलें. (का
मातुराणां न भयं न लज्जा) या प्रमाणें माझी स्थिति होऊन त्या

स्त्री समाजांतून हे मच्चित्तहारके, सिंहासनावर तुजसन्निध येऊन बसलों या वरूनच माझे मना विषयीं तुझी खात्री व्हावी. हा वेडे हेंच काय तुझें शहाणपण? या तुझे धूर्ततेस सीमाच राहिली नाहीं. असें बोलून त्यानें किंचित् विनोद लीलेनें कामिक हास्य करून विशेष प्रेम दाखवून तिचे कंठास मिठी मारली त्या वेळे स हा मदन आणि आपण रति अशी तीस भावना उत्पन्न होऊ न तिचा हर्ष ब्रह्मांडांत न मावून त्या एकांत विराजमान सौगं धिक शय्या स्थानीं त्याचे मुखचंद्रामृतानें स्वाधरोष्ठद्वारें त्या तृ षित चालकीनें प्राशन करून आपला कामिक हेतु तत्क्षणींच पूर्ण करून घेतला. परंतु राजपुत्रास तें सुख विषतुल्य वाटलें. मी या सांपळ्यांत सांपडल्यामुळें त्या मनोहरणी विषयीं कृतघ्न झालों. असें वारंवार मनांत येऊन सर्व रात्रभर तळमळ लागून त्यास निद्रा आली नाहीं. आतां येथून माझी सुटका निःसं शय होत नाहीं. मी दीपकाची इच्छा करणारा पतंग या प्रज्व लित ज्वाळारूप अग्नीनें आहाळलों आहें. हर हर!! असो. आतां मला हें तर समजलेंच आहे. तथापि जिजवर माझी पूर्ण आशा आहे तिजसाठीं अन्य जन्म घेऊन आपला हेतु तृप्त करीन. ई श्वरा. आतां इचे हातून सुटका मात्र लौकर करीव. असें मनांत आणून रडूंही येऊं लागलें. परंतु तें त्यानें तिचे भीतीस्तव आंत ल्या आंतच आवरीत असावें. इकडे तिलाही असा दिव्य मोहरा आपले हस्तगत होऊन त्याचें प्रेमही आपणावर जडलें आहे; आ तां निरंतर विषयसुखाचा अनुभव मी यथेच्छ घेईन. त्या हर्ष प्रमादानें निद्रा आली नाहीं. अशी ती रात्र परस्परांनीं वेगवे गळ्या विचारांनीं घालविली. सूर्याच्या किरणांचा अप्रतिबंधि त प्रकाश झरोक्यांतून त्या कुंजस्थळीं आला. एकांत स्थळींआ पणा उभयतां मध्यें हा तिसरा आला म्हणून लज्जेनें त्यांचीं तों

डें फिकट होऊन तीं खालीं करून त्यानें न पाहवें म्हणून आप
आपल्या डोळ्यांवर उभयतानींहीं हात ठेविले. तात्पर्य डोळेचो
ळीतच तीं उभयतां उठलीं. शौच मुखमार्जनादि प्रकार होतांच
तिनें सर्व प्रकारें सिद्धता करून त्याचा हात धरून त्यास संगमर
वरी चौकांतील मध्यस्थानीं ठेवलेल्या सुवर्णमय चौरंगावरआ
णून बसविलें. सुवर्ण पात्रांतून सौगंधिक तेलें तशींच उटणीं-
घेऊन, स्पर्श होतांच शरीरावर रोमांच उठविणाऱ्या अशा आ-
पल्या विलासी, व मृदु आणि रत्नकंकणानीं भूषित असलेल्या दे
दीप्यमान स्वहस्तें करून त्याचे प्रोज्वलित अंगास लावून दासी
सहवर्तमान सुगंधयुक्त उष्णोदकानें त्यास रासन्हाण न्हांऊं घा
तलें. उत्तम वस्त्राभरणें परिधान केल्यावर त्या सहवर्तमान तिनें
मोठ्या आनंदानें षड्रस मिष्टान्न भोजन केलें. आणि टबकेदार
पक्के पानांचें तांबूल सेवन झाल्या नंतर म्हणाली. मला नित्य बा-
पाचे दरबारीं तिसरा प्रहर पर्यंत राहावें लागत असून पुढें चार
घटका आपण काल प्राप्त झालेल्या आराम वाटिकेंत मैत्रिणी स
हवर्तमान क्रीडा सुखानंदांत जातात. या साठीं तितका वेळ पर्यंत
या विलास मंदिरीं आपणास मजवांचून एकटें राहणें आहे. ये वि
षयीं माफी असावी. तें वचन त्यास अंतःकरणीं अतिसंतोषका
रक वाटून धैर्यानें सर्व कार्य होतें हा विचार करून त्या धूर्तानें-
युक्ती योजून प्रेमयुक्त भाषण केलें, कीं तुजवांचून या ठिका-
णीं एक घटकाही मला वर्षा प्रमाणें होईल. आणि तुझ्या मु-
खचंद्रावांचून या चातकास दुसरी कोणतीच वस्तु आतां प्रिय
नाहीं. इकडें लक्ष पोंचवून हे मत्तमयुरी, जाणें अगत्यच अस
ल्यास जाऊन लवकर परत येण्याचें होत जावें. हें त्याचे मुखां
तील हेतुप्रिय भाषण ऐकतांच ती कलिका विकसित होत्सातां
मी आपल्यास निरर्थक अवधीचा विरह देणार नाहीं. असें म्हण,

न विनोद हास्य करीत बाहेर जातांनां विषयास प्रदीप्त करणाऱ्या
आपल्या करास वऱ्हीचें त्यावर अस्त्र टाकून चालती झाली. बा
गेंत सर्व सामसूम होऊन त्याजवांचून दुसरें तेथें कोणीच राहिलें
नाहीं. त्या बागेचे बाजूचा एकच दरवाजा होता तो तिनें बंद करू-
न बंदोबस्त केला होता. अशा समयीं त्यास सर्व उदास वाटून दुः
खानें अतिशय रडें कोसळलें, आणि ह्मणाला मजसारिखा दु-
र्भाग्य कोण आहे!! हे माझे राजपुत्राचे हाल या बंदिखान्यांत
कोणास सांगावे? माझें दुःख परिहार करणार कोणीच दिसत-
नाहीं. ज्याच्या जिवावर मी घरांतून निघालों तो पक्षिराजही म
ला वनवासी करून सोडून गेला.! हर हर!! परमेश्वरा!!! तुझी
इच्छा! अशा दुःख विचारांत तळमळ लागून तेथें सर्व सुखोप-
भोग असतांही त्यास सर्वथैव गोड वाटेना. अशा स्थितींत अ-
स्तमानचे संधीस एकदम दरवाजा उघडून ती जादुगार तेथें ये
ऊन पोंचली. तीस पाहतांच सर्व दुःख आंवरून जशी कांहीं ति-
ची मार्गप्रतीक्षाच करीत बसली आहे. असें तिला हास्ययुक्त मु-
खश्री दिव्यप्रकार दाखविलें असा त्याचा हा कृत्रिम प्रेमभाव
त्या विषयांधास मूर्छीत न करून उलट त्याला धैर्य तिची पक्की
खात्री होऊन तो तीस प्राणांहूनही प्रिय वाटूं लागला.

या प्रमाणें तिनें तिच्या लगटीनें लाडून अनेक रीतींनी फसवून याव
आणि त्यासहवर्तमान सर्व प्रकारचें विषयसुख अनुभवावें या
स पर्यंतही त्याचे दिवस लोटले. पण दिवशीं तिच्या प्रमाणेंच तो
ह मार्गीं प्रमत्तच झाला हा दुःखित होऊन आपली सर्व गों-
ष्टीस प्रमत्त ... अंधार इचे अंकित होऊन या बंदिखान्यांत रा
हात आहे. येथून जावयास इचे आज्ञे व्यतिरिक्त मार्गच
नाहीं. काय करावें! या कोटाळणीनें मजसाठीं सर्व दिशा व मा-
र्ग मारून टाकिले आहेत. अशांतूनही जाण्यास एखादा उपा-

य योजावा. आणि तो जर का मिळूस गेला नाहीं तर मग काय करावें? इच्या रुसले मुळें आमरण पर्यंत सौख्याचा लवलेश स्वप्नांतही यावयाचा नाहीं. मग सर्व हेतु सौख्याभिरामा वसंत कोकिला इचें प्रत्यक्ष दर्शन दुर्दैव्यास कोठून होणार? अशा अनेक कल्पना अंतःकरणांत येऊन भांबाऊन त्याचे दुःख उद्गारास कडआला. त्या श्रमा मुळें व ती येतांच दुःख न दाखवितां नित्य नवेंसेंबळेंच प्रेम उत्पन्न करून तिचे अंतःकरणास संतोष देण्याचे काळजीनें त्या म ग्लानी येऊन तळमळत आहे, या अवसरांत तो ज्ञानसंपन्न स्वामी बुद्धिमंत निजजिवलग व हितेच्छु कीर पक्षिराज अवचित त्याचे सन्निध येऊन भो अधैर्य संपन्न राजेंद्रा, हा आपला दास आपल्यास प्रणाम करीत आहे. याजकडे आपण सर्व दुःखाचा परिहार करून अवलोकन करा. असें बोलून पायांवर गडबडां लोळण घालूं लागला. ज्या प्रिय व हित कराच्या बहुत दिवसाच्या घडलेल्या अदर्शन दुःखें करून तळमळून झुरणीस लागलेल्या राजपुत्रानें, अशा दुर्धर प्रसंगीं व दुर्धर स्थानीं त्या मध्यनाथ शुकपक्ष्यास एका एकीं अवलोकन करितांच त्याचे सुखास काय विचारावें? हृदयीं प्रेम दाटून कंठ सद्गदित होत्सातां नेत्र सजल झाले व अंग स्फुरण पाऊन सौख्याचे रोमांच उभे राहिले. मोठ्या लगबगीनें त्यास हातीं घेऊन अगोदर त्याचें शिरावघ्राण करून प्रेमानें चुंबन केलें. नंतर त्यास हस्ताचे ठायीं कुरवाळून कुसुमचाप ह्मणाला हे माझ्या प्राणदात्या पक्षिराया, तूं आज मला भेटलास ही दुसरी फेर या मरणासन्नास केवळ अमृत संजीवनीच प्राप्त होऊन गेलेला प्राण पुनः कुडींत आला असें झालें. असें बोलत आहे इतक्यांत त्यास मनांत थोडी भीतीही उत्पन्न झाली कीं, या जादूच्या तडाख्यांत आतां या पक्ष्यास तरी कांहीं व्यत्यय न येवो. ह्मणजे तिला याचें आगमन अ-

नक्षत असो. असें त्याचें एकदम द्विधा झालेलें अंतःकरण पाहून पक्षी ह्मणाला आतां कोणत्याही गोष्टीची आपणास मी असतां काळजी करावयास नको. तुमचे दुःखाचा सर्व हवाल मी जाणत आहें. या वंदिखान्यांतून आपली लौकरच सुटका होऊन इच्छित हृदयाभिरामा प्राप्त होईल. धीर धरा.

**कुसुमचाप**:— ज्या ठिकाणीं आतां या जन्मांतही तुझे भेटीचा असा योग येऊन मला आनंद होण्याची वार्ताही नव्हती, तेथें ईश्वर दयेनें तूं माझा प्राणदाता मला भेटलास; त्या अर्थी आतां मला काळजी कशाची? या सुचिन्हा वरून पुढें दिवस चांगले येतील, हें मी निश्चयात्मक समजतों; परंतु जिवलगा **पक्षिराया** तुझी माझी तुटातुट झाली तेथपासून पुढें तूं आजपर्यंत दिवस कोठें कसे कंठलेस, आणि अशा दुर्गम स्थानीं माझा शोध कळून तूं कसा आलास? हा सर्व वृत्तांत सांगून माझा हेतु पूर्ण कर. असून तो दुःख [illegible] येथें येऊन दाखल होण्यास अवधीही [illegible]

पक्षी — हे सौंदर्यानंद [illegible] या वरून हा तुझा प्रश्न उत्कृष्ट वाटत असून त्या प्रमाणें माझा वृत्त कळवून आपली इच्छा पूर्ण करितों. पण त्या वेळेस आपण त्या चन्द्रभुवनात पाहिल्यावर घाबरा न होऊन मी न जाणत्याच मागें असतां त्यांनें पुढें [illegible] त्या [illegible] पुढें मला [illegible] वाटल्यावरून [illegible] या आशेने [illegible] [redacted] हात बसलों. परंतु आपण न आल्यानें माझ्या मनांत अनेक विचार येऊं लागले. तशीच ती रात्रही [illegible] वांचून दुःखांत काढली. दुसरे दिवशीं आसपास पुष्क [redacted] शोध केला; परंतु कांहींच पत्ता न लागल्या मुळें सर्वथैव जिवास गोड वाटेना. तो प्रसंग मनांत आला म्हणजे जें दुःख

ह्मांनं तें आपणास काय सांगूं? असो. नंतर मी आपली काळजी वहा
त नानें उपवनें सर्व धुंडून शोधिलीं, परंतु व्यर्थ. मग निराश होत्सा
ता तसाच जिवा आपल्यास मानसीं निजध्यास लागून या पेंचां-
त आपडला आह्मी त्याच विरहिणीकडे जाण्यास निघालों. जादूचा
प्रतिबंध न येऊं देणारीं अशीं जीं मला माहित असलेलीं अमरकट
स्थानें आहेत त्या मार्गानें स्थळीं स्थळीं वास्तव्य करीत जात असू
न कदाचित् आपणही दैववशात कोठे तरी भेटाल या आशेनें गे-
लों. परंतु तसा योग कोठून येणार! असो. पुढें त्या नगरीस पोंचून
त्या शांतीमतीची अंतरीं खंती लागली होती. तिचे अंतर महालीं
जाऊन तीस एकांतीं भेटलों. तिनें मला पाहतांच कीं पक्षिराया,
काम फत्ते आहेना? असें ह्मणून मला कुरवाळून पोटाशीं धरून
प्रेमानें माझें चुंबन केलें. आणि उत्तम द्राक्षें, पेरू, डाळिंबें आदि
करून मेवा मला खाण्यास देऊन रत्नजडित सुवर्णाचे पेल्यांत
शीतळ सुगंधोदक स्वहस्तें आणून प्यावयास दिलें. तिचे आज्ञे
प्रमाण आणि इच्छानुरूप कार्यभाग मजकडून घडून आला अ
सता तर तिचें तें कुरवाळणें, प्रियभाषण, आणि सदुपचार हें म
ला सुख होतें, परंतु तसा योग दुर्भाग्यें करून माझे हातून घड
ला नाहीं या मुळें हिरमुखी अंतःकरणानें मला तिच्याशीं एक श-
ब्दहीं बोलवेना. हें जाणून ती ह्मणाली. प्रियोत्तमाची हकीकत
काय आहे ती अगोदर मला कळीव. मी तर तूं गेल्या पासून पर
त येण्याच्या घटका मोजीत आहें. त्या तुझ्या येण्या वरून माझें
नियमित अर्ध कार्य झालें असावें. इतका माझें अंतःकरण म-
ला धीर देतें. त्या तिचे भाषणानें मला थोडी उमेद येऊन मी ह्म
णालों. हे प्रमोदचंद्रिके, असाच कांहीं प्रकार खरा. अंतर्गत भा-
व जाणण्या विषयींचा तुझा तर्क इतरांस गर्क करील, यांत संदेह
नाहीं. पहा तुझी आज्ञा घेऊन गेल्यावर मनांत योजलेल्या युक्ती-

नें दीर्घोपायें करून तुझी कामशक्तीची पीडा दूर करण्यास त्या सर्व संजीवन द्रोणाद्रीस मी तुजकडेस आणीत असतां दुर्दैवें करून मार्गांत कांहीं विघ्न झाल्यानें तो सुमेरु मजपासून दूर होऊन अदृश्य झाल्या कारयानें मी निरुपाय होत्साता सर्व परी निराश झालों; परंतु तुझी दुरावस्था होऊन तूं माझ्या येण्याची मार्गप्रतीक्षा करीत असशील, असें जाणून व तसेंच कदाचित् ईश्वर कृपेनें मार्गांतील विघ्न निरसून प्रीतीस्तव तो राजकुमार भ्रमर तुज कमलनीच्या सुगाव्यानें भ्रमण करीत तुजकडे येऊन तुह्मां उभयतांच्या भेटीचा योग येथेंच घडेल. या उत्कंठेनें मार्गांत जागो जाग शोध करीत करीत येथें आलों. हें वर्तमान ऐकून तिची जी अनावर स्थिति झाली ती व्यक्त करण्यास माझे चंचुपुटांस शक्ति नाहीं. तिजला आपली भेट केव्हां होईल व तसा आनंदाचा दिवस केव्हां येईल असा अहर्निशीं ध्यास लागून वेड्या सारखी झाली [illegible] आपला सुगावा नरी तिनेंच मला कळवून आपली [illegible] मार्ग [illegible] मला तांबडतोब पाठविलें आहे

[illegible] तिला कळ-
वाचयाल [illegible] त्या-
मून [illegible] आपली अ-
मला [illegible]
[illegible] असामर्थ्यानें प्रा[illegible] नि
[illegible] सून चलन करून तीस अन[illegible]
[illegible] ती असावध असल्या मुळें तिजवर त्या प्रक-
आलेल्या दुर्घट प्रसंगाची निवृत्ति करण्या विषयींचा उपाय करण्यास तीस सवड राहिली नाहीं. परंतु इतक्यांत तें जादु मंडळ सर्व विसर्जन होऊन पुनः ती आपले पूर्वस्थळीं स्वरूप प्राप्त झाली. तेव्हांपासून तीस मरणासन्न अवस्था प्राप्त होऊन ती कृशो-

ती अगदीं कृश होत चालली आहे हा प्रकार काय असावा, म्हणून तिला आपल्या जादूचे बळानें शोध करितां तिसरे दिवशीं तीस तो कळून आला. आणि प्रेमोद्गारानें ह्मणाली, माझ्या जिवाचे संकटाचा सांठीं त्या धैर्य सागरानें आपल्यावर जरी दुर्घट प्रसंग गुदरला तरी धैर्यानें त्याचा अंगीकार करून मला वांचविलें. अहाहा!! किती मजवर प्रेम! काय तो निश्चय! काय ती मनोनिग्रह शक्ति! धैर्य तरी किती ह्मणून सांगूं? मजसाठीं तो ऐश्वर्यसंपन्न हृदयाभिराम राज्यादि सर्वस्वाचा त्याग करून वनवासी झाला आहे। ईश्वर आतां आह्मा उभयतांची एकत्रता केव्हां करील तो सुदीन असो आपल्या स्मरणा विषयीं रात्रंदिवस तिनें हृदयांतरत्नास निश्वासरूप मण्यांची जपमालाच धारण केली आहे. हें एक त्या मजवांचून अन्यत्र कोणीच जाणत नाहीं. फार काय सांगूं? आपल्या सौख्याचा योग तीस लौकरच होईल तर बरें. नाहीं पेक्षां तिचे जीविताची आशा धरणेंच नको. घरीं सर्व यथास्थित आहे. परंतु आपलें वांचून तिला तें कांहींच रुचत नसून विरहाग्नीनें तिचें शरीर दग्ध होत आहे, त्यास आपल्या भेटिरूप अनुकूल कामोदकाचें सिंचन मिळेल तरच त्याची शांतता होऊन टिकेल. असो. हे सख्या कुसुमचापा, त्या विरह सुंदरीनें आपली शपथ घेऊन मला आपल्या मंदिरीं त्वरित परत बोलाविलें आहे. आतां जरी आपण या कृत्येचे पाशांत बद्ध झालां आहां, तथापि त्यांतून पार पडण्याची युक्ति तिनें आपणास कळविण्यास मला सांगितलें आहे. त्याप्रमाणें योजनेंसह कृती करून लागलीच निघून सांगतों त्या मार्गानें येऊन तिची हेतुकामना परिपूर्ण करावी. ती युक्ति अशी. या जादुगारणीपाशीं भारलेला एक जिवाचा ताईत असून तो तिचे कंठांत कंठमण्या प्रमाणें निरंतर विलसत आहे. तो कांहीं सम्यक् योजनेनें तिजपासून हस्तगत करून घेऊन त्यांत सर्व जादु

मंत्र प्रयोगाच्या योजनांची एक चिठी आहे ती पाहून हेतुकार्यभाग त्वरित साधावा. आतां त्या ठिकाणाहून मला ती येण्याचे पूर्वीच गेलें पाहिजे. नाहींपेक्षां हेतुकार्योद्देश निला कळून येऊन सर्वच विपरीत होईल. त्या करितां जाण्या साठीं मी आज्ञा मागतों. हें ऐकून **कुसुमचाप** ह्मणाला अद्याप चार पांच घटका दिवस आहे त्या अर्थी हे प्राणप्रिया **पक्षिवर्या** आपल्या या योजिलेल्या कार्यास विपर्यास येण्या विषयींची तिळमात्र भीति या समयीं बाळगणें नको. तुझा सहवास माझे स्थैर्याचा स्तंभ आहे. या करितां धैर्यास धरून जरा दम धर. त्या प्रमदेची येण्याची वेळ झाली कीं मीच तुला क्षणविलंब न करितां जाण्यास रजा देईन. परंतु एवढेंच विचारतों कीं, त्या फकिरा जवळून तूं मजजवळ येण्या पूर्वी म्हणजे त्या प्रमोददायिनी **वसंतकोकिलेच्या** प्रथम भेटींत निजजवळ तूं माझ्या गुणस्वरूपाची तारीफ केल्या पूर्वी तूं मला दोन वेळ पाहिलें होतें म्हणून मागें सांगितलेंस, तो प्रकार आजपर्यंत विस्मृतीनें विचारण्याचा तसाच राहिला; यास्तव तो आज या आनंदावधीस मयीं कथन करून माझी शंका दूर कर. हें ऐकून **मध्वनाथ** ह्मणाला आपली ही दीर्घकाळीं निघालेली शंका आतांच दूर करितों. श्रवण करा.

**मध्वनाथः**— हे रूपगुण संपन्न वरा राजकुमरा, मी घरून त्या माझ्या दुःखदायक प्रवासास निघण्याच्या एक वर्षा पूर्वी मी आपल्या बापा बरोबर कांहीं जवाहीर वगैरे खरेदी करण्या करितां घरून निघून उत्तम जवाहीर असल्याचा शोध लागल्या वरून आपल्या (नागपूर) राजधानींत आलों असून तेथील प्रसिद्ध धनकोटी साहुकाराची आमची भेट होऊन त्याच्या ओघानें शहरांतील मुख्य माणीक चौकांतील चार रस्त्याचे कोंपऱ्यावरील एका मोठ्या वाड्याचे हवाशीर बंगल्यांत बिऱ्हाड घेतलें असून

एकंदर सुमारें तीन चार आमचा मुक्काम होता. अस्समानच्याचा र पांच घटिका दिवसास नित्य नवा एकरंगी झोंकदार पोषाग करून आपल्या श्वेतवर्णा हिरकणी नामें चमकदार उमद्या घोडीवर आपण बसून माफक लवाजम्यानिशीं आपली सडी स्वारी त्या रस्त्यानें प्रत्यहीं सहल करण्यास जात असतां आपल्या-देदीप्यमानरूप व इभ्रतीकडे पाहून सर्व लोकांची तटस्थता होत असे. व त्याच प्रमाणें आह्मीं पितापुत्र त्या दिवाणखान्यापुढील सरज्यांतून नित्य आपल्याकडे अवलोकन करीत असतां आपलें अनुपमेय सौंदर्य तशीच आपली त्या देखण्या घोडीवर बसण्याची मांडही, या नेत्रांस त्रास रहित आपलेकडे पाहण्यास लावून चित्तास आकर्षण करून घेते. असो. त्या धनशेटी साहुकाराजवळ व त्याच्या द्वारें मिळून आह्मीं एकंदर पांच कोटींचें जवाहीर खरेदी केलें. त्यांत एके दिवशीं त्या साहुकाराचे चोहाट्यावरील दुकाना पुढील विस्तृत व हवाशीर गुळगुळीत चिरेबंदी ओट्यावर मागील चार घटका दिवसाचे सुमारास आम्हीं व आह्मां भोंवती हिऱ्यांची परीक्षा करणारे कितीएक बाणीदार-लोक बसलेले असून एका मोठ्या दीर्घवर्तुळाकार व तेजस्वी हिऱ्याची परीक्षा चालली असतां आप आपल्या परीक्षे प्रमाणें किमती होऊन शेवटीं सवालाख रुपये त्याची किंमत सर्वानुमतें ठरली. अशा समयीं आपली स्वारी त्या रस्त्या वरून नित्या प्रमाणें जात असतां त्या सर्व हिरे परीक्षकानीं उठून पुढें सरसावून आपल्यास मुजरे करतांच, आज इतकी एक समयावच्छेदें करून आपली मंडळी येथें कशासाठीं जमली असून हे दोघे अनोळखी सभ्य गृहस्थ कोठील कोण आहेत वगैरे बद्दल आपण त्यांस पृच्छा करितांच त्यांजकडून कारण वगैरे समजल्यावर आपण स्वारीच्या मंडळीस तेथेंच थोपवून त्या दुकानाकडे वळून आला.

व तो हिरा आपण बराच वेळ निरखून पाहिल्यावर साश्चर्य स्मित हास्य करून आपण दर्शविलें कीं, हा जर घेणेंच आहे तर याचा सुंदर देखावा व याजवरील अपूर्व चमक यांज करितांच ह्मणून एक हजार रुपये याची किंमत द्यावी. कारण हा केवळ कारिगार असून तीसही दिव्याकृति व हें तेज कोण्या कसबी प्रवीण कारागिरानें आपल्या बुद्धिकौशल्यें करून स्वकर्तानें देऊन हिरेपणास आणिला आहे. धन्य त्याची!!! पाहिजे असल्यास याचा खोटेपणा आतांच पहा. घणाच्या तिसऱ्या ठोक्यास, गर्भीं अतिसूक्ष्म अस्पष्ट दोरे असल्या प्रमाणें याचे पांच तुकडे होतील, हें मी खात्रीनें सांगतों. हें आपलें भाषण ऐकतांच तो धनशेटी, ती परीक्षक मंडळी व आह्मीं उभयतां असे मोठ्या विस्मयानें चकित झालों. व तत्क्षणीं प्रचीती करितां त्यावर तितके घण घालितांच त्याचे पांचच भाग झाल्याचें पाहून तर सर्व परीक्षक मंडळी लज्जेनें खालीं पाहूं लागली. मग आपण पुढें चालतें झाल्यावर आपल्या परीक्षेची कमालपणानें शिफारस होऊन आपल्यास खरे मनानें "वाहवा वाहवा" शब्दानें सर्वांनीं धन्यता दिली. व त्याच प्रमाणें आपली विद्वत्ता, चतुरस्रपणा, धूर्तता समयसूचकता, सदयता, परोपकार, धैर्यशौर्याद्यनेक गुणांची तारीफ सर्वतो मुखी निरनिराळे प्रकारें होत असतां रात्रीचे आठ वाजून साश्चर्यानंद भरित सर्व मंडळी घरोघर गेली. मग दुसरे दिवशीं आपल्या रूपगुण संपन्नाची भेट घ्यावी या इच्छेनें आह्मीं पितापुत्र आपले बंगल्यांत येऊन वर्दी लावितांच आपण पुढें स्वतः येऊन अत्यादरानें आह्मांस अंतर्धामीं नेऊन, बहुमान, फळफळाफळीची मेजवानी, पान सुपारी, गुलाब अत्तरादि उपचारें करून आह्मांस संतोष देऊन चार घटका सुरस व उपयुक्त भाषणप्रयोगानें आमचें अंतःकरण अगदीं वेधून टाकिलें. व ओळख देख

कायम राखण्या विषयीं लीनतेनें प्रीतिपुरःसर दर्शाविलें. तदनंतर आह्मीं स्वनगरास जाण्या करितां येथून उद्यीक प्रयाण करितां लोभवृद्धि असण्या विषयीं प्रार्थना करून आपला निरोप घेतला.

त्यावर चार पांच महिन्यांनीं ईश्वरें आपल्या साकरबाईस लग्नसमयीं आपल्या भेटीचा योग अकस्मात आणून आनंद दिला. तो सर्व पुढील प्रकार आतांच आपल्यास श्रुत केलेल्या साम्र हकीकती वरून कळून येईल. फार काय सांगू? आतां घटकाभर दिवस उरला. ती कुत्या येण्याची वेळ झाली असावी. आतां मी येतों. मात्र युक्तीनें तेवढा ताईत हस्तगत करून घेऊन विलंब न करितां सांगितलेल्या मार्गानें कोठें उसंत न घेतां आपण जे वसंत ते त्या मंजरवा कोकिलेच्या नगरास आगमन करून तीस आनंद द्यावा; इतकें बोलत आहे तों दरवाज्याचें कुलूप वाजलें. तितक्यांत तो पक्षी भरारी मारून चालता झाला.

नित्या प्रमाणें ती जादुगार अस्तमानाचे घटका दिवसास येतांच अगोदर तिनें कुसुमचापास शेजारीं पलंगावर बसवून प्रेमानें त्याचे कंठास मिठी मारली. त्यानेंही विशेष प्रेम दाखवून तिचें अंतरंग रिझविण्या साठीं तिचे हेतूनुरूप कांहीं विनोदपर भाषणें केलीं. नंतर त्या रात्रीं तीं दोघें एकांतांत असतां ती त्यास ह्मणाली, प्राणवल्लभा, सर्व खाणें, पिणें, भोगविलासादि यथास्थित; तशीच मीही नवयौवनारूपवती आपणास इच्छानुरूप अनुकूल असून इतरही कोणत्याच गोष्टीची येथें कमतरता नसतां आपल्या शरीरीं दिवसानुदिवस कृशता येत आहे, तर आपले अंतःकरणीं अशी कोणती चिंता प्राप्त झाली आहे? येथें सर्व स्वस्थता असून आपला सतेज मुखचंद्रमा असा निस्तेज कां बरें झाला? या ठिकाणीं मी नसल्या वेळीं इतर कोणाचीआप-

णास जाचणुक आहे, किंवा काय दुःख असेल तें या दासीस परिहारार्थ निवेदन करा. आपल्या केंसास जो धक्का तो माझे जिवासआहे असें समजा.

**कुसुमचाप.**- (इच्छानुरूप अनायासेंच बोलण्याचाओघ आल्या वरून हेतुकार्योद्देशास अनुसरून) प्राणप्रिये, तूं खरें ताडलेंस. संकोचानें मी आजपर्यंत बोललों नाहीं. तूं असतां मला काळजी व दुःख कशाचें आहे? परंतु तूं दरबारीं असल्यावरया ठिकाणीं मी सदैव एकटा वास करीत असून हा प्रदेश तर जादूचा या वरून एखादे समयीं कोणी माझी प्राणहानी येथें केल्यास माझी खबरही तुला लागणार नाहीं. आणि मला भलत्याच-स्थितीनें अपमृत्यु येईल कीं काय, ही मात्र रात्रंदिवस आलीकडे काळजी उत्पन्न झाली आहे. या ठिकाणीं कधीं कधीं भर दोन प्रहरीं पिशाच्या दिकांच्या भयसूचक गर्जनायुक्त आरोळ्या कानीं येतात. आकाशांतील ढगां प्रमाणें प्रथम आगीचे कल्लोळ प्रदर्शित होऊन त्यांतून धुराचे चोंहोंकडे सोट उत्पन्न होऊन दिशा व्यापून गेल्यानें नेत्रांस अंधारी येते. किंचित्‌ही निद्रा आली तर मज पाशीं शतावधि उग्ररूपा डाकिणी येऊन मला जागें करून आं करीत अदृश्य होतात.

**मन्मथपुरा.**- (असें विपरीत भाषण ऐकतांच क्रोधाविष्ट होत्साती पाय आपटून) सर्व जादुगारां मध्यें जी मी श्रेष्ठ तिचें हें स्थान. त्याजकडे वांकड्या दृष्टीनें पाहण्यास कोण समर्थ आहे? अशा कामास प्रवृत्त होऊन जो कोणी आपला छळ-करण्यास पाहील त्याचा मी तत्काल नाश करीन.

**कुसुमचाप.**- हें सर्व खरें म्हणूनच कोणापासून या ठिकाणीं आजपर्यंत मला धोका झाला नाहीं; परंतु न जाणो मत्सरभावानें दुसरी भलती कोणी जादुगार स्त्री माझा अगोदर नाश

करील. नंतर तिचें तूं पारिपत्य करणार. मग त्या पासून लाभ काय होणार हें दिसतच आहे.

हें त्याचें ह्मणणें तिला सर्व खरें भासून त्या कामांधनें सदैव तो विषयसुखार्थ सांनिध्य असण्याचे इच्छेनें जो शुकरूपस्थानें सांगितलेला तिचा जीव कीं प्राण वज्याच्या योगानें ती कोणाची पर्वा न राखून गर्वानें सर्वांस तुच्छ मानीत असे, असा जो महान् मंत्रानें भारलेला आपल्या गळ्यांतील ताईत, तो तिनें लागलीच काढून त्याच्या हातीं दिला. आणि ह्मणाली या ताईताचे महान् प्रभावें करून कोणी कसाही कपटी महान् जादूगार आपल्यावर चाल करून आल्यास त्याचें तेज सर्वथैव हरण होईल; या करितां आपण आतां निश्चिंत असावें. असें सांगून पहांटेस उठून ती दरबारीं गेली.

ती इच्छित वस्तु हातीं येतांच मोठा संतोष होऊन **वसंतकोकिलेची** आतां केव्हां भेट होईल, असें त्यास होऊन गेलें. चार घटका तिचे विरहानें वेडा होऊन पुनः शुद्धीवर आला. आणि मनांत, जिणें आपल्यास पेंचांत आणिलें तीस आपणही आतां हात दाखवून जावें. असा मोठ्या धैर्यानें विचार करून तो ताईत लागलीच उघडला. त्यांतील मंत्रोक्त लिहिलेली असलेली चिठी पाहिली. तींत असें होतें कीं, जो कोणी जादूचे पेंचांत सांपडला असेल त्यानें हा मंत्र ह्मणून पाहिजे तिकडे जावें. त्याजवर कोणाची कोणतीही तडफ आणि इलाज चालणार नाहीं. आणि कोणी कसाही मंत्रबलाढ्य जादूगार असो त्याजवर त्या मंत्राचा प्रयोग केल्यास लागलीच आपल्या इच्छेनुरूप सर्व प्रकार घडतील. म्हणजे मनांत असल्यास तो अन्य जादूगार जळून खाकही होईल. तसाच त्याच्या पठणें करून इच्छित पदार्थ आपोआप प्राप्त होतील. मग बीजां सहित तो षोडशाक्षरी मंत्र तोंडपाठ करून त्याचा त्यानें कांहीं स्वप्रास्थर्थ प्रत्ययही घेतला. मग येथून आतांच निघून

जावें; परंतु तीस न विचारतां दगा देऊन जाणें हें रास्त नाहीं. असें त्यास वाटून तो ती दरबारांतून येण्याची वाट पहात बसला. मग नित्या प्रमाणें ती जादूगार तेथें आल्यावर तिनें त्याचे तोंडावर नजेला पाहून म्हणाली; महाराज, आज तबियत तर ठीक आहेना? तो ह्मणाला आज काय विचारावें? फारच चांगली आहे. तुझीच वाट पहात बसलों आहें. आतां ज्या हेतु संकल्पानें मी घरून निघालों असून जिच्या विरहें करून व्याप्त आहें त्या फरवदाची बसंनको किलेकडे जाण्यास हा मी निघालों पहा. तुला विचारल्या वांचून जाण्यास माझा पाय निघेना. म्हणून हें दर्शन तुला आज पुनः तरी घडलें. तुला आतां हा राजपुत्र पुनश्च दिसणें दुर्लभ आहे. या करितां याजकडे एकवार पूर्णपणें अवलोकन कर, असें त्याचें खडेतोड भाषण ऐकतांच ती चपापून अतिशय घाबरी होऊन तिची हिंमत खचून गेली. आणि मनांत समजून आपणास दूषण देऊन ह्मणूं लागली हे मूढे मत्तमयूरी, पुरुषावर भरवसा ठेऊन तूं आपल्या हातानें आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊन भयंकर परिणाम करून घेतलास. मूळ विषय-व्याप्त होऊन आपली जी प्राणरक्षक व इच्छिताभीष्ट सिद्ध करणारी गुप्त वस्तु तिचा त्वां कां बरें त्याग करावा? वास्तविक आहे जे ह्मणून दुर्जय विषयप्रोवऱ्यांत बळेंच उडी घालतात त्यांचा असाच दुष्ट परिणाम व्हावयाचा. हें स्पष्ट आहे. मग तिनें अति दुःखानें धरणीवर मस्तक आपटलें. व विशेष खेद करीत आहे तितक्यांत सावध होऊन कांहीं उपाय करून पहावा. या हेतूनें कांहीं मंत्र म्हणून तिनें एक नारळ जमिनीवर आपटला. त्या सरसें लागलीच कुसुमचापासभोंवतीं अक्राळ विक्राळ हजारों श्रृंगिंग प्रगट उभे राहून त्यांनीं एकच गर्जना करून दिली. तथापि त्या नाईनाचे बळावर त्यानें त्या सर्व भयंकर कृत्यांस तृण

तुल्य मानिलें. त्यांची प्रीति त्यास कोहींच वाटली नाहीं. नंतर स्व तः त्यानें त्यांजवर मंत्र फेकतांच त्या सर्वांचा एका क्षणांत नाश होऊन पूर्ववत् सर्व स्वस्थ झालें. हें पाहून तिनें विचार केला कीं, याजवर आपण आतां कांहीं कसाही यत्न करून प्रयोग चालवि ला तरी व्यर्थ आहे. दीन जाणून व्यर्थ होऊन लीनतेनें त्याचे पायावर मस्तक ठेऊन आत्मरक्षणार्थ बहुत प्रकारचें आर्जव करूं लागली, आणि ह्मणाली महाराज, प्रीतीमध्यें माझें अंतःकरण आसक्त होऊन अप्राप्य जी माझे जिवाची वस्तु ती मी आपल्यास शुद्ध अंतःकरणानें दिली असून कपटानें अशी मान कापून जाणें हें आपल्यास उचित आहे काय? आपलें प्रिय इच्छून प्रसंगीं प्राणही देण्यास प्रीति साठीं जी सिद्ध आहे तिचा गुप्त घात करणें हें कृतघ्नपण नव्हे काय? कुसुमचाप ह्मणाला, तूं ह्मणतेस असाच अकृत्रिम प्रकार ज्या ठिकाणीं उभयपक्षीं खरा आहे त्या ठिकाणीं हें तुझें बोलणें वास्तविक शोभलें असतें. परंतु तूं विचार कर. पूर्वीच्या आणि आतांच्या तुझ्या स्थितींत किती अंतर आहे! मी जीच्या साठीं सर्वस्वाचा त्याग करून विदेशी होऊन भटकत फिरत आहें, तिची प्रीति मला न घडूं देण्या विषयींचे अनेक दुर्घट दुर्यत्न करून तूं मला जादुसंबंधानें वेडें करून जबरदस्तीनें आपले कैदेंत ठेविलें. हें तुझें अकृत्रिम काय? हा तुझा लटका प्रेमभाव मला घटकाभरही प्रिय न वाटून तुझ्या वज्र पाशांतून कोणत्या प्रकारें सुटका होत्साता तुला चटका लावून जीची अक्रम करणी त्या प्रियकरणी वसंत कोकिलेकडे केव्हां जाईन. याचीच वाट पहात होतों; तो समय ईश्वर कृपें करून आज प्राप्त झाला. तूं तर तिचा सर्वस्वीं नाश व्हावा अशी पूर्ण इच्छा धरून आपल्या जादुमंत्र प्रभावें करून तिजवर तसा प्रसंगही आणिला होतास. परंतु तिचें जीवित्वरक्षणा साठीं तत्काळ मी तुला प्रेमभाव

दाखवून तुझ्या हेतु कार्यास अनुसरल्या मुळेंच सर्व यथास्थित झालें. आतां इतकेंच कीं, तुझा प्रीतियोग या देहास घडला आहे, त्या अर्थी मी कृतघ्न होऊन तुझा प्राणनाश करीत नाहीं. हाच उपकार समज. मनांत आणीन तर हा सर्व तुझा जादु प्रदेश एका क्षणांत नाहींसा करून टाकीन समजलीस?

त्या त्याच्या समर्पक व कडीच्या बिनतोड खऱ्या भाषणानें ती निरुपायानें निरुत्तर होत्साती आपलें सर्व दुष्कृत्य मनांत आणून व तसेंच यानें माझी अगदीं दुर्दशा करून हा माझे हातावर हात मारून देखत देखत चालला असतां यास प्रतिबंध करण्याची शक्ति मला राहिली नाहीं. हें मनांत येऊन वारंवार खेद करून रडूं लागली.

मग तो राजपुत्र कुसुमचाप आपल्या तयार असलेल्या घोड्यावर आरोहण करून हे प्रमदे मत्तमयूरि, आतां खेद करून उपयोग काय? ही तुझी दुष्कृतीच तुला फळास आली परंतु या पुढें तरी तूं सर्व कवटाळ सोडून देऊन सुधारणुकेनें सद्वर्तनें ठेवशील तर ईश्वर तुझें बरें करील. असो आतां येतों असें म्हणून कु० चाप मोठ्या आनंदानें तेथून निघाला.

---

## अंक आठवा.

श्लोक (वसंततिलकावृत्त.)

सद्वर्तनास करितां दृढ निश्चयानें
विघ्नें हरूनि परमेश भया लयानें॥
संकल्प, त्या परि मनोरथ पूर्ण सर्व,॥
होऊनि ईश्वर कृपें सुख हो अपूर्व १

तो राजपुत्र कुसुमचाप त्या मत्तमयूरीचें ठिकाण सोडून आ-

पल्या हेतुस्थलास जाण्याच्या उभारणीनें एकटा महारण्यांतून मजल दरमजल करीत जातांना त्याचा साथी जो घोडा तो एके दिवशीं प्रातःकाळीं बांधल्या जागीं मेलेला पाहून त्यास अनिवार्य दुःख झालें. पायीं चालल्या मुळें व वाटेच्या हरयेक श्रमामुळें व अन्न न मिळाल्या मुळें मार्गांतील कंदमूळफळें खात गेल्यानें दिवसें दिवस क्षीण होऊन मुखावर निस्तेजता आली. तरी त्या वसंतकोकिलेला हृदयंगनेच्या संगमा साठीं आपल्या जीवाची आशा न धरितां तसेंच हाल व दुःख सोशीत शुकपक्ष्यानें सांगितलेल्या खुणे खुणेच्या धोरणानें मार्ग क्रमित चालला असतां एकविसावे दिवशीं प्रातःकाळीं नित्या प्रमाणें मुखमार्जनादि विधि उरकून चालला तों चार घटका दिवसाचे सुमारास दूर अंतरावर पश्चिम भागाचे मैदानांत कांहीं लखलखीत असून त्याचें तेज फांकलें आहे. त्या तेजावर त्याची नजर ठरेना. तें तेज त्यास कांहीं विलक्षणच भासलें. तेव्हां मनांत चपापून म्हणतो, हें काय असावें बरें!! कांहीं जादुमंडळप्रकाश तर नसेल ना! इतके दिवस कष्टानें प्रवास करूनही शेवटीं हेतुपूर्णतेचें कांहींच चिन्ह दिसत नसून कदाचित् जादूचे पेंचांत पुनः सांपडण्याचा प्रसंग येतो कीं काय कोण जाणे! हे देवाधिदेवा, अद्याप तुला त्या दीनाची करुणा कशी येत नाहीं? नंतर कांहीं असो. परंतु जवळ जाऊन पहावें. अशा निश्चयानें पुढें गेला तों एका मोठ्या शहरचा कमानीदार दरवाजा असून त्याच्या गलथ्या गलथ्यानीं वेलाकृतीनें व पुष्पाकृतीनें देदीप्यमान हिरे, पाच माणकें, कोंदण करून जडलीं आहेत असें पाहून त्याचे मनांतील भीति जाऊन त्यास खचित वाटलें कीं, आपण मुख्य ठिकाणींच येऊन ठेपलों. तरीही खात्रीपूर्वक समजल्या खेरीज त्यास चैन पडेना. मग तसाच अगदीं जवळ जाऊन चोंहींकडे पाहूं लागला. तों त्या शहरा सभोंवतालचा वर्तुलाकार मुस्तकीम राजकोट रुंद व उंच

असून त्याचें दर्शनी काम पेंलूदार एक सांच्याचें स्फटिकमय चिन्यांचें केलेलें आहे; त्या मुख्य दरवाजाच्या शिरोभागीं काळ्या कुळकुळीत गंडिका शिळेचा एक गुळगुळीत कलमदानी घाटाचा अष्ट पेंलू गलथेदार संगीन मोठा चिरा पुर्टाल झोंकानें बसविलेला असून त्याचे सभोंवती सारख्या रुंदीन रंगीबेरंगी चढविलेल्या भिन्यांतून उत्तम कारागिरीचें सोनेरी वेलबुटीचें रेखींव काम खुलत आहे. व त्या चिन्यांच्या बरोबर मध्यभागीं तेजस्वी हिऱ्यांनीं दिव्य व भव्या कृतीनें "सिंहदरवाजा" हीं प्रदर्शित केलेलीं अक्षरें आपल्या तेजानें पाहणाऱ्यास दिपवीत आहेत. त्या सिंह दरवाजाच्या वरच्याभागीं कोटावर रक्षणार्थ पांच हजार हत्यारबंद सिबंदीकडील लोक त्यांत कोणी तलवार बहाद्दर, कोणी बंदुकवाले, कोणी तिरकमठेवाले असे जय्यन शिपाई आपआपल्या हुद्या प्रमाणें पोषाक वगैरे करून चाकरीत दक्षतेनें उभे असून चोंहींकडे लक्ष्यपूर्वक अवलोकन करीत आहेत; त्याच प्रमाणें जागोजाग कोटावरून व ठिकठिकाणीं खालीं शहरचे रक्षणार्थ पायदळ फौज व घोडेस्वार, तलवारी, बंदुका, भाले, बरच्या, तिरकमठे हातीं घेऊन सावधपणानें पाहरा करीत आहेत. बुरजा बुरजानीं हंसवाहिनी यक्षिणी तोफा जणू काय शत्रूंस भक्षण करण्या करितांच आं पसरून उभ्या आहेत. व त्या मागून शेंकडों गोलंदाज दारूगोळ्याच्या भरपूर सामानासह तयारीनें उभे आहेत. असें अवलोकन करून मोठ्या धैर्यानें कुसुमच्या पानें नगरांतून येणाऱ्या एका वृद्ध व सभ्य वारगिरास विचारलें कीं, बाबा, या शहरचें नांव काय व येथील अधिपती कोण आहे? त्या सभ्य गृहस्थानें त्याचा हा लीनतेचा प्रश्न ऐकून मुखाकडे पाहतांच त्याचें तेज व स्फूर्ती वरून हा कोणीतरी निःसंशय थोर घराण्यांतील कोणा भाग्यवंताचा मुलगा असून कांहीं कारणास्तव अशा गरीबीच्या स्थितींत प्रवास करीत आला आहे. असें तत्क्षणीं

जाणलें. आणि मोठ्या नम्रतेनें ह्मणाला, महाराज, मला तर आपण कोणी थोरांचे चिरंजीव दिसत असून आपण अशा दुर्दशेंत येथें येण्याचें काय कारण असेल तें कृपा करून सांगावें. तेव्हां राजपुत्र ह्मणाला, तुह्मीं ह्मणतां तसेंच खरें. परंतु अशास्थितीचें कारण सांगण्यास मला रुचत नसून माझ्या प्रश्नाचें उत्तरच प्रस्तुत मला प्रिय आहे. हें ऐकून त्या राजकार्य समंजस पुरुषानें त्याचा विशेष खेद न घेतां त्या शहराचें नांव मणिपूर व याचा धनी नागपाली राजा आहे असें तत्क्षणीं सांगितलें. हे त्याच्या मुखांतील इच्छित शब्द कानीं पडतांच एकदम त्याची आनंदमय वृत्ति होऊन गेली. वीर्य तेज प्रकटपणें दिसूं लागलें. नेत्रांस वारंवार स्फुरण होऊन सर्व गात्रांस चर्धमान शक्तींचीं चिन्हें होऊं लागलीं. हृत्सरोवर आनंद तरंगीं त्याचें चित्त मोकळेपणें हेलावूं लागलें. त्या समयीं आपणाशीं म्हणतो, आतां मात्र माझ्या प्रश्नाचें साफल्य होण्याचा समय जवळ आल्याचें दिसत आहे. घर सोडिल्या पासून आज पर्यंत अशी उमेद व हुरूप या मार्गी एक दिवसही या जीवास वाटला नाहीं. असें बोलून तसाच पुढें जाऊन एकदम त्या विस्तीर्ण सिंह दरवाजाचे आंत म्हणजे पहिले कोटाचे आंत जात असतां त्याचे रूपाकडे पाहून कोणी एकानेंही त्यास जाण्यास बिलकूल अटक केली नाहीं.

असा तो राजपुत्र कुसुमचाप आंत जाऊन पाहतो तों त्या शहरा भोंवती संगमरवरी पडकोट असून त्याचे सभोंवार रुंद एक जलभरित खंदक आहे; त्यांतील दोहों बाजूंच्या छोटे खानी झाडांतून व हिरवळी मधून हरिण, रोही, सांबर, गवे वनगायी हीं तुंद चतुष्पाद जनावरें ठिकठिकाणीं विहार करीत असलेलीं दृष्टीस पडलीं. तसाच पुढें जाऊन त्या खंदकावरील काढ घालणीच्या मोठ्या लकडी पुलावरून शहर मार्गानें दुसऱ्या दर-

धाजाच्या पलीकडे गेला. आंतील बाजूस जागोजाग हवाशीर व गीचे व त्यांतील देखाव्याचीं रमणीय उंच विलासमंदिरें बाहेर- डोंकावीत आहेत. ज्यांच्या मजल्या मजल्याचे ठिकाणीं हस्तिदंती कटान्यावर सोनेरी व जडावाचें काम केलेलें असें तेजःपुंज सशो भित तसेच भव्य व उंच हवा खाण्याचे संगमरवरी मनोरे नजरे- स गर्क करीत आहेत; तद्वांच्र कित्येक शुभ्र स्फटिकांची, कित्येक निवळ काळ्या गंडिका शिळांचीं व कित्येक नानारंगीं संगमरवरी पाषाणाचीं उंच व डौलदार अशीं प्रतिबिंब दाखविणारीं विराज मान देवालयें आपल्या आढ्यतेंत गर्क आहेत व त्यांवरील रत्न खचित कांचनमय कळस सूर्य किरणें करून विद्युल्लते प्रमाणें नेत्रांस वरचेवर दिपवीत आहेत. असें अवलोकन केलें.

शहरास आरंभ होऊन ज्यांची लक्षावधी रुपयांचीं अप्र तिम देखाव्याचीं कामें केलीं आहेत असे मोठे मोठे वाडे, हवेल्या व घरें एकसारख्या समांतर हारीनीं व समरुंदीच्या प्रमाणानें बां धलेलीं आहेत. पेठा पेठांनीं सारख्या अंतरावर साधलेल्या प्र- कार चौरस्त्यां वरून गोड पाण्याचे मोठमोठाले हौद पाण्यानें भरलेले असून त्यावरून स्त्रिया पुरुषांचीं स्नान वगैरे करितांग र्दी जाहली आहे. रस्त्या रस्त्यांनीं कित्येक पालख्या मेणे रथां- तून, कित्येक हत्ती घोड्यां वरून तसेच हजारों पादचारी लोक आप आपल्या हेतुकार्यास मोठ्या लगबगीनें जात येत असल्या मुळें सर्व शहर गजबजलें आहे; व्यापाऱ्यांच्या पेंठांतून लक्षा वधी रुपयांची देवघेव सारखी चालू आहे; सोनार, पटवेकरी, शिंपी, रफूगार, आदी करून कसबी लोकांच्या दुकानांतून स्त्रिया पुरुष व मुलें यांची एकसारखी रीघ लागली आहे; गंधी, फुल माळी, तांबोळी, हलवाई, काची लोक यांच्या पेंठा पेंठांतील दुका नां वरून लोकांची गर्दी खळतच नाहीं; खेरीज शहरच्या बरोबर

मध्यभागीं साधलेल्या अफाट व अप्रतिम मार्णाक चौकांत नित्य स-
काळच्या गुजरी बाजाराची व्यवस्थेशीर व थाटमाटाची मांडणूक,
पदार्थ मात्रांची विपुलता लक्षावधी लोकांची गर्दी आणि देव घेवी-
चा खरेपणा यांहीं करून ती गुजरी विशेष साजरी दिसत आहे.
सारांश तें सर्व शहर स्वच्छतेचें माहेर आणि लक्ष्मीचें मंदीर असें
पाहात जाऊन अत्यानंद पावला आणि वाटेच्या सर्व शीण भाग ह-
रून त्यानें एके हौदावर स्नान केलें व विकत घेतलेली कांहीं फळ
फळावळ भक्षण करून पाणी प्याल्या नंतर त्यास बरीच हुषारी
वाटली. मग त्यानें एकास विचारिलें कीं, सरकारचा राजवाडा को
णीकडे व तो किती दूर आहे? त्या गृहस्थानें येथून या डावे रस्त्या
नें थोडा दूर जा, ह्मणजे पुढें महाराज गंज लागून तुह्मांस नेथून
राजवाडा दिसेल; असें सांगितलें. त्या प्रमाणें **कुसुमचाप** राज-
वाड्या समोरील मोठ्या घोडरंगण मैदानांत आनंदानें जाऊन दाख
ल झाला. इतक्यांत डावा डोळा लवून राजवाड्यांतून कांहीं दर
बारी लोक बाहेर आलेले त्याचे दृष्टीस पडले. परंतु त्या सर्वांचा
असलेला काळा पोषाग व त्यांची फिक्कट मुद्रा हीं राजपुत्राच्या ते
जस्वी मुखचंद्रा आड येऊन त्यास तत्क्षणीं निस्तेजता प्राप्त झा-
ली. तिकडील रिवाजा प्रमाणें त्या विपरीत व भयप्रदर्शक प्रगट
चिन्हां वरून त्याचें तोंड खरकन उतरून वेड्या सारखी वृत्ति होऊ
न गेली. पुढें एक पाऊलही टाकण्याची त्यास शक्ति न उरून ह्मणूं
लागला, या समयीं शकून तर अगदीं दुर्धर विघ्नसूचक होत आहे-
त त्यास हें संकट परमेश्वर निवारण करो. मग जीव अगदीं घाव
रून तसाच कांहीं पावलें पुढें जात आहे, या अवसरांत राजवाड्या
चे कोटांतून अंगावर लक्षावधी रुपयांचें जवाहीर असून घोड्या
वर बसलेला एक बृहन्नडावेषधारी ( क्लीब ) कांहीं लवाजम्यानिशीं
बाहेर आला. हें राजपुत्रानें पाहून हा कोणी जनानखान्यावरील अ-

धिकारी असून राजप्रिय मनुष्य असल्याचें ओळखिलें. मग तसा च लगवर्गानें त्याचे जवळ जाऊन त्यास मुजरा करितांच त्यानेंही याजकडे अवलोकन करून मुजरा घेतला. व मोठा विस्मय पावून त्याचे रूपाकडे पाहातच कांहीं वेळ पर्यंत तेथें स्तब्ध झाला. आणि ईश्वरी देणें अपार आहे! वाहवा!! त्यानें या पुरुषास काय अनुपमेय सौंदर्य संपत्ती दिली आहे!! असें ह्मणून त्यानें त्यास विचारिलें. कीं, आपण त्या शहरास कोठून व कां आलां आहांत? हा प्रश्न ऐकून राजपुत्र ह्मणाला, सांगतों तिकडे संतोषानें लक्ष्य द्या. मी हें अर्मतिम शहर व येथील अधिपती महाराज ह्यांच्या दर्शन इच्छेनें सर्व वैभवादिकांचा त्याग करून घर दार सोडून हाल व दुःखें सोशीत येथें फार दूर देशाहून आलों आहें; परंतु परोपकारार्थ मला आपण एवढें अगोदर कळवा कीं, येथील सर्व दरबारी खिन्न वदन असून ह्यांनीं असा काळा पोषाग कां स्वीकारला आहे? हे शब्द ऐकतांच त्या मनुष्यानें एकदम दुःखाचा सुस्कारा टाकून कपाळावर हात ठेवून उदास वाणीनें उत्तर दिलें कीं, तुह्मांस काय सांगूं? ज्या सुंदरीचे मुखा वरून रतिमदन ओंवाळून टाकावे; जीच्या अद्वितीय सौंदर्याची ख्याती सर्वत्र गाजत आहे; जिचे सारखी सुंदरी मनुष्याचें तर काय; परंतु देवादिकांच्याही नजरेस आजपर्यंत कोणीच आली नसेल. किंबहुना या मागें असें अघटित सौंदर्य कोणाचेंही नसून पुढेंही होणें असंभाव्य आहे. जिच्या प्राप्ती साठीं हजारों रूपवान राजपुत्र झुरणीस लागून विरहानें प्राणास मुकले; असें जें येथील नागपाल राजाचें दिव्य कन्या रत्न, तें आज पांच दिवस झाले कोण्या जादुगारानें आपल्या मंत्रसामर्थ्यानें तिच्या महालांतून एकदम उडवून नेलें. असें त्याचें पुरतें सांगणें संपलें नाहीं तोंच राजपुत्र एकंदर मतलब समजून ततक्षणीं धाडकन भूमीवर पडला. मी कोण आहें हें देहभान ठिकाणीं

न राहून दुःखाश्रूंनीं डोळे भरून येऊन ह्मणाला, हर हर!! हे पर मेश्वरा, जीच्या साठीं निश्चयानें सर्व राज्यादि सौख्यास पाणी सो डून देहाची आशा न धरितां मार्गांत आलेलीं धुरंधर विघ्नें व अड चणी टाळीत व सहन करीत व तसेंच दिवसांचे दिवस उपास काढी त व कितीही या जिवास श्रम व कष्ट झाले तरी हेतुकार्य सिद्ध्यर्थ तें सर्व कांहींच न गणून देवाधिदेवा! तुझ्या अगाध शक्तीनें आज मी त्या दुर्गम हेतुस्थलीं दाखल होऊन किंचित् या जीवास जों सुखाचा वारा लागत आहे तोंच माझें दुर्दैव आड येऊन त्यानें त्याजकडून (वाऱ्याकडून) आपलें झिंझामारुत प्रखर रूप प्रगट करवून माझ्या सर्व हेतुवृक्षास मुळासकट उपटून टाकविलें. कायही विचित्र दैवगति!! अशा प्रकारें दुःख विलाप करीत अस तां तिची लावण्य मूर्ति डोळ्यां पुढें उभी राहून ह्मणतो, हे मानिनी, हे सौंदर्य लहरी, हे चारु गात्रे, हे प्राणजीवनें, तुझ्या एकवारही प्रत्यक्ष अवलोकनानें त्या हर्षाचें ज्ञानवन किंवा तुजसह वर्तमा न एक भाषण या हतभाग्यास घडलें नाहीं. आतां तुज वांचून हा प्राण वांचवून तरी काय कर्त्तव्य आहे? असा दुःखविलाप करि-तांनां तोंडांतून पुढें एक शब्दही फुटेना. अंतरीं थोडी असलेली शुद्धि नाहिंशी होऊन निश्चेष्ट झाला. अशी त्याची दुर्निवार स्थि ति पाहून तो बृहन्नड अतिशय घाबरून म्हणाला. हा निःसं-शय **वसंतकोकिलेच्या** विरहानें व्यास झाला आहे. ह्यांची अ शी स्थिति होण्याचा दोष माझे माथीं येत आहे. व्यर्थ त्यास मीं ही खबर कळविली. नंतर लागलीच घोड्या खालीं उतरून त्या चे अंगावर जवळ असलेलें केवडा मिश्रित गुलाब पाणी सिंच न करून त्यानें आणखीही पुष्कळ सितोपचार त्यास सावध हो ण्यास केले. तरीही तो शुद्धीवर येत नसल्याचें पाहून लागलीच दुसरीं कामें एकीकडे ठेऊन अगोदर धांवत राजवाड्यांत राजा-

जवळ जाऊन त्यानें हात जोडून प्रार्थना केली कीं, सरकार, आज **वसंतकोकिला** बाइसाहेबांच्या स्मरणाचा नूतन दीपक प्रज्वलित झाला आहे. कोणी एक मदनरूप, गंभीर स्मितहास्य वदन तरुण राजपुत्र सर्व राज्यादिकांची आशा सोडून वसंत कोकिलेच्या प्राप्ती साठीं वनवासी होऊन नानासंकटें व दुःखें भोगीत येथें आला आहे. मजपासून जादुगाराची खबर त्यास समजतांच तो तिजविषयीं शोकाक्रांत होऊन बेशुद्ध होऊन धरणीवर पडला आहे. मी-आपले कडून त्यास सावध होण्यास पुष्कळ उपचार केले तथापि तो अद्याप पावेतों पूर्वस्थितींत आला नाहीं. या वरून तो जिवंत आहे किंवा नाहीं, हें कांहींच समजत नाहीं महाराज काय सांगूं आपण त्यास पहाल तर तत्काळ मोह पडेल. असा तो दिव्य मोहरा आहे. हें त्याचें भाषण श्रवण करितांच साश्चर्य दुःख उत्पन्न होऊन राजानें सांगितलें कीं, त्वरा करून जाऊन त्यास उचलून येथें घेऊन या. अशी आज्ञा होतांच जी सरकार, असें म्हणून जवळ असलेले लोकांनीं तेथें जाऊन त्यास मेण्यांत घालून राजाजवळ आणिलें. त्याजकडे पाहतांच ती लावण्य मूर्त्ति अवलोकन करून त्याजविषयीं राजास प्रेमाचा कळवळा उत्पन्न होऊन त्यानें त्यास सावध होण्यास नाना प्रकारचे शितोपचार आणि धुरंधर राजवैद्यांकडून पुष्कळ दुसरे उपाय आपण स्वतः करविले. तेणें करून तो मागील चार सहा घटका दिवसाचे-सुमारास बराच शुद्धीवर येऊन आपण कोण आहोंत याची स्मृति त्याचे हृदयमंदिरांत विहार करूं लागली. सभोंवती ते राजलोक दृष्टीस पडतांच तो घाबरून उठून बसला आणि मुख्य जडावाच्या सिंहासनावर महा इभ्रतवान् व अति तेजस्वी राजा बसला असून सभोंवती सर्व राजदरबार मंडळी इतमामा प्रमाणें आपआपल्या जागीं बसले आहेत; मधुन मधुन भालदार व चोपदार

ललकारत आहेत; तमाम हुजरेलोक आपआपल्या यजमानाच्या बाजूस उभे असून आज्ञा होण्याची वाट पहात आहेत; तो दरबार दिवाणखाना, व त्यांत मध्यंतरीं साधिलेली राजकचेरीची षोडशकोनाकृति अतिविस्तृत जागा, यांच्या अद्वितीय मांडणुकीचा अप्रतिम देखावा; तसेंच नकशीदार सुरूचे खांब व वरील खुबीच्या जाळीदार छतावरील सुवर्णमय रत्नजडित केलेल्या अवर्णनीय कामाचा लखलखाट आणि भोंवताली च्या प्रतिबिंबदाखविणाऱ्या घोटीव भिंतीवरील सुवर्ण रेखांकित अंगुष्ठमात्र स्तबक चित्रांचा विद्युत्प्राय चकचकाट; इत्यादि अतर्क्य संपत्त्यैश्वर्य अवलोकन करून **कुसुमच्चाप** राजपुत्र असतांही मोठा विस्मय पावून अगदीं गर्क होऊन गेला; परंतु तो अतिधूर्त व चतुर असल्यानें-तें भांबावणें कोणाचे दृष्टोत्पत्तीस येऊं न देतां जसा काय आतांच खऱ्या शुद्धीवर आला आहे, अशा प्रकारानें झटकन उठून त्यानें राजरीती प्रमाणें अतिनम्रतेनें राजास तीनवार मुजरा केला. राजानेंही त्याचें तेज व इभ्रत यां वरून त्याची योग्यता आणि मोठे कुलीन राजघराण्यांतील साम्यतेची त्याची वर्तन शक्ति जाणून आपण उठून त्याचा हात धरून सिंहासनावर आपले शेजारीं त्यास मोठ्या अदबीनें बसविलें. इतकाही त्याचा सन्मान स्वतः राजानें करून त्याचे श्रम निवारण केले, तथापि ते त्यास अधिकच दुःखप्रद होऊन तिचे विरहानें कांहींच गोड लागेना. वारंवार नेत्र सजल होऊं लागले; परंतु तें सर्व दुःख आंतले आंत आवरलें. हें समजून राजानें त्यास धैर्य देऊन त्याच्या आई बापांची राजधानीसह पूर्वापर सर्व हकीकत विचारून घेतली. तदनंतर कुसुमच्चापानेंही राजास घरचें सकल कुशल वर्तमान विचारितांराजाचे डोळे दुःखाश्रूनें एकदम भरून येऊन म्हणाला सर्व यथास्थित आहे; परंतु हे बालका, काय सांगू? जी रूपयौवन-संपन्न

कालिका, जी केवळ सौख्यभूमिका, ज्या मनोहरणीच्या स्वरूपता विद्युज्ज्योतीस मोहित होऊन कित्येक राजपुत्र पतंगानीं उड्या घालून यत्नसाध्य न होतां आपलीं शरीरें दग्ध करून घेतलीं. जी अन्यांस दर्शनास केवळ भाद्रपद शुद्ध चतुर्थी प्रमाणें भयप्रद चंद्रकलाच; अशी जी माझी प्राणांहून प्रिय कन्या वसंतकोकिला तिचे प्राप्तीस्तव एक महान् जादुगार प्रयत्न करीत असतां कित्येक महिने तिजविषयींचा त्याचा यत्न आमचे पुढें निष्फळ होऊन शेवटीं त्यानें आज पांच रोज झाले, आम्हांस दगा देऊन मंत्र सामर्थ्यानें तीस महालांतून उडवून नेऊन आह्मांस विरह समुद्रांत लोटून दिलें. हर हर!! तिचें स्मरण झालें म्हणजे आह्मां उभयतांची तर काय परंतु ज्यांनीं ज्यांनीं तीस बाल्यत्व संबंधानें पाहिलें आहे त्यांचीही चित्तवृत्ति ठिकाणीं न राहून अंतःकरणें करपून जात आहेत! आज पांच रोजांत महाल आणि खाणें पिणें बरोबर माहित नसून तिचे वियोगानें कंबर खचून गेली. तिला बाहेर जाऊन वारा आणि पराधीनता हीं बाळपणापासून मुळींच माहीत नसून निरंतर इच्छिलेले पदार्थ, दासदासी, सेवेंत तयार असून राहण्यास हवाशीर सोनेरी महाल अशा मिजासींत आमचे वेगळी कधींच झाली नाहीं. तिची प्रस्तुत अशा प्रकारची स्थिति व्हावी काय? इच्छा परमेश्वराची!! पांच दिवस तरी आह्मांशिवाय पराधीनतेंत ती जिवंत-राहिली असेल नसेलच. असें ह्मणून राजा अनावर दुःख झाल्यानें भरसभेंत आक्रोश करीत मूर्छित झाला. तरी लवकरच सावध होऊन त्यानें विवेक रज्जूच्या आकर्षणानें झोंके खात असलेला दुःखरूप पतंग (वावडी) तत्क्षणीं आंवरून घेतला. **कुसुमचाप** ह्मणाला आपण आतां बिलकूल दुःख करूं नये. मी आपल्यास मान्य आहें. परंतु अगोदर इतकें क-

ळवा कीं, त्या जादुगारानें तीस कोठें नेलें? राजा ह्मणाला येथू न पूर्वेस पांच कोश पर्यंत ती गेल्याचा बरोबर ठिकाण तिच्या जवळ असलेल्या एका शहाण्या व बोलक्या शुक पक्ष्यानें येऊन आह्मांस कळविल्या वरून तेथपर्यंत जाऊन पाहतां पुढें त्या जादुगारानें एक मोठा आगीचा किल्ला रचला असून त्याचे संरक्षणार्थ निर्माण करून ठेवलेल्या हजारों विक्राळ यक्षराक्षस व्याघ्र सिंह इत्यादिकांच्या गर्जना व भुजंगाचे फूत्कार ऐकूं येऊन तिकडे जाण्यास कोणाही इलम्याचा इलाज चालत नसल्या मुळें पुढें कांहीं पत्ता लागत नाहीं. तरीही. तो शुक पक्षी अद्याप त्या खटपटींत आहेच. कु. चाप ह्मणाला, आतां आपण निःसंशय स्वस्थ राहा. मला जर तिजविषयीं इतकी बित्तंबातमी शुकमुखांची आपणा कडून मिळत आहे तर तो बापडा जादुगार मज धुरंधरा पुढें तीस कसा कोठें घेऊन जातो हें मी आतां पाहतों. मी या पावलींच जाऊन माझ्या प्रखर तर जादु इलमानें त्या दुष्टाचा पराभव करून तीस सोडवून आणितों. असें बोलून मोठ्या आवेशानें उठून सभेंत उभा राहिला. त्याच्या त्या उभारणीचें खरें स्वरूप पाहून राजानें त्यास पोटाशीं धरलें. आणि ह्मणाला, बाबा, हें असें साहस कर्म करण्या विषयीं तूं प्रवर्त्तक होऊं नको. तूं राजपुत्र धैर्यशील आहेस खरा, तथापि तुला इकडील परकीय मुलखाचें आणि जादूचें परिज्ञान कोठून असणार? पहा आह्मीं सर्वच जादुविद्येत निष्णात असून वंश परंपरा ही विद्या आमचे घराण्यांत तर पाणीच भरीत आहे. असें असतां आह्मांसही अजिंक झाले त्या अशा जादुगारावर तूं चाल करून जाऊन आपला जीव मात्र धोक्यांत घालून घेशील- तूं सुकुमार बालक असून उगीच आपले आईबाप आणि राज्यादि सौख्यास अंतरूं नको- तुजवर

माझें प्रेम पुत्रा प्रमाणें जडलें असून तुला अशा संकटांत माझ्या नें कसें घालवेल? आतां माझी प्रपंच आणि राज्यकामीं कोणती च आशा उरली नाहीं, करितां तूं हा आग्रह सोडून देऊन स्वस्थ पणें येथें राहून माझें राज्य पहात जा. आणि पुढें हें राज्य तूं निर्वेधपणें उत्तम प्रकारें चालविशील अशी तुझे शहाणपणाव रून व त्या लोकोत्तर इभ्मतीवरून माझी पूर्ण खात्री होत आहे. ध्यानीं, मनीं, स्वप्नीं नसतां अकस्मात तुझ्या त्या दुर्लभ योग सुखाची जोड, ईश्वरें मला दिल्या कारणानें माझी प्रिय कन्या का यमच आहे असें मी समजतों. तेव्हां **कुसमचाप** आपणावर रा जाचें विलक्षण वमलेलें प्रेम पाहून अतिनम्रतेनें प्रार्थना करून ह्मणाला. महाराज, मी आपणास अंतर देईन असें होणार नाहीं. व हें मी निश्चयपूर्वक सांगतों कीं, कोणी कसाही मंत्र बलाढ्य जा दुगार असो; परंतु माझ्या जादुमंत्ररूपी सूर्यप्रकाशा पुढें त्यांचें तेज केवळ खद्योतवत आहे. करितां अशा यःकश्चित जादुगारा पासून माझें कांहीं विपरीत होईल ही शंका तिळमात्र आपण म नांत आणूं नये. आणि हेंही मी आतां स्पष्टपणें कळवितों कीं ज्या हृदयंगमेच्या प्राप्तिसंकल्पानें सर्व राज्यैश्वर्य सौख्यादिकांची स- र्व आशा सोडून जिवावर उदार होऊन अनेक देश फिरत असतां जादुसंबंधानें जागोजाग झालेली अटक आणि प्राप्त झालेलीं सं कटें व विघ्नें सोसून मार्गांत हाल व दुःख क्लेश भोगीत येथप- र्यंत येऊन ठेपलों; ती जर आतां प्राप्त न होईल तर या जीवितावें तरी कर्तव्य काय आहे!! प्रीती साठीं राजा पेक्षां मला मरणच उचि त आहे. जर मी या समईं मतांत कांहीं विकल्प आणून कृतसंक ल्पाचा भंग करीन तर कित्येक कल्प पर्यंत अभंग दुष्कीर्तीस मी कारण होईन. असो. आतां तर मी सर्व परी जिवावर उदार आहें. ज्या परमेश्वरानें अनेक दुर्धर संकटांतून मुक्त करून येथपर्यंत

मला सुखरूप आणिलें. तोंच तिची भेट करण्या विषयीं समर्थ आहे. असें त्याचें दृढनिश्चयाचें आणि **वसंत कोकिलेच्या** प्रीतीनें चाललेलें भाषण **सुलोचना** पट्टराणीनें नजीकच्या पडद्यांशी दालनांतून साग्र ऐकून तीसही त्याजविषयीं प्रीतिभाव उत्पन्न होऊन त्यास बोलावून अस्तमानीं आपले जनान महालांत घेऊन गेली.

राजपुत्र **कुसुमचाप** राणीचे महालांत जातांच त्याच्या भोंवतीं इतर राजपत्न्या अवांतर आश्रित स्त्रिया आणि दास दासी जमा होऊन त्याचें सौंदर्ययुक्त गोजिरवाणें मुख पाहतांच अंतःकरणीं सुख पावून थक्क झाल्या. त्यास भूक लागली असेल हें जाणून राणीनें अगोदर सपंचामृत पक्वान्नाचें ताट तयार करवून आणविलें. परंतु त्यानें इच्छा नसल्याचें खुणेनें दर्शविलें. तोंच तो ब्रह्मनट पुढें होऊन पायीं मस्तक ठेऊन प्रार्थना करून ह्मणाला कीं, महाराज **वसंतकोकिला** बाईच्या विरह दुःखें करून आज पांच दिवसांत कोणीही अन्न ह्मणून ग्रहण केलें नाहीं. परंतु आज या आपल्या मनोहर व सुखकर आगमनानें त्या दुःखाचा जरा विसर होऊन सर्वांनीं भोजन करण्याचा निश्चय केला आहे. याजकरितां आपण जर भोजन करणार नाहीं तर मग कोणीही कांहींच खाणार नाहीं. ते समयीं त्यानें निरुपाय होऊन त्यांच्या संतोष व सन्मानार्थ त्यांतील कांहीं घांस बळेंच खाऊन त्या सर्व राजस्त्रियांस जेवण्यास परवानगी दिली. आणि निद्रेच्या मिषानें तेथेंच एका पलंगावर तोंडावर आंगवस्त्र घेऊन पडला. परंतु त्यास झोंप कोठून लागणार! सारें लक्ष त्या अभिरामेकडे लागलेलें असल्या मुळें तिची सोज्वळ मूर्ति त्याचे डोळ्यां समोर उभी राहून ती सारि रात्र त्यानें तळमळत वर्षा प्रमाणें मोठे दुःखांत काढली.

उजाडतांच **कुसुमचापानें** त्या जादुगारावर आपल्या ... विद्येचा इलम चालवून वसंतकोकिलेस सोडवून आणण्याचे कामीं

निघण्याचे तयारींत आहे इतक्यांत तो दूरलक्षी मध्वनाथ कीर पक्षी एकाएकीं त्या महालांत येऊन आपल्या धन्याचे पायीं लोटांगण घालून हातावर येऊन बसला. त्यास पाहतांच कुसुमचापानें हर्षभरीत होत्सातां आपल्या साहकारी मित्राची या समयीं अकस्मात् झालेली प्रिय भेट हाच आपल्या कार्यसिद्ध्यर्थ लाभप्रद शकुन आहे, असें जाणून त्याच्या उमेदीस पुष्टीकरण होऊन म्हणाला कां पक्षिराया, कशी काय खबर? मध्वनाथ म्हणाला खबर तर सर्व विदितच झाली असेल. मी आपल्या तपासांतच होतों. काल आपण येथें येऊन दाखल झालां आहां. ही परमेश्वराचीच पूर्ण कृपा समजली पाहिजे. आतां तो दुष्ट जादूगार आपल्या मनांत जरी गर्व असून आपल्या पुढें कंबर बांधून शांभर यत्नही चालवील, तरी आपल्या ताईताच्या प्रभावें करून आपणा जबरदस्तां पुढें त्याचा कांहींच टिकाव न लागून शेवटीं आपण पुरी खबर घेऊन त्याची मुस्त किंवा कबर बांधाल यांत मुळींच संदेह नको. त्या त्याच्या, समयास हुरूप देणाऱ्या भाषणानें कुसुमचाप वीरश्रीस चढून राजाज्ञा घेण्यास आला.

आदल्या दिवसच्या घडलेल्या सर्व कृत्यां वरून ही बातमी सर्व शहरभर लागलीच पसरून नगरवासी सर्वत्र लोक त्यास पाहण्यासाठीं राजवाड्या समोर येऊन उभे राहिले. राजानें त्याची पूर्ण उभारणी पाहून कांहीं तरी याच्यांत त्या जादुगारा बराबर भिडण्याचें मंत्रसामर्थ्य असल्या शिवाय यानेंही एवढी उमेद धरली नाहीं. हें निश्चयानें जाणून लागलीच दरबार भरवून त्यास आपले सिंहासनावर सन्मानानें बसविलें. त्यास यश प्राप्तीस्तव आपण स्वतः प्रधान व सर्व अमीर उमराव आदी करून राजकीय लोकांनीं परमेश्वराची अनन्य भावें प्रार्थना केली. मग तत्क्षणीं राजाज्ञा घेऊन श्री महाकाली देवीचें स्मरण करून त्या पक्ष्या सह राजपुत्र कुसुमचाप मोठ्या

आवेशानें (राजा कांहीं दुसरे मांत्रिक व इतर लोक सात्यास देत-असतां ते नकोत असें स्वच्छ कळवून) एकटाच वाड्या बाहेर प-डून रथारूढ होतांच सर्व लोकांनीं आशीर्वादात्मक जयघोष केला.

मग कुसुमचाप मध्वनाथाचे सात्यानें त्या किल्याचे मार्गानें निघून गेला. पुढें जाऊन पाहतो तों दूर अंतरावर आका-शापर्यंत ज्याचा विस्तीर्ण भाग असून चक्राकार सारखा फिरत आहे. व ज्याच्या ज्वालांची धग लांबवर येत असून तें अरण्य न-ष्ट झालें आहे. असा अधांत्रीं असलेला आगीचा किल्ला दृष्टीस पडला. आणि त्याच्या सभोंवती रक्षणार्थ ठेवलेल्या मोठ मोठ्या भुजं-गांचे फूत्कार व व्याघ्र सिंह आणि विक्राळ पिशाच, यक्षिणी, डाकि-नी, झोटिंग आदि करून रक्षकांच्या भयंकर गर्जना ऐकूं येत आहे-त. इतरांस तो भीतीकर खटाटोप पाहण्या बरोबर मृत्यूच यावयाचा. परंतु त्यास तें कांहींच वाटलें नाहीं. मग त्यानें अगोदर त्या पुढील विघ्नाचें निवारणार्थ तत्क्षणीं जवळ असलेला जादुमंत्राचा ताईत हातीं घेऊन त्यास कृती प्रमाणें मंत्रोक्त धूप दाखवितांच तिकडे ए-कदम मोठा हाहाकार होऊन त्या रक्षकांचा सर्व खटला पाव घटकें-त जळून फस्त होऊन त्या धुरानें आकाश दिशांसह कोंदून गेलें. घट-केंत पुनः पूर्ववत् जिकडे तिकडे शांतता झाल्यावर तो किल्ला अगदीं सन्निध दिसूं लागला. मग त्यानें जयकालिमाता असा जयघोष क-रून मंत्राचे भार फेंकीत घडघडाट रथ अगदीं किल्या जवळ नेऊन ठेपविला. त्या रामबाग मंत्रभारांनीं त्या ज्यादुगाराची तत्क्षणींच लचिचल होऊन कोणी तरी धुरंधर मांत्रिक आपणावर चाल करू-न आला आहे असें जाणून तो ज्यादुगार किल्याचे कोटा वरून अ-वलोकन करून पाहतो तों किल्याच्या लक्षावधी तमाम रक्षकांची रक्षा करून त्या आगीच्या लोळरूप किल्यास जमिनीस लोळवून म-ला यमनगरीच्या पल्याम पोंचविण्याच्या हल्याच्या कडेकोट तयारींत

कोणी एक रथारूढ सुकुमार बालक खालीं सिद्ध आहे. असें पाहतां च तो जादुगार क्रोधाविष्ट होऊन त्याचा नाश करण्यास उच्चारण मार ण उच्चाटनादि करून आपल्या जादुगिरीचे कित्येक क्लिष्ट प्रयोग चालवीत असतां त्या त्या पासून उत्पन्न होणारें निरनिराळें अरिष्ट **कुसुमचापानें** ताइताच्या सात्त्व बलानें तृणापरी लेखून आप- ल्या जमदग्नि मंत्रस्पर्शें करून क्षण क्षणांत नष्ट करून टाकिलें. हें त्याचें अघटित मंत्रसामर्थ्य पाहून जादुगाराची पांचावर धारण ब सून ह्मणतो. हें खरेंच मजहून जबरदस्त मनुष्य असून याची मजवर पुरी शिस्त आहे. त्यां अर्थी आतां मला ह्या जाळून फस्त केल्या खेरीज स्वस्थ बसावयाचा नाहीं. हें निश्चांत. तथापि वर्षेच आवेश आणून भीति उत्पन्न होण्या सारख्या दीर्घ स्वरानें ओरडू न ह्मणाला, रे, काळच्या पोरा मतिमंदा, मिलिंदा, तूं **वसंतकोकि** ला स्वर्णवर्णा गंधाढ्या केतकीस लुब्ध होऊन तिच्या अधरां मु मध प्राशनाच्या भ्रांतीनें भ्रमण करीत येथें आला आहेस, परंतु हें पक्कें जाण कीं, त्या मधूचा लेशाही प्राप्त न होतां तिच्या भोंवतीं अ सलेले हे माझे जादुमंत्ररूप कंटक तुझ्या आंगांत रुतून, आणि तसेच जादुमंत्र प्रयोग परिणामरूप केंसर (रजःकण) हे तुझ्या डोळ्यांत शिरून तूं बहूरत्व आणि अंधत्व पावून व्यर्थ प्राणास मु कशील. त्या करितां त्या प्राणघातका केतकीच्या तूं भरीस न प डून एखाद्या सुखदा कमलिनीकडेसच परिभ्रमण कर. ज्ञा. या- समयीं तुझी मला दया येऊन तुला मी जीवदान देत आहें. व्यर्थ आपले आई, बाप, आप्तवर्ग आणि इतर सर्व गृहसुखांस मु- कूं नको. हें त्याचें गर्वोक्तीचें परंतु केवळ धमकावणीचें असलेलें भाषण त्याच्या मुखचर्येवरून **कुसुमचाप** समजून म्हणाला रे, राजकन्यारत्न वंचका, ठका, चोरा, हा तुझा लटका आविर्भाव मज समर्थ राजकोतवाला पुढें घटकाभरही टिकावयाचा नाहीं.

माझ्या प्रखर तर जादुमंत्ररूप चौदावे रत्नाचा फटका तुझ्या पाठीवर आतां बसला ह्मणजे तुझ्या सर्व यत्नाचा भंग होऊन तुझी सूटका होणें कठीण. या समयीं तुझी मला कीव येत आहे, याजकरितां आपला जीव बचावणें आहे तर आपल्या सर्व पूर्व मतास सोडून देऊन ती राजकन्या आपली दुहिता मानून स्वहितार्थ या मज जामाताचे हातांत मनोमय संकल्पानें कन्यादान करून देऊन लोकांत धन्य हो. याहून अन्यमार्ग तुझें जीवित्व कायम राहण्यास कोणताच नाहीं. चल. एक राजकन्या लौकर आणून माझे स्वाधीन कर, अथवा उगीच वटवटवट करून असा लपून छपून न रहतां सामना करण्यास मजसमोर मैदानांत येऊन लवकर उभा रहा. कां? अशा द्विधा अंतःकरणें करून उशीर कशास लावीत आहेस! असें पुष्कळ प्रकारें सांगितलें तरी ज्यादुगार कोणतीच गोष्ट स्पष्ट पत्करीत नसून आपलें स्थान न सोडतां गुप्त रितीनें कांहीं इल्माच्या खटपटीच्या तयारींत गुंतला आहे अशी त्याच्या साथी मध्यनाद्य हेरानें तत्क्षणीं येऊन नक्की बातमी देतांच कुसुमचापानेंही त्याच्या असावधपणाची संधी साधून क्षणमात्र अवकाश न करितां आपल्या इच्छित प्रदर्शनानें श्री कालिकेचें स्मरण करून त्या ताईतास सबीज मंत्रोक्त अष्टगंधाचा धूप दिला. त्या सरसा तिकडे ज्यादुगाराच्या सर्वांगाचा एकदम एकसारखा अतिशय दाह होऊन त्याचा सर्व प्रकारें इल्माज खुंटून हाहाकार करीत धडपडत तो त्यामैदानांत त्याचे समोर येऊन पडला. हतवीर्य होऊन पुढें हालचाल करण्यास शक्ति न उरल्या मुळें पडल्या जागींच दीन वाणीनें प्रार्थना करूं लागला कीं, हे जादुविद्यामंत्र निपुणा, मी तुमच्या पायीं शरणागत आहें. माझा हा विलक्षण झालेला दाह शमन करून मला जीवदान द्यावें. हे मंत्रशूरा सुकुमारा, आतां मी ती राजतनया तुमच्या स्वाधीन करून खेरीज तुमच्या चलाख व अतितेजस्वी-

जादुविद्या मंत्राच्या अघटित प्रभावें करून मी गर्वहत होत्सा-
ता सुप्रसन्नतेनें माझी रूपवती उपवर झालेली लाडकी मुलगी
चंद्रप्रभा तुह्मांस जिवें भावें अर्पण करून कन्यादानाचें स्वरें-
श्रय मिळविण्यास मी फार उत्कंठित झालों आहें. व मी सर्व-
बोलल्या प्रमाणें करीन अशा खात्री साठीं ही माझी गुरूची श-
पथ घ्या.

अशा त्याच्या अति लीनपणाच्या दीन भाषणानें कुसुमध्वा
पास त्याची दया येऊन त्यानें तत्काळ आपल्या मंत्राचा उलटा
प्रयोग केला. त्या सरसा त्या जादुगाराचा सर्वत्र दाह शमून पूर्ववत
त त्याची स्थिति झाली. उभयपक्षीं ऐक्य व प्रेमभाव घडून तत्का-
ळ जादुगारानें तें आपलें सर्व जादुकौशल्य आंवरून घेतलें. तेव्हां
नें सर्व भारूड एके क्षणांत जिकडलें तिकडे विरून जाऊन त्या-
किल्ल्याचे जागीं फक्त एक गर्द शीतळ अंबराई मात्र उरलेली ह
ष्टीस पडली. मग कुसुमध्वापास त्या दिव्य विजय रथांत बसवू
न तो चित्रसेन जादुगार आपण सारथ्यस्थानीं बसून तींत प्रवेश-
करून तो रथ मध्यभागीं घडघडाट हांकून नेत असतां तो मध्व
नाथ शुकपक्षी रथशिरोभागीं केवळ हनुमानसा शोभून ते
उभयतां कृष्णार्जुना परी दुरून पाहणाऱ्यांस भासूं लागले. म-
ध्यभागीं रथ जाऊन दाखल होतांच तेथून थोड्या अंतरावर तेथी
ल कांहीं आम्रवृक्षांच्या मंडपाकृति कुंजाखालीं दिव्य तल्पकाव
रील मऊ आच्छादित परांच्या गादेल्यावर बसून मखमालीनें म
ढविलेल्या बाजूंच्या दोंहों कठाऱ्यांच्या कोनाकृति भागीं गालास
डाव्या हाताचा टेका देऊन टेंकून बसलेली एक नवयौवनाट्या, हे
मवर्णा पिंपाळभाला, मृगविलोलनयना, स्मित सुहास्य वदना, दि
व्यकपोला, सरळ नासिका, बिंबाधरा, कंबुकंठा, घनस्तना, कृशो-
दरी सरल हस्ता, चारुगात्रा, मनोहरा, अशी चमकत असलेली-

विद्युल्लता दृष्टीस पडून राजपुत्र कुसुमचापाचे डोळे वरचे वर दिपून हीच चित्ताभिलाषा सौंदर्यकला वसंतकोकिला आहे. अशी खात्री होऊन आनंद भरानें परमेश्वराच्या अगाध करणीस व अंतःकरणीं स्तव करूं लागला. व तिजसमोरील दुसरे भागीं-त्याच मंचकावर दुसरी एक रूपवती तरुणी मनोरमा रामा बसली असून भोंवताली आसपास तेनांतील व पाहऱ्याकडील मि कून कांहीं लोक आणि घोड्यां सह एक सुंदर रथ तेथें असल्या चें त्यानें पाहिलें.

इकडे आपणा सभोंवतालचें सर्व अग्निमय जगड्वाळ ए काएकीं शांत होतांच त्या वसंतकोकिलेस जरा उसंत वाटू न समोरून एक दिव्य रथ आपणाकडे शीघ्र गतीनें येत अस-ल्याच्या अवलोकनानें तीस आपला मनोरथ पूर्ण होण्याचें सुचि न्ह स्फुरण होऊं लागलें. व कांहीं अंतरावर तो रथ येऊन थब-कतांच पुढें सारथ्यभागीं स्थित असलेल्या सदा उदासीन, रुष्ट करुणाशून्य आणि पापबुद्धि अशा आपल्या अपहारी जादुगा-राची सानंद शांत सद्यवृत्ति आणि पुण्यदृष्टि हीं तीस तत्क्ष णीं दिसून आल्या वरून ती सविस्मय आनंद पावली. आणि आंतील मुख्य स्थानीं एक रूपतारुण्य संपन्न पुरुष केवळ मद नाचा पुतळा, आजानुबाहु असून ज्याच्या कमसन्न रवटवी त मुखकमलावर वीर्य विजयश्रीचें विलक्षण तेज फांकलें-आहे, असा दिव्य मोहरा अवलोकन करून, तसेंच आपला मध्य नाथ शकपक्षी ज्याच्या ध्वजस्तंभीं स्थित आहे असें पाहून, हा च हो लावण्यवतंस राजपुत्र या अग्निचक्राचा विध्वंस करणा र असून हाच राजहंस माझ्या मानस सरोवरीं विहार करणा र आहे. असें तत्काळ जाणून परमेश्वराच्या अगाध लीलेस्तव आनंद स्फुरण पावून ती त्याच्या गुणाचें गायन करूं लागली.

मग ते उभयतां रथाखालीं उतरून परस्पर हात धरून कांहीं पाव लें चालून त्या हंसकुंजाजवळ येतांच **वसंतकोकिला** आणि **चंद्रप्रभा** त्या उभयतां झटकर खालीं उतरून त्यांस नमस्कार करून लज्जेनें बाजूस उभ्या राहिल्या. इतक्यांत तो शुकपक्षी आपल्या प्रियकरणीच्या हस्तकमलावर जाऊन बसला. मग प्रीति पूर्वक सन्मानानें **कुसुमचापास** त्या तल्पकावर बसवून तो चित्रसेन आपण त्यावर दुसरे बाजूस बसला, आणि शेजारचे दुसरे मच्छरदानी युक्त छोटेखानी पलंगावर त्या दोघीजणींस- त्यानें बसावयास सांगितलें. मग **चित्रसेन** प्रेमभरानें ह्मणाला हे राजबाले **वसंतकोकिले** आतां हें माझें वचन ऐकून घेऊ न मनांतील सर्व शंका आणि भीति दूर कर. जरी आज पर्यंत तुजविषयीं माझी पापबुद्धीरूप लता दिवसानुदिवस विस्तार पावून फैलावली होती, तरी तिचा आज या धुरंधर मदन मूर्ती- च्या बलवत्तर मंत्रशस्त्रानें समूळ नाश होऊन तुला मी धर्म क- न्या मानली आहे. आणि तुज रति वधूस हाच मदन वर योग्य- असून तुमचा जोडा या भूमंडलावर अखंड साजो. आणि ही माझी औरस कन्या चंद्रप्रभा या राजमान्या हून अन्यांस न देण्या चा माझा मनसंकल्प झाल्या प्रमाणें इजलाही वरण्यास या राज कुमरास तुझी मुभा असावी. व हा जो अनाथ तुह्मां उभयतांचा खरा साथी शुकदेहधारी **मध्वनाथ** पक्षियास पूर्वदेह प्राप्त करून देण्याचें माझे हातीं आहे, त्या अर्थी मी शर्तीनें आज पा- सून एक महिन्यांत तसा प्रकार घडवून यास आनंदैश्वर्य महोत्स वानें आपल्या घरीं पाठवून सुखरूप पोंचवीन. हें त्याचें वचन ऐ कून आनंदगगनीं न मावून राजकन्या गहिंवरून गेली. आणि हें आपल्या खऱ्या दृढसंकल्याचें फळ ईश्वरें आज दिल्या मुळें त्याचा अनन्य भावानें आठव करूं लागली. इतक्यांत तयारीची वर्दी येतां

च त्या सर्वांनीं यथाक्रम भोजन करून थोडी वामकुक्षी झाल्या नंतर आज्ञा होतांच मागील प्रहर दिवसाचे सुमारास दोन्ही रथ तयार झाले. एके रथीं कुसुमचाप आणि वसंतकोकिला आणि दुसरे रथीं चित्रसेन कन्येसह वर्तमान बसून मणिपुराचा रस्ता धरून ते दोन्ही रथ थरथरात धरणी कांपवीत अति वेगानें चालले.

तिकडे, आपण विजयी होऊन वसंतकोकिलेसह येत असल्याची खबर कु. चापानें राजा नागपाली यास जासुदा करवीं आगाऊ दिल्या प्रमाणें स्वारीची तयारी करून सर्व ऐश्वर्यासह राजा सामोरा येत असतां अस्तमानच्या सुमारास शहरा नजीक च परस्पर गांठी पडून भेटी झाल्या. त्या त्यांच्या आनंदास काय विचारावें!! शहरांत आगाऊ वर्दी देऊन आज्ञा दिल्या प्रमाणेंस र्व रस्त्यांनीं चंदनाचे सड्या वरून चित्रविचित्र रंगी मनोहर रांगोळ्या रेखल्या आहेत; गुलाब, पाच, केवडा, या अत्तरानीं सिंचित अशा गुलाब मोतिया व बटमोगरा आदिकरून सुगंधिक पुष्पें त्यांवरून वेतानें विखुरलीं असून त्यांचा परिमळ चोहींकडे दरवळला आहे.; सर्व रस्त्यांच्या दुतर्फा हारीनीं विजय व सन्मानसूचक दिव्याकृति शब्दांनीं बिलोरी चिराखदानें प्रज्वलित केलीं असून सोनेरी तोरणें, पताका चोहींकडे लखाकत आहेत; माड्या माड्यांच्या दिवाणखान्या पुढील सज्जांच्या पुढल्या बाजूनें हंड्या वगैरेची उत्तम प्रकारची रोषनाई केली असून वरल्या बाजूनें सुवासीक पुष्पांचे मोठमोठाले हार नानाविध आकृतीनीं लटकावलेले आहेत; सज्जांतून तशींच खिडक्यांतून पुष्पवृष्टि करून त्या विजयी राजपुत्रास तुष्टी देण्या करितां तमाम नगर वासी स्त्रिया पुरुष मोठ्या उत्साहानें आप आपल्या मर्यादेनें उभे आहेत. सारांश तें सर्व शहर शृंगारून आनंदोत्सवें करून गजबजलें आहे. अशा दोन घटका रात्रीच्या समयास तीथा-

रमाटाची राजस्वारी शहरांत प्रवेश करिती झाली. पुढील गजेंद्र हत्तीवर रत्नखचित सुवर्णमय खुल्या अंबारींत राजपुत्र कु० चाप, राजा नागपाली आणि कन्या वसंतकोकिला हे त्रिवर्ग बसले असून शेजारच्या दुसऱ्या हत्तीवर आपल्या कन्येसह तो चित्रसेन जादुगार बसला आहे. प्रधानादिक सर्व राजकीय मंडळी तसेच गांवांतील श्रीमान व संभावित लोक मेणे, पालख्या, हत्ती, घोडे, त्या वहना वरून बसले असून मोठ्या गजरानें रस्त्यानें सुवर्ण व रौप्य मुद्रिका उधळीत स्वारी मिरवत गज बाड्यांत जात असतां वारंवार जयघोष होऊन त्या कु० चापावर एकसारखी कुसुम वृष्टी होऊं लागली. अशी ती स्वारी राजवाड्यांत दोन प्रहर रात्रीं जाऊन दाखल झाली. जयजयकार होऊन ती [illegible]र नासिका राजकन्यका वसंतकोकिला त्या मध्वनाथकी [illegible]स्यास उरस्थलीं धरून त्या चंद्रप्रभेसह राणिवशांत आईचे म[illegible]लांत गेली. त्या समयीं राणीसह सर्व स्त्रियांस परमावधीचा आ[illegible] होऊन भेटी झाल्या. इकडे दरबारांत पानसुपारी हार गजरे तु[illegible] गुलाब अत्तर होऊन सर्व मंडळी त्या कुसुमचापाच्यें रूप ज्या[illegible]धा, मंत्रबल, धैर्य, गांभीर्य, वीरश्री इत्याद्यनेक गुणांची विस्म[illegible] वाखाणणी व प्रशंसा करीत घरोघर गेली. व राजवाड्यांत अ[illegible]ची मुळें उपहार होऊन सर्व रवाशी मंडळी आप आपल्या निद्रास्थानीं गेली.

प्रातःकाळ होतांच परमेश्वर कृपेनें आपली कन्या आपणास जिवंत भेटून आज हा आनंदाचा दिवस उगवला. असें जाणून ते दिवशीं राजानें सर्व ज्ञातींचे याचक जनांस लक्षावधी रुपये धर्म करून स[illegible] विद्वान व आश्रित जनांस योग्यतानुरूप उंची पोषाग व भूषणें दिलीं. निराश्रित देवस्थानांचे शुश्रुषेस मोठमोठाले गांव जाहगीर व [illegible] करून दिले. सर्व ज्ञातींस पृथकपणें मिष्टान्न भोजन व जागो-

ज्ञाग रापरिपीच्या मेजवान्या देऊन सर्व नगरवासी जनांस तृप्त केलें. ठिक ठिकाणीं देवालयांतून कीर्तनें व मैदानांत मंडप देऊन त्यांतून नाच, गवय्यांचीं गाणीं, बैठका, तमाशे, रंग गुलाल करवून सर्व लोकांस संतुष्ट केलें. बंदिखान्यांतील मोठमोठ्या शिक्षेचे कैदी बंद मुक्त करून त्यांसही वरील सर्व सुखांस अनुभवविलें. सर्व शहरभर दीपोत्साह करविला. इकडे राणिवशांत राणीनेंही मोठ्या आनंदानें सर्व ज्ञातींचे स्त्रियांस लुगडीं चोळ्या व रुपये धर्म करून सौभाग्य वायनें देऊन सवस्त्रालंकारें १०८ दंपत्य पूजनें केलीं. दासी व आश्रित स्त्रियांस वस्त्रभूषणें इनाम दिलीं. अशा उत्सवानें सर्व शहर ते दिवशीं आनंदभुवन करून सोडिलें. मात्र कुसुम व आणि वसंतकोकिला यांस परस्पर दर्शनाचा योग न आल्या मुळें उभयपक्षीं सर्वथैव लक्ष्य एकमेकांकडे गुंतून त्यानीं ती दिवस रात्र मोठ्या दुःखांत घालविली.

दुसरे दिवशीं रात्रीं राजा नागपाली आणि भार्या राणी सुलोचना एकांत महालीं असतां राणीस ह्मणाला, आपणावर कुसुमचापाचे महदुपकार असून तो वसंतकोकिलेचे प्राप्तीकरितां सर्व घरदार राज्यैश्वर्य सोडून नाना दुःखें व क्लेश भोगीत थेथें येऊन शेवटीं त्यास सुखाचा लेश ही प्राप्त न झाल्या मुळें तो तिजसाठीं आपल्या जिवावर उदार होऊन आपल्या जादुविद्या पराक्रमानें त्या महान् जादुगारा पासून तीस सोडवून आणिलें. खेरीज लावण्य गुणलक्षणानीं तो केवळ प्रत्यक्ष अश्विनी कुमारच भासत असून सत्कुलोत्पन्न आहे. आणि विशेष हें कीं, अंतर्यामापासून त्यास तिचाच ध्यास असल्यानें आजन्म पर्यंत याजकडून तिच्या प्रीतीस यत्किंचितही अंतर होणार नाहीं. ह्या सर्व अनुकूल गोष्टीं वरून आतां दुसरा कांहीं एक विचार न करितां आजचें उद्यांवर न लोटून होईल तितक्या त्वरेनें याशीं मुलीचें लग्न

करून देऊन कन्यादानाचें श्रेय मिळवावें. ह्या माझ्या हेतूस तुझेंही पूर्ण अनुकूल मत असल्याचें तुझ्या त्या सुप्रसन्न मुखचर्येवरून सहज कळून येतें. व वसंतकोकिलेसही हाच उत्तम वर पसंत होऊन ती बहुशः आपल्या आज्ञेस अमान्य करील असें वाटत नाहीं. तथापि तीस हा आपला मनोभाव प्रगट करून या कामीं तिचा पूर्ण रुकार मिळाला म्हणजे दुधांत साकर पडून सर्व यथास्थित होईल. याजकारितां सकाळीं अगोदर तूं हेंच काम करून मी दुपारीं दरबारांत जाण्याचे पूर्वीं मला कायतें कळीव. फार बरें आहे असें तिनें म्हटल्यावर त्या उभयतांनीं ती रात्र त्याच विचारांत आनंदानें घालविली.

उजाडतांच मुखमार्जनादिक विधी सारून अगोदर राणिवस्यांतील कित्येक स्त्रियांसह राणी कन्येचे महालांत जातांच वसंतकोकिला नमस्कार करून आईशेजारीं बसून म्हणाली, मातुश्री, आज एवढ्या पाहांटेस कन्येचें स्मरण होऊन कशा करितां येणें झालें हें मला कळत नाहीं.

राणी— बाई हे आनंदकलिके कन्यके, येण्याचा हेतु म्हणून इतकाच कीं, ज्याच्या योगानें हें तुझें सुहास्य वदन पुनः दृष्टीस पडलें, व ज्यानें आमचा उजळ माथा करून सर्वत्रांस सुख दिलें त्या राजपुत्र कुसुमचापाचे मनोरथ आतां आमचे हातून केव्हां पूर्ण होतील ही अंतःकरणीं फार उत्कंठा लागली आहे. पहा, ज्या सारखा निश्चय व धैर्याचा प्राणी कोणीच होणें नाहीं. ज्यानें तुजसाठीं राज्यादि सर्व सौख्यास मागें लोटून जिवाचीही परवा न बाळगितां कित्येक महिने प्रवासांत व दुःखांत काढिले. काय त्याची गोष्ट! आतां तुह्मां उभयतांस एकत्र सौख्याचा अनुभव घेतांनां आह्मीं केव्हां पाहूं असें होऊन गेलें आहे. दुसरी कांहीं आशा नाहीं. खेरीज रूपगुण लक्षणानीं तुझ्याशीं साम्यतेचा हाच वर व-

ह्मदेवानें निर्माण केला आहे, यांत संशय नाहीं. या साठीं तुझ्या रुकार घेण्या विषयीं मला तिकडली आज्ञा झाली आहे.

असें आईच्या तोंडचें इच्छित शब्दचंद्र दर्शन होतांच वसंतकोकिलेच्या हृदयाब्धीस प्रेमनीर भरुनी येऊन आनंद लहरी उसळूं लागल्या. रोमांच्या सह वदन कमलावर स्मित हास्ययुक्त प्रफुल्लता आली. तथापि एका एकीं आपला हेतु उघाडीस न येऊं देण्या साठीं मुद्रा फिरवून ती ह्मणाली, आई मी बोलत्यें इकडे अपराध माफ करून लक्ष दे. तूं ह्मणत्येस हें केवळ अगदीं माझ्या हेतुविरुद्ध आहे. माझें नशीब चांगलें ह्मणूनच त्या जादुगारा पासून त्यास यश मिळून पुनः मी आणि हे सुखाचे दिवस तुमच्या दृष्टीस पडले. मध्यंतरीं पांच दिवस माझे कपाळीं दुःख भोगणें होतें तें मी तुह्मीं सर्वत्र मंत्रबलाढ्य व राजसत्ताधारी असतांही कोणाच्यानेंही यत्किंचित् कमी करवलें न जाऊन मला भोगावें लागलेंच. पहा:-

श्लोक.

**सुखस्य दुःखस्य न कोपि दाता, परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥ अहं करोमीति वृथाभिमानः स्व कर्मसूत्र ग्रथितोहि लोकः**

सुख अथवा दुःख देण्यास कोणीच समर्थ नाहीं; दुसऱ्यापासून मला सुख अथवा दुःख प्राप्त झालें असें ह्मणणें केवळ चूक आहे. मी अमुक गोष्ट केली, करितों किंवा करीन, हा अभिमान व्यर्थ प्राणिमात्रास आहे. जसजसें पूर्वार्जित सुकृत किंवा दुष्कृत असेल तदनुसार चांगलें अथवा वाईट प्राप्त होणार आहे. मात्र कोणत्याही कर्माचा कर्ता त्याचे परिणामा प्रमाणें निमित्ताचा अधिकारी होतो. असें खरें बीज असतां त्या राजपुत्राची व्यर्थ प्रशंसा करून ज्या गोष्टीचा मला मनापासून कंटाळा आहे तेंच

कसें बोलत्येस !

**आई–** मुली, तूं तर मोठी ब्रह्मज्ञानी आहेस. तुला काय म्ह-णावें ? तुजपेक्षां आह्मीं कांहीं दिवस तरी अधिक पाहिले आहेत. असेंच तुजसारखें पूर्ण ज्ञान सर्वांस झालें तर प्रपंच राज्य व ऐश्वर्यादि सुखाची आणि स्वकीय जनांची कोणास काय गरज उरणार आहे ? आह्मीं तुझे आई बाप आणि तूं आमची मुलगी हें तरी नातें मग कशाचें ? श्रीजनक राजा सारखे आजपर्यंत पुष्कळ-तत्ववेत्ते होऊन गेले, त्यांजपेक्षांही तुझी कडी जास्त दिसते त्यां नीं कांहीं राज्यादि सुखाचा उपभोग घेऊन प्रपंच केला कीं नाहीं? याचा विचार कर. आजपर्यंत कित्येक राजपुत्र तुला वरण्यास येऊन ते तुझ्या सामर्थ्याच्या तुळणेंत न उतरल्या मुळें त्यांचा तूं निषेध केलास. त्या विषयीं आह्मांस कांहीं वाईट वाटलें नाहीं. परंतु या राजपुत्रा सारखा सौंदर्यगुणसंपन्न या दुनियेंत दुसरा कोणीच नसेल अशी त्याचें स्वरूप व कर्तृत्वशक्ति पाहून आमची पूर्ण खात्री होत आहे. व तुझीही झालीच असेल. तोच तुझ्या सद्भाग्यानें अनायासें तुझी आशा धरून हजारों कोसां वरून येथें आला असून त्याचे कृतोपकार आमच्या व तुझ्या शिरीं न फिटण्या सारखे झाले आहेत. अशास जर तूं या समयीं न वरशील तर तुझें दुर्दैवच तुला आड आलें, असेंच समजलें पाहिजे; तुला ईश्वराच्या पूर्ण दयें करून स्वरूपाची अवर्णनीय अनुकूलता असून तशांत प्रस्तुत काळीं यौवनबहाराचें वारें तुझ्या सर्वांगीं खेळत असल्या मुळें तुला एकटी पाहतांना आह्मांस जें दुःख होतें तें काय सांगावें ? हा तुझा रसभरित सतेज देहा वरील प्रस्तुतचा अलौकिक पूर्ण काम मालती पुष्प कलिकेच्या तारुण्य सुगंधाचा ऐन भर निघून गेल्यावर पुनश्च यावज्जीव हें सौख्य मिळणें नाहीं. सारांश तारुण्य हें दोन प्रहरची सावली आहे; केव्हांच

निघून जाईल. आणि या देहाचा तरी काय भरवंसा? आज आहे आणि उद्यां नाहीं. ईश्वराच्याच मनांत असल्यास हा तुमचा लग्न सोहळा आमचे दृष्टीस पडेल.

**वसंतकोकिला.**– (रोषमुद्रा करून) माझे मनांत नाहीं तर तुमचा हा खटाटोप व्यर्थ आहे. तो राजपुत्र मोठा खिलाडू आहे. त्यानें आपल्या जादुसामर्थ्यानें तुमचीं सर्वांचीं अंतःकरणें मोहून आपलींशीं करून टाकलीं आहेत. मी मात्र त्याचे मोहनास्त्राचे पेंचांत अद्याप पुरी सांपडले नाहीं. मजवरही त्यानें मंत्र फारच टाकिले; परंतु माझ्या कटाक्ष बाणपिसाऱ्यांची त्याचे अंतःकरणावर प्रेरणा झाल्यामुळें मजपुढें त्याच्या जादु टोण्याचा यत्न हरून तो आतां भ्रमिष्ट झाला आहे. मग अशा ऋद्धिहीनावर माझी प्रीति कशी जडेल? तथापि त्याचे मोहनास्त्राचा माझ्या मनास कांहींसा स्पर्श झाल्यामुळें मीही वेड्या सारखी होऊन माझी प्रकृति आतांशी कोणाचेच आधीनशी राहिली नाहीं. कोणजाणे तो कोण आहे! त्याचें विद्यासामर्थ्य पाहून माझा तर बाई हा जीव थरथरां कांपतो. तो वाटचालीचा मुशाफर, ठाव ना ठिकाण! अशाशीं माझी जन्माची गांठ घालणें हें तरी तुह्मांस बरें वाटतेंना?

असें तिचें अज्ञानपणाचें चमत्कार वाटण्या जोगें भाषण ऐकतांच राणीसह सर्व स्त्रियांस एकदम हसूं आलें. त्यास रसें तिचेही पोटांत हसूं न मावून तिनें तें उघडपणें बाहेर न कळूं देण्यास आपल्याकडून विचारानें पुष्कळ आवरलें, तरी किंचित गालांत आलेलें हसूं स्पष्टपणें सर्वांस दिसून आल्या वरून इचे मनांत खचित ही गोष्ट वसत असतां आपणास लज्जेमुळें तसा भाव प्रदर्शित करीत नाहीं, हेंच खरें असें राणीस आणि इतर सर्व स्त्रियांस निश्चयात्मक कळून येऊन त्यांनीं आनंद प्रदर्शक टाळी वाजवितांच वसंतकोकिला आपला हेतु

उघडकीस येऊन त्यांस पूर्णपणें समजला ह्मणून लज्जित होऊ-
न पुढें कांहीं एक न बोलतां खालीं पाहूं लागली. नंतर राणीस-
ह सर्व स्त्रिया कार्य झालें असें ह्मणून आनंदानें उठून आपआप-
ल्या महालांत गेल्या.

मग भोजनसमयीं ती आनंदवार्त्ता राजास राणीकडून साक-
ल्य रीतीनें कळतांच अंतःकरणीं संतोषयुक्त अत्यानंद होऊन उभ-
यतांच्या विवाहकारणीं त्यांच्या असलेल्या उभारणीस उत्तेजन आ-
लें. मग तिसरे प्रहरीं वडा दरबार व शास्त्रिपंडितांची सभा भ-
रवून राजानें आपली कन्या वसंतकोकिला राजपुत्र कुसु-
मचापास विवाहित करून देण्या विषयींचा आपला हेतु सर्वां-
स प्रदर्शित केला. या कार्यीं सर्वांचा " फार उत्तम " ह्मणून आनं-
दानें रुकार पडतांच राजानें मोटमोठाले ज्योतिषि, शास्त्रि, पं-
डित यांस उभयतांच्या गणगुण मैत्री ग्रहांसह लग्नास सुमुहूर्त
पाहण्यास सांगितला. त्यानीं वधूची सिद्ध असलेली जन्मपत्रि-
का आणि वराचें जन्मटिप्पण जवळ नसल्यामुळें प्रथम त्याची
प्रश्नपत्रिका ठरवून तिजवरून जातक सिद्ध केलें. मग त्यां वरून
परस्परांत बराच वेळ वादाघाट व चर्चा वगैरे होऊन सिद्धांत ठर
तांच त्यानीं मोठ्या उत्साहानें वधुवरांचे देवगण आणि पूर्ण छत्ती
स गुण उत्तम मिळाल्याचें प्रमाणांसह कळवून प्रभृती केशवादि-
करून पद्धतिकारांनीं सांगितल्या प्रमाणें कर्कीचा चंद्र आणि बृह-
स्पति हे जन्मलग्नीं ह्मणजे प्रथम केंद्रीं असून बुध आणि शुक्र ए
का केंद्रींचे आहेत; आणि तृतीय, षष्ठम व एकादशस्थानीं सर्व
पापग्रह उभयतांचेही असल्यामुळें हे अविघ्न दीर्घायु होतील; आ-
णि त्याच प्रमाणें " किंकुर्वंति ग्रहाःसर्वे, यस्यकेंद्रे बृहस्पतिः॥ म
त्तो मातंग यूथानां, भिन्नत्येकोपि केसरि " या वचना प्रमाणें बृ-
हस्पति प्रथम केंद्रीं असल्या मुळें ह्याच्या पराक्रमाचा दरारा सर्वत्र

गाजेल, ह्मणजे इतर सर्व राजगजांत हा राजपुत्र सिंह्सा शोभेल; इत्यादि सर्व उच्च ग्रह असल्याचें कळविलें. आणि आज वैशाख शुक्ल ५ चा सुमुहूर्तच असून आजपासून पांचवे दिवशीं शुक्ल नवमी कृत्तिका नक्षत्र शुक्रवारीं गोरज सुमुहूर्त्त विवाहास उभ यपक्षीं फार उत्तम लाभणार असल्याचेंही सांगितलें. सर्व गोष्टींत कोठें कांहींच न्यूनता न येतां उभयतांचे सर्व उत्तम योग जमल्या चें पाहून राज्यासह सर्व दरबार व सभाजनांस नवल वाटूनआ- नंद झाला. मग विडे देऊन दरबार खलास होतांच, आतां लग्ना स मध्यंतरीं खरी काय ती तीन दिवसांचीच अवधि. असें ह्मणू न राजानें लागलीच प्रधानास वधुपक्षाकडील सर्व तयारी कर- ण्यास सांगून आपण स्वतः वराकडील सिद्धता करण्याचें पतक रिलें. मग तत्क्षणीं त्याच सुमुहूर्तावर श्री कुळस्वामी आदिक- रून देवतांस लग्नपत्रिका लिहून कुंकुममंडित सुशोभित केल्या; आणि शिवाय बाहेर गांवीं पाठविण्याच्या त्या पत्रिका तयार करवू न तावडतोब सांडणी स्वारा बरोबर आसपासचे रजवाडे, जहागि रदार, मोठमोठाले विद्वान लोक व नामांकित श्रीमान तसेच संभावि त गृहस्थ यांजकडे रवाना करण्याचें व ते आल्यावर त्यांच्या सर्व- सरबराईचें काम मुख्य कारभाऱ्याकडे सोंपविलें.

असा आनंदाचा दिवस पाहतांच कुसुमचाप अगदीं भांबा वून त्यास कांहीं सुचेनासें झालें. बाहू आणि सर्व गात्रांस शुभ स्फुरण होऊन आंगरख्याचे बंद तटतटां तुटूं लागले. इकडे वसंतकोकिलेसही हें सर्व आनंदवृत्त कळतांच तिची चित्त- वृत्ति वेड्या सारखी होऊन हातचें कशिदा काढणें वगैरे कामाची तीस विसर पडून आंग स्फुरणादि सुचिन्हें होऊन बद्धकंचुकीची ग्रंथी वरचेवर मुक्त होऊं लागली.

जेथें सदैव सर्व सिद्धता व सर्वच अनुकूलता आणि त्यांतून

स्वतः राजा आणि प्रधानच त्या कार्याचे पुढारी झाल्यानें तयारी-
स तो काय उशीर ? हूं म्हणण्याचा मात्र अवकाश. सर्व शहरास
घरोघर रंगसफेती देणें ; जागोजाग पानसुपारी, नाच, गाणें, रंग-
गुलाल, जेवणावळी वगैरे करितां चौफेर किनखापी कनाती चि-
णून झालरीसह वर उत्तम छतें देऊन आंतून हंड्या वगैरेच्या रो-
षनाई करितां आंकडे मारून, स्त्रिया पुरुषांचे पृथक् भाग दाख-
वून मोठमोठे मांडव घालणें आणि त्यांच्या मुख्य दरवाज्यावरून
चौघड्यांचे नगारखाने उभारून जागजागच्या बैठकांच्या रेख-
लेल्या मृदु लोड तक्क्यां सहवर्तमान बिछायती तयार करणें; स-
र्वत्र याचकजनांस लग्नदक्षिणा देण्याचे रमणे व्यवस्थेशीर स
ज्ज करणें; रस्तो रस्तीं दुतर्फी चार चार हातांच्या अंतरावर रोष
नाईच्या फंदिलांचे उंच खांब रोंवणें व चिराखदानें बांधणें; इत्या
दि राजवाड्या समोरील सुशोभित अति देखाव्याच्या मुख्य लग्न
मंडपासह यच्चावत सर्व तयारी दोन दिवसांत झाली. सर्वत्र राज-
मंडळींत एक एकाकडे पृथक् पृथक् कामाची सोंपवणूक केली.
अठरा कारखान्यां वरील मुख्य अधिकाऱ्यांस आपआपली सर्व-
सज्जता बरोबर राखण्या विषयीं हुकूम फर्माविले. असत फिर
वून मोठ्या अगत्यानें सर्वत्र नगरवासी जनांस पाहुण्यां रावळ्यां
सह पंधरवड्याचे भोजनाचें आमंत्रण एकदम देऊन ठेविलें. मु
ख्य राजवाड्याचेच माणिकचौकाचे नाक्यावर असलेला विलास-
मंदिर या नांवाचा दुसरा राजवाडा जानवशास देऊन वरपक्षाची
मंडळी नेमून दिली. अधले दिवशीं रात्रीं सीमांतपूजन या थाट
माटानें होऊन उजेडल्यावर म्हणजे लग्नदिवशीं प्रातःकालीं श्री
महागणपती व श्री महाकाली सरस्वती यांचें पूजन यथाविधि
होऊन दोहींकडील दोलेजंग गडगणेर दाहा घटिकांचे आंत उ-
रकले. मागील प्रहर दिवसास सर्व कडेकोट तयारीनें वरास

मूळ जाऊन मंगल वाद्यें वगैरेच्या धूम धडाक्यानें राजपुत्र कुसुमचाप वधुगृहीं येऊन दाखल होत आहे तों घटकाभर दिवस उरून लग्नवेळा समीप येत चालली. वधुवर उभयतां उभे राहून मध्यें अंतरपट धरून राजोपाध्याय आणि पंडित शास्त्री आदिकरून विद्वज्जनांनीं मंगलाष्टकें म्हणण्यास आरंभ केला. वधुवरांवर सौभाग्य मंडित स्त्रिया आनंदानें अक्षता टाकूं लागल्या. श्रीगणपती, कालिका सरस्वत्यादि देवतांचे स्तुतिपर सात श्लोक मध्यें किंचित् लटपट न होतां झटपट एका मागून एक उच्च सुस्वरावर म्हणून एकुणीस विस्वे होतांच म्हणजे अगदीं सूर्यास्ताचे संधीस वधुवरांस आशीर्वादार्थ आठवा-

श्लोक.

या लोकीं वर पुष्पचाप वधु या शोभेच ही कोकिला,  
देवा यां उभयांस सौख्य कर दे निर्विघ्न दीर्घायुला;  
आनंदांत वसोत राज्य करुनी पावो प्रजा ही सुखा,  
सत्पुत्रा प्रसवोत, होइल जगीं जो मान्य सल्लोकिका; १

हा श्लोक म्हणून झाल्या नंतर सूर्यास्त होऊन "शुभलग्न सावधान" त्या मंगल ध्वनीनें त्या गोरज सुमुहूर्तावर उभयतांचे शिरीं अक्षता पडून आनंदाची टाळी वाजतांच आनंदोत्सव सूचक खुणेची तोफ धाड्कन सुटून सर्वत्र सिद्ध असल्या प्रमाणें जिकडे तिकडे एकदम दीपकल्याण रागाचे आलापयुक्त सुस्वर सनयादिक वाद्यांचे ध्वनि, दुंदुभी, नगारे, चौघडे इत्यादि वाद्यांचा कडकडाट; तोफा बंदुकांचा धूमधडाका होऊन सर्व शहर दणाणून गेलें. जिकडे तिकडे शेकडो गॅसबत्या प्रज्वलित होऊन कलावंतिणीचे नाच सुरू झाले. मंडपांतून स्त्रिया पुरुषांकडे यथाक्रम हळद कुंकू, रवण नारळानीं ओटया भरणें, विडे पानसुपारी हार गजरे, तुरे, फुलछड्या

अत्तर गुलाब, आणि त्याच प्रमाणें रमण्याकडे लग्नदक्षिणा य- थास्थित देणें चाललें. सर्व शहरभर एककाळीं आनंदानंद हो- ऊन गेला.

इकडे विद्युल्लतेचें सालंकृत कन्यादान करून राजा मणिपाल आणि राणी सुलोचना यांस कृतकृतार्थ पूर्वक धन्यता वाटली. वरास एक कोटीचें राज्य आंदण देण्याचा संकल्प करून विद्- ज्जन मंडळी इच्छित दक्षिणेनें संतुष्ट केली. राजपुत्र कुसुमचा- प आणि वसंतकोकिला यांचें पाणिग्रहण होऊन त्या उभयतां- चे मनोमय आनंदास पारावार नाहींसा झाला. लोकसंकोच्यामुळें एकमेक हळूच चोरून वांकड्या दृष्टीनें परस्परांकडे मधून मधू- न पाहून संतोष पावत. पुढें भोजनोत्तर मध्यान्हरात्रीं सर्व मंडळी विश्रांत होण्यास निद्रास्थानीं गेली.

दुसरे दिवसा पासून सतत पंधरा दिवस पर्यंत नित्य प्रातः काळीं बरोबरीच्या मान्यतेच्या इतर कित्येक जोड्यांसह वधूव- रांचे सुमंगल वाद्य घोषयुक्त मंगल स्नानाचा अपूर्व थाट; विड्या तोडणें, सुपाऱ्या लपवून त्या वधुवरांनीं शोधून काढण्याचा चमत्का- र; त्यांचे फराळ, आणि नंतर सर्व राजदरबार मंडळी व अर्वांतर बाहेरून आलेले रजवाडे, जहागिरदार, विद्वान् लोक, तसेच श्रीमा- न् व संभावित, नामांकित नगरवासी जनांच्या पुरुष स्त्रियांच्या खाशा पंक्तींत परस्परांचीं नांवें घेऊन घांस देऊन अन्य जोड्यांस- ह वधुवरांचे भोजनाचा थाटमाट; शहरांतून मंडपा मंडपाचे न- गारखान्यांतून सुस्वर सनयायुक्त त्रिकाल चौघडे झडणें; जागो- जाग पृथक्पणें स्त्रिया पुरुषांच्या, मेजवानीच्या थाटाच्या जेवणा- वळी व पान सुपारी, हार गजरे, अत्तर गुलाब, नाचगाणीं, रंगगुला- ल यांची रेलचेल; हत्ती, घोडे, रथ, पालख्या, मेणे इत्यादि वाहनां- वरून स्त्रिया पुरुषांची जाण्या येण्याची गर्दी, व त्यांचे अंगावरील

उंची पोषाख व दिव्य नगभूषणांचा चकचकाट, रात्रीं दीपोत्सवाचा लखलखाट; पुनः सारी रात्र नृत्यगायनांची चळ्ळी व रंग गुलालाची धमम्धळी. अशा आनंदोत्सवें करून लग्नसोहळा सोळा दिवस चालून ती नगरी केवळ इंद्रपुरीच होऊन राहिली होती.

सुनमुखाच्या सोहळ्यास राणी सुलोचना व इतर सर्व राजस्त्रिया आणि प्रधानादि करून सर्व राजकीय बडे लोकांच्या बायका अंतर्गृहांतील हवाशीर विस्तृत बिलोरी महालांत, व त्याच प्रमाणें राजा मणिपाल व प्रधानादि करून नित्याची राजदरबार मंडळी आणि अठरा कारखान्यांवरील अधिकाऱ्यांसह वर्तमान सर्व राजकीय बडे लोक, विद्वज्जन समूह, ग्रामस्थ व परस्थ नामांकित श्रीमान व संभावित गृहस्थ आदी करून लोक समाज मुख्य दिवाणखान्यांत मागील चार घटिका दिवसास जमल्यावर सुनमुखास आरंभ झाला. जेथें रौप्य, कांचन, हिरे, पाच, मोतीं यांचे परोपरीचे सर्वत्र दागिने, जिच्या अंगावर पादांगुष्ठ मस्तका पर्यंत नित्य असावयाचे तीस या समयीं जास्त अलंकार ते काय घालावयाचे! सर्व होतेंच. कुसुमचाप आणि व. कोकिला यांच्या पदरास गांठ पडून ते उभयतां आंत देवदर्शनास गेले. विडा, सुपारी, दक्षिणा, देवा पुढें ठेवून नमस्कार करून ते त्या स्त्री समाजांत जाऊन बसल्या नंतर उखाणे घालून परस्परांचीं नांवें घेतलीं म्हणजे ही गांठ सुटावयाची. असें मुख्य मुख्य स्त्रियांकडून सांगणें झालें. मग वसंत कोकिला बाईनींच अगोदर नांव घ्यावें असें ठरल्यावर ती लज्जेनें निश्चळ खालीं पाहात राहिली; परंतु आतां नांव घेतल्या शिवाय सुटकाच नाहीं असें जाणून वसंतकोकिला,-

"येनी मर्वाहि सोडुनी ऐश्वर्य घर दार, वसंत कोकिल रतिचे कु-

सुमचाप सरदार" हा उखाणा ऐकून सर्वत्र स्त्रियांस तिची योजना व शाहाणपणा यां विषयीं कौतुक वाटलें. आतां जां बाई बोवांवर पाळी आली करितां आतां त्यांनीं टाळाटाळीन करितां लवकर बायकोचें नांव घ्यावें अशी त्या स्त्रियांकडून त्यास आग्रहाची सूचना मिळतांच,–

कुसुमचाप,– "वसंतऋतुचा वारा, सुखसुख वाहे गार; वसंत कोकिला कमलिनी, मज मधुपाचा थार!" हें त्याचें गौरव युक्त सुरुचिर वचन ऐकून, जां बाई बावांनीं तर बुद्धिबळाची प्यादिमात करून सोडली, ह्मणून आश्चर्य पावून सर्व तोंमुखीं वाहवा झाली. वसंतकोकिलेस तर त्या प्रेमवचनानें आनंदरोमांच उभे राहिले. असो. मग एकमेकींच्या आग्रहावरून कित्येक स्त्रियांनीं उखाणे घालून आप आपल्या पतींचीं नांवें घेण्याचा चमत्कार कांहीं वेळ चालून तो सोहळा उरकल्यावर साकर, हळदकुंकूं, चिडे, पान सुपारी झाली. व झाल आरोपत आहे इतक्यांत अस्तमान होऊन जिकडे तिकडे रोषनाई प्रज्वलित झाली.

राजवाड्या समोरील अफाट चौफेर मैदानांत वराती चे तयारीची सर्व सज्जना असल्याची वर्दी कारभाऱ्यांकडून मिळून चार घटिका रात्रीचे सुमारास वरात निघाली. तो थाट असा कीं, सर्वां पुढें तोफखाना असून उल्हाळयंत्राचे धूमधाड आवाज कानीं येत आहेत; त्या मागून घोडे स्वार व पायदळ फौज; बंदुकांचे कडाक्याचे बार काढीत आहेत; त्यां मागून हत्तीउंटावरून निशाणांसह नौबदी, नगारे आणि सुस्वर सनयांचे गतीं गतींवर चौघडे झडत आहेत. व चौघडे झाडतांना वर टिर्यां वर्तुलाकार उडवून अवकाश न होऊं देतां चलाखीनें झेलून मध्यें खळ न पडतां पुनः गतीचे तालास मिळण्याचें आपलें पूर्ण

कसब चौघडेवाले वरचेवर दाखवीत आहेत. त्यांमागून शिंगाडे व मोठमोठे शंखवाले आपआपलीं वाद्यें जोरानें फुंकून सस्वरा नें मध्यें मध्यें झणत्कार दाखवून ताला तालांच्या गतींचे मोहरे घेत आहेत; डफाचे हलकारे लोक डफांवरून करनाटकी तालावर मिळवीत आहेत; ताष्या ताष्यानीं घडशी वाजंत्रें सनया फुंकून कल्याण रागाचे दीप यमन भूपादि भेद बरोबर दाखवून त्यांचे जोड करून सस्वर ध्रुपद ख्याल टप्पे आदिकरून चिजा गातआ हेत; त्या मागून सिबंदीकडील हत्यारबंद लोक समांतर ओळीं- नीं रेखले चालत आहेत; त्यां मागून वस्त्रभूषणानीं अलंकृत शृंगारलेले जिलबीचे देखणे खंदे घोडे मोठ्या अकडीनें ओळी ओळीनीं चालत असून मागून रत्नजडित कांचनमय देखाव्याचे देदीप्यमान रथ व पालख्या सारख्या हारीनीं हळू हळू चालल्या आहेत; त्यांमागून आप आपल्या सर्व साजिंद्यांसह उत्तम देखण्या नामांकित गाणाऱ्या कलावंतिणींचे ताष्यांतून तबले सारंग्यांचे मिळणीवर कोकिल स्वर मधुर तान पलट्यावर ठुंबऱ्या दादरे ग- जल इत्यादि कवाली सस्वर गाणें चालू आहे; त्यां मागून भाले बर्च्या तलवारी, बंदुकांचे हत्यारबंद अक्कडबाज घोडे बारगीर व नागव्या तलवारी ढालींचे फक्कड शिपाई दक्षतेनें पाहरा क रीत चालले आहेत; त्यां मागून घोड्यां वरून रत्नजडित सोन्या च्या काठ्यांचे भालदार चोपदार लकीबदार वरचेवर जयघोष शब्द ललकारत असून भाट व बंदीजन मंगल शब्दानीं बाजू नीं पुकारत आहेत; त्यांमागून सरदार, अमीर, उमराव, मुत्सद्दी सर्व कारखान्यां वरील अधिकारी आदिकरून सर्वत्र राजकीय बडे लोक मोठ्या थाटानें आप आपल्या शृंगारलेले उमद्या घोड्यां वरून सशस्त्र चालले आहेत; त्यां मागून भरगच्ची जरतारी वस्त्रां- नीं आणि सोनें जडाव मोत्यें त्यांच्या भूषणानीं अत्युत्कट भूषवि-

लेल्या मुख्य गजेंद्र ऐरावतावर रत्नजडित सोन्याच्या खुल्या अंबा-
रींत राजपुत्र **कुसुमचाप** आणि **वसंतकोकिला** या वरवधू-
चा जोडा केवळ शची इंद्राणी प्रमाणें शोभत आहे; त्या मागून
एका हारीनें लाविलेल्या सुशोभित अंबारींच्या पांच हत्तीं पैकीं
मधल्या गजावर राजा **मणिपाल**, **चित्रसेन** जादुगार, प्रधान
मुख्य कारभारी आणि राजोपाध्याय हें पंचक बसलें असून बा
कीच्या चार हत्तींवरून रजवाडे व सर्व मानकरी लोक बसले आ
हेत; त्यां मागून मोठमोठे आश्रित जन, विद्वान् लोक, जहागिरदा
र, श्रीमान् व संभावित नगरवासी साहुकार मंडळी आदी करून
नामांकित गृहस्थांच्या पालख्या, मेणे, घोडे यांची ओळिओळी-
नीं एकसारखी रीघ लागली आहे; अशा लोकोत्तर पुढल्या पु-
रुष समाजा मागें त्यांच्या राजरीती प्रमाणें जनानखान्या कडील
कडवे हत्यारबंद पाहरेकरी आपल्या कामीं मोठ्या सावधगिरी
नें चालले असून त्यां मागून सर्व राजस्त्रियांच्या पडदपोशी पाल
ख्या व मेणे यांची एकसारखी थाप लागून राहिली आहे; त्यांती-
ल मधल्या मुख्य पालखींत पट्टराणी सुलोचना, जादुगारकन्या
चंद्रप्रभेसह होती. बाजूनीं सर्व दासी पालख्या व मेणे धरून
बरोबर चालल्या आहेत; आणि सर्वां मागें पुनः हत्यारबंद स्वार
व पायदळाचा कडेकोट पाहरा. अशा थाटानें ती अर्ध कोस-
लांबीची वरात कडकडाट मिरवत जातांना जिकडे तिकडे रस्त्यां
वरून मोठमोठाल्या प्रज्वलित केलेल्या कंदील व बिलोरी चि
रागदानाची आणि तशीच घरां घरां वरून प्रदीप्त केलेल्या हं
ड्या झाडें वगैरेंची लखलखाट रोषनाई असल्या मुळें त्या स
र्व वरातीचा थाटमाटाचा लोकसमाज, लांबून पाहणाऱ्यांसही
स्पष्ट दिसे. पांच पांच हातांच्या अंतरावर निरनिराळ्या प्रकार-
च्या फुलांचे दारूचे नळे, तशाच पंचरंगी चंद्रज्योती, आणि अंत-

रिक्षांत जाऊन तेथून तारे तुटणारे नानाप्रकारचे बाण जोरानें सुरू त असून पंनास पंनास हातां वरून मोठ्या करामतीनें तयार केलेलीं दारूचीं भुईंत रोंवून ठेवलेलीं झाडें तसेंच तक्ते प्रज्वलित होऊन चक्राकारादि गतींत स्फुटतानां ज्यांतून मत्स्य कच्छादि दशावतार लीला, रासमंडळाचा थाट, मोठमोठे सुंदर राजवाडे, व बागबगीच्यांची शोभायमान रचना, इत्यादि चित्रांचा अनुपमेय स्पष्ट देखावा दिसून त्यांच्या कारागिरांच्या बुद्धि कल्पना व अतर्क्य कर्तृत्व शक्ति या विषयीं सर्वांचें अंतःकरण अगदीं थक्क होऊन जावें. माड्या गच्यां वरून नगरवासी स्त्रिया पुरुषांची ठेल होऊन त्या वधुवरांच्या वरातीचा अपूर्व थाट व आटोकाट कडाक्याची मिरवणूक पाहतांच सर्व देहभान विसरून त्या समय सूख कपिलाषष्ठी पर्वणीस आनंदाब्धींत मज्जन (स्नान) करून त्या. वधुवर रूप श्रीलक्ष्मीनारायणावर उत्साहानें पुष्पवृष्टि करूं लागले. नागरिक इतर सर्वत्र गरीब गरीब लोकांचे थवेच्चे थवे रस्ते साधून तो अपूर्व चमत्कार पाहण्यास सत्कार पूर्वक वाट पहात उभे राहिले आहेत. अशा मिरवणुकींत मागील महर रात्र उरून ती वरात ज्ञानोस वाड्यास (विलास मंदिरास) मोठ्या आनंदाच्या गजरानें येऊन ठेपली. हत्तीवरून वरवधु खालीं उतरतांच जलपूरित सुवर्ण कलशासहित अनेक सौभाग्यवती तरुणि स्त्रिया पुढें येऊन त्यानीं ते कलश त्यांजवरून उतरून त्यांतील उदक हत्तीचे पायां खालीं ओतून दिलें कोणी पोक्त पोक्त स्त्रियानीं त्यांजवरून लिंबलोण उतरून त्यांस दृष्ट न होण्यास परोपरीचे तोडगे केले. मग वसंत कोकिलेस कुसुमचापानें कडेवर घेऊन गृहप्रवेश करून सभास्थानीं जातांच शहरांतील नामांकित नामांकित कलावंतिणींचे नाच गायन दोन्ही समाजांकडे सुरू झाले. उ-

दें लक्ष्मीपूजन आदीं करून सर्व सोहळा यथाक्रम यथासांग होऊन हळद कुंकूं, नारळ, साकर, विडे, पान सुपारी, दक्षिणा ओंघाळण्या, इनाम, शिरपाव नारळ वगैरे देणें होऊन अरुणोदयाचे संधीस तो सर्व खटला जिकडल्या तिकडे चालता होऊन जे ते आप आपल्या घरोघर मोठ्या आनंदानें गेले.

उजाडून तो सर्व दिवस **कुसुमचाप** आणि **वसंतकोकिला** त्या विलास मंदिरांत आप आपल्या महालांतून पृथक् पणें असतां अस्तमान केव्हां होऊन निःशंकपणें एकत्रता केव्हां होईल असें उभयतांस होऊन गेलें. राजरीती प्रमाणें घटका घटकांची वर्दी त्यांस पाहरेकऱ्यांकडून मिळत असतां मध्येंच किती घटका झाल्या ही खबर वरचेवर आणवूं लागले. उभयतांचीं चित्तें उग्र कामव्यथेनें व्यग्र होऊन त्यांस कांहीं सुचेनासें झालें. सूर्यास्तास एखादा कांही उपाय असता तर फार बरें होतें, असें वाटून त्यांनीं वरचेवर खिडक्यांतून, झरोक्यांतून बाहेर डोकावून सूर्याकडे पहात असावें. करमणुकीस सान्निध्य असलेले प्रियमित्र व जिवलग मैत्रिणी हास्य विनोदपर भाषणानीं व खेळादि नाना उपचारें करून त्यांस रंजवीत असतां परस्परांच्या निजध्यासानें तें त्यास कांहींच न रुचून एक एक घटका दिवसा एवढी भासूं लागली. अथापरस्परांच्यास मनोल स्थितींत अस्तमान झाल्याची त्यांस एका एकीं वर्दी मिळतांच उभयतांच्या एकरूप अंतरंगाचे दुर्धर तरंग भंग पावून ते अनंगरंग प्रियसंग अभंग वांछिते झाले. तरी एकांत वेळा केव्हां प्राप्त होईल अशा उत्कंठेनें जिवास चळवळ लागून पळपळ मोजूं लागले. **कुसुमचापाकडे** राजकार्य मंडळांची आणि **वसंतकोकिलेकडे** तिच्या प्रिय सख्यांची बरीच रात्र पर्यंत गर्दी असल्या मुळें त्याचें सुखकर दर्शन, प्रिय भाषण, आणि

शांतकर अन्योपचार हे त्यांचे नेत्रांस, श्रोत्रांस आणि सर्व गात्रांस भासरूप होऊं लागले. असो. पुढें मंडळी जिकडल्यानिकडे जाऊन सर्व सामसूम झाल्यावर ते उभयतां परस्परांचा हात धरून सर्व आराशी सहवर्तमान सिद्ध असलेल्या एकांत कुंज सोनेरी आरसे माहालांतील अष्टपेद्र हवाशीर दिवाणखान्यांत, गुलाब, पाच, बकुळी, केवडा, हिना, फिनना आदी करून अत्तरांनीं सिंचित केलेल्या मोतिया, गुलाब, मदनबाण, निशिगंधादि सौगंधिक पुष्प सेजे सह तयार असलेल्या सुशोभित शय्या स्थानीं गेले. हिरे, पाच, माणिकें यानी जडाव केलेल्या त्या सोनेरी विस्तृत सर्जेदार छप्पर पलंगावर, वरून एक सारख्या हारी हारींनीं प्रदीप्त केलेल्या चंद्रप्रकाशी हांड्या, व त्यांच्यामधून साधिलेल्या चौरसाकृती जागेंत सोळ सोळा मेणबत्यांनीं प्रज्वलित केलेलीं रंगी बेरंगी झुंबरांचीं मोठमोठीं बिलोरी झाडें, आणि तशींच सर्वबाजूनीं लाविलेलीं बिल्लोरी शामदानें त्यांचें तेज एकवटून फांकलें आहे; गुलाब, केवडा अत्तर मिश्रित गुलाब पाण्यानें सिंचित करून उघड्या खिडक्यांवरून लोंबते सोडिलेल्या मोतिया मोगऱ्याचे कमाल खानीं हारांचा, त्यांवरून वाहणाऱ्या वाऱ्या सरसा कामोद्दीपन करणारा मधुर सुवास येऊन वरचेवर घ्राणेंद्रियास स्पर्श करीत होत्साता सुरत रस सौख्य समय दर्शवित आहे; पलंगास लगत असलेल्या एक पार दीर्घ परिघ वर्तुलाकार चांदीच्या चौरंगावर सुवासिक गार पाण्याची भरलेली झारी तेजोमय अडणीवर झुलत असोन सोन्याच्या तबकांतून ताजा मेवा मिठाई आणि तसेच अत्तर मिश्रित गुलाब पाण्यानें मोतियाच्या साजुक कळ्यांचे तुर्त्तीच विकसता पावत असलेले नाजुक हार व गजरे सिद्ध आहेत; वर खुपेच्या चिख्या

मारून नानाविध अत्तरांनीं भरलेल्या रंगी बेरंगी डौला डौलाच्या बि-लोरी लहान मोठ्या कुप्या आणि अंबर मिश्रित अर्गजाचे चांदीचे डबे, चंदनीं कलमदानाच्या रचिलेल्या पुडांतून आपल्या उपभो गत्याकडे प्रेमदृष्टीनें वर डोकावून पाहात आहेत. पलंगाच्या बाजूस सजावर जडावाच्या जाळीदार डब्यांत कळीदार पक्क्या पानाचे त्रयोदशगुणी गोविंद विडे तयार आहेत, व सोन्याच्या पोकळ स्तबक दांड्यांचे वाळ्याचे झालरीदार दोन पंखे दोहों बाजूंस पडलेले आहेत. अशा त्या एकांत विलासमय क्रीडा स्थानीं पलंगीं तीशुभांगी आपल्या प्रियतमाचे वामांगीं स्थित असतां हास्य विनोद लीलापर भाषण अन्योक्तीनें परस्परांची हारजिंक समतोल पणानें बराच वेळ चालून शेवटीं उभयतांनीं ही आपण अजिंक आहोंत ह्मणून परस्परांच्या सन्मानार्थ आपल्या हस्त द्वयांचे हार करून मोठ्या प्रेमानें एकमेकांचे कंठीं घातले. सारांश त्यांचे मनोरथ पूर्ण होऊन, ती **वसंत कोकिला** लावण्य स्रुवर्ण वेली आपल्या देह वृक्षावर लपेटून मिळून गेली आहे येणेंकरून त्यास आणि इच्छेनुरूप कुसुमचाप देहवृक्षावर आपण मोकळे पणानें विलासें करून सहल करित आहोंत ह्मणून तीस, त्रिभुवनींचें कायतें खरें सौख्य हेंच आहे असें वाटून नानाप्रकारच्या विलास उपभोगादि उपचारें करून त्या सुरत रस रंगप्रेम संगांत उभयतांच्याही गर्वाचें हरण होऊन सर्व इच्छा परिपूर्ण होतांना त्यांनीं ती सर्व रात्र शृंगार पर विनोद हास्य रसांत घटके प्रमाणें घालविली. त्या रात्रीं एकमेकांनीं आपली पूर्वीपासून साकल्य हकीकत परस्परांस कळवून प्राप्त झालेल्या दुःखादि पापांचें आपल्या घडलेल्या सिंधुभागीरथी प्रिय संगम तीर्थ पवित्रोदक स्पर्शें करून परिमार्जन केलें.

इच्छेनुरूप परमेश्वर कृपेनें उभयतांचें ऐक्य घडून अ-

से आनंदाचे दिवस पाहिले ह्मणून राजा राणीस परमावधीचा आनंद होत्साता जन्माची सार्थकता झाल्याचें वाटूं लागलें. दरबारांतील राजकीय काम कुसुमचापाचे मसलती शिवाय कोणतेंच होईना. जो रमणीय "विलासमंदिर" माहाल जानोशास दिला होता तो, त्यांतील सर्व संपत्योपभोग साहित्यासह वर्तमान राजानें कुसुमचापास अर्पण करून आंदण संकल्पानुरूप एका कोटीचें राज्य त्याचे नावें तोडून दिलें. व आपल्या प्रिय कन्येच्या सेवे साठीं तिच्या प्रीतींतल्या पांचशें दासी त्यांच्या नेमणुकी सह दिल्या. शिवाय हत्ती, घोडे, रथ, मेणे, पालख्या आदी करून इच्छे प्रमाणें देऊन त्यांच्या व्यवस्थे साठीं ज्यास्त पृथक् मुलुख ही तोडून दिला. अशा संपत्येश्वर्यांत ते उभयतां रतिमदन अतर्क्य सुखाचा नित्य पूर्ण अनुभव घेऊं लागले.

इकडे तो चित्रसेन ज्यादुगार राजाचा एक जीवीचा जिवलगच होऊन त्यास राजानें वंशपरंपरें वर्षास बाराहजारांच्या उत्पन्नाची जाहागीर करून दिली. आणि त्याच्या मनोमय संकल्पानुरूप आपल्या प्रिय कन्येची परवानगी मिळतांच त्याची कन्या चंद्रप्रभा इचें, त्याच्या हातें आपल्या सर्व खर्चानें सालंकृत कन्यादान करवून राजपुत्र कुसुमचापाशीं लग्न करून दिलें. व तिच्याही रतमामाच्या नतुर्दीस नेमणूक करून दिली. येणें करून चित्रसेन धन्यता पावून राजकन्या वसंतकोकिला आपल्या कन्येस धाकट्या बहिणी प्रमाणें वागवीत असोन कुसुमचापाचें ही उत्तम प्रेम तिजवर असल्याचें पाहून मनांत अत्यानंद पावला.

## अंक-वा समाप्त.

# अंक ९ वा.

## श्लोक.

॥ राही उगा, नंवे जराही चले न चतुराई, नहोयसटका॥
॥ एलो न शीतल दयेलाकरी, जंव नये लाभ काळ घटका॥
॥ निष्ठा धरीं मनिं अनिष्टा नइच्छुनि कनिष्ठा पदानें उवेगे॥
॥ हें तूं मनीं समज, हेतू लदीय मग होतील पूर्ण अवघे ॥१॥

मागील अंकांत सांगितल्या प्रमाणें सर्व लग्नसोहळा उरकून सर्वत्र आनंद झाल्यावर तिसरे दिवशीं **कुसुमचाप** आणि **वसंत कोकिला** रात्रीं समयास एकांत स्थलीं असतां समोर तो मदनाथ शुक पक्षी पिंजऱ्यांत निद्रिस्थ अवलोकन करून.

**वसंत कोकिला**.— प्राणनाथ, आपण फणिपूरनगरचे राजपुत्र आणि मीं मणिपूर नगरची राजकन्या कोठें काय अंतर! परंतु हा आपला योगायोग केवळ डोंगरचे आंवळे आणि समुद्रांतील मीठ यांच्या एकत्रते प्रमाणेंच ईश्वर कृपे करून घडला. कायही अगाध ईश्वर करणी !! याविषयीं मला वारंवार फार नवल वाटलें. परंतु सूक्ष्म विचार करून पाहिलें असतां आपणा उभयतांत आधाराधेय भाव संबंध आहे, त्या अर्थी असा योगायोग घडणेंच आहे. पहा, फणिपूर आणि मणिपूर या नामशब्दांतील "पूर" हें पद वर्ज केलें असतां, आपण आधार भूत फणी (शेष) होऊन मज अधेय मण्यास धारण केलें; यांत आश्चर्य तरी काय! संबंधा प्रमाणें सर्व योगायोग घडतच आहेत. तथापि ज्या कारण द्वारें कोणतेंही कार्य घड-

---

१ तों पर्यंत. २ येलदोश ३-३ कंटाकूं नको.

नें, त्याची वन्या वाइटा प्रमाणें अठवण सर्वांस राहावयाचीच:- असें असून आपल्या एवढ्या अघटीत एकत्रतेस व सुखास, त्यास हा मध्वनाथ शुकपक्षीच सर्व प्रकारें साह्यभूत कारण असतां या विषयींची विस्मृती व्हावी काय?

**कुसुमचाप:—** सखे प्राणवल्लभे, एकूण तुझे मनांत मला याजविषयीं कांहींच काळजी नाहीं! पहा, तुजपेक्षांहि मला याचा पुष्कळ दिवस आनंदकारक सहवास सतत सारखा घडून याच्याच पूर्ण साह्यानें हे आनंदाचे दिवस प्राप्त झाले. याचे उपकार किती म्हणून आठवूं!! जन्मोजन्मीं न फिटण्या सारखे ते आहेत. असें असतां याचा विसर करण्यास हें माझें मन मला कसा अवसर देईल? यास आणि याच्या शालकास मनुष्य देह प्राप्त करून देऊन, त्या माल्याप्रारानामें सखीसहवर्तमान यास आणि याच्या शालकास अत्यानंद सुखानें आप आपले स्वस्थानीं पाठविण्याचेच योजनेंत मी आहें.- आणि माझी आजच दुपारीं श्वशुर चित्रसेन यांची भेट झाली होती त्यासमयीं त्यानीही आपल्या वचना प्रमाणें हें कार्य सिद्धीस नेण्याचें मला खात्रीनें कळविलें आहे. तसेंच ज्या सुमेधेनें यास शुकदेह दिला असोन त्यांत राहण्यास दोन वर्षांची मुदत दिली, तीही पूर्ण होण्यास सारा एक पंध्रवडाच कमी आहे. या शिवाय ती सुमेधा चित्रसेनाची आते बहीण असल्याचें ही त्याजकडून मला आजच समजलें. या एकंदर अनुकूलतेवरून नष्टचर्या जाऊन याच्या उर्जित कालाचे दिवस प्राप्त झाले, असें समज.

**वसंतकोकिला:—** प्राणपते, आज पर्यंत कळविण्यास प्रसंगच आला नाहीं. परंतु आतां शेवेसीं श्रुत करित्येंकीं, एक मी, दुसरा चित्रसेन, आणि जिनें मूळ या मध्वनाथास मजकडे आश्रयास पाठविलें असोन जी प्रकृत काळीं माझे भेटी-

स विवाह कार्यी येथें आली आहे, ती माझी प्रिय सखी तिसरी-हेमकुंतला, असे त्रिवर्ग ही मंत्रसामर्थ्यानें यांस येथेंच पाहिजे त्या-वेळीं मनुष्यदेह देऊं शकुं. परंतु ती कायमची स्थिती नसल्यानें उल-टें विशेष दुःख मात्र होऊन, पुनः यास शुकदेह प्राप्त व्हावयाचा-च. नाहीं पेसां इतक्या विचाराची व अवकाशाची मुळींच गरज नव्ह-ती. यासाठीं हें कार्य त्या सुमेधेच्याच हातें पूर्ण जालें पाहिजे. त्या सुमेधेवर मध्वनाथाचे अनंत उपकार असल्यानें तिचें प्रेमही त्या-जवर बंधु प्रमाणें असोन, प्रस्तुत समयास तीच त्या जादु स्त्रीरा-ज संस्थानाची मालकीण झाली आहे. तशांत ती चित्रसेनाची-आते बहीण असल्याचें ही आपले मुखानें आतांच समजतें.-शिवाय यास अशी स्थिती प्राप्त होण्यास मूळ कारण जी जादु-गार हेमा, ती माझी बाळपणाची प्रेमाभिलाषी मैत्रिण असोन खेरीज मजपुढें तिचे मंत्र सामर्थ्याची कांहींच मातबरी नाहीं. म-ग अशा त्रिवेणी संगमी स्नान केल्यावर कोण पापी उद्धरगती पा-वणार नाहीं?

आपल्या मुक्तते विषयींच्या योजनेचें असें त्यांचें परस्प-र चाललेलें कळवळ्याचें भाषण, निद्राभिषानें पिंजऱ्यांत पडून रा-हिलेल्या मध्वनाथानें ऐकून फारच संतोष होत्साता तो हळूच मंजु-ळ शब्दानें ह्मणाला, हे माझ्या आश्रय दात्यानो, आपणां उभयतां-चा एकत्र सत्समागम हेंच माझें सर्व सौख्य. ईश्वर आपणांस सु-खी राखून आपल्या सहवासांत माझे आयुष्याचे दिवस आनंदा-नें घालवो. याहून मी आतां अधिकाची मुळींच इच्छा करीत ना-हीं. असें त्याचें प्रेमवचन ऐकून उभयतां ही गहिंवरून ह्मणाले, हे सुखकरा पक्षिराया, आमचे हातीं असतां तुझे कृतोपकार-विसरून तुला अशा पराधीन पणाचे दुःख स्थितींत ठेवून स्व-स्थ बसणें, या सारखें कृतघ्न पणाचें दुसरें कोणतेंच कृत्य या

भूमंडळावर उरलें नाहीं. ईश्वर रूपें करून सर्व पूर्व स्मरवांस तूं प्राप्त होऊन तुला आमचा, व आह्मांस तुझा निरंतर सहवास घडविणार तोच समर्थ आहे.

पुढें राजा मणिपाल याच्या अनुमतें पांचचार रोजांत सर्व विचार ठरून त्या जादुगी राज ढाका संस्थानाधिकारिण स्मेधा राणीकडे जाण्यास स्वारीची कडेकोट तयारी झाली व चित्रसेनादि करून जादुविद्या निपुण महान महान मांत्रिक मंडळी सहवर्तमान राजपुत्र कुसमचाप आणि भार्या वसंत कोकिला यांची स्वारी मध्यनाथास बंदोबस्ताने बरोबर घेऊन निघाली. तंबु, डेरे, राहोट्या, आचारी, पाणके, वाढपे, खटपटे, दासदासी, हुजरे, जामदार, कारकून, घोडे, रथ, मेणे, पालख्या, हत्ती, उंटें, स्वार, शिबंदी वगैरे सर्व दुहेरी सरंजाम बरोबर असोन, जागजागचे आगाऊ मुक्काम नेमलेले असल्या प्रमाणें, जे ते यथास्थित सिद्धता, दीपदीप, व्यवस्था, बंदोबस्त वगैरे ठेवण्याचे आप आपले कामीं सर्व दक्षतेनें तत्पर असल्या मुळें, कोणत्याही प्रकारें त्यांस आपण प्रवासांत आहोंत असें वाटलें नाहीं. अशा प्रकारें दररोज साहा कोशांवर मुक्काम करीत ढाका शहरास पोंचून स्वारीचा तळ पडला.

हें सर्व वर्तमान तेथील मुख्याधिकारीण स्मेधाराणीस, इकडील वकिला कडून विदित होतांच ती अत्यानंद पावून आपल्या मात्यभारा प्रियसखी सहवर्तमान पालखींत बसून मोठ्या लवाजम्यानें, सन्मान पूर्वक राजपुत्र कुसमचाप वगैरेंच्या भेटी करितां तिसरे प्रहरचे समारास गोठांत येऊन दाखल झाली. मुख्य भरंगची किनखाबी तीन कोट पडकोटी तीन मजली तंबूवरील पाहारे कऱ्यां कडून आ-

पण भेटीस आल्याची वर्दी लावून ती आंत गेल्यावर यथा-क्रम सर्वांच्या सत्कार पूर्वक भेटी झाल्या. आपला मामेभाऊ चित्रसेन ध्याची मनीं नसतां अकस्मात् येऊन भेटल्यामुळें, व त्याच प्रमाणें आपला सौभाग्य सुख दाता शुकदेह धारी दुसरा धर्मबंधु वसंत कोकिलेजवळ बसलेला एकाएकीं अवलोकन केल्यामुळें, ती आश्चर्यानें चकित होत्साती आनंद भरानें गहिंवरून गेली. मग परस्पर सर्व वृत्तांत कळून आल्यावर आपल्याच हेतुनुरूप कार्यभाग घडण्याचा हा सर्व योगायोग ईश्वरें आणिला, येणें करून तिचे आनंदास सीमा न उरून ती परमेश्वराच्या अघटित लीले विषयीं हृदयीं आठव करूं लागली. तशीच आपल्या मनसंकल्पानुरूप हा शुक देह धारी जो स्वरूपगुणसंपन्न सावकार पुत्र चंद्रकांत, ( चंद्रकांत हें आपलें नांव पूर्वी सुमेधेचे घरीं असतां त्यानें सांगितलें होतें. ) तो आपल्या सपती होण्याचा प्राप्तकाळ समीप आल्याचें समजून तर ती प्रतस्थ लावण्य कुमरी मालय भारा हर्षभरानें अगदीं भांबावून गेली.

मग चित्रसेनानें आपल्या बहिणीस, वसंत कोकिला आणि कुसुमचाप यांजविषयींचें इत्थंभूत वर्तमान कळवून, त्या उभयतांचा खरा साथी जो हा शुक पक्षी, यास दोन महिन्यांत मनुष्य देह प्राप्त करून देण्याविषयींचें आपण दिलेलें वचन कळविलें. आणि ह्मणाला, ताई, ती मुदत आजन पूर्ण होत आहे. या साठीं तुझ्या जिवावर त्यास मी दिलेल्या वचनाचा भंग न होईल अशा उदार मनानें यास मनुष्यदेह दान करून यासहणीच या सर्वांस आनंद देऊन मला धन्य कर. हे बंधूचे मुखांतील इच्छित शब्द ऐकतांच-

सुमेधेनें अगोदर त्या शुकास आपल्या डाव्या तळहातावर घेऊन त्याचें प्रेमानें चुंबन करून ह्मणाली, हे बंधुराया चंद्रकांता, मूळ माझ्याच वचना प्रमाणें तुला मी आतां मनुष्य देह देत आहें. असें ह्मणून तिनें आणविलेल्या जलपूरित झारींतील उजव्या हातानें मंत्रोक्त उदक त्याजवर सिंचन करून खालीं डावा हात उलटता करितांच त्यासरसा, चंद्राप्रमाणें ज्याची देदिप्य मान कांति, असा तो मनुष्य देही दिव्य मोहोरा एकदम त्या सभास्थानीं प्रगट होऊन त्यानें आभार पूर्वक सर्वांस तीनवार प्रणाम केले. त्यास अवलोकन करितांच पूर्वीची ओळख पटून कुसुमचाप प्रेमानें सद्गदीत होत्साता त्याचे कंठीं मिठी मारून कडकडून भेटला. सुमेधा व वसंतकोकिला यांची ही तीच स्थिती होऊन त्यांनीं त्यास अनुक्रमें बंधु व पुत्र नात्यानें कुरवाळून पोटाशीं धरिलें. इतर सर्वत्र सभाजन आश्चर्यानें चकित जाले. मग कांहीं वेळ पर्यंत सर्वत्र स्वस्थ बसून आनंदाच्या गोष्टी होत आहेत, या अवसरांत, चंद्रकांत आणि माल्यभारा हे मधुन मधुन एकमेकां कडे हळूच-अस्पष्ट रीतीनें पहात असोन त्यांचे मनाची चंचलवृत्ति झाल्यानें, कुसुमचाप, वसंतकोकिला. आणि सुमेधाराणी. या-त्रिवर्गांचे लक्षांत आलें. मग त्यांनीं लागलीच त्या उभयतांच्या प्रीति विवाहास दुसरे दिवशींच असलेली ज्येष्ठवद्य १२ ही लग्नतिथी धरिली. आणि सर्व तयारी मी रात्रींतून करितें, असें सांगून सुमेधा राणी माल्यभारे सह परत नगरांत आपल्या स्वस्थानीं गेली.

जेथें नित्य दिवाळी तेथें सणवारीं नवीनवाळ ती कायक-रावयाची? सर्व सिद्धता होतीच. त्या प्रमाणें अस्तमानीं गोरज मुहूर्तावर सावकार पुत्र चंद्रकांत आणि माल्य भारा यांचें लग्न-

मोठ्या आनंद गजरानें लागलें. माल्यभारेचे आईबाप, कन्येस-तिचे मनोदयानुरूप पती प्राप्त झाला ह्मणून अत्यानंद पावले. चाररोज लग्न सोहळा यथास्थित रीतीनें मोठ्यां थाटमाटाचा झाला. गृहप्रवेश होऊन उभयतांचे सर्व मनोरथ पूर्ण जाले. आपला माणदाना धर्मबंधु व प्रिय सखीचा भ्रतार यांस सुमेधा राणीनें अमोल्य वस्त्रें व कांचन मय रत्नभूषणें अर्पण करून राहण्यास संदर महाल दिला. आणि आपल्या कायम राजसंस्थानांतून वर्षास साठ हजारांची जाहागीर त्याचे नावें ताम्रपत्रावर लेख करून विभागुन दिली. शिवाय आपल्या प्रिय सखीस तिच्या इच्छेनुरूप दिव्य वस्त्रालंकार देऊन, शुश्रुषेस दास दासी त्यांच्या नवरव्या सह तोडून दिल्या. इकडे राजपुत्र **कुसुमचापानें** मणिपूर पैकीं आपल्यास प्राप्त झालेल्या एक कोटीच्या राज्या पैकीं एक लक्षाची जाहागीर दिल्या विषयींचें उदक आपल्या मध्वनाथ शुकपक्षी रूप चंद्रकांत प्रिय मित्राच्या हातावर सोडिलें. **वसंत कोकिलेनें** ही आपले कंठांतील अमोल्य नवरत्नाचा हार माल्यभारेस अर्पण केला. अशा आनंदोत्सवांत मागील सर्व दुःखाचा विसर चंद्रकांतास तत्क्षणीच पडला.

मग चंद्रकांताचे इच्छेनुरूप सर्व कार्य सिद्धि करण्यास आपल्या स्वारीची सज्जनता करून **कुसुमचापाकडील** सर्व सिद्ध असलेल्या स्वारी सह वर्तमान चंद्र कांतास बरोबर घेऊन, सुमेधा राणीची स्वारी तेथून पंचवीस कोसांवर, मागें तिसऱ्या अंकांत सांगितलेल्या भारलेल्या प्रदेशांतील अतर्क्य शोभायमान अरण्या रामांत (वनबागेंत) जाऊन दाखल झाली. तेथील मुख्य-राज महालांत दुसरे दिवशीं सर्व जादु कौंटाळ स्त्रियांचा बडा दरबार भरवून त्या बागेंतील स्वापद रूपी सर्व मनुष्यें आणवून समोर उभीं केलीं. मग सुमेधा राणीनें आपला भाऊ चित्रसेन, राज

पुत्र कुसुमचाप, आणि वसंत कोकिला यांच्या जादुविद्यामंत्रानें महान सामर्थ्य त्या स्त्रियांस कळवून त्या पशूंस मनुष्य देह देण्या विषयीं निक्षून आज्ञा केली. त्यांनींही कांहीं हूं चूं न करितां आपल्या अधिकारिणीची आज्ञा तत्क्षणीं मान्य करून मंत्रोच्चारानें त्या श्वापदां वरून वेताच्या छड्या फिरवितांच त्या सर्वांस तत्काल मनुष्य देह प्राप्त झाले; व ते आभार पूर्वक राणी आदीकरून मुख्य सभाजनास साष्टांग प्रणिपात करून आपल्या अक्षय्य मुक्तते विषयीं हात जोडून दीन वाणीनें प्रार्थना करूं लागले. ते एका पेक्षां एक सुस्वरूप तरुण पुरुष असोन, त्यांत कित्येक तर मदन मूर्तीच भासूं लागले. त्या मध्येंच चंद्रकांतानें आपला मेहुणा प्रद्युम्न यास पाहून एकदम उठून जाऊन प्रेमानें त्याचे कंठीं मिठी मारिली. आणि त्याचा हात धरून त्यास सहवर्तमान आपले जागीं येऊन बसला. व बाकीच्या त्या सर्वत्र पुरुषांस राणीनें सभारंगीं मध्यभागीं असलेल्या उत्तम बिछाइतीवर सन्मानानें बसविलें. नंतर भोजनाचे तयारीची वर्दी येतांच अगोदर त्या पुरुषांस मंगल स्नानें घालवून परिधानार्थ उत्तम वस्त्रें देवविलीं. नंतर भोजन वगैरे होऊन स्वारीचा तेथेंच तीन दिवस मुक्काम ठरला. त्या समदुःखी सर्व लोकांस ते तीन रोज मोठ्या आनंदाचे गेले. त्यांत राणीनें त्या प्रत्येकाची विचार पूस करून तशा प्रकारच्या ४२७ लोकांची खालीं दर्शविलेल्या नमुन्या प्रमाणें एक याद तयार करविली.

स्त्री जादूच्या तडाख्यांत सांपडून श्वापद देह पावून बंदिस्थ झालेल्या लोकांच्या हकीकती विषयींची खुलासेवार याद.

| अनुक्रमांक. | नांव | | अधिकार किंवा धंदा. | ठिकाण. | | घरसोडण्याचें कारण. | बंदिस्थ झाल्याची मुदत | | मास झालेला देह. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | स्वतांचें | बापाचें | | गांव. | देश किंवा प्रांत. | | वर्षे. | महिने. | |
| १ | दिक्पाल | चंद्रगुप्त | राजपुत्र | तालीकोट. | कर्नाटक | देशपर्यटण. | २ | २ | हरीण |
| २ | धनशंकर. | चूडामणी. | जाहगीरदारपुत्र. | मांडवी | कच्छ. | तीर्थाटण. | ४ | ३ | रोही. |
| ३ | हिरालाल. | देवीदास. | सावकारपुत्र. | पट्टण. | गुर्जर. | व्यापारोद्देश. | ४ | ८ | कोल्हा |

मग स्वारी परत ढाका शहरास आल्यावर राणीनें सर्व तयारी करवून दुसरे दिवशीं त्या सर्व लोकांस वस्त्र भूषणें व ज्याचे त्याचे स्थिती प्रमाणें रथ,अश्वादि वाहनें देऊन बंदोबस्तासहवार खर्चाच्या पुऱ्या बेगमीनें ज्याच्या त्याच्या ठिकाणास रवाना केलें. पुढें लोकरच समस्तांच्या विचारें चंद्रकांताच्या स्वारीची तयारी होऊन, राजपुत्र **कुसुम चाप** व **वसंत कोकिला**- आणि सुमेधा राणी, यांच्या पायीं चंद्रकांत उतराई पूर्वक डोई ठेवून आपल्या अवंतिका नगरीस जाण्याचा निरोप मागतांना घडणाऱ्या वियोग दुःखानें परस्पर गहिंवरून गेले. तेव्हां राजपुत्र **कुसुम चाप** ह्मणाला हे जीवींच्या जिवलगा चंद्रकांता आतां आह्मीं येथून परत मणिपुरास जाऊन राजा मणिपाल याच्या हेतूनुरूप परजन्य काळ चार महिने तेथें वास्तव्य घडेल. त्या तुझ्या वियोगास उपाय नाहीं परंतु पुढें आह्मीं फणिपूर स्वराज नगरीस येतांना तुला आणावयास सरंजामा निशीं मूळ पाठवूं. त्या समयीं मात्र तूं सर्वत्र मंडळी सहवर्तमान येऊन, या तुझ्या सुखकर भेटीच्या दुर्मिळ लाभानें आह्मांस आनंद द्यावा; हेंच मागणें आ-

हे. याहून विशेष काय सांगूं! याप्रमाणें पृथक् पणें सर्वां-
चा निरोप घेऊन चंद्रकांत आपली भार्या माल्यभारा आणि
शालक मद्यम्म यां सहवर्तमान रथारूढ होऊन निघाला.

इकडे आपल्या साह्य कर्त्या प्रियकराच्या वियोगाचें दुःख
आणि तसेंच त्याचें सर्व प्रकारें चांगलें होऊन तो आपल्या घ-
रीं परत आनंदानें गेल्याचें सुख, हीं दोन्ही एककालीं समस-
मान प्राप्त होऊन **कुसुमचापानें** मणिपुरास परत जाण्या
स सुमेधा राणीच्या निरोपानें दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ढाका
शहराहून आपल्या स्वारीचें कुच केलें. व पूर्वी सांगितलेल्याक्र-
मानेंच मुक्काम दर मुक्काम होत स्वारी मणिपुरास सुखरूप दा
खल झाली.

राजा मणिपाल यानें चातुर्मास्य सर्व राज कारभार जा-
मात **कुसुमचापावर** सोंपवून आपण फक्त सही शिक्क्या-
चा नामधारी अधिकारी होऊन राहिला. या काळांत त्याचें शा-
हाणपण, धूर्तता, न्यायीपणा, दक्षता, धैर्य, शौर्य, गांभिर्य,
भूतदया, इत्या द्यनेक अलौकिक गुणांची सर्वतोमुखीं वाह-
वा होऊन मणिपाल राजामागें हाच आपला अधिपती असा-
वा. असें सर्वांस वाटूं लागलें. हें जाणून संतोष पावून व-
आपल्या पोटीं कायतें **वसंतकोकिला** हें एकच अद्विती-
य कन्यारत्न असोन तिचे भाग्योदयें करून असा गुण नि-
धी ज्यामात आपणास प्राप्त झाला आहे. तस्मात् यासच हें
सर्व राज्य अर्पण करून, आपण स्वस्थ बसोन निश्चिंत मना-
नें परमेश्वर प्राप्तीच्या साधनांत राहिलेलें आयुष्य आनंदा
नें घालवावें; असा राजानें निश्चय केला. ही भूमका सर्व-
राष्ट्रांत पसरून राजा मणिपाळ याच्या सुतास हें हेतूस प्र-
जेच्या मनानें लागलीच आपलें अनुमोदन दिलें. मग अ-

श्वीन शक्कु १ रोजीं राजानें राष्ट्राचा बडा दरबार भरवून आपला मनोभाव सर्वांस प्रगट केला. त्यासमयीं राजा मणिपाल हे आपल्या शिरींचें छत्र नाहींसें होणार ह्मणून सर्वांस जरी वाईट वाटलें, तथापि सद्धर्मरक्षक व पुत्रवत्प्रजाप्रतिपालक, शूर व तसाच दानशूर, विद्वान तसाच सदसत् विचारवान्, आदीकरून सर्वस्व गुणानीं राजपदास योग्य असा राजपुत्र **कुसुमचाप** आपला अधिपती होणार; हें जाणून त्यांस आनंद होत्साता राजाच्या हेतूस सर्वांचें अनुमत पडलें. मग मोठा समारंभ करून विजया दशमीच्या सुमुहूर्तावर राजानें आपल्या हातें **कुसुमचापास** महोत्सवानें राज्याभिषेक करून त्याचे नावें नगरांत व राष्ट्रांत द्वाही फिरविली. अशा प्रकारें करून **कुसुमचाप** मणिपूरच्या पांच कोटीच्या राज्याचा चक्रवर्ती राजा होऊन **वसंतकोकिला** पट्टराणी झाली. असा सर्व प्रकारें करून एककालीं भाग्योदय होण्यास जन्म जन्मांतरींचीच तपश्चर्या पाहिजे, यांत संशय नाहीं. याचें नाव भाग्यवंत॥

पुढें लौकरच श्वशर मणिपाल याच्या विचारें निश्चय ठरून फणिपुराधिपति राजा **कुसुमचाप** यानें आपल्या सत्येंद्रनाथ प्रधानाकडे साहा महिने मुदतीची राज्याची सोपवणूक करून आपले आईबाप, बंधु, आप्त, इष्ट मित्र आदीकरून सर्वांच्या भेटीस फणिपुरास जाण्याकरितां स्वारींची सिद्धता केली. कोणी एरवादा सामान्य प्रतीचाही मनुष्य रोजगार, उदीम, व्यापार वगैरे करितां घर सोडून बाहेर गेल्यावर तिकडे तो कशाहि स्थितींत असो परंतु कांहीं कालावधीनें तो जन्हां आपला मोठेपणा व योग्यता दिसण्याकरितां रास्त पेक्षां जास्त असा थाटमाट डौ-

त्यानें घरिं परत येतो. मग जो मूळचा राजपुत्र असून, जो केवळ आपल्याच हेक्यानें प्रवासास गेला, व तिकडे जो आपल्या पराक्रमानें प्रथम मणिपुराधिपती चक्रवर्ती राजाचा जामात होत्साता पुढें आपल्या शाह्याण पण गुणानीं कर्तृत्वाची मात करून त्या सर्व राज्याचा मालक झाला; त्या मणिपुराधिपति **कुसुमचाप** राजाच्या या आनंद कारक स्वारीच्या आश्चर्य वैभवाचें. व बेत बात बंदोबस्ताचें वर्णन करण्यासच नको.

मग ती राजस्वारी पट्टराणी **वसंत कोकिळा** आणि स्त्री चंद्र प्रभा यां समवेत आपल्या जन्मभूमी फणिपूर नगरीस मोठ्या आनंदानें अल्प काळांतच येऊन पोंचली. आपला ज्येष्ठ बंधु **कुसुमचाप** मणि पूरचें राज्य संपादन करून आल्याचें वर्तमान फणिपुराधीश राजा भुवन सुंदर यास समजतांच, त्यानें मोठ्या समारंभ गजरानें नगरा बाहेर सामोरें जाऊन त्यास राज मंदिरीं आणिलें. **कुसुमचापानें** प्रथम आपल्या आई बापाचे चरणीं मस्तक ठेवून त्यांस आपल्या प्रेमालिंगनानें प्रमोदित केलें. **वसंत कोकिळा** आणि चंद्र प्रभा ह्या आपल्या नूतन दोघी सुना नमस्कार करिताहेत, हें समजून त्यांस त्या सासू सासऱ्यांनीं संतोषानें " सौभाग्यवती पुत्रवती भव " असे आशीर्वाद दिले. सर्व आप्तवर्ग, इष्टमित्र सोयरेधायरे, नागरीक इतर जन हे आनंदानें भेटीस आले. प्रवासांत प्राप्त झालेलीं संकटें व विघ्नें ईश्वर कृपें निवारण होऊन सार्वभौम पद प्राप्तीनें आपल्या प्रिय बंधूचें दीड वर्षानें प्रेम दर्शन झाल्या मुळें, राजा भुवन सुंदरानें आनंदानें अगणित द्रव्य वांटून सर्वत्र याचक जनांस तृप्त केलें. अस्तमान होतांच नगरांत दीपोत्सव होऊन जिकडे तिकडे नृत्य गायनादि आनंद प्रकार सुरू जाले. रात्री समयीं पूर्व गृह पत्नी मालती, वसंत को-

किला आणि चंद्रप्रभा अनुक्रमें गंगा, यमुना आणि सरस्वती त्यांचा, स्त्री विलासमंदिर प्रयाग क्षेत्रीं त्रिवेणी संगम होऊन पुढें अधिकार परत्वें यमुना व सरस्वती ऐक्य भावानें केवळ वरिष्ठ भागीरथी मय होऊन गेल्या. कायतो क्षेत्र महिमा !! आणि कायत्या क्षेत्रस्थ पुण्यवंत कुसुमचापाचें धन्यभाग्य !!!

आपण फणिपुरास दाखल होण्या पूर्वी मार्गांतूनच परभारें कुसुमचापानें आपल्या चंद्रकांत मित्रास उज्जनी हून (अवंतिका.) घेऊन येण्या करितां आपल्या एका सरदारास लवाजम्यानिशीं पाठविलें होतें. त्याप्रमाणें चंद्रकांत आपल्या दोघी स्त्रियांसह थोड्या दिवसांतच फणिपुरास येऊन दाखल झाला. कुसुमचाप आणि वसंतकोकिला त्या आपल्या आश्रय दात्यांच्या चरणीं चंद्रकांतानें मस्तक ठेऊन परस्पर आनंदानें भेटी जाल्या. राजा भुवनसुंदरानें ही त्याचा योग्य सन्मान ठेविला.

मग लौकरच एके दिवशीं राजा भुवनसुंदरानें दरबारच्या सर्व राजकीय लोकांसह नागरिक जनांची एक मोठी सभा सर्वांच्या इच्छेनुरूप भरवून तींतील अध्यक्ष स्थान चंद्रकांतास दिलें. आणि सभांगणीं स्वतः उभा राहून त्यानें आपला भाऊ कुसुमचाप याच्या प्रवासाचा सकल वृत्तांत कथन करण्यास आरंभ केला. त्यांत प्रथम मच्छनाथ शकपक्ष्याचा पडलेला योग; पुढें फणिपूर सोडून प्रवासास जाण्याचा त्याचा उद्देश; बाहेर न पडण्या विषयीं त्यास मच्छनाथाचा उपदेश; घर सोडून प्रवासास निघुन गेल्यावर मणिपुरास पोंचे तों पर्यंत मार्गांत जादुसंबंधानें त्याजवर आलेलीं संकटें, तशींच प्राप्त झालेलीं विघ्नें, अडथळे, अरिष्टें व दुर्दैवें व त्यांतून त्याच्या निभावणीचे प्रकार; त्याच्या साह्यकर्त्या मच्छनाथाचे त्या साठीं नाना प्रकारचे परिश्रम; प्रधान त्यादुमंत्रानें भारलेल्या तारनाची प्राप्ती व त्याच्या प्रभा-

वें करून झालेली बंदमुक्तता; पुढें मणिपुरास पोंचल्यावर व- **संत कोकिला** हें राजकन्यारत्न जादुगारानें उठवून नेल्याचें- समजून तत्संबंधानें त्यास घडलेली दुर्निवार स्थिति; तेथील- मणिपाल राजाचें त्याजवर जडलेलें प्रेम; पुढें त्या जादुगाराशीं झालेला सामना, त्या मंत्र तार्इताच्या सामर्थ्यें करून जादुगाराचा पराभव; राजकन्या **वसंत कोकिला** इजसहवर्तमान त्याचा- आनंदानें मणिपूर नगरींत प्रवेश, व राजा व राणी यांचा आनं- द; पुढें **वसंत कोकिलेशीं** मनोदयानुरूप त्याचा विवाह, व तत्संबंधानें घडलेला सोहळा; राजा मणिपाल श्वशूर या- जकडून त्यास प्राप्त झालेली जाहागीर व ऐश्वर्य; **वसंत को- किला** स्त्री प्राप्त होऊन हेतूची पूर्णता; जादुगार कन्येशीं त्याचा दुसरा विवाह; पुढें आपल्या हित व साह्यकर्त्या मछनाथ शु- कास मनुष्यदेह प्राप्त करून देण्या विषयींचा विचार, व तत्सं- बंधानें ढाका शहरावर स्वारी; तेथील अधिकारिणीच्या कर्तृ- त्वानें मछनाथास मनुष्य देहाची प्राप्ती व त्याचा मात्यभारे- शीं विवाह; चंद्रकांत (मछनाथ) याच्या एकट्या बंदिस्थ मेहुणया साठीं श्वापद देह प्राप्त झालेल्या आणखी ४२७ लोकांची मुक्तता; चंद्रकांताचे त्यांच्या अवंतिका स्वनगरीस गमन; **कुसुमचापाचें** मणिपुरास परतणें व चातुर्मास्य ते- थें वास्तव्य होऊन तेथील राजपदीं त्याची स्थापना; तेथुन- प्रस्तुतचें त्याचें फणिपुरास झालेलें आगमन; व संकल्पानु रूप चंद्रकांताचें येणें; इत्यादि विषयींचा शृंगार, वीर, करुणा, अद्भुत, भयानक आणि हास्य या साहा रसांनीं योग्य अशा अ- स्खलित व सुरस भाषणानें साकल्य वृत्तांत कथन करून आ- पले स्थानीं बसला. हा सर्व अघटित वृत्तांत ऐकून आणि तोच शु- क देही मछनाथ सांप्रत अध्यक्ष स्थानीं बसलेला चंद्रकांत आ-

हे असें समजून सर्व सभाजन थक्क होऊन बंगाली जादुविद्येच्या सामर्थ्याचा विस्मय करूं लागले.

त्याच रात्रीं कांचनमय आरसे माह्यालांतील मुख्य दिवाणखान्यांत मालती, **वसंत कोकिला**, आणि चंद्रप्रभा त्या त्रिवर्ग भार्या एकत्र बसल्या असल्याची संधी राखून चंद्रकांतास बरोबर घेऊन **कुसमचाप** अकस्मात तेथें गेला. तों त्या तिघीही चपापुन एकदम उभ्या राहिल्या. हें पाहून **कुसमचाप** ह्मणाला, त्या उत्थापन सन्माना पेक्षांही हा त्रिवेणी संगम अति संतोष कारक आहे. असें ह्मणून आपण त्यांजसमोरील एका मंचकावर चंद्रकांतासह बसून त्यांस त्यांसही त्यांचे जागीं बसविलें.

**कुसमचाप**:- हा मालती पुष्पाचा सुगंध, हा **वसंत कोकिलेचा** मधुर ध्वनी आणि ही चंद्राची प्रभा हीं तिन्ही ही प्रियच आहेत. परंतु हे प्रियसखे मालती ? तुझा सुवास, त्याचा-सहवास घडविण्यास मुख्य कारण आहे, तस्मात तुजकडेच श्रेष्ठत्व येतें. इकडे पहा हा मज शेजारीं कोण बसला आहे यास तूं ओळखिलें ?

**मालती**:- (हळूच) मेलि नाहीं तीच थट्टा करायची. ओळखीचा तो काय संबंध ? असतील कोणी तिकडील आपले स्नेही.

**कुसमचाप**:- ओळखीचा तसा संबंध आहे ह्मणुनच विचारिलें. एरव्हीं या अशा एकांत स्थलीं दुसरा कोण येउं पावणार आहे ? मला पुरतें ठाऊक आहे कीं, तुझी याजवर पूर्वीं अति प्रीती असतां पुढें ती नष्ट झाली आहे. याहून-स्पष्ट काय सांगूं ?

**मालती**:- (चपापुन) मला तर बाई या बोलण्या-

चा कांहींच अर्थ समजत नाहीं. कोणा दुष्टानें काय मनांत भरविलें असेल तें असो. मी तर त्या पायांच्या एका प्रीती शिवाय दुसरें कांहींच जाणत नाहीं. (असें ह्मणून धामाधुम होते.)

वसंतकोकिला:- बाई, उगीच भलताच तर्क करून घाबरायास नको. इकडील हें सर्व संदिग्ध बोलणें केवळ विनोदार्थ असल्या विषयींचा रोख दिसत नाहीं काय? अशाच कांहीं गूढ भाषणानें दुसऱ्यास व्यर्थ घोंटाळ्यांत घालण्याचा नेहमीचा देह स्वभावच.

कुसुमचाप:- हा वेडे! सहज गोष्टींत भलताच अर्थ मनांत आणून व्यर्थ श्रमावें हेंच का शाहाणपण? अगे हा आपला तो निस्पृह व सत्यवादी मध्वनाथ शुक पक्षी. (मग त्यानें आपलें इत्थंभूत प्रवास वृत्त कथन करून) आतां तरी याची ओळख पटून मी ह्मटलें तें खरें आहेसें वाटतें?

चंद्रकांत:- (उठून मालतीच्या पायीं नमस्कार करून.) मातोश्री, या आपल्या मध्वनाथ रूपी चंद्रकांत सेवकावर पूर्णकृपा दृष्टीनें आपले अखंड प्रेम राह्मो. हेंच आतां मागणें या पायां जवळ आहे. (असें बोलून अपरात्र जाल्यामुळें आपल्या महालांत गेला.)

अशा प्रकारें करून आनंदांत पांच चार महिने फणिपुरास वास्तव्य होऊन राजा कुसुमचाप चंद्रकांत मित्रास बरोबर मणिपुरास घेऊन जाऊन त्यानें आपल्या कृत संकल्पानुरूप त्यास एक लक्षाची जाहागीर तोडून दिली. पुढें अल्प कालांतच राणी वसंतकोकिला, मालती आणि चंद्रप्रभा त्या तिघींस ही तीन पुत्र होऊन आनंद झाला. पुढें मणिपूर आणि फणिपूर हा हमेश जाण्या येण्याच्या संबंधानें अगदीं पायदळीं तला मार्ग होऊन गेला. या प्रमा-

यों चंद्रकांत मित्रासह सर्व कुटुंब सह परिवार राजा कुसुम चाप आनंदांत बसून मणि पूरचें उत्तम प्रकारें राज्य करूं लागला.

कं. स. रि.

---

# समाप्त.